17-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SGJ/ 10:00

17-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

SGJ/ 10:00

17-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1

SGJ/ KGS/ MMP/ 10:00

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

**पृ.शी.**: पावसाअभावी तसेच बियाणे व खते यांचे नियोजनबध्द पध्दतीने वाटप न झाल्याने शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका

**मु.शी.**: पावसाअभावी तसेच बियाणे व खते यांचे नियोजनबध्द पध्दतीने वाटप न झाल्याने शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, जयंत प्र. पाटील व दिवाकर रावते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु...

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे भाषण काल अपूर्ण राहिले होते ते त्यांनी सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, कालपासून सभागृहात दुष्काळाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे असे असतांना माननीय कृषी मंत्री काल दिल्ली येथे गेले होते असे आम्ही वर्तमानपत्रात वाचले आहे. सन्माननीय कृषी मंत्री दिल्ली येथे गेले होते यासंदर्भात खालच्या सभागृहात सुध्दा चर्चा झालेली आहे. या ठिकाणी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील उपस्थित आहेत. त्यांच्या कामकाजाच्या संदर्भात मला काही बोलावयाचे नाही. परंतु भाजपच्या कार्यकर्त्यांवर चुकीचे गुन्हे दाखल का होत आहेत हे आम्हाला तरी समजून येत नाही.

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल प्रश्नच येत नाही. कर्जमाफीच्या पॅकेजमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे हे सर्वांना मान्य आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांचे वस्त्रहरण करणे हा माझा उद्देश नसतो परंतु सरकारचे वस्त्रहरण करणे हे विरोधी पक्षाचे काम आहे. विरोधी पक्षाला विरोधी पक्षाचे काम करावे लागत असते. आज या ठिकाणी शेतक-यांच्या विषयावर चर्चा होत आहे परंतु कृष्णा खो-यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे, नांदेड शहरात होऊ घातलेल्या गुरु-ता गद्दीच्या कामामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे, आदिवासी विभागामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे, सहकार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

खात्यामध्ये सुध्दा भ्रष्टाचार आहे, साता-याच्या महिला क्रेडीट सोसायटीमध्ये 6 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.

सभापती महोदय, मी शेतक-यांच्या प्रश्नासंदर्भात प्रामाणिकपणे माझे विचार मांडीत असतो. शेतक-यांचे प्रश्न सुटावेत यासाठी आपण सर्वांनी एक होऊन प्रयत्न करावे यामताचा मी आहे. प्रत्येकाने आपापला विषय आपापल्या पध्दतीने रेटावयाचा असतो, वाचा फोडावयाची असते. केवळ उणीधुणी काढून हा प्रश्न सुटणार नसून सर्वांनी एकत्र आल्यावरच हा प्रश्न सुटू शकेल. मी आकसाने कधीही बोलत नाही परंतु काही वेळेला भावना उद्वेग झाल्यामुळे काही गोष्टी बोलल्या जातात परंतु उत्स्फुर्त प्रतिक्रियेमुळे असे होत असते. कालच्या भाषणात देखील मी शेतक-यांच्या पॅकेजमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्यासंदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. शेतक-यांच्या पॅकेजमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्यासंदर्भात माननीय विधानसभा अध्यक्षांना सुध्दा मी पत्र दिलेले आहे. शेतक-यांच्या पॅकेजमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्यासंदर्भात आपण कोणीही दखल घेतलेली नाही त्यामुळे मी फार व्यथीत झालेलो आहे. शेतक-यांचे पॅकेज हा विषय माझ्या दृष्टीने फार महत्वाचा आहे. त्यामुळे ज्या अधिका-यांनी शेतक-यांच्या पॅकेजमध्ये भ्रष्टाचार केलेला आहे, ज्यांनी शेतक-यांच्या टाळूवरील लोणी खाल्ले आहे, त्यांच्या घरावर नांगर फिरवला पाहिजे, असेही मी काल सांगितलेले आहे. ऑडिटर जनरल यांनी शेतक-यांच्या पॅकेजमध्ये जो भ्रष्टाचार झालेला आहे त्याला वाचा फोडलेली आहे. शेतक-यांचे पॅकेज हे माननीय पंतप्रधानानी दिलेले असतांना ते हडप करण्यात आलेले आहे. आज आपण सावकाराच्या विषयावर बोलतो परंतु सावकाराचा विषय हा तेवढा सोपा नाही परंतु सावकाराच्या विषयावर बोलणे सोपे आहे

.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 10.05

श्री.दिवाकर रावते..

या अधिका-यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात मी काल उल्लेख केला होता तेव्हा माननीय मंत्री महोदयांच्या भाषणात या संदर्भात ठोस असे उत्तर दिले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.शेतक-यांच्या बाबतीत जर आपण अशा पध्दतीने वागलो तर सरकार आपल्याविरुध्द कारवाई करील आणि आपल्याला माफ करणार नाही अशा प्रकारचा संदेश खालपर्यत जाईल. कृषी अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात काय बोलावयाचे ? मी कालसुध्दा वर्णन केले होते ज्यावेळी मी बिहारमध्ये काम करीत होतो त्यावेळी तेथील लोक मला असे सांगत होते की," यहॉ पर गुप्त सरस्वती बहती है ." असे सांगून ते मला त्या ठिकाणी घेऊन जावयाचे. तेथे गेल्यानंतर तीन चार फुटावर पाणी असल्याचे दिसून यावयाचे. तशा प्रकारे भ्रष्टाचाराचा गुप्त लक्ष्मीचा वास या कृषी खात्यामध्ये असल्याचे दिसून येतो. हे कृषी अधिकारी कसा भ्रष्टाचार करतात, किती भ्रष्टाचार करतात हे कोणालाही कळत नाही. बाकीच्या अधिका-यांनी केलेला भ्रष्टाचार दिसून तरी येतो परंतु कृषी अधिका-यानी केलेला भ्रष्टाचार दिसत नाही.

एखाद्या पाटबंधारे विभागातील अधिका-याने धरण बांधले व ते फुटले असेल तर त्यात भ्रष्टाचार झाला असल्याचे दिसून येते सहकार खात्यातील अधिका-यांनी केलेला भ्रष्टाचार दिसून येतों कारण त्या कागदपत्रावर त्या अधिका-याच्या सहया असतात. परंतु कृषी अधिका-यानी केलेला भ्रष्टाचार कोणालाही कळत नाही. मध्यंतरी माननीय पंतप्रधानांनी जे कृषी पॅकेज जाहीर केले होते ते पॅकेजच या अधिका-यांनी संपूर्णपणे खाऊन टाकले आहे. त्यामुळे त्या अधिका-यांनी कसा भ्रष्टाचार केला हे आपण समजून घ्यावे. त्यांनी कृषी पंप कसे घेतले आणि परत कसे दिले ? हे आपण समजून घेतले पाहिजे. काल या संदर्भात बोलत आसतांना सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की हे पंप कृषी अधिका-यांनी शेतक-यांच्या गळयात मारले आहेत. एखाद्या शेतक-याला पंप नको असेल आणि त्या ऐवजी दुसरी वस्तू हवी असेल तर ती दिली जात नाही. त्या शेतक-याला पंप घेण्याच्या बाबतीत आग्रह केला जातो व त्याच्या गळयात पंप मारला जातो. या चर्चेच्या निमित्ताने मला आणखी एक गोष्ट या ठिकाणी मांडावयाची आहे.ती गोष्ट मी या पूर्वी मांडलेली आहे. अर्थात एखादी गोष्ट या अगोदर माडलेली असतांना परत परत तीच ती गोष्ट मांडणे मला योग्य वाटत नाही. बोलावयास दुसरे काही नवीन मुद्दे नसल्यामुळे तेच ते मुद्दे पुन्हा मांडले जातात अशातला तो प्रकार असू शकतो. एकदा मांडलेला मुद्दा पुन्हा मांडावयाचा असा माझा

2..

श्री.दिवाकर रावते..

स्वभाव नाही. या अगोदर सांगितले असतांनासुध्दा मी पुन्हा एकदा ते सांगू इच्छितो. माननीय पंतप्रधानांच्या पॅकेजमधून शेतक-यांना बैलजोडी देण्यात येणार असून ती बैलजोडी त्या शेतक-याला हवी आहे असे असतांना अधिकारी त्याला सांगतात की , "तू बैलजोडी घ्यावयाची नाही तर आम्ही जी वस्तू देऊ तीच घेतली पाहिजे.". वणी येथील एका शेतक-याने सांगितले की," मला बैलजोडी देण्यात यावी त्याकरता मी माझा दहा टक्याचा जो काही शेअर असेल तो भरण्यास देखील तयार आहे." परंतु संबंधित अधिका-याने त्या शेतक-याला असे सागितले की, " तुला बैलजोडी मिळणार नाही.". बैलजोडी मिळाली नसल्यामुळे या शेतक-याने आत्महत्या केली होती. त्यानंतर त्याच्या कुटुंबियांना एक लाख रुपये मदत देऊन शासन मोकळे झाले परंतु त्या शेतक-याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणा-या अधिका-याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला नाही ही उद्वीग्न करणारी भावना आहे. त्या शेतक-याने आत्महत्या केल्यानंतर सबंधित अधिका-याविरुध्द आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दलचा गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता परंतु तो दाखल केलेला नाही जर तो गुन्हा दाखल केला असता तर पोलिसांनी त्यासबंधीची माहिती घेतली असती,शोध घेतला असता, परिस्थिती पाहिली असती, संबंधित व्यक्तीच्या जाब जबाब घेतले असते. अशा प्रकारे पोलिसांनी आपले काम केले असते परंतु आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दलचा गुन्हा त्या अधिका-याविरुध्द दाखल केलेला नाही. हा अधिकारी कृषी विभागातील आहे त्याच्या विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला नाही हा त्या खात्याचा गुन्हा आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत मी त्यांना विनंती करतो की ही घटना होऊन आठ दहा महिने होऊन गेलेले आहेत तेव्हा वणी येथील ज्या शेतक-याला बैलजोडी हवी होती व ती न दिल्यामुळे त्या शेतक-याने आत्महत्या केली होती तेव्हा आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल संबधित अधिका-याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा . असे जर करण्यात आले तर खालपर्यन्तच्या अधिका-यामध्ये असा संदेश जाईल की, सरकार आपल्याला माफ करणार नाही . अशा प्रकारे जर त्या अधिका-याविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला तर पोलीस त्या संबंधी चौकशी करतील. तेव्हा अशा प्रकारचा गुन्हा त्या अधिका-याविरुध्द नोंदविण्यात यावा अशी मी माननीय उपमुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा व्यक्त करतो.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने खताच्या टंचाईचा उल्लेख करण्यात आला होता. राज्यात पाऊस न पडल्यामुळे पाण्याचे नियोजन केले पाहिजे, चा-याची व्यवस्था केली पाहिजे व दुष्काळ जाहीर केला पाहिजे अशी मागणी शेतकरी करीत आहेत असे मी काल म्हणालो होतो. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय महसूल राज्य मंत्री उपस्थित आहेत. मध्यंतरी असे सागितले गेले की, आणेवारी विचारात घेऊन दुष्काळ जाहीर करण्यात येईल. असे सांगितल्यामुळे लोक वेडयात काढतील. पाऊस न पडल्यामुळे पेरण्या झालेल्या नाहीत आणि पेरण्या न झाल्यामुळे उगवण झालेली नाही. उगवण न झाल्यामुळे आणेवारीचा प्रश्नच येत नाही. आणेवारी पाहून नंतर दुष्काळ जाहीर करु अशा प्रकारे माननीय महसूल मंत्र्यानी जाहीर निवेदन केलेले असल्यामुळे लोक टींगल करतात. थट्टा मस्करी करतात . ते केवळ माननीय मंत्री महोदयाची टिगल करतात असे नाही तर सरकारचीसुध्दा करतात. आम्ही शेतक-यांचे पूत्र आहोत आणि त्यांना जर आणेवारीचा विषय समजत नसेल तर ते केवळ वेळ मारुन नेतात काय असे शेतक-यांना वाटते व त्यातून गंभीर विषय निर्माण होत असतो . त्या संदर्भात वर्तमानपत्रात बातमी आली होती की आणेवारी पाहून नंतर दुष्काळ जाहीर करण्यात येईल. अशा प्रकारे जर सांगण्यात आले असेल तर त्याबाबतीत योग्य तो खुलासा करण्यात यावा.असे मला सांगावयाचे आहे. मंत्री मंडळाने टंचाईच्या संदर्भात निर्णय घेतला आहे. टंचाई घोषित केल्यानंतर त्यापुढची पावले दुष्काळाच्या संदर्भातील असतात हे आम्ही देखील समजू शकतो. खताच्या बाबतीत टंचाई निर्माण झाल्यामुळे गंभीर स्थिती उद्‌भवली होती परंतु हा विषय आता थंडावला आहे काय ? सध्या तर पाऊसच पडत नाही. पाऊस न पडल्यामुळे पेरणीचा प्रश्न येणार नाही तेव्हा खत कशाला लागणार आहे ? त्यामुळे खताचा विषय लांबवर गेलेला आहे परंतु त्यावेळी जर वरुण राजा बरसला असता आणि शेतक-याला जर पेरणी करावयाची असती तर त्याला खताची आवश्यकता होती. शेत नांगरुन तयार आहे, पेरणी करावयाची आहे अशा वेळी त्या शेतक-याला खताची गरज होती परंतु ते न मिळाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला होता. त्याबाबतीत मी काल वाचून दाखवले होते की , "माननीय मुख्यमंत्र्यांच्या लातूर जिल्हयात खताची अभूतपूर्व खताची टंचाई होती . त्यामुळे शेतक-यांनी जाळपोळ केली होती. नांदेड, देगलूरच्या शेतक-यांनी खतासाठी . रास्ता रोको आंदोलन केले होते

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रावते ...

हिंगोलीमध्ये वसमत, सेनगाव शेतकऱ्यांनी इतरत्र खत घेऊन जाणाऱ्या गाड्या अडविल्या. परभणी, देठना, पेडगाव येथे खतासाठी शेतकऱ्यांनी केलेले उग्र आंदोलन, पोलिसांचा आंदोलकांवर लाठीमार, उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये खतासाठी शेतकऱ्यांनी केलेली दगडफेक. सभापती महोदय, इतक्या या साऱ्या बातम्या असताना, शेवटी पोलिसांना यावे लागले आणि पोलिसांना पोलीस ठाण्यांतून खताचे वाटप करावे लागले. आता आमचे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील म्हणतील की, आमच्या पोलिसांनी आता हेही काम करायचे का ? कायदा व्यवस्थेचा विषय पोलिसांचा असताना पोलिसांनी आता खत वाटप करण्याचेही काम करायचे का ? खरे तर पोलिसांनी हे काम करणे हे बेकायदेशीर होते. परंतु प्राप्त परिस्थितीमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याच्यादृष्टीने पोलिसांनी हेही काम केले. मग माझा असा प्रश्न आहे की, खताची टंचाई असताना, जे काही खत आपल्याकडे आले आहे ते समप्रमाणात सर्वांना वाटले गेले पाहिजे, पाच बॅगा आल्या असतील तर प्रत्येकाला एक बॅग याप्रमाणे वाटणी केली पाहिजे आणि आपण असेच सर्वत्र वाटप करीत असतो. मग आपल्या जिल्ह्यामध्ये खत आलेले असताना, एक तर खत कमी आले. मग ते किती कमी आले तेही मी काल येथे वाचून दाखविले आहे. मी या संदर्भात सगळ्या जिल्ह्यांमध्ये गेलो होतो आणि तेथील व्यापाऱ्यांशी, शेतकऱ्यांशी देखील बोललो आहे. व्यापाऱ्यांची परिस्थिती काय आहे तेही येथे मांडण्याचा मी काल प्रयत्न केला. त्या काळात गोदामे सगळी खाली होती. गोदामे भरलेली असती तर या अशा परिस्थितीत 1972 सालात झाले त्याप्रमाणे शेतकऱ्यांनी ती फोडून लुटली असती. नांदेड मध्ये बी-बियाणांचा दुष्काळ जाहीर झाला. बियाणे उपलब्ध होत नाहीत असे जाहीर झाले आणि आमच्या तेथील जिल्हा प्रमुखाच्या जेव्हा लक्षात आले की, जिल्ह्यातील दुकानदाराकडे भरपूर बी-बियाणे आहे. तेव्हा जिल्हा प्रमुखांनी त्या दुकानदाराचे दुकान तोडले आणि शेतकऱ्यांची रांग लावून त्या दुकानात होते नव्हते तेवढे सगळे साठा केलेले बियाणे शेतकऱ्यांना वाटले. अर्थात पैसे घेऊन बियाणे शेतकऱ्यांना दिले गेले. नशीब हे की, त्या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. अर्थात अशा प्रकरणी गुन्हा दाखल केला गेला असता तरी हरकत नव्हती. पण आमच्या जिल्हा-प्रमुखाला हे करावे लागले. त्यामुळे सर्वांसमोर तो व्यापारी उघडा पडला. आमचे माननीय सहकारी राज्यमंत्री श्री.दांडेगावकर साहेबांना हे प्रकरण माहिती असेल. तेव्हा सांगण्याचा मुद्दा हा की, ही परिस्थिती खताच्या बाबतीत नव्हती अन्यथा शेतकऱ्यांसाठी

.... सी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

ती गोदामे फुटलीच असती. खत आलेच नाही. मग अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली की ज्यामुळे खत आपल्याकडे आलेच नाही वा येऊ शकले नाही ? या संदर्भात आम्ही वर्तमानत्रातून आपल्याकडील बातम्या वाचत होतो. त्यात काहीही कारणे दिली जात होती. राजस्थान मधील गुज्जरांचे आंदोलन किती दिवस चालले ? कधी झाले ? आपल्याकडे खत केव्हा यायला पाहिजे होते ? त्याचे नियोजन काय असायला पाहिजे होते ? आपण गेल्या अधिवेशनातील शेवटच्या आठवड्यात मंगळवारी आम्ही हा प्रश्न सभागृहात उपस्थित केला असता आदरणीय मुख्यमंत्री म्हणाले की, मी दोन दिवसात याबाबत निवेदन करतो. हे सारे रेकॉर्डवर आलेले आहे. माननीय उपमुख्यमंत्री देखील तेव्हा येथे उपस्थित होते. पण दोन दिवसांनी याबाबत येथे निवेदन झालेच नाही. त्यामुळे दोन दिवसात अधिवेशन संपणार असल्याने आम्ही, मी आणि माननीय फुंडकर भाऊंनी गुरूवारी हा प्रश्न पुन्हा सदनात उपस्थित केला. त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, यासाठीचे पैसे भरायचे राहिले होते ते साडेतीनशे कोटी रूपये भरण्याची व्यवस्था आम्ही कालच करीत आहोत. म्हणजे सहा राज्यांचे पैसे भरले गेले होते आणि आता आपण पैसे भरत असल्याने आपला नंबर 7 वा राहणार आहे. हे जसे आम्हाला येथे तेव्हा कळले तेव्हा मिश्रखताचाही विषय निघाला असता माननीय कृषी मंत्री उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, आम्ही मिश्रखत बंद करणार आहोत. त्यावर मी त्यांना विचारले की, कशासाठी आपण मिश्रखते बंद करणार आहात ? पण हा विषय तेवढ्यावरच थांबला. मग मी या विषयाच्या खोलामध्ये गेलो. तेव्हा मला काही गोष्टी समजल्या. त्यात केंद्र सरकारकडून राज्यांची जी या संदर्भात गरजेनुसार मागणी आणि त्यानुसार केला गेलेला पुरवठा याचा सारा हिशोब मला मिळाला आहे. 2005-06, 2006-07, 2007-08 आणि 2008-09 या संपूर्ण कालखंडामध्ये खतांच्या मागणीमध्ये फार मोठी वाढ झालेली नाही. 2005-06 मध्ये खरीपाकरिता 114.39 मे.ट.ची मागणी होती ती 2006-07 मध्ये 127.08 ची झाली आणि 2007-08 ला 131.68 ची झाली आणि या वर्षी म्हणजे 2008-09 साठी 137.11 ची मागणी झाली. आणि डीएपीची जी रिक्वायरमेंट आहे, त्याबाबत कालही येथे असे सांगण्याचा प्रयत्न झाला की, ती मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परंतु डीएपीची गेल्या वर्षीची मागणी ही 40.08 होती. याची क्वांटिटी लाखामध्ये आहे. ती वाढून 42.75 एवढीच झालेली आहे म्हणजे केवळ 2 लाखांनी मागणी वाढली आहे. सभापती महोदय, या खताच्या संदर्भात आपल्या राज्यामध्ये

..... सी 3 ...



KBS/MMP/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 10:10

श्री. रावते ....

जो काही गोंधळ चालू होता, गोळीबार आंदोलने वगैरे चालू होती तेव्हा आपल्या खासदारांनी देखील पार्लमेंटमध्ये हा विषय उपस्थित केला होता. त्यावर केंद्रीय मंत्री श्री.रामविलास पासवान यांनी अधिकृतरित्या एक निवेदन जाहीर केले की, आम्ही 4 लाख मे.टन डीएपी महाराष्ट्राला पाठविलेले आहे आणि ते त्यांना पोहोचलेले आहे. त्यामुळे खताच्या बाबतीत अशी काही परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झाली असेल तर त्याला तेथील राज्य सरकारच सर्वस्वी जबाबदार आहे. सभापती महोदय, केंद्रीय मंत्र्यांकडून खुलासा करणारे निवेदन झाल्यानंतर आपल्या राज्य सरकारकडून त्यावर काहीही खुलासा आलेला नाही. म्हणजे केंद्रीय मंत्र्यांचे ते निवेदन बरोबर होते. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... डी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/ 10:15

श्री. दिवाकर रावते...

आंदोलनाचे कारण आपण कशासाठी सांगता? आपल्याकडे खत कोठून आले? परदेशातून येणाऱ्या खताची महाराष्ट्राची कन्साईनमेंट असेल तर ते महाराष्ट्राला मिळते. अशाप्रकारे परदेशातून आलेले खत मुंबईच्या बंदरामध्ये अडकले, रेल्वेने आणावयाचे म्हटले तर रेल्वेच्या वाघिणी मिळत नाहीत असे कारण सांगितले जाते. माजी केंद्रीय मंत्री श्री. सुरेश प्रभू यांचे पूर्ण पत्र मी आपणास वाचून दाखविले नाही. ते संबंधित खात्याचे मंत्री होते. त्यांनी माननीय पंतप्रधानांना 2006 मध्ये पत्र लिहिले. त्यामध्ये त्यांनी "Encrochment upon your valuable" अशाप्रकारचे उत्कृष्ट शब्द आपल्या पत्रामध्ये वापरले आहेत. माननीय पंतप्रधानांचा प्रत्येक सेकंद किती महत्वाचा आहे हे मला माहीत आहे. तरीसुध्दा मी आपल्या वेळेवर अधिकृतरित्या "एन्क्रोचमेंट" म्हणजे अतिक्रमण करीत आहे, याकडे आपण लक्ष द्यावे. महाराष्ट्र राज्यामध्ये असे काय घडले? महाराष्ट्रामध्ये खताची वहातूक करण्यासाठी रेल्वेच्या वाघिणी उपलब्ध होणार नाहीत असे सांगण्यात आले. बंदरामध्ये गहू आला असल्यामुळे बंदरामध्ये सुध्दा खत उतरविण्यासाठी जागा उपलब्ध नाही. याकडे आपण जरा लक्ष द्यावे. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाकडे आपण जर तातडीने लक्ष दिले नाहीतर हा प्रश्न अधिक गंभीर होईल. अशाप्रकारे त्यांनी माननीय पंतप्रधानांच्या निदर्शनास आणले. त्यावेळी आपणास मला सांगता येणार नाही की, असे कां घडले? सभापती महोदय, मी सुध्दा रेल्वे खात्याला माझे वैयक्तिक पत्र लिहिले असून ते पत्र अजून त्यांच्याकडे पोहोचले नाही. त्यामध्ये मी म्हटले आहे की, महाराष्ट्रासाठी आपण किती रेक्स मागविल्या ते सांगा? फक्त सहा रेक्स मागविल्या होत्या. त्याकरिता आपण आंदोलनाचे कारण सांगितले. मी हे अधिकृतरित्या सभागृहात बोलत असून त्याचे रेकॉर्ड होत आहे. त्या आंदोलनामुळे राज्याला मिळालेल्या फक्त सहा रेक्स अडल्या गेल्या, बाकीच्या नाहीत. बाकीच्या तुम्ही वळण घेऊन आणल्या म्हणून सांगितले. ठीक आहे, त्याकरिता आठ दिवसांचा विलंब झाला असता. परंतु तशाप्रकारे सुध्द रेक्स आल्या नाहीत. शेवटी शेतकऱ्यांसाठी असलेली इच्छाशक्ती आपल्यामध्ये असावी लागते. ती माननीय कृषी मंत्र्यांमध्ये दिसली नाही. माझ्याजवळ माननीय कृषी मंत्र्यांचे निवेदन असून मी ते वाचणार आहे. मी ते निवेदन काल याठिकाणी वाचून दाखविले नाही. आपल्या राज्याची खताची गरज किती आहे, आणि आपल्याला किती मिळाले? याकरिता मी सर्वत्र जिल्हयामध्ये फिरलो, सर्वांशी चर्चा केली आणि माझ्या निदर्शनास काही बाबी आल्या. त्याबाबतचे रेकॉर्ड माझ्याजवळ



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे, ते मी माननीय कृषी मंत्र्यांना देईन. याबाबत माहितीच्या अधिकाराखाली मी माहिती उपलब्ध करुन घेईन त्यावेळी आपणावर हक्कभंग दाखल करण्याची मुभा मला मिळेल.

सभापती महोदय, जून महिना संपल्यानंतर सुध्दा या राज्यात गरजेपेक्षा 30 ते 35 टक्क्यापर्यंत आपल्याकडे खत उपलब्ध होते. आपल्याकडे खत मुबलक प्रमाणात असतांना खताची कमतरता होती असे आपण सांगू नका. त्याबाबत आंदोलन झाल्यानंतर पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला. शेतकऱ्यांना हवालदिल करणारी ही घटना गंभीर स्वरुपाची होती. खत निर्मितीच्या बाबतीत याठिकाणी सांगितले गेले की, 70 टक्के खताची निर्मिती महाराष्ट्र सरकारच्या कारखान्यामधून होते. असे असतांना तुम्ही खताची निर्मिती कां केली नाही? याचे कारण सरळ आहे की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ आणि कर्जमाफी यांची सांगड आपण कशासाठी घालता? या संबंधात शासनाची तेवढी हिंमत असेल तर फसवा फसवी किती करावयाची ते सांगा. त्याबाबतची आकडेवारी मी आज मांडणार नाही. आपल्याकडील संपूर्ण खत हे परदेशातून येते. त्यामध्ये फक्त सल्फेट हे खत राजस्थानमधून मागविण्यात येते. याबाबत राजस्थानच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्याला सांगितले की, माझ्या राज्यातील शेतकऱ्यांना दिल्यानंतर मी इतर ठिकाणी हे खत पाठवीन. सभापती महोदय, टीका करणे सोपे असते. त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे शेतकऱ्यांकरिता असलेली इच्छाशक्ती आपणास पहावयास मिळते. दुसरी इच्छाशक्ती मी भाषणाच्या शेवटी सांगेन. त्याचवेळी परदेशातून येणाऱ्या खताचे भाव प्रचंड वाढले. त्याबाबत मी आपणास दोष देणार नाही, तो केंद्र सरकारचा विषय आहे. त्यामुळे खतासाठी अर्थसंकल्पामध्ये पैसे उपलब्ध झाले नाही.

( यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

त्यामुळे खत येण्यास उशीर झाला. त्यात अजून सर्व बंदरे भरलेली होती. अजूनही लाल गहू बंदरा मध्ये पडून आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेसाहेब यांच्याकडे त्याबाबतची पूर्ण आकडेवारी असेल. परदेशामध्ये खताचे भाव वाढले होते, या सर्व परिस्थितीत अर्थसंकल्पामध्ये देखील यासाठी तरतूद नव्हती ही बाब मी अत्यंत गंभीरपणे आपल्या निदर्शनास आणत आहे. कर्जमाफी झाली आणि आपल्या सगळयांनाच आनंद झाला. शेतकऱ्यांना काही मिळाले तर आनंद वाटणे यामध्ये काही गैर नाही. आम्ही साखर वाटली म्हणून तुम्ही आमच्या टिमक्या वाजववयास निघाले आहात, पण तुम्ही जे ढोल बडविले, ते फुटले, मग त्याबाबतीत काय उत्तर देणार आहात ? हा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून आपण जेव्हा दुसऱ्याकडे एक बोट दाखवितो, तेव्हा आपल्याकडे चार बोटे वळलेली असतात याचे भान ठेऊन मी या सदनामध्ये या विषयावर बोलत आहे. मी तुम्हाला आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभा करण्यासाठी उभा नाही. परंतु एक गोष्ट सांगू इच्छितो की, संपूर्ण देशामध्ये 60 हजार कोटी रुपयांची कर्ज माफी करण्यात आली होती, परंतु ती आता 71 हजार कोटी रुपयांवर गेलेली आहे. पण आपल्या मंत्री महोदयांकडून कर्ज माफीच्या बाबतीत काय-काय वक्तव्य झालेली आहेत ? ते ऐकल्यानंतर हे सगळे अचंबित करणारे आहे. म्हणजे मंत्री म्हणून येथे का असणार ? हा विषय गांभीर्याने घ्यावा लागेल. शेवटी हे सभागृह आहे. तुम्ही येथे अत्यंत जबाबदारीने निवेदन केले पाहिजे. जर तुमच्याकडे माहिती नसेल तर माहिती नंतर देतो किंवा सभागृहाच्या पटलावर ठेवतो असे सांगण्याची माननीय मंत्री महोदयांना मुभा आहे. पण नसलेली माहिती, असलेली माहिती असेल, त्याची ठोकाठोकी करावयाची आणि वेळ मारुन न्यावयाची असे सुरु आहे. शेतकऱ्यांची एवढी जी टिंगलटवाळी केली, त्याचे परिणाम बरेच झालेले आहेत. तसेच खताची टंचाई आणि कर्ज माफी याचे गणित जुळलेले आहे. खताकरता 1 लाख 25 हजार कोटी रुपयांचे अनुदान आहे. यावेळेला अर्थसंकल्पामध्ये खतासाठी 1 लाख रुपयांचे अनुदान दाखविण्यात आले नाही. या टंचाई मागचा हा मूळ मुद्दा आहे. का ? तर कर्ज माफी देण्यात आली. केंद्रीय वित्त मंत्री श्री.चिदंबरम्‌साहेब हे एवढे हुशार आहेत की, त्यांनी शेतकऱ्यांसाठी काहीही वेगळे पैसे दिलेले नाहीत. खताची सबसिडी थांबविली आहे. गेल्या पाच वर्षातील आकडेवारी पाहिली तर तुमच्या एक बाब लक्षात येईल. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांच्या तोंडाला फेस आणणारी कृती जर केंद्र शासनाच्या एका सन्माननीय मंत्री महोदयांनी केली असेल तर शेतकऱ्यांवर केलेला हा फार मोठा आघात आहे

. . . .ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

असे माझे मत आहे. 1 लाख रुपयांची सबसिडी कमी केली आणि ती कर्जमाफी मध्ये घालण्यात आली. पण अजून ते आलेले नाहीत. ते तीन वर्षामध्ये येतील, पुढील हप्ता नोव्हेंबरमध्ये येईल वगैरे सर्व मुद्दे मी काल मांडलेले आहेत. महाराष्ट्र राज्याच्या वतीने शेतकऱ्यांना कर्ज मिळावे म्हणून माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांना नाबार्डच्या अधिकाऱ्यांना विनंती करावी लागली. सध्या त्याठिकाणी आपलेच श्री.सारंगी तेथे कार्यरत आहेत. त्यांना माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी सांगितले की, "तुम्ही आम्हाला नंतर जे काही देणार आहात, ते द्या. परंतु आम्हाला आता तातडीने 1860 कोटी रुपये द्यावेत आणि ते त्या हप्त्यातून वळते करावेत. कारण आता बँकांकडे, सोसायट्यांकडे शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी निधी उपलब्ध नाही. कारण आता शेतकरी कोणतेच कर्ज परत करीत नाही. केंद्र शासनाकडून अशी परिस्थिती निर्माण होण्या सारखी कृती घडलेली आहे, म्हणजे एका हाताने दिले आणि दुसऱ्या हाताने काढून घेतले आणि शेतकऱ्यांना केवळ लाठया-काठया खाव्या लागल्या आहेत, त्याची जबाबदारी कोण स्विकारणार आहे? त्याचा जाब कोण विचारणार आहे ? माननीय पंतप्रधान यांच्याबरोबर जेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठक होते, तेव्हा हे सर्व मुद्दे उपस्थित केले पाहिजेत. त्यांना विचारले पाहिजे की, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या सबसिडीचे 1 लाख कोटी कमी करुन ते कर्ज माफीमध्ये वळविले, त्याचा परिणाम खत न येण्यामध्ये झाला. खत आलेले नाही. परंतु येथील खताची निर्मिती थांबली आहे काय ? शासनामार्फत 70 टक्के खत निर्माण केले जाते आणि 27 टक्के खत महाराष्ट्रातील खाजगी कंपन्या निर्माण करतात. तसेच बाहेरुन येणारे जे खत आहे, ते बोगस आहे आणि त्या संदर्भात परिमाणानुसार सगळी तपासणी झालेली आहे. 18:18:10 च्या ठिकाणी 6:6:2 असे भयानक प्रकारचे मिश्र खत येते. याबाबतीत सर्व तपासणी झाल्यानंतर यावर बंदी घालण्यात यावी असे सांगितल्यानंतरही त्याच्यावर बंदी घालत नाहीत. मात्र महाराष्ट्रातील सर्व कंपन्या माननीय कृषी मंत्र्यांनी पूर्णपणे बंद केल्या. का बंद केल्या ? माझ्याकडे माननीय कृषीमंत्र्यांचा आदेश आहे. कृषी संचालक, (निवगुनि), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी काढलेला आदेश आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"राज्यातील खत उपलब्धतेबाबत आढावा घेतला असता खरीप हंगाम 2008" म्हणजे आपण ज्याच्याबाबतीत चर्चा करीत आहोत. "त्यामध्ये शेतकऱ्यांना युरिया, डीएपी,एमओपी व एसएसपी या प्रमुख खतांचा शेतकऱ्यांना योग्य वेळी, योग्य प्रमाणात खते उपलब्ध

. . . .ई-3



APR/ MMP/ KGS/ 10:20

होण्याच्या दृष्टीने मिश्र खत उत्पादकांना युरिया, डीएपी, एमओपी व एसएसपी या खतांचा पुरवठा पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात यावा."

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .......

खत उत्पादकांनी परस्पर मिश्रखते उत्पादनाचा पुरवठा केल्यास सदर खत साठ्याच्या अनुदान शिफारशीसाठी विचार करण्यात येणार नाही. असे आदेश काढले. हे खत उत्पादक कच्चा माल कधी आणतात ? जेव्हा भारतामध्ये कोठेही शेतकऱ्यांची मागणी नसते तेव्हा हा संपूर्ण माल येतो आणि आपल्या राज्यामधील कारखाने मिश्रखत तयार करतात. आपली मिश्रखताची मागणी जवळजवळ 6 ते 7 लाख मे.टन आहे. मिश्रखत हा फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित विषय आहे आणि तो विषय यशस्वी झालेला आहे. कृषी तज्ज्ञांनी तो विषय दिला आणि ते शेतकऱ्यांना वरदान ठरले. संयुक्तखते आणि मिश्रखते ही दोन वरदान ठरलेली खते आहेत. हे आदेश निघाल्यानंतर आपल्याकडे मिश्रखते निर्माण करणारे कारखाने बंद केले. त्यांना अनुदान मिळणार नाही त्यामुळे त्यांच्याकडे जो काही स्टॉक होता त्याचे त्यांनी खत तयार केले आणि बाजारामध्ये विकले. त्याचे अनुदान नाही. अनुदानामध्ये फरक 1500 रुपयांचा आहे. हे आदेश निघाल्यामुळे जे एक ते दीड लाख मे.टन मिश्रखत आपल्या शेतकऱ्यांना मिळत होते ते बंद झाले. खताची मुळात टंचाई केंद्राकडून होती आणि त्यामध्येच राज्याची टंचाई निर्माण होईल अशा प्रकारचे आदेश खरीप हंगामाची बैठक घेतल्यानंतर काढले. ते आदेश का काढले ? त्या मागची भूमिका काय ? मला अत्यंत गांभीर्याने हे मांडावयाचे आहे. या सदनामध्ये मी लातूरच्या एका भ्रष्ट, जे पूर्वी आपल्या कृषी खात्यामध्ये क्वॉलिटी कंट्रोल इन्स्पेक्टर पदावर होते त्यांचा उल्लेख केला होता. कोठे हात घातला की काय मिळते हे त्यांना माहीत होते. नंतर ती नोकरी त्यांनी सोडली आणि एका कारखान्यामध्ये पार्टनर म्हणून नोकरीला गेले. त्या ठिकाणी प्रचंड भ्रष्टाचार केला. तिथून त्यांना काढले. मग ते आमच्या जालन्याला गेले. ते आपल्या मराठवाड्यातील प्रकरण आहे. ते सद्‌गृहस्थ राधेगोविंदमध्ये गेले. तिकडेही घोळ केला. तिकडूनही काढले. मग त्यांनी दूध डेअरी काढली. त्या दूध डेअरीमध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला. तो मी या सदनामध्ये मांडला. तो भ्रष्टाचार सदनामध्ये मांडल्यानंतर या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, आम्ही त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करतो. भ्रष्टाचाराचा एफ.आय.आर.दर्ज करतो. तो केला नाही. त्यांना अटक का झाली नाही ? मग शेतकरी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद कोर्टात गेले. कोर्टाने आदेश दिले पण

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आजही त्या सद्‌गृहस्थांना अटक झालेली नाही. यांचा रोष, माझ्यावर झालेला अन्याय आणि अपमान, मग त्यांनी एका संघटनेला हाताशी धरले. हल्ली कोणाचे तरी नाव घेणे म्हणजे काही कारण नसताना असमजुतीने पटकन काही तरी गडबड होते. त्यांना अटक होऊ नये म्हणून पुण्यात पाच दहा लोकांनी उपोषण केले. या उपोषणकर्त्यांनी कोठे बोगस मिश्रखते पकडली का ? नाही. कोठे दाखले आणले का ? नाही. कोठे धाडी टाकल्या का ? नाही. संबंधित सद्‌गृहस्थ श्री. बिराजदार यांचे नाव रेकॉर्डवर आलेले आहे. त्यांना अजूनही अटक झालेली नाही. आपण शोधून काढा. एक माणूस एकदा हेव्यादाव्याला पेटला की कोठे नेतो, सरकारला कसे लोळवतो हे यातून दिसते. त्या पाच दहा लोकांच्या उपोषणाची नोंद घेऊन आमच्या मंत्रिमहोदयांनी ताबडतोब मिश्रखते बंद करण्याचा आदेश काढला. हे आदेश कशासाठी काढले ? बोगस मिश्रखत तयार करण्याच्या संदर्भात फर्टिलायजर ॲक्ट आहे. त्यानुसार आपण कायदेशीर कारवाई करु शकतो. पण आज शेतकऱ्यांना रस्त्यावर येण्याकरिता एका माणसाचा राग असा कारणीभूत ठरला. एवढे मोर्चे येतात, एवढे सगळे जाळून घेतले जाते, एवढा आक्रोश होतो, रोज टी.व्ही. वर बातम्या येतात पण सरकारला त्यांची दाद घेण्यास वेळ नाही. त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. त्याचा अन्याय दूर करण्यास वेळ नाही. आणि दुसरीकडे कोठे पाच दहा लोक पुण्यामध्ये मिश्रखत बंद करा हे सांगण्यासाठी बसले त्यांची दाद घेतली. आता अंदर की बात काय आहे हे त्यांचे त्यांना माहीत. आपण त्यांची लगेच दाद घेतली आणि एवढा मोठा निर्णय घेतला की, ज्यातून खताची प्रचंड एक दीड लाख टनाची टंचाई निर्माण झाली आणि त्या टंचाईचा परिणाम भीषण झाला. सभापती महोदय, महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे अध्यक्ष माननीय कृषी मंत्री आहेत.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 10:30

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मे.इंडियन पोटॅश कंपनी, मुंबई यांना एक पत्र लिहिले आहे. या सरकारने शेतक-यांचा घात कसा केला आहे त्याचे हे एक डॉक्यूमेंट आहे. यासंदर्भात माननीय कृषी मंत्र्यांनी उत्तर द्यावे. त्या पत्रातील विषय असा आहे, "Receipt of IPL-DAP." त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "Sir, with reference to above we would like to inform you that, we have received 1725 mt IPL-DAP through M/s. Maharashtra Transport, Jalna, period from 04/05/2008 to 05/05/2008. The total quantity i.e. 2515.050 mts. 1725 mts. for factory and (details enclosed) 790.050 mts for open market" फक्त 790 मे.टन खुल्या बाजारातून विकत घेण्यासाठी म्हणजे शेतक-यांसाठी उपलब्ध केले. जे डीएपी आले ते औरंगाबाद रिजनचे आहे. इतर रिजनचा माल शासनाने शेतक-यांना न देता फॅक्टरीत नेला, बाकीच्या फॅक्टरीज बंद पाडून टाकल्या आहेत. शेतक-यांना खतापासून वंचित केले आहे. हया लेखी डॉक्यूमेंटवर टी.एम.भारंगरे, मॅनेजर, एमएआयडीसी लि. यांची सही आहे. शेतक-यांचे खत तुमच्या फॅक्टरीत नेले. शेतक-यांना डीएपी दिले नाही. शासनाने किती विवंचना निर्माण केली आहे ?

सभापती महोदय, यानंतर मी पुढील मुद्दा सांगणार आहे तो अतिशय महत्वाचा आहे. माननीय कृषी मंत्र्यांचा मी अधिकृतपणे राजीनामा मागत आहे. शेतक-यांशी बेईमानी करणा-या माननीय कृषी मंत्र्यांना क्षणभर सुध्दा खुर्चीत राहण्याचा अधिकार नाही. हे मी जाहीररित्या बोलत आहे. माझ्याकडे महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात छापून आलेली जाहिरात आहे. ही जाहिरात केंद्र सरकारची आहे. माननीय श्री.मनमोहन सिंगजी, माननीय श्री.रामविलास पासवान, सन्माननीय श्रीमती सोनियाजी आणि श्री.बी.के.हांडिया, केंद्रीय राज्यमंत्री त्यांनी ही जाहिरात दिली आहे. ही जाहिरात राज्याच्या माननीय कृषी राज्यमंत्र्यांनी पाहिली असावी असा माझा समज आहे, कारण ती केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशातील वर्तमानपत्रातून छापून आली आहे. ही जाहिरात कशासाठी छापण्यात आली ? नवीन एमआरपी दिनांक 18.6.2008 पासून लागू होईल हे सांगण्यासाठी ही जाहिरात देण्यात आली. "शेतक-यांना मिळणा-या खतांच्या किंमती कमी

2...



NTK/ MMP/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

करण्यात आल्या, शेतक-यांच्या भरभराटीच्या दिशेने सरकारने टाकलेले पाऊल आहे," असे केंद्र सरकार म्हणत आहे. शेतक-यांची काय भरभराट आहे ? त्यांच्या डोक्यात लाठया काठया पडल्या. डोकी फुंटली. माझ्या शेजारी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी बसतात, त्यामुळे मी थोडेसे त्यांच्यासारखे बोललो आहे. या जाहिरातीमध्ये असे लिहिले आहे की, "मिश्र खतांचे एमआरपी भाव उल्लेखनीयरित्या कमी केले." केंद्र सरकारने भाव कमी केले पैशाची बांधिलकी राज्य सरकारची. सभापती महोदय, एक महत्वाचा विषय आठवला म्हणून थोडक्यात सांगतो. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष हे धोरणात्मक भूमिका घेणारे आहेत. पुढच्या पिढीसाठी आपण काय वाढून ठेवतो आहोत हे कळले काय ? धसका भरेल अशी ही गोष्ट आहे. सर्व ऑईल कंपन्या सरकारच्या आहेत. त्यांना येणारा लाखो रुपयांचा तोटा सबसिडीच्या माध्यमातून केंद्र सरकार भरुन देते. 20 टक्के रोखीने आणि 80 टक्के बॉण्डच्या रुपाने 35 वर्षांसाठी दिला जातो. म्हणजे माझ्या मुलाला नातवंडं होतील त्यांच्या डोक्यावर दरवर्षी लाखो रुपये याप्रमाणे 35 वर्षे या बॉण्डचा बोजा येणार आहे. हा एक विषय आहे आणि दुसरा प्रकार या खतांच्या बाबतीत करुन ठेवला आहे. त्या तेल कंपन्या सरकारच्या असल्यामुळे त्यांना मम म्हणावेच लागते. त्यांचा नाईलाज आहे. पण जे खाजगी कारखानदार आहेत त्यांना पैसे देताना 35 टक्के सबसिडी दिली जाते. बाकीचे पैसे 35 वर्षाच्या कालावधीसाठी बॉण्डच्या माध्यमातून दिले जातात. मी कारखाना काढण्यासाठी गुंतवणूक केली तर मला मिळणारी सबसिडी प्रत्येक बॅगेमागे 1500 रुपये इतकी आहे. टनानुसार नाही.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

म्हणजे 435 रुपयास मिळणारी बॅग 2600 रुपयास विकण्यात आली. दीड हजार रुपये केन्द्राने सबसिडी दिली.त्यामधील 500 रु. रोखीने आणि 1000 रुपये 35 रुपयाच्या बॉण्डने दिले जाणार आहेत. आता बँका तुमचे बॉण्ड कर्ज देण्यासाठी स्वीकारत नाहीत. केवढी तुमची दुर्दशा झालेली आहे ? मी आव्हान करतो की या प्रकरणी कुणी तरी ज्येष्ठ पत्रकाराने संशोधन करुन भविष्यातील पिढीवर येणा-या बोजाचा अभ्यास करावा. कारण यामुळे देशाच्या पुढील पिढीचा काळ खूप कठीण जाणार आहे. या निमित्ताने या विषयाला मी स्पर्श केलेला आहे.

तालिका सभापती महोदय, केन्द्र सरकारने जाहिरात देऊन सांगितले की खताचे भाव कमी होणार आहेत. हे भाव किती कमी होणार आहेत तर 16.20.00.13 हे 7100रु. ऐवजी 5875 रुपयास मिळेल., 20.20.13 हे 7,280 रुपया ऐवजी 6295 रुपयास मिळेल, 20.20.00 हे 7280 रुपया ऐवजी 5343 रुपयास मिळेल आणि 23.23.00 हे 8000 रुपया ऐवजी 6145 रुपयास मिळेल. अशा प्रकारे केन्द्र सरकारने खतांचे भाव कमी केले. हे भाव राज्य सरकारने कमी करायला पाहिजे होते. परंतु राज्य सरकारने हे भाव कमी केलेले नाहीत. ते का कमी केले नाहीत याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये द्यावे. खत विकल्याच्या पावत्या मी गोळा केलेल्या आहेत. भाव कमी न करता खताची विक्री केलेली आहे. माझ्याकडे एक जाहिरात आहे. कर्नाटकमध्ये भाजपचे सरकार आले. मी केवळ मध्यप्रदेशचे नाव घेतल्या बरोबर पटकन उठून राजस्थानमध्ये भाजपचे सरकार असून तेथे आंदोलने सुरु आहेत असे मंत्री महोदयांनी सांगितले. मग आता मी ह्या ज्या काही गोष्टी आघाडी सरकारच्या समोर मांडलेल्या आहेत त्याबाबतीत आघाडी सरकारने मर्दगिरी दाखवून या राज्यातील शेतक-यांशी तुमची काय बांधिलकी आहे हे दाखवून द्यावे. केन्द्र सरकारने परिस्थितीची ताबडतोब नोंद घेऊन आदेश काढले. ते आदेश माझ्याकडे आहेत. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, मिनिस्ट्री ऑफ केमिकल ॲण्ड फर्टिलायझर, दिनांक 17 जून 2008 चे हे आदेश आहेत. 17 तारखेला आदेश काढण्यात आले आणि संपूर्ण देशभरातील शेतक-यांच्या हितासाठी 18 तारखेला जाहिरात आली. जाहिरातीमध्ये मिश्र खताचे भाव कमी केल्याचा उल्लेख आहे. वाहतूक खर्चाची संपूर्ण प्रतिपूर्ती करण्यात येणार असाही उल्लेख जाहिरातीमध्ये आहे. म्हणजे वाहतूक निधी पूणपणे देण्यात येणार आहे. माननीय कृषी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

मंत्र्यांची 10.30 वाजता टी.व्ही.वर झालेली मुलाखत मी देखील ऐकलेली आहे. त्यांनी असे सांगितले की, आम्ही 10 कोटी वाहतूक अनुदान देणार आहोत. राज्यामध्ये खतांचा तुटवडा पडलेला असल्यामुळे खत उपलब्ध होण्यासाठी वाहतूक अनुदान देणार आहोत. खरे म्हणजे कायद्यातील तरतुदीप्रमाणे हे वाहतूक अनुदान मिळतेच. सरकारने दुकानापर्यन्त हे खत पोहोचवायचे अशी कायद्यामध्येच तरतूद आहे. 30-40 कि.मी.च्या परिसरातील वाहतूक असेल तर ती वाहतूक लायसन्स होल्डरने करावयाची असते. या खताच्या रॅक्स आल्या नंतर पहिल्यांदा काही रॅक्स मंत्र्यांनी पळवल्या. 1 तीळ 7जणांनी वाटून खावा अशी महाराष्ट्राची संस्कृती आहे. परंतु हे मंत्री महोदय तीळ वाटून न खाता तो संपूर्ण तीळच पळवितात हे काही बरोबर नाही. यवतमाळ मधील एक नेते माननीय मंत्री महोदय प्रा. वसंत पुरके हे सभागृहामध्ये दिसत नाहीत. खत आल्यानंतर त्यांनी आपला पहिला ट्रक लावून 200 पोती ट्रकमध्ये भरली. मला येथे कुणाचे नाव घ्यावयाचे नाही. कारण ते सभागृहामध्ये नाहीत. एक तीळ 7 जणांनी खाण्याऐवजी तो तीळच पळवून न्यायचा आणि बाकीच्यांनी पोलिसांच्या लाठ्या खायच्या अशी स्थिती या सरकारने करुन ठेवलेली आहे. आता ह्या रॅक्स कुणी पळविल्या ते या सरकारनेच सांगावे. तीळ वाटून न घेता तो पळविला आणि शेतक-यांना रस्त्यावर आणून त्यांना पोलिसांच्या लाठ्या खायला लावल्या. माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या गृह खात्यातील पोलिसांवर नको तेवढा ताण पडला. कृषी अधिकारी पळून गेले, ते तोंड दाखवायला देखील उभे राहिले नाहीत.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम- 10:40

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, यासंदर्भात केंद्र शासनाने एक आदेश काढला आहे, त्यात असे म्हटले आहे की, "In Maharashtra, the Govt. himself is producing more than 4,50,000 M.T. of granulated fertilizers and till today," "टील टुडे" या शब्दाचा मी आज पुन्हा उल्लेख करतो आहे. त्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, "they are selling the fertilizer grades like 18:18:10 at MRP which is around Rs. 8,000/- as per the new formula declared by the central Govt.," आज राज्यात खताची विक्री 8 हजार रुपयाने होत आहे या गोष्टीला या सभागृहातील अनेक निश्चितपणे दुजोरा देतील. प्रत्यक्ष खताची विक्री 5 हजार 600 रुपयांने व्हावयास पाहिजे, त्या खताची विक्री आज 8 हजार रुपये भावाने होत आहे. खतांच्या किंमतीमध्ये भरमसाठ वाढ झाल्यामुळे राज्यातील शेतक-यांना खते वेळेवर दिली गेली नाहीत. एक तीळ सात लोकांनी खाल्ला नाही. खत वितरणाच्या कामात देखील शासन कर्त्याकडून पुढारीपणा दाखविला गेला. महाराष्ट्रातील अनेक जिल्हयात शासन कार्यकर्त्यांकडून खतांची पळवापळवी केली गेली ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. खताच्या बाबतीत केंद्र शासनाने 18 जुलै रोजी सबसिडी देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या या निर्णयापासून राज्यातील शेतक-यांना वंचित ठेवले गेले आहे. त्यामुळे मी मघाशीच म्हटलो की, या सरकारला एक मिनिट सुध्दा खुर्चीवर बसण्याचा अधिकार राहिलेला नाही. ही चर्चा सुरु असताना एक गोष्ट मी प्रकर्षाने या सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. कर्नाटक राज्यात नुकत्याच निवडणुका झाल्या. त्या ठिकाणी भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. सरकार सत्तेवर आल्यानंतर नवीन मुख्यमंत्र्यांनी ताबडतोबीने आदेश काढले आहेत. ते आदेश माझ्याकडे उपलब्ध आहेत. ते मी आपल्याला वाचून दाखवितो.

"To,

All the NPK Fertilizer Mixture
Manufacturers in the State.

Sub : Maximum retail price of NPK fertilizers mixtures-reg.

Reg : C.O. letter No. : 120125/2008-FPP, dated 17.06.2008.

2....

17-07-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम- 10:40

श्री. दिवाकर रावते....

Government of India vide letter cited above has revised the MRP of different fertilizers in Karnataka w.e.f. 18.06.2008 and fixed the revised prices as per the Annexure enclosed. Therefore, all the NPK physical and granulated mixture manufacturer are informed to reduce the MRP of fertilizer mixtures and should be printed on the bags. The Prices of mixtures should be lesser than the complex fertilizers this should be strictly followed. Any violation in this regard, action will be taken as per FCO 1985." अशा प्रकारचे आदेश काढण्याची या सरकारमध्ये धमक आहे काय ? या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. तसेच कर्नाटक सरकारने त्यांच्या सर्व सह आयुक्त, कृषी विभाग यांना या आदेशाची अंमलबजावणी करण्यास सांगितले. कर्नाटक राज्यात निवडणुका होऊन नव्याने मुख्यमंत्री आले आहेत. त्यांनी मुख्यमंत्री पद स्वीकारल्या बरोबर खताच्या बाबतीत आदेश तर काढले आहेत, शिवाय सभागृहात असेही जाहीर केले आहे की, "The Karnataka Chief Minister, has declared the policy that, their State Government is ready to give additional subsidy..."

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गिते 10:45

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, खताच्या बॅगवर योग्य किंमत लावली नाही तर आम्ही तुमच्यावर कारवाई करु असे आदेश काढले. एवढयावर मुख्यमंत्री थांबले नाहीत. मुख्यमंत्र्यांचे मला कौतुक वाटले. राज्यात ते नव्यानेच सत्तेवर आलेले आहेत. त्यांनी पुढील आदेश काढले आणि सदनात असे सांगितले की, "The Chief Minister of Karnataka has declared a policy that the State government is ready to give additional subsidy worth Rs.. 300 crores to compensate the price difference, whereas the Maharashtra Government is trying to squeeze money from the farmers." शासनाने केले नाही. कर्नाटकच्या राज्य शासनाने हे केले. कर्नाटकाचे मुख्यमंत्री कोणत्या पक्षाचे आहेत त्यापेक्षा त्या मुख्यमंत्र्यांनी आपल्या राज्यातील शेतकऱ्यांकरिता भाव कमी झाले आहेत ते अंमलात आणा परत राज्य शासनाच्या तिजोरीतून आणखी 300 कोटी रुपये सबसिडी देऊ हे मर्दपणाने त्यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी सांगितले. तुम्ही आहेत भाव ते सुध्दा कमी केले नाहीत. का कमी केले नाहीत ?

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, अजून भाषणासाठी किती वेळ लागणार आहे ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून 5 मिनिटात माझे भाषण संपविणार आहे. मुलाखतीमध्ये कृषीमंत्री असे म्हणतात की, मिडीयाच्या विरोधाता बोलतात. महाराष्ट्रात खताची टंचाई बिलकूल नाही. शेतकऱ्यांनी लाठया खाल्ल्या, पोलीस अधिकारी आणि तहसीलदार पळाले होते.हा काय तमाशा होता तो कळला नाही. जून महिन्याच्या पहिल्या आठवडयात खताचा तुटवडा होता तेव्हा प्रसार माध्यमांनी भीषण चित्र प्रसार माध्यमांनी तयार केले त्यामुळे शेतकऱ्यांना खत मिळाले किंवा नाही असा प्रश्न पडला. प्रसारमाध्यमांमुळे हे सर्व झाले. अशी दंगल निर्माण करण्याची परिस्थिती जे निर्माण करतात त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी कायद्यात तरतूद आहे. ज्या प्रसार माध्यमांनी हे केले असा सरकारचे मत आहे त्या प्रसार माध्यमांवर शासनाने का कारवाई केली नाही ? का गुन्हा दाखल केला नाही ? शेतकऱ्यांचे रक्त सांडेपर्यंत प्रसारमाध्यमे त्यांना रस्त्यावर आणतात असे तुमचे मत आहे तर मंत्रीमहोदयांनी गुन्हा

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.गिते 10:45

श्री. दिवाकर रावते ....

का दाखल केला नाही असा माझा प्रश्न आहे ? प्रसार माध्यमांवर दोष ढकलून आपण मोकळे होता. ही पाप तुमची,लोकांनी ती दाखविली ,ती मांडली. उद्या आम्हांला तुम्ही बोलाल. याहून वाईट बोलले. जून महिन्यात सांगितले की खताच्या मागणीएवढा पुरवठा आहे. पण ज्या पध्दतीने खत टंचाईचा इश्यू निर्माण केला गेला आणि विरोधकांनी रान उठविले तशी परिस्थिती नव्हती. मला याचा अभिमान वाटतो की, यावेळेला शेतकरी स्वतःहून मैदानात उतरला आणि रस्त्यावर आला. त्याचे नेतृत्व कोणत्याही पक्षाने केले नाही. शेतकरी जागृत झाला तर तुम्हांला कुठे रहावे लागेल अशी परिस्थिती असताना विरोधकांच्या माथ्यावर तुम्ही खापर फोडता आणि प्रसार माध्यमांया माथी फोडत आहात. जो शेतकरी स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर आला त्याचा आदर तरी करा. त्याच्या भावनांचा आदर करा. खताची मागणी केंद्र सरकारकडे मार्च-एप्रिलमध्ये केली जाते. त्यावेळी ती करण्यात आली होती असे सांगितले आहे. खते गुजरात बंदरात का उतरली ? जेएनपीटी हे बंद उरण येथे आहे तिकडे खते का उतरविली नाहीत ? गुजरातमध्ये कशी गेली ? शेतकऱ्यांना कारणे कशाला सांगता ? मे मध्ये गुज्जर आंदोलन उद्‌भवले असे सांगितले. माझ्याकडे रेल्वेखात्याचा जबाब आहे. गुज्जरांनी आंदोलन केले ते त्यांच्या अस्तित्वाकरिता त्यांच्या समाजाच्या मागण्यांकरिता केले. त्यांचा अपमान तुम्ही करीत आहात. गुज्जर आंदोलनामध्ये काठया खाल्ल्या अशी दूषणे मुलाखतीमधून दिली. खताच्या टंचाईला पूर्णतः कृषीमंत्री जबाबदार आहेत. शेतकऱ्यांना खते देण्यासाठी वेळेवर नियोजन केले नाही.खत दिले नाही. केंद्र सरकारने जी सबसिडी दिली होती आणि खताच्या किंमती कमी केल्या होत्या ते अनुदान दिले नाही. अशा बेवारस परिस्थितीमध्ये आमच्या शेतकऱ्याला यातना भोगायला लावणाऱ्या कृषीमंत्र्यांनी एक मिनिट सुध्दा खुर्चीमध्ये राहू नये आणि त्यांनी राजीनामा द्यावा अशी मी मागणी करतो. दुष्काळाच्या संदर्भातील आणेवारीची नाटके बंद करा. सर्वांच्या यासंदर्भात भावना आहेत. सदनाच्या भावना लक्षात घेऊन ताबडतोब दुष्काळाच्या संदर्भात शासनाने पाऊल उचलावे आणि यासंदर्भातील उत्तर देताना शासन शेतकऱ्यांसाठी नक्की काय करणार आहे ते सांगा.

नंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

जनावरांच्या चा-याच्या संदर्भात काय करणार आहात ? दुबार पेरणीच्या संदर्भात आपण काय करण्ार आहात ? शेतक-यांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात काय करणार आहात ? या सर्वांची उत्तरे या ठिकाणी येण्याची आवश्यकता आहे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

---------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय सभापती महोदय, विधान परिषद नियम क्रमांक 97 अन्वये अल्पकालीन चर्चेमध्ये काही मुद्दे मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी उपस्थित असलेल्या सर्वांनी 1972 चा दुष्काळ पाहिलेला आहे. 1972 चा दुष्काळ आणि सन 2008 मधील दुष्काळ यामध्ये फार मोठे अंतर आहे. 1972 च्या दुष्काळात पाऊस नव्हता परंतु विहिरीला पाणी होते. सन 2008 मध्ये पाऊसही पडलेला नाही आणि विहिरीलाही पाणी नाही असा एवढा मोठा फरक आहे त्यामुळे या दुष्काळाचे गांभीर्य फार मोठे आहे. कोणाच्याही मनातून हा दुष्काळ जाणार नाही एवढी या दुष्काळाची व्याप्ती मोठी आहे. गेल्या 40-50 वर्षात पडला नसेल एवढा मोठा दुष्काळ या वर्षीचा आहे. आताच्या काळात पाणी कसे जपून वापरले पाहिजे हा परवलीचा शब्द झाला पाहिजे. आतापर्यंत शासनाने आर्थिक नियोजन केलेले आहे परंतु या पुढील काळात शासनाला पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे. पाण्याचे नियोजन करण्यासाठी जे काही पैसे लागतील त्याची जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे. महाराष्ट्रात यापूर्वी 1972 चा दुष्काळानंतर 1986 चा दुष्काळ पडला. त्यानंतर सन 2004 मध्ये दुष्काळ पडला होता व आता 2008 मध्ये दुष्काळ पडलेला आहे. आजची दुष्काळी परिस्थिती पावसामुळे निर्माण झालेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी खताच्या पुरवठयाच्या संदर्भात आपले विचार मांडलेले असल्यामुळे या ठिकाणी आता खताच्या संदर्भात विचार मांडण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. मी या विषयाच्या संदर्भात केवळ तीन मुद्दे मांडणार आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

या ठिकाणी मी सुरुवातील शेतक-यांना लागणारे पाणी आणि शेतीसाठी लागणारे बियाणे यांसदर्भात विचार मांडणार आहे. खरे म्हणजे बियाण्यांच्या संदर्भात अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. दीड दोन महिने पाऊस पडला नाही तरी शेतक-यांवर दुबार पेरणीची वेळ येणार नाही अशा प्रकारचे चांगले बियाण्यावर संशोधन करण्याचे काम कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून झाले पाहिजे. ड्रॉट रेजिस्टंट सीड शोधण्याचे काम कृषी विद्यापिठाच्या माध्यमातून होण्याची नितांत आवश्यकता आहे. बियाण्यांच्या संदर्भात नवीन टेक्नॉलॉजी आणली गेली पाहिजे. म्हणजें धुळ पेरणी करुन एक दोन महिने पाऊस आला नाही तरी शेतक-याला पुन्हा

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

दुबार पेरणीची गरज पडणार नाही अशा प्रकारच्या बियाण्यांचे संशोधन कृषी विद्यापीठाने करण्याची आवश्यकता आहे. बियाण्यांच्या संदर्भात अशा प्रकारचे क्रांतिकारक संशोधनाला सुरुवात झाली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी आहे की, वेधशाळेच्या संदर्भात आपल्याकडे नवीन टेक्नॉलॉजी आणण्याची आवश्यकता आहे. आताची परिस्थिती अशी आहे की, वेधशाळेने सांगितले की, या या ठिकाणी चांगला पाऊस पडेल तर हमखास त्या ठिकाणी चांगला पाऊस पडत नाही अशी परिस्थिती आहे. पाऊस किती प्रमाणात पडेल, कोठे पडेल, कोणती पिके घेणे योग्य राहील अशा प्रकारची माहिती वेधशाळेकडून येणे आवश्यक आहे. वेधशाळेच्या संदर्भात नवीन टेक्नॉलॉजी आणली जाणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी तलाव आहेत त्या तलावात कृत्रीम पाऊस पाडणे आवश्यक आहे. कृत्रीम पाऊस पाडण्याची आता नितांत आवश्यकता आहे. समुद्रातील खारट पाणी गोड करण्याची लाँग टर्म योजना आणण्याच्या संदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. माझ्या माहिती प्रमाणे चेन्नईमध्ये दोन अडीच कोटी रुपये खर्च करुन त्यांनी खारे पाणी गोड करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. आजपर्यंत नदीतील पाणी समुद्रात जात होते परंतु आता समुद्रातील पाण्याचा उपयोग आपल्याला करुन घ्यावा लागणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ..

सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात व्यवस्थापन करीत असतांना डेलिगेशन ऑफ पॉवर्स केल्या पाहिजेत. माननीय मंत्री महोदयांकडे किंवा आयुक्ताकडे अधिकार न देता जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, तहसीलदार यांना अधिकार देण्यात आले पाहिजेत अशा प्रकारचा जर निर्णय घेण्यात आला तर तो एक चांगला पायंडा पडू शकेल असे मला म्हणावयाचे आहे. त्याचबरोबर कृषी आणि महसूल विभागाच्या आणि इतर चार पाच माननीय मंत्री महोदयांची एक समिती नेमण्यात आली पाहिजे तसेच यासाठी एक स्पेशल सेल निर्माण करण्यात यावा अशी माझी मागणी आहे. आयुक्त वा सचिव पातळीवरील अधिका-याकडे या स्पेशल सेलची जबाबदारी देण्यात आली पाहिजे. मंत्रालयामध्ये एक स्पेशल सेल निर्माण करणे ही काळाची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, दुष्काळ पडला असता शासनाकडून असे सांगण्यात येते की, पैसा कमी पडू देणार नाही. कोणत्याही राज्यात कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी दुष्काळाच्या वेळी पैसा कमी पडू दिला जाणार नाही असे सांगण्यात येत असते. हे तीन चार शब्द सर्वाच्या आवडते आहेत त्यामुळे पैसे कमी पडू देणार नाही असे सांगण्यात आल्यानंतर त्याचे अभिनंदन करीत असतांना वर्क द प्लॅन आणि प्लॅन द वर्क याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.कामाची अंमलबजावणी करणे अत्यंत महत्वाचे आहे. शासनाने जे काही निर्णय घेतलेले आहेत , जे धोरण स्वीकारलेले आहे, जे जी.आर. काढण्यात आलेले आहेत त्याप्रमाणे अंमजबजावणी कशी करण्यात येणार आहे हे महत्वाचे आहे. जो काही निर्णय घेतलेला आहे त्यानुसार पूर्तता करणे हे अत्यंत आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे. मध्यंतरी राज्य सरकारच्या व केन्द्र सरकारच्या माध्यमातून विदर्भातील शेतकऱ्यांना मदत मिळावी म्हणून काही पॅकेजस दिली गेली होती त्याप्रमाणे अंमबजावणी करीत असतांना अनेक ठिकाणी शेतक-याकडून भ्रष्टाचाराच्या वा विलंबाच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. दुष्काळाचे व्यवस्थापन करीत असतांना या तक्रारी पुन्हा येणार नाहीत या दृष्टीने काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, आज या दुष्काळाची व्याप्ती वाढलेली आहे. महाराष्ट्रात दरवर्षी 30 - 40 तालुक्यात दुष्काळ असतो त्यात आणखी वाढ झाली तर 69 -70 तालुक्यात दुष्काळ असतो . परंतु या वर्षी 2/3 पेक्षा अधिक तालुके असे आहेत की ज्या ठिकाणी दुष्काळाचे संकट फार मोठे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. राज्यातील खरिपाचे जे क्षेत्र आहे त्यापैकी 20 टक्के क्षेत्रामध्ये पेरण्या झालेल्या आहेत आणि 80 टक्के क्षेत्रामध्ये पेरण्या झालेल्या नाहीत .त्या ठिकाणी पेरण्या झालेले नाहीत त्यामुळे तेथे पैसेवारी मोजण्याची काही आवश्यकता नाही. पेरण्या झालेल्या नाहीत याचा अर्थ असा की त्या ठिकाणी 100 टक्के दुष्काळ आहे या दृष्टीने आपण त्याकडे पाहिले पाहिजे.असे मला सांगावयाचे आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक गावामध्ये एक तलाव निर्माण करणे आवश्यक आहे त्यामुळे गाव तेथे तलाव असलाच पाहिजे. त्यासाठी जो काही खर्च येईल तो शासनाने करावा आणि त्या गावातील 20 वर्षाची वाढणारी लोकसंख्या गृहित धरुन प्रत्येक गावामध्ये डॅम बांधणे आवश्यक आहे त्याचबरोबर चा-याच्या संदर्भात देखील व्यवस्थापन करणे आवश्यक आहे . आमच्या भागातील साखर कारखाने चालू असतांना 500 ते 700 रुपयाचा भाव शेतक-यांना ऊसासाठी देण्यात आला होता जे कार्यक्षम कारखाने होते त्यांनी 900 रुपयांचा भाव दिला होता . आज ऊसाच्या चा-याचा भाव दोन हजार रुपये प्रती टन एवढा आहे. ज्या शेतक-यांचा ऊस शिल्लक राहिला होता ते म्हणाले, आमचा ऊसा राहिला हे चांगले झाले आहे. काही ठिकाणी साखर कारखाने बंद झाले आणि त्या क्षेत्रातील ऊस तसाच शिल्लक राहिला त्या भागातील शेतकरी 2 हजार रुपये प्रती टन या प्रमाणे ऊस विकत आहेत. ज्यांनी नवीन ऊस लावला आहे ते असे म्हणतात की एवढा भाव कोणताही कारखाना देणार नाही .नवीन ऊसाला सुध्दा दोन हजार रुपये प्रती टन एवढा भाव आहे. या दुष्काळाच्या निमित्ताने चा-याचे नियोजन करणे आवश्यक आहे. दुष्काळ जरी पडला असला तरी माणूस जगणार आहे, कोणताही माणूस मरणार नाही. धान्याची उपलब्धता होईल. कदाचित काही भागात कमी जास्त प्रमाणात धान्य उपलब्ध होईल. क्वालिटी आणि क्वांटीटी कमी जास्त होऊ शकेल. परंतु धान्य उपलब्ध होईल. अन्न व नागरी पुरवठा मंत्री महोदयांना मी या निमित्ताने विनंती करील की त्यांनी सर्वांना धान्य मिळेल या दृष्टीने व्यवस्थापन करावे. धान्याचे व्यवस्थापन करीत असतासंना चा-याचे देखील चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले पाहिजे अनेक ठिकाणी जनावरांसाठी छावण्या सुरु केल्या पाहिजेत. दोन वर्षापूर्वी दुष्काळ पडला असतांना इतर भागापेक्षा जनावरांच्या छावण्या सुरु करण्याच्या बाबतीत आणि जनावरांना वाचविण्याच्या बाबतीत पश्चिम महाराष्ट्रात चांगल्या प्रकारचे व्यवस्थापन केले होते.

श्री दिवाकर रावते (बसून) : शेण गायब झाले होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, किती टन शेण गायब झाले होते हे जर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात सांगितले असते तर बरे झाले असते . सभापती महोदय, दुष्काळा वरील चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, पाणी आणि चा-याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. पाण्याची टंचाई भासणा-या गावाच्या संख्येत 38 टक्के वाढ झाली आहे. 15 हजार 845 गावामध्ये आणि 7000 वाडयामध्ये दर माणसी 20 लिटर्सपेक्षा कमी पाणी मिळणार आहे मराठवाडयातील अनेक गावामध्ये पाण्याची तीव्रता जास्त जाणवणार आहे मराठवाडयातील पाण्याची टंचाई असलेल्या गावांची संख्या 3 हजार 75 हून 6 हजार 600 गावापर्यत गेलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये माणसांना आणि जनावरांना जगविणे ही अत्यंत महत्वाची गोष्ट असून त्यासाठी अर्थसंकल्पात देखील कोठे कपात करण्याची आवश्यकता असेल तर ती सुध्दा शासनाने जरुर करावी. विकासाचे एखादे काम प्रलंबित राहिले तरी चालेल .

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरूण गुजराथी ....

विकास कामे थोडी प्रलंबित ठेवून, ती पुढे ढकलली गेली तरी हरकत नाही. परंतु यासाठी वेगळा अर्थसंकल्प, वेगळे बजेट करा, त्यासाठी किती निधी लागणार आहे ते लक्षात घेऊन तो देण्याची काळजी घ्या आणि त्याचे वाटप जिल्हावार पाण्यासाठी, रो.ह.यो.साठी, धान्यासाठी, गवतासाठी कसा करावा लागेल यादृष्टीने नियोजन करावे एवढे सांगून मी भाषण संपवितो. धन्यवाद.

**उपसभापती** : यानंतर आता सन्माननीय सदस्य प्रा. नवले हे भाषण करतील.

श्री. सय्यद जामा : सभापती महोदय, हमे संधी कब प्राप्त होगी ? हमारा नाम कल के लिस्टमें था.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सत्तारूढ पक्षाच्या सदस्यांना आपण जरूर बोलू द्यावे. परंतु त्यांच्या पक्षाकडून, समोरून एकही नाव गेलेले नव्हते ही गोष्टून कालच निदर्शनास आणून दिली गेली होती. वस्तुत: पक्ष प्रतोदांनी ते काम करायला पाहिजे होते. शेवटी लोकांच्या भावना त्यांच्या प्रतिनिधींना येथे मांडण्याची संधी त्यांनी दिलीच पाहिजे. तेव्हा आपल्याकडील यादीमध्ये ज्यांचे नाव प्रथम आपल्याकडे आले आहे त्यानुसार आपण सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी.

**उपसभापती** : माझ्याकडे ज्या क्रमाने नावे आली आहेत त्याचक्रमाने मी सदस्यांना बोलण्याची संधी देत आहे. कालच्या यादीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी आणि प्रा.नवले यांचे नाव होते त्याप्रमाणे त्यांना मी संधी देत आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.जामा यांचे नाव कालच्या यादी असल्यास त्यांनाही संधी दिली जाईल. आता यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.नवले हे भाषण करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...... एम 2 ...

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : माननीय सभापती महोदय, या ठिकाणी राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा उपस्थित झालेली आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, दुष्काळ हा राज्य, देश आणि जग यांच्या पाचवीला पुजलेला आहे अशी परिस्थिती आहे. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये डोकावले तर दुर्गादेवीचा 12 वर्षांचा दुष्काळ हा सुप्रसिद्ध आहे. संत तुकाराम महाराजांनी दुष्काळाच्या संदर्भात आपल्या अभंगामध्ये आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. 1801 ते 1921 या 120 वर्षांच्या काळात महाराष्ट्रात 34 वेळा दुष्काळ पडलेला आहे. आमचे वडीलधारे सांगतात की, त्या काळात धामुके खाऊन लोक जगले. काही सन्माननीय सदस्यांना धामुक्यांची व्याख्या माहिती नसेल तर मी त्यांना सांगू इच्छितो की, बाभळीच्या शेंगांमधील बिया म्हणजे धामुके. तर हे धामुके खाऊन लोक त्या काळात महाराष्ट्रात जगले आहेत. त्यानंतर 1972 च्या दुष्काळामध्ये सुकडी खाऊन लोक जगले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.पाशा साहेब, आपण देखील सुकडी खाल्लेली आहे. सभापती महोदय, बंगालमध्ये 1943 ला जो दुष्काळ पडला होता त्यात 35 लाख लोक मृत्यूमुखी पडले होते तर आसाम मध्ये दुष्काळ पडला होता त्यात लाखो लोक मृत्यूमुखी पडले आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ....एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले...

सभापती महोदय, या देशाला दुष्काळ नवीन नाही. त्यावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, महाराष्ट्र सरकारने ती करावी अशी मी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, 1972 साली पडलेल्या दुष्काळाची परिस्थिती आणि आजच्या दुष्काळाची परिस्थिती वेगळी आहे. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे 1972 साली महाराष्ट्राची लोकसंख्या 3 ते साडे तीन कोटी होती. आज ती 3 ते साडे तीन कोटींनी वाढली आहे. त्यावेळी भूगर्भामध्ये 40 फूटावर पाणी मिळावयाचे. आज 750 फूट खोल गेले तरी सुध्दा पाणी मिळत नाही इतकी भयावह परिस्थिती आहे. 1972 सालच्या दुष्काळामध्ये महाराष्ट्र सरकारने 60 हजार विहिरींचा कार्यक्रम आयोजित केला होता, त्यापैकी 20 हजार विहिरी खोदण्याचा संकल्प आमच्या मराठवाडयामध्ये करण्यात आला. त्यापैकी अनेक विहिरी आजही अर्धवट अवस्थेत आहेत. यानिमित्ताने मी महाराष्ट्र शासनाला विनंती करतो की, या विहिंरींचे आपण पुनरुज्ीवन करावे. त्या निमित्ताने भविष्यामध्ये पिण्याच्या पाण्याची सोय होईल. त्यासाठी महाराष्ट्र शासनाने पाऊले टाकावीत अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, राजस्थानमध्ये बारव नावाचा प्रकार आहे, आणि आपल्या ग्रामीण महाराष्ट्रात सुध्दा बारव नावाचा प्रकार आहे. त्या बारवची संकल्पना अशी आहे की, कमीत कमी पाण्याचे बाष्पीभवन व्हावे. या प्रकारामुळे आज ग्रामीण भागातील तळयातील व विहिरीतील पाण्याच्या बाष्पीभवनाचे प्रमाण घटले आहे. जानेवारी ते जून पर्यंत सहा महिन्याच्या काळात 50 टक्के पाण्याचे बाष्पीभवन होते, ते टाळण्यासाठी आपण प्रयत्न करणार की नाही हा खरा प्रश्न आहे. याबाबतीत तंत्रशुध्द अभ्यास करणारे जे वैज्ञानिक आहेत त्यांची मदत घेऊन महाराष्ट्र सरकारने या योजनेची आखणी महाराष्ट्रामध्ये करावी अशी यानिमित्ताने मी सूचना करणार आहे. आपल्या राज्याच्या कृषी खात्यामार्फत अनेक योजना जाहीर केल्या जातात. त्यामध्ये तळयांची कामे करण्याचे टारगेट दिले जाते. मी यानिमित्ताने एवढीच विनंती करणार आहे की, अशाप्रकारच्या टारगेटची आपल्याला गरज नाही. ज्यांच्याकडे जमिनीचा 7/12 उतारा असेल त्याला आपण तळे बांधून द्या. जर त्याच्याकडे 5 एकर जमीन असेल तर त्यामधील 10 टक्के जमीन रिझर्व्ह करुन आपण त्याच्या शेतामध्ये तळयाचा प्रयोग केला पाहिजे. "तळेच तळे चहुकडे" असे महाराष्ट्रामध्ये चित्र दिसले पाहिजे. मला खात्री आहे की, यामुळे आपण दुष्काळी परिस्थितीवर मात केल्याशिवाय राहणार नाही. त्याचप्रमाणे आपल्या राज्यामध्ये विहिरी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. आपण 15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री.सुरेश नवले...

बाय 15 च्या, 20 बाय 20 च्या विहिरी खोदण्याचा कार्यक्रम घेतला पाहिजे. मी माझ्या शेतामध्ये 70 बाय 70 च्या विहिरींचा प्रयोग केला. 50 फूट खोल विहिरी खोदल्या पाहिजेत. आदिवासी भागामध्ये 100 बाय 100 च्या विहिरींचा कार्यक्रम घेतला जातो, 50 फूट खोलवर विहिरी खोदल्यामुळे त्यामध्ये लाखो लिटर पाणी राहते. विहिरी जास्त खोलवर खोदल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन कमी होते. असा प्रयोग जर आपण राज्यात केला तर त्यामुळे दुष्काळी परिस्थितीवर आपल्याला मात करता येईल. त्याकरिता महाराष्ट्र शासन उपाय योजना करणार आहे की नाही? त्यादृष्टीने या विषयावर गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे अशाप्रकारची विनंती मी करणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 70 टक्के डोंगर उजाड आहेत, त्याठिकाणी अजिबात वृक्ष नाहीत. पाण्याचे कुंभ म्हणून या डोंगराकडे शासनाने पहावे. या डोंगरांवर सर्वत्र खड्डे पाडले पाहिजेत, विहिरी खोदल्या पाहिजेत, लहान लहान तळे तयार केले पाहिजेत. यानिमित्ताने डोंगरावर पडणारे पावसाचे पाणी अडवून ठेवण्याची क्षमता त्या डोंगरामध्ये असल्यामुळे अवती भवतीचे भूगर्भातील पाणी साठविण्याची किमया हे डोंगर निश्चितपणे करु शकतील अशी विनंती मी यानिमित्ताने करीत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

अशी मी यानिमित्ताने आशा करीत आहे. कोकणामध्ये प्रचंड प्रमाणात पाऊस पडतो. जर आपण कोकणातील पाणी डोंगरमाथ्यावर नेण्याचा प्रयोग करु शकलो तर वाहून जाणारे, समुद्राला मिळणारे जे पाणी आहे, जे वाया जाणारे पाणी आहे, त्याचा उपयोग डोंगरमाथ्यावरील शेतीसाठी होऊ शकतो आणि मग पर्यायाने महाराष्ट्र राज्याला होईल. यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावेत अशी मी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी अशा बातम्या छापून आल्या की, पॅसिफिक महासागरामध्ये एल.व्ही.ओ.नावाचा प्रकार तयार होत आहे. त्यामुळे पृष्ठभागावर उष्णता तयार होते आणि त्याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. त्यामुळे त्याबाबतीत देखील वैज्ञानिकांनी प्रयत्न करावा आणि पर्यावरणावर याचा परिणाम होणार नाही यादृष्टीने जर वैज्ञानिक प्रयत्न करु शकले तर निश्चितपणे वेळेवर पाऊस पडण्याची जी किमया आहे, ती साधली जाईल.

सभापती महोदय, पूर्वी देव आणि दैत्य यांच्यामध्ये अमृमकुंभासाठी युध्दा झाले. आता पुन्हा एकदा पाण्यासाठी युध्द होईल अशी परिस्थिती आहे. मराठवाडयामध्ये पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष्य आहे, विदर्भामध्ये देखील पाण्याची टंचाई आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल खाली बसून बोलतात.)

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, हे सगळेच देव, मग दानव कोणाला म्हणणार.

(सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल खाली बसून बोलतात.)

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, काय होते ते पाहू. घोडे मैदान जवळ आहे. तुमच्या घोडयाला एकही नाल शिल्लक ठेवणार नाही एवढी आमच्यामध्ये क्षमता आहे. आप क्या बात कर रहे हैं ?

**उपसभापती** : याठिकाणी दुष्काळाच्या विषयाबाबत चर्चा सुरु आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, होय. आज दुष्काळाच्या संबंधात चर्चा सुरु आहे. महाराष्ट्र शासन संवेदनाक्षम आहे. महाराष्ट्र शासनाच्या मनामध्ये शेतकऱ्यांविषयी जिव्हाळा आहे. शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे हे शासन आहे.

श्री.पाशा पटेल (खाली बसून) : मग दुष्काळ जाहीर करावा.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, त्यामुळे येथे खूर्चीवर बसणारा प्रत्येकजण शेतकरी ....

. . . .ओ-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

आहे. टीका करणाऱ्यांना शेतीविषयी अजिबात माहिती नाही. त्यामुळे तुम्हाला ढेकूळ आणि माती यातील फरक काय कळणार आहे ? मी या विषयामध्ये जास्त नाही. मी चर्चेच्या निमित्ताने एवढीच विनंती करीन की, महाराष्ट्रामध्ये कृत्रिम पावसाचा प्रयोग झाला पाहिजे. मागच्या वर्षी आणि त्यापूर्वीच्या वर्षी असा प्रयोग केला होता. पण आता कृत्रिम पावसाचा प्रयोग करणारी यंत्रणा कुठे आहे? ही यंत्रणा कुठे गेली आहे ? महाराष्ट्रातील सगळया लोकांची इच्छा आहे की, कृत्रिम पावसाचा प्रयोग करावा. कारण पाऊस पडत नाही. मात्र ढगांमध्ये क्षमता आहे आणि ही क्षमता आहे तोपर्यंतच जर आपण कृत्रिम पावसाचा प्रयोग केला तर निश्चितपणे महाराष्ट्र राज्याला याचा फायदा होऊ शकेल. महाराष्ट्र शासनाने अशा प्रकारच्या उपाययोजना कराव्यात आणि पाझर तलाव, गाव तलाव आणि गॉर्जची कामे करावयास पाहिजेत. 1972 पासून गॉर्जची कामे अर्धवट अवस्थेमध्ये आहेत. या निमित्ताने जी संधी उपलब्ध झाली आहे, त्याचे सोने करण्यासाठी आपण पुढाकार घेणार आहोत की नाही ? असा प्रश्न आहे. कारण इरिगेशनचे आणि संबंधित अधिकारी असे सांगतात की, ही कामे नॉर्म्स्‌मध्ये बसत नाहीत. परंतु राज्यामध्ये पडलेल्या दुष्काळाच्या निमित्ताने सर्व नॉर्म्स्‌ शिथिल करावेत आणि पाझर तलाव, गाव तलाव, गॉर्जची कामे यांना ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणावर सुरु झाली तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनता दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करुन स्वत:चे जीवन सुसह्य करील याची मला खात्री आहे. या राज्यातील जनतेचे जीवन सुसह्य करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावेत अशी मी शासनाला आग्रहाची विनंती करतो आणि माझ्या ज्या सूचना आहेत . . . .

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

प्रा.सुरेश नवले : सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, अजून भरपूर वेळ आहे. परंतु टीका करणाऱ्यांना भरपूर वेळ आहे, त्यांना 40-45 मिनिटे आहेत. पण सूचना करावयाच्या असतील तर असे म्हणणार की, दुष्काळाच्या बाबतीत काय उपाययोजना करता येतील ? या उपाययोजनांच्या बाबतीत माझ्या मनामध्ये जे विचार होते, ते मी येथे मांडलेले आहेत. धन्यवाद.

-----

. . . .ओ-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जी चर्चा उपस्थित केली आहे, मी त्याचे समर्थन करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, घरचा प्रमुख जसा वागतो, तशी घरातील मंडळी वागतात. यावर्षी जून महिना सुरु झाला, तेव्हा हवामान खात्याने एक उच्चांक केला. त्यांनी असे सांगितले की, प्रति वर्षा पेक्षा यावर्षी लवकर पाऊस येणार आहे आणि 103 टक्के पडणार आहे. ज्याप्रमाणे माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील आधी बोलतात, तसे या हवामान खात्याचे संशोधक सुध्दा आगाऊ बोलले. ते बोलल्यानंतर जसे खोटे ठरले म्हणजे सोलतो, भांडतो, मारतो आणि मग जेलमध्ये घालतो परंतु प्रत्यक्षात काही देखील झालेले नाही. तसेच हवामान खात्याने सांगितले की, पाऊस आधी येणार आहे आणि लई येणार आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

आधी बी आणले, लई बी आणले, म्हणजे हे वारे, ही तुमची सावली आपल्या खालच्या लोकांवर पडलेली आहे. महाराष्ट्रातील जनतेमध्ये पावसाच्या बाबतीत प्रचंड प्रमाणामध्ये हवालदिल परिस्थिती निर्माण झालेली आहे. आता सगळ्यांनी उल्लेख केला. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी 1972 च्या दुष्काळाचा उल्लेख केला. 1972 चा दुष्काळ आम्ही भोगलेला आहे. 50 फूट खोल विहिरीमध्ये एवढेसेच डबके आणि त्यामध्ये डाळ खाण्याच्या वाटीने घागरीमध्ये पाणी भरावयाचे. रात्रभर विहिरीत राहावयाचे तेव्हा दिवसभर पिण्याचे पाणी मिळावयाचे. तेव्हा पाणी जास्त असून सुध्दा ही परिस्थिती होती. आता पाण्याची पातळी खोल गेलेली आहे. आता बोअरच्या सहा इंचाच्या होलमध्ये खाली तळाला बसून घागर कशी भरता येईल असा प्रश्न मला पडलेला आहे. पाण्याचा प्रश्न तयार झालेला आहे. आता सध्या गावागावामध्ये अशी चर्चा चालू आहे की, जनावरांना चारा मिळाला पाहिजे. सरकार काही गंभीर दिसत नाही. चारा नाही. रोजगार हमी योजनेची परिस्थिती कशी आहे ? या वर्षी महाराष्ट्राची रोजगार हमी योजना बंद पडली. मी माझ्या जिल्ह्याचे उदाहरण सांगतो. माननीय कृषी मंत्री श्री. राणा जगजितसिंह पाटील या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनीच मला प्रश्न विचारला. ज्या दिवशी महाराष्ट्राची रोजगार हमी योजना बंद झाली त्या दिवशी लातूर जिल्ह्यात 70 हजार मजूर होते आणि दुसऱ्या दिवशी जेव्हा केंद्राची रोजगार हमी योजना सुरु झाली त्या दिवशी 813 मजूर होते. एकाच दिवसात मजुरांना कसे कळले की, ज्यामुळे ते सगळेच्या सगळे मजूर पटकन पळून गेले. काम संपले की लोक पळून गेले की मधला मलिदा संपला म्हणून लोक कामाला येत नाही, हे कळत नाही. गंमत आहे. विचार करा. हे सगळ्यांना कळते. तरी सुध्दा आपले वागणे चुकीचे आहे. आता लोक काम मागावयास लागले आहेत परंतु रोजगार हमी योजनेची कामे चालू नाहीत. आपण टंचाई जाहीर केली परंतु लोकांना काम नाही. आज कामाची गरज आहे. काम मागितल्यानंतर जर आपण 15 दिवसात काम दिले नाही तर आपल्यावर खटले दाखल करता येतील. मी 26 जानेवारीला नंदूरबार जिल्ह्यात गेलो होतो. मी जाऊन बघितले की, 26 जानेवारीला लोकांनी काम मागितले परंतु मार्चपर्यंत, एप्रिलपर्यंत काम मिळाले नाही. आपला जिल्हाधिकारी तोंड दाखविण्यास तयार नसतो एवढी गेल्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

वर्षीची परिस्थिती बेकार होती. या वर्षी काहीच नसल्यामुळे ही मंडळी अजिबात काम देण्यास तयार नाही. लोकांचे सगळ्यात महत्वाचे असे म्हणणे आहे की, आपण काम द्यावे. आपण काम देत नाही. चारा द्या. आपण चारा देत नाही. छावण्या सुरु करा. आपण छावण्या सुरु करीत नाही. शेण कोठेही घेऊन जा परंतु छावणी तर सुरु करा. छावणी कोणी सुरु करावयास तयार नाही. अशी सर्व परिस्थिती आहे पाण्याच्या संदर्भामध्ये तयार झालेली आहे. मला एका गोष्टीची गंमत वाटते. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेब जोराजोरात असे म्हणाले की, आमचे सरकार लई चांगले आहे, असे आहे, तसे आहे. जर सरकार एवढे चांगले आहे तर मला सरकारला एक प्रश्न विचारावयाचा आहे. सरकार लई चांगले आहे ना, तुम्हाला लई कळते ना, मग माझा एक प्रश्न आहे की, पेरणी वर्षाला त्याच मोसममध्ये येते, वर्षाला किती खत लागते हेही माहीत आहे, मग वर्षाला कॅलेंडर प्रमाणे चालणाऱ्या गोष्टी असताना या वर्षी खताचा तुटवडा का पडला ? याबाबतीत जीवाला काही तरी वाटू द्या. काही असली तर वाटू द्या, नसलीच तर त्याला कोण काय करणार ? आमचा निलंगा तालुका माजी मुख्यमंत्र्यांचा तालुका आहे तसेच आजी मुख्यमंत्र्यांचा जिल्हा आहे, या जिल्ह्यामध्ये 15 हजार टन खताची मागणी असताना फक्त 6 हजार टन खत दिले. आपल्याला लई कळते. मग हेच कळते काय की, आपल्याचीच जिरवावयाची. तुम्हाला दुसऱ्याची जिरवण्याचे कळत नाही. या राज्याचे दुर्दैव आहे. एक काम करा. आमचे कोणाचे जाणार नाही. जो विळा खाईल त्याची टिंब टिंब.... तुम्हाला त्याचे काही घेणे देणे नाही. तुमचे तुम्ही भोगा. मी आपल्याला एक गंमत सांगतो. आपण खत दिले नाही. लोकांनी लातूरमध्ये काय केले ? माझ्याकडे वर्तमानपत्रे आहेत. 'सकाळ', 'सामना' अशी सगळी वर्तमानपत्रे माझ्याकडे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेब, यामध्ये असे लिहिले आहे की, पोस्टरवर राग काढला. आपण सापडत नव्हता. लोक म्हणाले पोस्टरवरच जमवा. लोकांनी काय केले ते वाचून दाखवतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

या वर्तमानपत्रामध्ये अशी चौकट छापून आली आहे की, गांधी चौकाजवळ केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार, सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि अन्य नेत्यांची पोस्टर्स लावण्यात आली होती ती या संतप्त लोकांनी फाडून टाकली आहेत. त्याठिकाणी आम्ही नव्हतो. आता लोकच शासनाचा बंदोबस्त करीत आहेत. शासनातील मंत्री दिसत नाहीत म्हणून लोक पोस्टर्स फाडून आपला राग व्यक्त करीत आहेत. तुम्ही जेव्हा लोकांकडे मते मागण्यासाठी जाल तेव्हा तुम्हाला काय अनुभव येतो ते बघा. लोक आता नेत्यांच्या पोस्टर्सचे हाल करीत आहेत, ते हाल निवडणुकीमध्ये मतदानातून दिसणार आहेत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी दुष्काळावर बोलावे.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मी दुष्काळावरच बोलत आहे, कर्जमुक्ती, खतांचा तुटवडा या विषयावरच माझे विचार मांडत आहे. खतांच्या बाबतीत सरकारने काय चमत्कार केला ते सांगत आहे. हा तुटवडा का निर्माण झाला ते सांगतो. खत उत्पादक संघटनेच्या अध्यक्षांनी सांगितले आहे की, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमध्ये डीएपी 62 हजार रुपये मे.टन या दराने मिळते आणि आपल्याकडे मात्र 905 रुपये दराने विकले जाते. तेथील किंमतीमध्ये आणि आपल्या येथील किंमतीमध्ये खूप फरक आहे. खत उत्पादकांना 35 टक्के बॉण्डच्या रुपाने सबसिडी दिली जाणार असेल तर त्यांना एक तर कारखाना बंद करावा लागेल किंवा खतामध्ये वाळू तरी मिसळावी लागेल. या लोकांनी काय केले ? तर खतात वाळू मिसळली आणि बॉण्ड सुध्दा घेतले आहेत. त्यामुळे बाजारामध्ये भेसळयुक्त खत आलेले आहे. जर आम्ही खताबाबत बोललो तर तुम्हाला राग आला असता. परंतु खताच्या कंपन्यांची पत घालविण्याचा इशारा त्यांच्यापैकी मोठमोठया लोकांनी सरकारला दिला आहे. सरकारच्या वागण्याचा परिणाम शेतक-यांवर झाला आहे, खतांच्या कंपन्यांवर झाला आहे. सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की, केंद्रीय मंत्री श्री.पासवान हे मुंबईला रसायनी येथे आले होते. त्यांनी काय सांगितले की, महाराष्ट्र सरकारच्या मागणीनुसार सरकारने खत दिलेले आहे, परंतु सरकारला वाटपामध्ये अपयश आलेले आहे. केंद्र सरकारने कबूल केले आहे की, आम्हाला काय करावयाचे होते ते आम्ही केलेले आहे, पण महाराष्ट्र

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.पाशा पटेल....

सरकारने पुढील कार्यवाही योग्यपणे केलेली नाही. मग केंद्रातील मंत्री खरे बोलतात की, राज्यातील मंत्री खरे बोलतात ? खताच्या वाटपामध्ये चूक झालेली आहे. सरकारने शेतक-यांचा किती छळ चालू केला आहे ते दिसून येते. मला असे वाटू लागले आहे की, सरकारला भविष्यामध्ये निवडणूक घ्यावयाची नाही की काय ? जर तसे वाटले असते तर सरकार शेतक-यांबद्दल अशा पध्दतीने वागले नसते. शेतकरी मोफत खत मागण्यासाठी गेले नव्हते तर पैसे घेऊन गेले होते. परंतु त्यांना साधी चुनखडी सुध्दा दिली नाही, उलट त्यांचे अंग सुजवून परत धाडले. हा शाप कोणत्या पध्दतीने व्यक्त होईल ते सांगता येत नाही. कर्ज वाटपावर बोलण्यासाठी मंत्र्यांमध्ये सभागृहात खूप जोरजोराची स्पर्धा लागली होती. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत 200 कोटी रुपये माफ होणार असे सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात 76 कोटी रुपये माफ झाले आहेत. अशा परिस्थितीत लोक सरकारला जाब विचारणार नाही काय ? आता लोक जाहीरपणे बोलू लागले आहेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल पुढे सुरु...)

कर्ज माफी जाहीर करणार तुम्ही, कर्ज माफ करणार तुम्ही, हातात पैसे देणार तुम्ही. उपसभापती महोदय, 1972 पासून शेतक-यांच्या तळ्यासाठी, रस्त्यांसाठी, सार्वजनिक उपक्रमांसाठी घेतलेल्या जमिनींच्या नोंदी त्यांच्या 7/12वर केलेल्या नाहीत. ह्या नोंदी केल्या असत्या तर 5 टक्के लोकांना कर्जमाफी मिळाली असती. भाजपचे केन्द्रीय अध्यक्ष श्री. राजनाथ सिंह यांनी असे आवाहन केलेले आहे की केन्द्र सरकारने एकराची भाषा करण्याऐवजी रकमेची भाषा करावी. शेतक-यांना कमीत कमी 50हजार रु. कर्ज माफी द्यावी. पण तुम्ही कर्जमाफीची माती केली. तुम्ही दिलेल्या घोषणेला जागला नाहीत. खताच्या बाबतीतही तसेच झाले. आता निसर्ग देखील कोपलेला असल्यामुळे पाण्याचा भयानक प्रश्न निर्माण झालेला आहे. आता माझी या सरकारला एवढीच विनंती आहे की, कोणत्याही निकषांचा आणि बारकाव्यांचा विचार न करता महाराष्ट्रामध्ये तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची गरज आहे. या ठिकाणी खूप मोठ मोठी भाषण सरकार पक्षाकडून करण्यात आली असली तरी आता या सरकारचे ढोंग लोकांसमोर उघड झालेले आहे. सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांनी पोटतिडिकेने प्रश्न मांडले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मला वाटते आता सत्ताधारी पक्षातील आमदारांचे मंत्री आणि मंत्र्यांचे आमदार झाले तर राज्यात काही तरी सुधारणा होईल. राज्यामध्ये पावसाअभावी, खताअभावी खूप भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा सरकारने दुष्काळ जाहीर केला नाही, जनावरांच्या छावण्या सुरु केल्या नाहीत, लोकांच्या हाताला काम दिले नाही तर लोकांनी ज्याप्रमाणे मंत्र्यांची पोस्टर्स फाडली त्याप्रमाणे आता ते मंत्र्यांचे कपडे फाडल्या शिवाय राहाणार नाहीत. म्हणून मंत्र्यांनी आपले कफडे फाडून घ्यायचे नसतील तर राज्यामध्ये उद्‌भवलेल्या गंभीर परिस्थितीला सामारे जाण्यासाठी काय काय उपाययोजना केलेल्या आहेत ते माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे...(अडथळा)...

उपसभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, ही चर्चा संपण्यापूर्वी महाराष्ट्रामध्ये दुष्काळ जाहीर करावा. काल या सभागृहामध्ये हास्यास्पद चर्चा झाली. खताच्या तुडवड्यासंबंधीची चर्चा सुरु असताना राजस्थानमधील आंदोलनाचा उल्लेख करण्यात आल. खते परदेशातून समुद्रमार्गे येतात. मग गुजराथ ऐवजी राजस्थान हे समुद्रमार्गे कसे काय जोडले गेले ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...)

राजस्थानमध्ये 27 मे रोजी आंदोलन सुरु झाले. 1 मे रोजी शेतक-यांच्या घरामध्ये खत असावयास पाहिजे. आपले पाप शेजारच्या राज्यावर फोडून आपण गप्प बसायचे हे काही बरोबर नाही. लोक आता वेडे राहिलेले नाहीत. या सरकारच्या 9 वर्षाच्या कारभाराला लोक वैतागलेले आहेत. आता लोक आम्हाला सत्ताधारी बाकावर आणि तुम्हाला विरोधी बाकावर बसविल्या शिवाय राहाणार नाहीत. ...(अडथळा)...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 11:30

श्री. पाशा पटेल....

सभापती महोदय, या सरकारचे कोणावरही नियंत्रण राहिलेले नाही, हे सरकार प्रत्येक आघाडीमध्ये फेल्यूअर झालेले आहे असे मी जाहीरपणे या ठिकाणी सांगतो. महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ जाहीर करावा अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने आग्रहाची मागणी आहे. या शासनाने अधिवेशन संपण्यापूर्वी दुष्काळ जाहीर केला नाही तर राज्यातील जनता सरकारला रस्त्यावर फिरु देणार नाही असा इशारा मी या निमित्ताने देऊ इच्छितो. शेतक-यांना कर्जमाफी देण्याच्या बाबतीत देखील हे सरकार पूर्णपणे फेल्यूअर गेले आहे. शेतक-यांना खत पुरवठा करण्याच्या बाबतीत देखील हे सरकार फेल्यूअर गेले आहे. राज्यातील जनतेच्या भावना समजून घेण्याच्या बाबतीत देखील हे सरकार फेल्यूअर गेले आहे. चार दिवस जगणारे एक बाळ आहे, ते बाळ चार दिवसात मरणार आहे. ते बाळ मरण्यापूर्वी शासनाने याबाबतीत निर्णय घेऊन कामास सुरुवात करावी अशी माझी मागणी आहे. राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केला तर पर्यायाने ग्रामीण भागातील जनतेला रोजगार उपलब्ध होईल, तसेच मुक्या जनावरांना चारा उपलब्ध होऊ शकेल. म्हणून दुष्काळ जाहीर करणे अत्यंत आवश्यक आहे असे माझे मत आहे. राज्य शासनास या दुष्काळी परिस्थितीवर मात करावयाची असेल तर माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी नद्याजोड प्रकल्प जाहीर केला आहे. दुष्काळी परिस्थितीचा या सरकारला खरोखरच सामना करावयाचा असेल तर नद्याजोड प्रकल्पांची कामे हाती घेण्यात यावीत अशीही माझी मागणी आहे. नद्योजोड प्रकल्पाचा कार्यक्रम जाहीर होऊन बराच कालावधी झाला आहे, परंतु या सरकारने गेल्या चार वर्षात एकही नद्याजोड प्रकल्पाचे काम हाती घेतले नाही. खरे तर राज्य सरकारने उत्तरेकडची एखादी नदी महाराष्ट्रातील नदीला जोडली असती तर या राज्यातील पिण्याचा आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटला असता. परंतु या शासनाने याबाबतीत काहीही प्रगती केली नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. राज्यात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली तर लोकांचे स्थलांतर होऊ शकते. ग्रामीण भागात ज्या खेडया-पाडयांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली तर तेथील लोक गाव सोडून निघून जातील. ग्रामीण भागातील खेडया-पाडयातील लोकांचे स्थलांतर रोखावयाचे असेल तर अजूनही वेळ गेलेली नाही. सरकारने दुष्काळ जाहीर करुन नद्याजोड प्रकल्पांची कामे हाती घेऊन ग्रामीण भागातील खेडया-पाडयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

सभापती महोदय, मी या ठिकाणी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करु इच्छितो की, इस्त्रायल देशामध्ये दोन दोन वर्षे पाऊस पडत नाही. परंतु तेथे कधीही पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत नाही. त्या देशात पिण्याच्या पाण्याचे तसेच शेतीसाठी लागणा-या पाण्याचे नियोजन अतिशय व्यवस्थितपणे केले गेले आहे. त्या देशात कोणी पाण्याचा गैरवापर केला तर संबंधित व्यक्तीस दंड आकारला जातो. त्या देशाने अतिशय गंभीरपणे पाण्याचे नियोजन केले आहे, त्याप्रमाणेच आपल्या राज्यात पाण्याचे नियोजन व्यवस्थितपणे केले पाहिजे. राज्यात पाण्याचे नियोजन व्यवस्थित केले गेले नसल्यामुळे पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे ही वस्तुस्थिती सरकारला नाकारुन चालणार नाही. म्हणून माझी अशी मागणी आहे की, इस्त्रायलमध्ये ज्या प्रमाणे पाण्याचे नियोजन केले गेले आहे, त्याप्रमाणे या राज्यात देखील पाण्याचे नियोजन करण्यात यावे.

सभापती महोदय, महाराष्ट्रात पेरणीक्रम पाहिला तर अतिशय भयानक परिस्थिती आपल्याला दिसून येईल. महाराष्ट्रामध्ये काही विभागात 2 टक्के, काही विभागात 1 टक्का अशा पध्दतीने पेरण्या झाल्या आहेत. पेरणीचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे. महाराष्ट्रातील काही विभागात पेरण्या झाल्या आहेत, परंतु तेथील पिके पाण्याअभावी सुकत चालली आहेत. राज्यातील अनेक शेतक-यांनी पेरणी करण्यासाठी बियाणे तसेच खते घरात आणून ठेवलेली आहेत. परंतु पाऊस न पडल्यामुळे शेतकरी बियाणे पेरु शकलेले नाहीत. शेतक-यांनी विकत घेतलेली खते तशीच पडून आहेत. त्या शेतक-यांचे बियाणे आणि खते कोणी विकत घेत नाहीत. या बियाण्याचे आणि खताचे काय करावयाचे हा गंभीर प्रश्न शेतक-यांसमोर उभा राहिलेला आहे. दुबार पेरणी करण्याची वेळ आली तर कोणती पिके घ्यावयाची हा देखील प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिलेला आहे. म्हणून शेतक-यांच्या या गंभीर प्रश्नाकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. शेतक-यांच्या पशुधनासाठी चारा उपलब्ध नाही. या पशुधनासाठी शासन चारा कशा पध्दतीने उपलब्ध देणार आहे यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी माझी विनंती आहे. महाराष्ट्रातील जमिनीच्या भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे या गंभीर विषयाकडे देखील लक्ष देणे गरजेचे आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने प्रयत्न करावेत अशी माझी शासनास विनंती आहे.

3...



ABG/ SBT/ MMP/     प्रथम श्री. शिगम     11:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी राज्य शासनाने खताचा प्रश्न व्यवस्थितपणे न हाताळल्यामुळे माननीय कृषी मंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशा प्रकारची मागणी केली आहे. त्यांच्या मागणीला माझा पूर्णपणे पाठिंबा आहे. या राज्यातील शेतक-यांना न्याय देण्यास मी असमर्थ ठरलो आहे, माझी या बाबतीत खरोखरच चूक झालेली आहे, मी खरोखरच राज्यातील शेतक-यांना त्रास दिला, राज्यातील शेतक-यांना बियाणे तसेच खते वेळेवर उपलब्ध करुन देऊ शकलो नाही, शेतक-यांना न्याय देण्याकामी माझ्याकडून पाप झालेले आहे असे प्रांजळपणे कबूल करतो आणि मी माझ्या मंत्री पदाचा राजीनामा देत आहे अशा प्रकारची घोषणा माननीय कृषी मंत्र्यांनी जाहीर केली पाहिजे. हे शासन राज्यातील शेतक-यांना न्याय देऊ शकलेले नसल्यामुळे संपूर्ण मंत्रिमंडळाने राजीनामा द्यावा अशा प्रकारची मागणी करतो आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी चर्चा उपस्थित केली आहे, त्या चर्चेला पाठिंबा देतो आणि सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा अशी सरकारला सूचना करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.गिते 11:35

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मला बोलण्याची परवानगी द्यावी.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला आपण बोलण्याची परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी सकाळी 10.00 वा. उपस्थित नव्हते.

**उपसभापती** : कोण सदस्य बोलणार यावर चर्चा नको. याविषयावरील चर्चेत भाग घेण्यासाठी माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची नांवे आली होती ती मी वाचून दाखविली आहेत आणि सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचा क्रम देखील सांगितलेला आहे. तरीसुध्दा आता कोणत्या सन्माननीय सदस्याने भाषण करण्यासाठी उभे रहायचे यावर जर चर्चा होत असेल तर ते चुकीचे आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब हे काल आणि आज भाषण करण्यासाठी इतका वेळ घेणार आहेत हे आम्हांला 100 टक्के माहीत होते. त्यांना वेळ मिळाला पाहिजे म्हणून सदनामध्ये मी उशिरा आलो.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, आम्हांला भाषण करण्याची संधी मिळाली पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांना मी सांगू इच्छितो की, आपण तालिका सभापती म्हणून काम केले आहे. जेव्हा आपण सभापतीच्या स्थानावर बसतो तेव्हा सर्व सन्माननीय सदस्यांना बरोबर घेऊन आणि सांभाळून घेऊन पुढे जावे लागते. मी मगाशी भाषण करणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नांवे आणि त्यांचा क्रम सांगितलेला आहे. त्यावेळी आपण काही बोलला नाही. आता सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार**)

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, शासनाने दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केली असली तरी गेल्या आठवडयातील पावसाच्या आकडेवारीवरुन दिसून येईल की, 164 तालुक्यांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झालेला आहे. धरणांमध्ये गेल्या वर्षी याचसुमारास 47 टक्के पाण्याचा साठा होता यावर्षी तो 22 टक्के इतका आहे. सरकारने पावसाची जी आकडेवारी ठिकठिकाणी सांगितलेली आहे त्यानुसार हे स्पष्ट झालेले आहे की, औरंगाबाद, नाशिक आणि पुणे विभागात पेरणी 10 टक्के झालेली आहे. नागपूर विभागात 50 टक्के आणि अमरावती विभागात 39 टक्के क्षेत्रात पेरणी झालेली आहे. या चर्चेच्या निमित्ताने पहिला प्रश्न मला उपस्थित करावयाचा आहे तो म्हणजे दुष्काळी परिस्थिती आहे ती महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये आहे. प्रत्येक ठिकाणी लोकांना फार मोठया प्रमाणात दुष्काळाचे चटके सहन करावे लागत आहेत. परंतु दुर्दैवाने शासकीय अधिकाऱ्यांपर्यंत ही सर्व परिस्थिती पोहोचलेली दिसत नाही. विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये दुष्काळाच्या प्रश्नावर चर्चा चालू असताना पुण्यामध्ये काल रात्री सरकारी अधिकाऱ्यांनी आलिशान मेजवानीसह आषाढी साजरी केली.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MMP/ 11:40

डॉ.नीलम गोऱ्हे.......

आणि पुण्यातील दैनिक 'सामना' या वृत्तपत्रामध्ये या संदर्भातील सविस्तर वृत्त प्रसिध्द झाले. सरकारी बंगल्यामध्ये संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील 100 पेक्षा जास्त अधिकारी उपस्थित होते. सरकारी बंगल्यामध्ये या सगळ्या अधिकाऱ्यांसाठी शाकाहारी व मांसाहारी जेवणाची व्यवस्था करुन मोठी जेवणावळ साजरी करण्यात आली. आपण सरकारची राजकीय इच्छाशक्ती म्हणतो, ती विधीमंडळामध्ये काय घडते यामुळे स्पष्ट होत नाही. विधीमंडळाबाहेर ज्या गोष्टी घडतात त्यामधून सामान्य लोकांना कळते की, सरकार आपल्यासाठी किती गंभीर आहे. दुष्काळाच्या संदर्भातील परिस्थिती गेल्या 15 दिवसापासून स्पष्ट होत असताना वेगवेगळे मंत्री कोणकोणत्या कामामध्ये गर्क होते याची आपल्याला कल्पना आहे. नगर जिल्हयातील राहुरीमध्ये दुष्काळाच्या संदर्भात बैठक घेण्यात आली. खरीप पिकांची परिस्थिती काय आहे? याचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी अनेक शेतकरी रस्त्यावर उभे राहून कृषिमंत्र्यांना भेटण्याच्या प्रयत्नात होते. महाराष्ट्राच्या इतर भागामध्ये अशी बैठक झाली नसेल, परंतु कृषिमंत्र्यांनी नगर जिल्हयात राहुरीला रस्त्याने जाण्याऐवजी हेलिकॉप्टरद्वारे राहुरीच्या कृषि विद्यापीठात उतरले. शेतकऱ्यांना भेटून त्यांची निवेदने न स्वीकारता, त्यांच्या व्यथा न ऐकता पहिल्यांदा असा प्रयोग केला. स्वतःच्या संगमनेर या गावातून राहुरीला हेलिकॉप्टरने हजर झाले पण त्यांनी लोकांचे काय म्हणणे आहे हे बैठकीपूर्वी ऐकून घेतले नाही.

सभापती महोदय, दुसरे एक मंत्री, ज्यांनी पुणे जिल्हयामध्ये हरणाची शिकार केली, त्या विषयाचा या प्रस्तावाशी संबंध नाही असे कोणी म्हणेल. परंतु कोणताही शासनाचा प्रतिनिधी किती मोठया प्रमाणात जबाबदार भूमिका बजावतो त्याचे हे उदाहरण आहे. पुणे जिल्हयामध्ये पश्चिम महाराष्ट्रात काय घडते? मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात अनेक आंदोलनांमध्ये आम्ही सहभागी झालो. त्यावेळी एक चित्र असे दिसून आले की, जशी दुष्काळाची चर्चा सुरु झाली तशी पाण्याची टंचाई जाणवू लागली, पाऊस गायब झाला. आता राज्यात मोठमोठ्या लॉबी निर्माण झाल्या आहेत. टँकर लॉबी, धान्य वितरणाची लॉबी, कुपोषणाचा सामना करणारी लॉबी, या सगळ्या लॉबीचे सुत्रधार हे सत्ताधाऱ्यांच्या खुर्चीला झुरळ चिकटते तसे अनेक लॉबीचे सुत्रधार सत्तेतील पुढाऱ्यांना चिकटले आहेत. पी.साईनाथ यांचे 'दुष्काळ आवडे सर्वांना' हे पुस्तक फार महत्वाचे आहे. दुष्काळ पडला की, मोठया प्रमाणात पैशाची उलाढाल होते. दुष्काळ निवारणासाठी विशेष निधी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.........

मिळतो आणि नंतर पाऊस आला की, पावसानंतर दुष्काळासाठी खर्च झालेला पैसा कुठे गेला त्याचा कोणाला थांगपत्ता लागत नाही. म्हणून पी.साईनाथ यांनी राजकीय षडयंत्र कशाप्रकारे काम करते हे त्या पुस्तकात स्पष्ट केले आहे. कोट्यावधी रुपये येऊनही सामान्य लोकांना काही फायदा मिळत नाही. म्हणून मोठमोठ्या लोकांना दुष्काळ आवडतो. व्यवस्थापन हा फार मोठा राजकीय आधार आहे. वर्षानुवर्षे विधीमंडळामध्ये दुष्काळाच्या विषयावर चर्चा होते. तीन वर्षापूर्वी ज्यावेळी दुष्काळ पडला होता त्यावेळी पावसाळी अधिवेशनात दुष्काळावर चर्चा झाली होती. रोजगार हमी योजना, जलस्वराज्य योजना यांचे संनियंत्रण, व्यवस्थापन चांगल्याप्रकारे होत नाही. आता कशा पध्दतीने व्यवस्थापन करणार? हा प्रश्न आहे. जलस्वराज्य योजनेचे कसे तीनतेरा वाजले हे मी सांगणार आहे. 2002-03 मध्ये पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील 9 जिल्हे, दुसऱ्या टप्प्यात 16 जिल्हे आणि नंतर उर्वरित जिल्हयांमध्ये कोट्यावधी रुपये जलस्वराज्य योजनेसाठी खर्च करण्यात आले. त्यासाठी 26 जिल्हयातील 3378 ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. या 3378 पैकी 347 ग्रामपंचायती प्राथमिक स्तरावरील अडचणींमुळे वगळण्यात आल्या आणि फक्त 715 गावात गेल्या तीन वर्षाच्या काळात जलस्वराज्य प्रकल्प पूर्ण झाले. म्हणजे फक्त 23.59 टक्के काम पूर्ण झाले. उर्वरित गावे आहे त्याच स्थितीत आहेत. हजारो गावांपैकी 3378 ग्रामपंचायतींची जलस्वराज्य योजना होती, त्यापैकी 23.59 टक्के काम पूर्ण झाले. दुसरे उदाहरण रोजगार हमी योजनेचे आहे. काल दूरदर्शनवर एक कार्यक्रम दाखविण्यात आला. रोजगार हमी योजनेची अधिकाऱ्यांनी कार्यशाळा कशी घेतली? आज प्रत्येक गावातील परिस्थिती काय आहे? मोठया प्रमाणात गाजावाजा करुन केंद्र सरकारने आपल्या रोजगार हमी योजनेला राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे स्वरुप दिले. सरकार ती राष्ट्रीय रोजगार हमी योजना गुंडाळण्यास निघाले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात सर्वांनी वृत्तपत्रात वाचले आहे. माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांनी सांगितले होते की, या योजनेचे आम्ही स्वरुप बदलणार आहोत.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ......

म्हणजे या योजनेसाठी जो पैसा करदात्यांकडून घेतला जातो तो पैसा शासनाच्या नेहमीच्या खात्यामध्ये जमा होईल आणि त्यासाठी वेगळा निधी उपलब्ध केला जाणार नाही. थोडक्यात दोन्ही पध्दतीचा निधी एकत्र मिसळला गेला, रोजगार हमी योजनेसाठी आलेला किती निधी दुसऱ्या कामासाठी वापरला गेला आणि त्याचा खर्च किती याचा थांगपत्ता कोणालाच लागणार नाही. आम्ही सर्व आमदार बोलतो की, रोजगार हमी योजना सुरु करा, सरकार सांगते की, शेल्फवर कामे आहेत परंतु ती कामे लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी मधली यंत्रणा नाही. तसेच यासंबंधीचे जे निकष आहेत त्यानुसार ग्रामसभेची बैठक, मजुरांना जॉब कार्ड आणि त्या आधारे कामाची मागणी केली पाहिजे हे आहेत. तसेच काम गावाच्या जवळपासच काढले पाहिजे, त्याची प्रतिपूर्ती झाली नाही तर लोक स्थलांतराच्या तयारीत असतात, असे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी सांगितले, ते एका दृष्टीने बरोबरच आहे. यापूर्वी सुध्दा राज्यात अनेक भयानक दुष्काळ पडलेले आहेत. इतिहासात सुध्दा तीन-चार दुष्काळ पडल्याची नोंद आहे. परंतु सन 1972 चा दुष्काळ पडला त्यावेळी मुंबईत मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातून जे लोक मुंबईतील झोपडपट्टीमध्ये रहायला आले होते त्यावेळेस एका दिवशी एक लाख मंगळसुत्रे विकली गेल्याची माहिती आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात या स्थलांतराचे परिणाम होतात. कारण दुष्काळ पडल्यानंतर गोरगरीब भांडी-कुंडी विकून पोट भरतात. याचे कारण त्यावेळेस रोजगार हमी योजना अस्तित्वात नव्हती. आणि आता देखील रोजगार हमी योजना योग्य नियोजनाअभावी बंद पडलेली आहे. तसेच या मजुरांना वाटत नाही की, आपल्याला प्रत्यक्षात काम मिळू शकेल हणून ते स्थलांतराचा मार्ग अवलंबायला निघाले आहेत.

महोदय, दुसरीकडे कर्जमाफीची शासनाने घोषणा केली, त्याबद्दल मला सांगावयाचे आहे की, या सभागृहात बरेच शेती तज्ज्ञ आहेत. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी या ठिकाणी अत्यंत उत्कृष्ट भाषण केले. इतकी तज्ज्ञ मंडळी आपल्याकडे असताना शासनाकडून कशी चुकीची गोष्ट घडली हे मला समजत नाही. आपण कर्ज माफीसंबंधी पाच एकराचे निकष ठेवलेले आहेत, यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी हे निकष बदलण्याबाबत केंद्राकडे विनंती करण्यात येईल, असे सुतोवाच केले होते तसेच माननीय उपमुख्यमंत्र्यांनी देखील केंद्रशासन हे निकष बदलण्यासंबंधीचा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेणार असे सांगितले होते. परंतु अद्यापही पाच एकर कोरडवाहू शेतीसंबंधीचे निकष बदलण्यात आले नाहीत. वास्तविक हे निकष बदलण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्रशासनाकडे तसा पाठपुरावा करणे आवश्यक होते. कर्जमाफीसंबंधी ज्यावेळेस बँकांच्या याद्या लागल्या त्यावेळेस मात्र शेतकऱ्यांना या गोष्टीचा धक्का बसला. परंतु अजुनही वेळ गेलेली नाही. कारण आजही अनेक ठिकाणी कर्जमाफी मिळालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या लागलेल्या नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे नाव नसल्याची कल्पना नाही. तसेच नवीन कर्ज द्यावयाचे झाले तर तसे सर्टिफिकेट त्यांना मिळाले नाही. तरी देखील नशिबाने म्हणा किंवा दुर्देवाने म्हणा यासंबंधीची चालढकल होत आहे त्यामुळे संपूर्ण राज्यात असंतोष खदखदत आहे.

महोदय, इतर दुसऱ्या योजनांच्या बाबतीत विचार केला तर दुसरीकडे जे चित्र दिसत आहे ते अतिशय भयानक आहे. राज्यातील लातूर जिल्हयातील 1497 ग्रामपंचायतींतील पिण्याच्या पाण्याची तपासणी केली असता त्यापैकी 786 गावातील पाणी दुषित असल्याचे आढळून आले आहे, हा गेल्या आठवड्यातील अहवाल आहे. खरा प्रश्न आहे की, राज्यात सगळीकडे विशेष म्हणजे कोंकणात सुध्दा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, "पाणी अडवा, पाणी जिरवा" आणि "शिवाराचे पाणी शिवारातच अडवा". अशा योजनांच्या बाबतीत दुष्काळी परिस्थितीच्या वेळी चर्चा चर्चा सुरु झाल्यानंतर सभागृहात आपण बोलतो. राज्यात रोजगार हमी योजनेची कामे सुरु नाहीत पण नंतर पाऊस पडला तर लक्षावधी रुपयांची कामे संपूर्णपणे वाया जातात, त्या कामांचे नंतर काय होते हे कळत नाही. तीन-तीन, चार-चार वर्षे कामे प्रलंबित राहतात. "दैनिक सकाळ" मध्ये यासंबंधीची आकडेवारी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातील कामे अर्धवट स्थितीत पडलेली आहेत, कंत्राटदारांना त्या कामाची बिले मिळतात. पुन्हा नवीन कामे दुष्काळ पडल्यानंतर सुरु होतात, अर्धवट कामांचा पाठपुरावा होत नाही. म्हणूनच पी.साईनाथ "दुष्काळ आवडे सर्वांना" असे म्हणतात. नंतर पुन्हा कंत्राटदारांना आनंद होतो कारण दुष्काळ पडल्यानंतर रोजगार हमी योजनेची नवीन कामे होणार आणि त्यांना त्यांची बिले मिळणार, मजुरांना पैसे मिळणार किंवा नाही यासाठी मात्र कुठलीही स्वतंत्र यंत्रणा नाही. आम्ही गेल्या वेळेस म्हटले होते की, शासनाने प्रत्येक तालुक्यात एक सर्वपक्षीय समिती निर्माण करावी. अशा सर्वपक्षीय समितीमध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .. ..

विरोधी पक्षाचे सदस्य असतील त्याचबरोबर पिण्याचे पाणी व दुष्काळाच्या प्रश्नांसंबंधी काम करणाऱ्या सामाजिक संघटनाही असतील, त्यांना सहभागी करुन घेण्यात यावे. या समितीच्या माध्यमातून त्या प्रत्येक तालुक्यात किती रोजगार हमीची कामे काढली पाहिजेत, परंतु अशी सर्वपक्षीय समिती शासनाने अद्यापही काढलेली नाही. तसेच ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री. अण्णा हजारे यांची "आदर्श गाव" ही समिती होती, ती देखील शासनाने बरखास्त केली व तिला वेगळे स्वरुप दिले, त्याचे काय झाले हे कोणालाच माहीत नाही. गाव पातळीवरील माणसाचा विचार करण्यासाठी आज शासनाच्या अधिकाऱ्यांना वेळ नाही किंवा राजकीय लोकांनाही वेळ नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ।..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

आणि त्याचा परिणाम म्हणून माणसांना असे वाटते आहे की, आमचे कोणी ऐकणारे नाही, त्याचे दोन परिणाम होत आहेत एक तर लोक आत्महत्या करुन घेतात किंवा दुस-याला काळे फासतात, हातामध्ये पिस्तुल घेऊन हिंसाचार करतात, पोलिसांना मारुन टाकतात. या ज्या गोष्टी घडत आहेत त्याचे कारण म्हणजे सहृदयतेने ऐकणारे कान आणि मन आपल्या जवळ नाही असा संदेश आता सगळीकडे जात आहे. जास्त माहिती न देता मला सांगितले पाहिजे की, दुष्काळाच्या परिस्थितीच्या संदर्भात खरे म्हणजे शासनाने श्वेतपत्रिका जाहीर करण्याची आवश्यकता आहे. आम्ही आतापर्यंत रोहयोवर किती पैसे खर्च केले, प्रत्येक जिल्हयांमध्ये रोहयोची किती कामे उपलब्ध आहेत यासंदर्भात शासनाने श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी शिवसेना नेते श्री. दिवाकरजी रावते यांनी कृषी मंत्र्यांच्या राजीनाम्याची जी मागणी केलेली आहे ती अतिशय योग्य आहे. कारण यामध्ये आम्ही कोणत्याही प्रकारचे राजकारण केलेले नाही. शेतकरी उत्सफुर्त आंदोन करीत होती त्यामध्ये जनता मला बोलवत होती त्यामुळे मी नाशिक, नांदेड, लातूर येथे गेले होते. तेथील जिल्हाधिका-यांना भेटलो. नाशिक मधील जिल्हाधिका-यांना भेटून विचारले की, सरकारी कंपन्या खताचे जे उत्पादन करतात त्यापैकी 10 टक्के पुरवठा देखील ते त्या त्या जिल्हयांना करीत नाहीत त्यामुळे यासंदर्भात शासन काही आढावा घेते काय? त्यावेळी जिल्हाधिका-यांनी सांगितले की, 10 टक्के खत मिळत असेल तर आमचा नाईलाज आहे, परंतु तरी देखील आम्ही पाठपुरावा करु. महाराष्ट्रात ज्या खतांचे उत्पादन होते त्यातील बरीच खते महाराष्ट्राच्या बाहेर दिली जातात ही त्यातील वस्तुस्थिती आहे. आज खताच्या संदर्भात सगळीकडे हिंसाचार पेटलेला आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपले विचार मांडत असतांना आपण त्यांना अडवत होता. येथे कोणीही राजकारण करु नये. परंतु तुमच्यातर जर हिंमत असेल मग सत्ताधारी पक्षाचे आमदार असो किंवा मंत्री असो तुम्ही स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्हयात जाऊन जनता दरबार घेऊन दाखवा आणि लोकांना फेस करुन दाखवा. लोकांचे काय प्रश्न आहेत ते तुम्ही सोडवून दाखवा व नंतर आमच्यावर विधीमंडळात टीका करा. काही ठिकाणी मंत्री हेलिकॉप्टरने जातात, त्यामुळे स्वत:चा जिल्हा सोडून किती पालक मंत्री दुस-या जिल्हयात गेले याचा आढावा आपण स्वत:चा स्वत: घ्या. पालक मंत्री फक्त स्वत:च्या जिल्हयात जाता, टी.व्ही.चॅनल समोर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे..

बोलतात परंतु बाकीच्या जिल्हयात मात्र ठणठणाट आहे. पालक मंत्री आपला जिल्हा सोडून दुस-या जिल्हयात जातच नाही अशी स्थिती आहे. जे चांगले अधिकारी आहेत त्यांना आपण आपापल्या जिल्हयात नेमलेले आहेत. कोणाला औरंगाबादमध्ये तर कोणाला पुण्यामध्ये नेमलेले आहे. विदर्भ आणि मराठवाडयात सर्व ज्युनिअर अधिकारी पाठविलेले आहेत. या ज्युनिअर अधिका-यांचे म्हणणे यंत्रणा ऐकतच नाही अशी स्थिती आहे. तुम्हाला जर खरोखरच परिवर्तन करावयाचे असेल तर जे अनुभवी अधिकारी आहेत, चांगले अधिकारी आहेत त्यांना खरे म्हणजे अविकसीत जिल्हयात पाठविले पाहिजे व बाकीचे जे कार्यक्षम अधिकारी आहेत त्यांचा फायदा आपण स्वत:च्या जिल्हयामध्येच घेऊ नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. आज माननीय उध्दवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली मोठया प्रमाणात आंदोलन सुरु आहेत. या आंदोलनामध्ये शेतकरी शिवसेनेकडेही विश्वासू साथीदार म्हणून पहात आहे. एकेकाळी लोक म्हणत होते की, शिवसेनाला शेती कळत नाही. परंतु शेती न कळणा-या लोकांकडे शेतक-यांचा ओघ जात असेल तर ज्यांना शेतीमध्ये काही कळते त्यांनी स्वत:ची काय पायरी आहे हे तपासून घ्यावे. नाही तर जनता देखील आपल्याला आपली पायरी दाखवणारच आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

जय भीम, जय महाराष्ट्र.

-------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सभागृहाचे विरोधीपक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर, शिवसेना गट नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते, शेकापचे नेते श्री. जयंत प्र. पाटील यांनी दुष्काळाच्या संदर्भात प्रस्ताव चर्चेला आणलेला आहे. या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. दुष्काळसदृष्य संकट महाराष्ट्रावर कोसळलेले आहे. मध्यंतरी साडेनऊच्या बातम्यांमध्ये एका शास्त्रज्ञाला पाचारण करण्यात आले होते. त्या चर्चेमध्ये पर्जन्यवृष्टीचे जे वेळापत्रक बदलले आहे त्यावर चर्चा झाली होती. अगोदर पाऊस कसा पडत होता आणि आता पाऊस कसा पडत आहे यासंदर्भात काही अनुमान आहेत. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. नवले यांनी या देशात कसे कसे दुष्काळ पडले याची माहिती दिलेली आहे. सन 1935 च्या बंगालच्या दुष्काळात 35 लक्ष माणसे मृत्यू पावली होती यासंदर्भातील माहिती त्यांनी दिलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ..

परंतु 9.30 च्या बातम्यामध्ये त्या शास्त्रज्ञाने काही अनुमाने सांगितलेली आहेत. पावसाच्या बाबतीत आपण वेळापत्रक ठरवून घेतलेले आहे. नैसर्गिक परिस्थितीमुळे तशा प्रकारची पर्जन्यवृष्टी होते ही अनुमाने आपण ठामपणे लक्षात ठेवतो आणि तशा प्रकारे पर्जन्यवृष्टी व्हावी अशी आपणा सर्वाची अपेक्षा असते. मृग नक्षत्र हे पहिले नक्षत्र असून 7 जूनला म्हणजेच मृग नक्षत्राला राज्यामध्ये शेतकरी सामान्यत: पेरणीला सुरुवात करतात. मृग नक्षात्राच्या वेळी पाऊस पडला पाहिजे परंतु जर त्यावेळी पाऊस पडला नाही तर तो का पडला नाही अशी भीती सर्वांना वाटते. पावसाचे जे काही वेळापत्रक आपण ठरविलेले आहे त्यानुसार पाऊस पडावयास पाहिजे अशी आपली अपेक्षा असते परंतु त्या शास्त्रज्ञाने असे विश्लेषण केलेले आहे की, या राज्यात आज पर्जन्यवृष्टी झाली नाही तरी पर्जन्यवृष्टी होण्याचा जो कालावधी आहे त्या कालावधीत पर्जन्यवृष्टी होणारच नाही असे सांगता येणार नाही. अशा प्रकारचे विश्लेषण त्यांनी केलेले आहे.याचा अर्थ आहे की, सुरुवातीला जरी पाऊस पडला नाही तरी नंतरच्या काळात मुसळधार पाऊस पडलेला आहे. 26 आणि 27 जुलै रोजी मुंबईमध्ये व राज्यामध्ये मुसळधार पाऊस पडला होता त्यावेळी पावसाने केवढे थैमान घातले होते हे आपणा सर्वांना माहीत आहे. कोकण असो, पश्चिम महाराष्ट्र असो, विदर्भ असो अशा प्रकारे संपूर्ण राज्यात पावसाने किती थैमान घातले होते हे आपण सर्वांना पाहिलेले आहे. त्यामुळे सुरुवतीलाच पाऊस जर पडला नाही तर नंतरच्या काळात पाऊस पडणारच नाही असे अनुमान काढता येणार नाही. त्याच प्रमाणे या पर्जन्यवृष्टीचा फायदा होणार नाही असेही अनुमान आपण काढू शकत नाही. गांभीर्याने या प्रश्नाची उकल झाली पाहिजे किंवा या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात चर्चा व्हावयास पाहिजे , त्याबाबतीत शासनाने निर्णय घेतले पाहिजेत अशी भूमिका विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून मांडण्यात आली आहे त्या भूमिकेशी या बाजूचे सन्माननीय सदस्य सुध्दा सहमत आहेत. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, चांगले काम करीत असतांना काही चुका होत असतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी एक हजार 75 कोटी रुपयांचे पॅकेज विदर्भातील सहा जिल्हयासाठी दिले होते .त्या भागात शेतक-यांचे आत्महत्याचे प्रमाण वाढलेले होते हे प्रमाण कमी व्हावे यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी पॅकेज दिले होते परंतु त्यात भ्रष्टाचार झाला होता असे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे आहे. मला त्यांना सांगावयाचे आहे की एखादे काम करीत असतांना भ्रष्टाचार होईल. कारण शासनाने निर्णय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ..

घेतल्या नंतर त्याची अंमलबजावणी करणारी शासकीय यंत्रणा असून मामलेदार, तलाठी, कारकून ही प्रशासकीय यंत्रणा ग्रामीण भागात काम करीत असतात. त्यामुळे त्यांच्याकडून भष्टाचार होणारच नाही असे मी सांगू शकत नाही परंतु शेतक-यांना मदत करण्यासाठी शासनाने काहीही केलेले नाही, या प्रश्नामध्ये शासनाने लक्ष घातलेच नाही ही भूमिका घेऊन या ठिकाणी ढोल वाजविण्याचे काम जर होत असेल तर ती नाऊमेद करणारी गोष्ट आहे असे मला सांगावेसे वाटते. काल तुम्ही सत्ताधारी पक्षात होता परंतु आज आम्ही आहोत उद्या कदाचित पुन्हा तुम्ही येऊ शकाल. तेव्हा सत्तेमध्ये कोण आहे याकडे न पाहता राजकारणाच्या पलीकडे जाऊन या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे असे मी आपल्याला सांगू इच्छितो.माननीय पंतप्रधानांनी 3 हजार 500 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते त्याचबरोबर केन्द्र सरकारने कर्ज माफी जाहीर केली होती .5 एकर किंवा दोन हेक्टर शेती असलेल्या शेतक-यांना कर्ज माफी देण्याच्या संदर्भात केन्द्र सरकारने निकष ठरविलेले आहे. त्याबाबतीत सांगावयाचे म्हणजे विदर्भात जमीन सपाट आहे. परंतु कोकणामध्ये अशी जमीन नाही. त्या ठिकाणी सलग जमीन नाही. कोकणामध्ये डोंगर, द-या, खाडया आहेत. म्हशीच्या शिगाप्रमाणे कोकणामध्ये जमीन आहे. रायगड जिल्हयामध्ये थोडी सपाट जमीन आहे. परंतु कोकणामध्ये मात्र सपाट आणि सलग अशी सुपीक जमीन नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरूनाथ कुलकर्णी ....

परंतु विदर्भामध्ये या संदर्भात असलेली परिस्थिती पाहिल्यास आपल्याला असे दिसते की, तेथे कोठूनही सुरूवात करा, अगदी अकोला, बुलढाणा असेल, यवतमाळ, भंडारा, गोंदिया असेल वा अगदी नागपूरपर्यंत आपण गेलो तरी त्या भागात कोठेही झाडे-डोंगर वगैरे दिसत नाही. सगळीकडे अगदी सपाट आणि सरळ जमीन आपल्याला दिसते आणि त्यामुळेच त्यांचे होल्डिंग जास्त आहे आणि त्यांचा ॲव्हरेज हा 54 एकर जमीन हे त्या ठिकाणी सिलिंग आहे. ....

**तालिका सभापती** (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांनी जरा खाली बसावे. आता दुपारचे 12 वाजले आहेत आणि सभागृहाच्या या विशेष बैठकीची वेळ ही 12 वाजेपर्यंत आहे व ही चर्चा पुढे चालू ठेवायची तर ती आपल्याला वाढविली पाहिजे. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयावर आज दुपारी देखील चर्चा सभागृहात होणार आहे ... तेव्हा सन्माननीय सदस्यांचे भाषण आपण येथेच थांबवून ठेवून दुपारी पुन्हा सुरू करावे. ...

**तालिका सभापती** : होय. हा विषय आजच्या कामकाज-पत्रिकेवर क्र.6 वर दाखविलेला आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांचे याबाबत काय म्हणणे आहे ?

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण सांगाल तसे करण्यास मी तयार आहे. आपण आता थांबा म्हटले तर मी 'ऑन लेग' राहण्यास तयार आहे. ...

**तालिका सभापती** : मला वाटते सन्माननीय सदस्यांनी आता आपले भाषण पुढे सुरू करावे. 10 मिनिटात त्यांनी त्यांचे भाषण संपविल्यास आपण त्यानंतर 10 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक स्थगित करून नंतर नियमित बैठक सुरू करू शकू. तरी सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरू करावे.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, विदर्भामध्ये आज 54 एकराचे सिलिंग आहे. तेथे एका एकाकडे एकर एकर जमीन आहे. तेथे मालगुजारी पद्धत असल्याने जमिनीचे होल्डिंग मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे सामान्यातील सामान्य शेतकऱ्याकडे देखील 5 एकरापेक्षा जास्त जमीन असल्याचे दिसून येते. ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य आहे. आता त्या पाच एकरामध्ये किती पीक येते हा भाग वेगळा आहे. त्याबाबत विचार केला तर पश्चिम महाराष्ट्रातील तेवढ्याच जमिनीमध्ये जेवढे पीक येते ते लक्षात घेतल्यास दोन्हीमध्ये मोठी तफावत आढळते. आता या

...... वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कुलकर्णी ....

ठिकाणी आमचे नवीन सदस्य श्री. संजय पाटील हे सांगलीकडील आहेत. त्यांच्या भागामध्ये, सांगली-कोल्हापूर भागामध्ये एका एकरातील ऊस देखील मोठ्या प्रमाणात येतो. तसेच आमच्या कोकणामध्ये भात पिकला नाही तर आमच्याकडील जमिनीचा काहीच उपयोग नाही. पण आमच्याकडे इतर बागायती फळझाडे, उदा. आंबा, काजू इत्यादीमुळे तसेच मच्छिमारीमुळे लोकांचा चांगला उदरनिर्वाह होतो. अन्यथा आमच्याकडील लोकांची अवस्था देखील विदर्भातील लोकांसारखीच होईल. तेव्हा विदर्भात 5 एकरापेक्षा जास्त जमिनीचे होल्डिंग आहे. आता त्यांना कर्जमाफीसाठी 71 कोटी रूपये केंद्राने दिलेले आहेत. आता त्यात काही चुका होणारच. मात्र त्यासाठी प्रयत्न जरूर केलेले आहेत आणि त्यातून कोणालाच फायदा मिळालेला नाही असे नाही. सभापती महोदय, आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे एक मासिक निघते. येथे नव्याने सदस्य म्हणून आलेले सन्माननीय श्री. हेमंत टकले यांना त्याची चांगली माहिती आहे. आता आमचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष केवढा मोठा पक्ष आहे पण एवढ्या पुरतेच मर्यादित ते मासिक नाही तर त्यात निरनिराळ्या विषयावर चर्चा केल्या जातात, लेख लिहिले जातात. अणुकरारासंबंधात देखील त्यात चर्चा केलेली आहे. तसेच ॲग्रिकल्चर संबंधात देखील मोठे लेख आलेले आहेत. आता आमचे नेते माननीय श्री.शरद पवार हे एक मोठे मान्यवर नेते आहेत म्हणून मी सांगत नाही, पण आपल्याला आश्चर्य वाटेल पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, मध्यंतरी हैद्राबाद येथे देशातील सर्व राज्यांतील कृषी मंत्र्यांची एक बैठक घेतली गेली. त्यात ग्लोबल वॉर्मिंगमुळे जे दुष्परिणाम होत आहेत त्याबद्दल चर्चा करण्यात आली. त्या बैठकीमध्ये पंजाबमधील कृषी मंत्री देखील हजर होते. त्यांचा त्यासंबंधीचा लेख आलेला आहे. तो वाचल्यानंतर मला आनंद वाटला. मध्यंतरी केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार हे भारताचे कृषी मंत्री म्हणून रोमला गेले होते आणि त्यावेळी अमेरिका व जपान हे दोन देश सोडून बाकी 137 देशांचे प्रतिनिधी तेथे आले होते. त्यांनी तेथे त्यांना सांगितले की, तुम्ही तुमच्याकडे कृषी व्यवस्थापन चांगल्या प्रकारे केलेले आहे. आम्हाला तुमच्याकडून धान्य पाहिजे आहे, ते तुम्ही आम्हाला द्याल काय ? ....

( यानंतर श्री. सरफरे .... झेड 1 ...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

हा एक महत्वाचा प्रश्न आहे. एन.डी.ए. सरकार असतांना गव्हाला 450 रुपये क्विंटल इतका भाव देण्यात आला होता. देशामध्ये मोठया प्रमाणावर शेती व्यवसाय होतो, 65 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. पंजाब आणि हरयाणामध्ये मोठया प्रमाणावर गव्हाचे आणि तांदळाचे उत्पादन होते. हिमाचल प्रदेश हा डोंगरी भाग असल्यामुळे त्याठिक्राणी मोठया प्रमाणावर फलोत्पादन होते. परंतु हरयाणा आणि पंजाबमध्ये जमिनीशिवाय दुसरे काहीही भांडवल नाही. ज्याप्रमाणे विदर्भामध्ये एकरो न् एकरी जमीन आहे त्याप्रमाणे पंजाब व हरयाणा राज्यामध्ये मोठया प्रमाणात जमीन उपलब्ध आहे. तसेच, त्याठिकाणी 60 ते 70 टक्के इरिगेशन फॅसिलिटी उपलब्ध आहे. त्यामुळे त्या राज्यामध्ये गव्हाचे आणि तांदळाचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते. मध्यंतरी हे धान्याचे उत्पादन रोडावले होते. 450 रुपये क्विंटलपेक्षा अधिक भाव न दिला गेल्यामुळे आणि इंन्सेटिव्ह न मिळाल्यामुळे धान्याचे मोठया प्रमाणावर उत्पादन वाढले नाही. परंतु त्यानंतर माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी गव्हाला आणि तांदळाला 1 हजार रुपये क्विंटल इतका भाव दिला. त्याचा परिणाम असा झाला की, त्या राज्यात इतक्या मोठया प्रमाणावर कधीही पिकाचे उत्पादन होत नव्हते इतके जबरदस्त गव्हाचे पीक आले. जवळपास 1 लाख मेट्रिक टन इतके गव्हाचे उत्पादन वाढले. त्यामुळे दर दोन दिवसांनी दूरचित्रवाणीवर बातमी झळकत असते. माननीय श्री. शरद पवार हे देशाचे केंद्रीय कृषी मंत्री असल्यामुळे गेल्या दोन-तीन वर्षात धान्याचे उत्पादन देशाच्या पातळीवर मोठया प्रमाणावर वाढले आहे, हे केवळ मी सांगत नसून ही वस्तुस्थिती आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, दुष्काळ महाराष्ट्रामध्ये पडला आहे, पंजाबमध्ये नाही. तेव्हा माननीय सदस्यांनी महाराष्ट्राविषयी बोलावे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी दुष्काळी परिस्थितीवरच बोलत आहे. माननीय सदस्यांना राजकारण कळणार नाही. माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांनी यावर्षी गव्हाचे भाव वाढवून दिल्यामुळे पंजाब राज्यातील शेतकऱ्यांना साडे 7 ते 8 हजार कोटी रुपये जास्त देण्यात आले ही वस्तुस्थिती आहे.

झेड 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

सभापती महोदय, या राज्याच्या आणि देशाच्या पातळीवर आपण अभ्यास केला तर सिंचनाची एकूण टक्केवारी 40 ते 45 टक्के इतकी आहे. देशाच्या पातळीवर कर्नाटक, तामिळनाडू किंवा अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रामधील इरिगेशनवर 65 ते 70 हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत.

.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी . . . .

परंतु दुर्दैवाने आमच्या राज्यातील इरिगेशन 15 ते 16 टक्क्यापेक्षा वाढू शकलेले नाही ही वस्तुस्थिती आहे ही गोष्ट मी लक्षात आणून देऊ इच्छितो. परंतु या राज्याची जी भौगोलिक परिस्थिती आहे, त्यामुळे ही गोष्ट होऊ शकत नाही. त्यामुळे आपण सूचना केली किंवा आमच्या कडून सूचना करण्यात आली तरी याबाबतीत फार मोठे काही घडणार आहे असे काही नाही. आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, दुपारी 12 वाजून 15 मिनिटांनी प्रश्नोत्तराचा तास सुरु होणार आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ठीक आहे. ज्यावेळेस या विषयावरील चर्चा पुन्हा सुरु होईल, त्यावेळी मी माझे अर्धवट राहिलेले भाषण पुढे सुरु करीन.

**तालिका सभापती** : मी आता सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 11 मिनिटांनी, 12 वाजून 15 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यात खतांच्या झालेल्या तुटवड्याबाबत**

**(१) * ४२२८५ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. सुरेश जेथलिया , श्री. किसनचंद तनवाणी , डॉ. निलम गोऱ्हे , श्रीमती अलका देसाई , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री सुभाष चव्हाण , श्रीमती मंदा म्हात्रे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री.विक्रम काळे , डॉ. वसंत पवार , श्री.परशुराम उपरकर , श्री. यशवंतराव गडाख , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री.केशवराव मानकर , श्री. चरणसिंग सप्रा, श्री. जयंत पाटील , श्री.कपिल पाटील , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. मधुकर चव्हाण , श्री. श्रीकांत जोशी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वप्रकारच्या खतांची विशेषत: डि.ए.पी.खतांची व बियाणांची तीव्र टंचाई निर्माण झालेली असल्यामुळे शेतकऱ्यांना फार मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे अथवा आणण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात खतांची एवढी टंचाई निर्माण होण्याची कारणे काय व त्यावर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यात अनेक ठिकाणी व्यापाऱ्यांकडून कृत्रिमरित्या खतांची टंचाई निर्माण करण्यात आलेली असून खत विक्रेते व्यापारी व खत उत्पादक खते काळ्याबाजारात व जास्त भाव लावून विक्री करीत असल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, उपरोक्त प्रकरणी अशा व्यापाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे,

(५) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) अंशत: खरे आहे.

(२) बी.टी.कापूस व सोयाबीन क्षेत्रातील वाढीमुळे डीएपी खत मागणीत वाढ झाली आहे. तसेच संयुक्त खतांची उपलब्धता मागणीच्या प्रमाणात नसल्याने डीएपी खताची मागणी वाढली. राजस्थानामधील सामाजिक आंदोलनामुळे दिनांक २०/५/२००८ ते १६/६/२००८ या कालावधीत रेल्वे वाहतूकीत बाधा निर्माण झाल्याने पुरवठ्यावर विपरित परिणाम झाला. कांडला व मुंद्रा या बंदर स्थानी दिनांक १३ ते १५ जून, २००८ दरम्यान अतिवृष्टी झाल्याने वाहतुक काही कालावधीसाठी बंद होती. त्यामुळे काही काळ राज्यात रासायनिक खतांचा पुरवठा वेळेवर होवू शकला नाही. डीएपी खताचा व संयुक्त खतांचा पुरवठा मागणीप्रमाणे उपलब्ध करुन देण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42285 ..... श्री. बाळासाहेब थोरात .....

(३) अंशत: खरे आहे.
(४) चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या खत विक्रेत्यांचे विक्री परवाने निलंबीत/रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच अवैध साठा प्रकरणी विक्रेत्याविरुध्द पोलिस स्टेशनला गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.
(५) खत पुरवठा सुरळित व समप्रमाणात होण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. टंचाईच्या काळात खत निरिक्षकासमोर शेतकऱ्यांना रासायनिक खताची विक्री करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुळातच या प्रश्नासंबंधी....

**सभापती** : कालपासून आपण जी चर्चा करीत आहोत त्यातील अतिशय महत्वाचा भाग या प्रश्नामध्ये सुध्दा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : काल माननीय कृषी मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते.

**सभापती** : आज ते उत्तर देणार आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल माननीय कृषी मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर येऊ द्यावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा जो प्रश्न आहे तो त्या चर्चेमध्ये सुध्दा आहे. माझी दोन्हीकडे उत्तर देण्याची तयारी आहे. आपण जी सविस्तर चर्चा करीत आहोत त्यामध्ये सुध्दा हा मुद्दा आलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी यावर एक दोन उपप्रश्न विचारावेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कालचा जो ठराव आहे तो दुष्काळासंबंधीचा आहे. त्यामध्ये अनेक विषय आहेत. हा प्रश्न फक्त स्पेसिफिक खताच्या संदर्भात आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या खतासंबंधीचा हा प्रश्न आहे. माझी उत्तरालाच हरकत आहे. यामध्ये पहिला प्रश्न असा विचारलेला आहे की, राज्यात सर्व प्रकारच्या खतांची विशेषत: डी.ए.पी. खतांची व बियाणांची तीव्र टंचाई निर्माण झालेली असल्यामुळे शेतकऱ्यांना फार मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत आहे ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे अथवा आणण्यात आली आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. महाराष्ट्रामध्ये खताची टंचाई

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 42285 ..... श्री. पांडुरंग फुंडकर ....

निर्माण झालेली आहे, हे खरे आहे असे उत्तर न देता अंशत: खरे आहे असे म्हटले आहे. महाराष्ट्रामध्ये खते पूर्णपणे उपलब्ध होती असे शासनाचे म्हणणे आहे काय ? माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. महाराष्ट्रात डी.ए.पी., सुफला, युरिया, अमोनियम सल्फेट या खताची मागणी किती होती आणि शासनाने 15 जूनपर्यंत किती खताचा पुरवठा केला ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हे खरे आहे की, देशामध्ये आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये खताचा मुबलक पुरवठा आहे असे मी म्हणणार नाही. परंतु आपली जी मागणी होती त्या मागणीच्या दृष्टीने आम्ही तयारी केलेली असल्यामुळे उत्तर देत असताना "अंशत: खरे आहे" असे शब्द वापरलेले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये एकंदर आबंटन आणि पुरवठा कशा पध्दतीचा झाला असा प्रश्न विचारलेला आहे. युरियाची 14 लाख 15 हजार टनाची एकंदर मागणी आहे. 15 जुलैपर्यंत 7 लाख 52 हजार टन....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पेरणी 8 जूनला सुरु झाली. 7 जूनला मृग नक्षत्र सुरु होतो. मी 15 जून पर्यंतची माहिती विचारलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय जुलैची माहिती देत आहेत. 15 जूनपर्यंत खताची काय तयारी केली ? किती खत आणले आणि किती पुरवले ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 12:20

ता.प्र.क्र.42285.....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी 15 जुलै पर्यंतची माहिती देत आहे. युरिया खताची टंचाई कधीच नव्हती, त्याचा पुरवठा चांगल्या प्रकारे झाला आहे. डी.ए.पी.चा प्रश्न निर्माण झाला असला तरी एकूण डी.ए.पी.पाहिजे होते त्याच्या बाबतीत 15 जुलै पर्यंतचे नियोजन आहे त्यामध्ये सरकारला 99 टक्के यश मिळाले आहे. एम.ओ.पी.ची 1 लाख मे.टनाची आवश्यकता होती....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा एक वाक्याचा प्रश्न होता. महाराष्ट्राला किती खतांची आवश्यकता होती आणि 15 जून पर्यंत युरिया, सुफला, 20 : 20 : 0 या खतांचा पुरवठा किती झाला ?

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, मी आपल्याला पुन्हा उपप्रश्न विचारण्याची संधी देईन. आपण मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मंत्रिमहोदय, आपल्याजवळ 15 जून पर्यंतची माहिती आता उपलब्ध नसेल तर आपण ती पटलावर ठेवावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : अशाप्रकारे माहिती पटलावर कशी ठेवता येईल ?

**सभापती** : मंत्रिमहोदयांनी त्यांच्याकडे या क्षणी 15 जुलैपर्यंतची माहिती आहे असे सांगितले आहे. खरे तर मंत्रिमहोदयांनी 15 जूनची माहिती आणणे आवश्यक होते. मंत्रिमहोदयांची पटलावर ठेवण्याची तयारी असल्यामुळे ते माहिती पटलावर ठेवतील.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सर्व खतांचा पुरवठा केल्यानंतरही संयुक्त खताचा पुरवठा व्हायला पाहिजे होता तेवढा झाला नाही. हे मी मान्य करतो की त्याची साथ जेवढी मिळायला पाहिजे होती ती मिळाली नाही. संयुक्त खते कमी मिळाली त्याचा परिणाम डी.ए.पी.ची लोकांची मागणी वाढली. त्याचप्रमाणे सोयाबीनचे उत्पादन चांगले झाले, चांगला भाव मिळाला त्यामुळे सोयाबीन व कापूस या पिकांचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढले. सोयाबीनची लागवड करण्याकडे लोकांचा कल वाढल्यामुळे डी.ए.पी.ची मागणी वाढली....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना असे कसे म्हणता येईल ? आम्ही उद्योजक नाही. डी.ए.पी.चे खत सोयाबीनला लागत नाही. मी सोयाबीन पिकविणारा शेतकरी आहे. सोयाबीनचा पेरा वाढला म्हणून डी.ए.पी.कमी पडले असे म्हणणे चुकीचे आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र.42285....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, कॉम्प्लेक्स खत कमी पडल्यामुळे डी.ए.पी.ची मागणी वाढली. त्यामध्ये युरियाचे कंटेण्ट, अमोनिया फॉस्फेट असते त्यामुळे ही मागणी वाढली आहे. ही वस्तुस्थिती आहे. अनेक लोकांनी सोयाबीन बरोबर त्याची पेरी केली.

श्री.पांडुरंग फुंडकर : मंत्रिमहोदयांनी मोघम उत्तर देऊ नये. महाराष्ट्रामध्ये खताची मागणी केली होती, डी.ए.पी., युरिया, सुफला, 20 : 20 : 0 आणि फॉस्फेट या खतांची किती मे.टनाची मागणी होती आणि 30 जूनपर्यंत किती मे.टन पुरवठा करण्यात आला ?

श्री.बाळासाहेब थोरात : मी सांगितले आहे की, युरियाची टंचाई निर्माण झालेली नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहात चुकीचे उत्तर येऊ नये. सरकारच्या कृषी खात्याची आकडेवारी माझ्याजवळ आहे. सरकारने युरियाची मागणी किती केली होती आणि पुरवठा किती केला ते सांगावे.

श्री.बाळासाहेब थोरात : युरियाचा 15 जुलैपर्यंत 7 लाख 52 हजार मे.टनाचा पुरवठा करावयाचा होता.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सभागृहात चुकीची माहिती दिली तर आम्ही त्यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव देऊ.

श्री.बाळासाहेब थोरात : प्रत्यक्षात 15 जुलैपर्यंत 8 लाख 55 हजार मे.टन इतका पुरवठा केला आहे. म्हणजे मागणीपेक्षा जास्त पुरवठा केला आहे. डी.ए.पी. सुध्दा 99 टक्के मिळाले आहे. एम.ओ.पी.ची 1 लाख मे.टनाची आवश्यकता होती, 1.55 लाख उपलब्ध झालेले आहे. फॉस्फेट मात्र कमी मिळाले आहे. एस.एस.पी.चा प्रश्न खूप मोठा आहे. आज तरी रॉक फॉस्फेट उपलब्ध होऊ शकत नाही. त्याच्यावर प्रक्रिया करुन सल्फ्यूरिक ॲसिट तयार करावे लागते. त्याचा पुरवठाच होत नसला तरी एम.ओ.पी.चा 1 लाख 75 हजार मे.टन पाहिजे होते. प्रत्यक्षात युरिया 1 लाख 13 हजार मे.टन उपलब्ध झाले आहे. संयुक्त खताबाबत मी म्हणेन की, 19 : 19 असेल किंवा आपली जी अपेक्षा असेल त्या सर्व खतांची 6 लाख 14 हजार मे.टनाची आवश्यकता होती, 3 लाख 45 हजार मे.टन मिळाले म्हणजे 56 टक्के मिळाले आहे. संयुक्त खते पुरेशा प्रमाणात मिळालेली नाहीत, त्याचा परिणाम इतर खतांच्या मागणीवर झाला. त्यामुळे सर्व खतांची टंचाई जाणवली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

नंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.42285.....

श्री. पाशा पटेल : मार्च-एप्रिल महिन्यामध्ये शेवटचा माल विकून शेतकरी खत विकत घेतो. राजस्थानमध्ये 16 मे नंतर आंदोलन सुरु झालेले असताना आपल्या राज्यातील खत पुरवठ्याचा आणि राजस्थानातील आंदोलनाचा काय संबंध आहे ? खते ही परदेशातून समुद्रमार्गे येत असतात. तेव्हा राज्यास्थान आणि समुद्र यांचा संबंध कसा काय जोडला गेला ? खतासंबंधीची खरी माहिती सरकार लपवून ठेवत आहे, हे खरे आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : आपण डीएपी पूणपणे आयात करायला सुरुवात केली. त्यासाठी मक्तेदारी दिली होती. कांडाला आणि मुंद्रा बंदरावर खते उतरविली जातात आणि त्यांची वाहतूक जिल्हा आणि तालुक्यांच्या ठिकाणी केली जाते. कांडला आणि मुंद्रा बंदरामध्ये खते आल्यानंतर जे सामाजिक गुर्जर आंदोलन झाले त्यामुळे दिल्लीकडे जाणा-या पॅसेन्जर ट्रेन्स ह्या अन्य मार्गाने वळविण्यात आल्या...(अडथळा) ..त्यामुळे आपल्याकडे खताची वाहतूक होण्यासाठी रेल्वेमार्ग उपलब्ध झाला नाही...(अडथळा).. ज्यावेळी आपल्या राज्यामध्ये खताची टंचाई निर्माण झाली त्यावेळी कांडला बंदरामध्ये 50 हजार टन डीएपी आपल्यासाठी उपलब्ध होते. परंतु रेल्वेमार्ग मिळत नसल्यामुळे ते खत आपण आणू शकलो नाही. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये अस्वस्थता निर्माण झाली.

श्री. जयंत प्र. पाटील : महाराष्ट्रातील किती बंदरामध्ये खत उतरविण्यात आले ? मुंबई पोर्टट्रस्टमध्ये किती डीएपी आणि युरिया खत उतरविण्यात आले. ही खते महाराष्ट्रातील बंदरामध्ये न उतरविता गुजराथमधील बंदरामध्ये का उतरविण्यात आली ? आमच्या अलिबाग येथे किती खते उतरविण्यात आली ? महाराष्ट्र औद्योगिक कृषी मंडळाला खतांचा पुरवठा करण्याची एजन्सी दिलेली होती आणि त्यासंबंधी मी मागील अधिवेशनामध्ये प्रश्न देखील विचारलेला होता. तेव्हा महाराष्ट्र औद्योगिक कृषी मंडळाने किती खत आयात केले आणि किती खताचा पुरवठा केला ?

श्री. बाळासाहेब थोरात : आपल्या राज्यामध्ये जेव्हा जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट तयार झाले त्यावेळी आपल्यासाठी एक पॉईण्ट ठेवलेला होता. परंतु त्यावेळी आयात न झाल्यामुळे आपली ती सुविधा गेली. महाराष्ट्रामध्ये खते उतरविण्यासाठी एकही बंदर नाही. ..(अडथळा)...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 12:30

ता.प्र.क्र.42285....

**सभापती** : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, माननीय कृषी मंत्र्यांचे एखादे उत्तर चुकीचे असेल तर आपण विशेषाधिकारभंगाची सूचना त्यांचे विरुध्द देऊ शकता, माननीय मंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे असे विरोधी पक्ष नेते म्हणून पॉईंट आऊट केले तर माननीय मंत्री महोदय आपल्या उत्तरात दुरुस्ती करु शकतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ....

**सभापती** : राज्यातील शेतक-यांच्या दृष्टीने खत हा विषय महत्वाचा आहे, तसेच राज्यात निर्माण झालेली टंचाईसदृश्य परिस्थिती, राज्यातील शेतक-यांना देण्यात आलेली कर्जमाफी असे तीन चार विषय महत्वाचे आहेत. या महत्वाच्या विषयांच्या बाबतीत काल सभागृहात चर्चा झाली, आज सकाळी देखील चर्चा झाली आणि ती अपूर्ण राहिलेली चर्चा आज दुपारी देखील सभागृहात होणार आहे. या चर्चेला माननीय कृषी मंत्री आणि इतर संबंधित मंत्री उत्तर देणार आहेत. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत खतासंदर्भातील प्रश्न प्रथम क्रमांकावर चर्चेला आहे. खताचा प्रश्न शेतक-यांच्या जिव्हाळयाचा असल्यामुळे त्यावर सन्माननीय सदस्यांना दोन, तीन प्रश्न विचारण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे. सन्माननीय सदस्यांच्या एखाद्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून मिळू शकले नाही तर ते उत्तर चर्चेच्या उत्तराच्या वेळी घेऊ शकता. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना एखादे उत्तर चुकीचे दिले असेल तर त्यांचा विरुध्द सन्माननीय सदस्यांना विशेषाधिकारभंगाची सूचना देता येऊ शकते किंवा सभागृहातील वेगळया आयुधाचा वापर करुन त्या प्रश्नाचे उत्तर आपण घेऊ शकता. परंतु सर्व सदस्यांनी एकाच वेळी उभे राहून माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारले तर त्यांना उत्तर देणे शक्य होणार नाही. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे, त्यानंतर मी माननीय विरोधी पक्ष नेते यांना उप प्रश्न विचारण्यास संधी उपलब्ध करुन देईन.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जे.एन.पी.टी.बंदरात खत उतरविण्यासाठी जागा नाही ही वस्तुस्थिती आहे. धरमतर बंदरावर काही प्रमाणात युरिया आणि एम.ओ.पी.खते उतरविण्यात आली होती. खते उतरविण्यासाठी शासनाकडे बंदर नाही. यासाठी स्वतंत्र बंदर असावे अशी मागणी मी मंत्री झाल्यापासून केंद्र शासनाकडे केलेली आहे. या मागणीचा मी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. खते उतरविण्यासाठी स्वतंत्र बंदर असले तर ही असुविधा टळू

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे की, एम.ए.आय.डी.सी. या संस्थेस आय.पी.एल.च्या माध्यमातून आपल्याला जे काही आयात करावयाचे आहे, जी त्रुटी डी.ए.पी.च्यामध्ये येत होती ते आयात करण्यासाठी आपण एम.ए.आय.डी.सी.ला नोडल एजन्सी म्हणून नेमले आहे. महाराष्ट्र शासनाने बँक गॅरंटी देऊन बँकेच्या माध्यमातून 150 कोटी रुपये आपल्याला उपलब्ध करुन दिले आहेत. खत खरेदी करण्यासंबंधी प्रथम आपणाकडून ऑर्डर नोंदविली जाते. ती ऑर्डर नोंदविली गेल्यानंतर केंद्र सरकार आय.पी.एल.ला सांगते असते की, महाराष्ट्रातून ऑर्डर नोंदविलेली आहे, त्यांची ऑर्डर मान्य करा. आपल्याला आतापर्यंत 38 हजार टन डी.ए.पी. उपलब्ध झाले आहे. यापुढच्या काळासाठी आणखी डी.ए.पी. उपलब्ध करुन घेण्याची शासनाची तयारी आहे. हा विषय केंद्र शासनाच्या सबसिडीशी संबंधित असल्यामुळे केंद्र सरकार या गोष्टीस मान्यता देत असते. आपल्याला अजून दीड लाख टन डी.ए.पी.पाहिजे आहे आणि त्यासाठी ऑर्डर नोंदविण्याची व पैसे भरण्याची शासनाची तयारी आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : खरीप हंगामाच्या बैठका शासनाच्या पातळीवर घेतल्या जातात. खरीप हंगामाच्या बैठकांमध्ये सर्व जिल्हयांची आकडेवारी जमा होते. महाराष्ट्रात मृग नक्षत्र लागल्यानंतर म्हणजे 7 जून नंतर पेरण्या होत असतात. माझ्याकडे कृषी उद्योग विकास मंडळाचे पत्र आहे. माननीय मंत्र्यांनी मघाशी माहिती दिली की, 150 कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध झालेले आहे. या 150 कोटी रुपयातील 18 कोटी रुपये दिनांक 5.5.08 रोजी त्यांच्याकडे जमा केले. त्यापोटी 20 हजार मेट्रीक टन खत उपलब्ध करुन घेतले आहे. आणि 15 हजार मेट्रीक टन खत घेण्यासाठी दिनांक 26.6.08 रोजी उपलब्ध करुन दिले.जूनमध्ये शेतक-यांची पेरणी सुरु झाली. खतासाठी शेतक-यांनी लाठया खाल्ल्या तरी शासन खत मागविण्याच्या संदर्भात पैसे भरण्यास तयार नाही. 20:20:0 ची मागणी नोंदविलीच नाही. सदर कर्ज किती तारखेस मंजूर झाले ? केंदाने आय.पी.एल.कडे मागणी कधी नोंदविली ? शासनाने पैसे कोणकोणत्या तारखेस भरले ?

श्री. बाळासाहेब थोरात : एप्रिल,2008 मध्ये 150 कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. मी यापूर्वीच सन्माननीय सदस्यांना सांगितले की, शासनाची आजही मागणी नोंदविण्याची तयारी आहे. केंद्र सरकार आय.पी.एल.ला सांगते की, त्यांनी एवढया मेट्रीक टनाची मागणी केली आहे, ती

3...



ABG/ SBT/ MMP/ प्रथम श्री. शिगम 12:30

ता.प्र.क्र.42285....     श्री. बाळासाहेब थोरात....

मागणी मान्य करावी. ती मागणी मान्य झाल्यानंतर शासनाला पैसे भरावे लागतात. त्यानंतर आपली मागणी पूर्ण होत असते.

-------

......यानंतर          श्री.कानडे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ पूर्वी श्री.गिते 12:35

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य वेलमध्ये उभे राहून घोषणा देतात)

( गोंधळ )

**ता.प्र.क्र. 42609**

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य घोषणा देत असतात)

**सभापती** : राज्यात तीन प्रश्नांच्या अनुषंगाने म्हणजे शेतीच्या अनुषंगाने, शेतकऱ्यांच्या अनुषंगाने तसेच बँकांच्या संदर्भात आणि खतांच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाची बाब होती. म्हणून काल याविषयावर चर्चा स्वीकारली. ती चर्चा काल झाली, आज सकाळी झाली आणि दुपारी सुध्दा होणार आहे. सन्माननीय कृषीमंत्री या चर्चेला सविस्तर उत्तर देणार आहेत. या प्रश्नावर किमान 5-6 उपप्रश्न विचारले गेले आहेत. विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की त्यांनी आपापल्या जागेवर बसावे आणि सदनामध्ये शांतता ठेवावी.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात विशेषत: कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यात मत्स्यव्यवसाय करणाऱ्या कोळी बांधवांवर माशांच्या दुष्काळामुळे उपासमारीची पाळी उद्‌भवल्याबाबत**

**(३) * ४३०६० श्रीमती अलका देसाई , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. चरणसिंग सप्रा , श्री.भास्कर जाधव , श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री सुभाष चव्हाण , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांना गेल्या आठ वर्षापासून मासळी दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाने जाहिर केलेले ३१ लाख ५६ हजार रुपयांचे पॅकेज अपूरे पडत असून त्याची थेट अंमलबजावणी आणि मासळी दुष्काळावर ठोस उपाययोजना कार्यान्वित होत नसल्यामुळे मच्छिमारांवर आपत्ती ओढवली आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच कोकण विभागातील बंदराची क्षमता अथवा मत्स्यसाठ्याची मर्यादा विचारात न घेता असंख्य नौकांद्वारे अनियंत्रित मासेमारी सुरु असून या तळ ढवळून काढणाऱ्या विध्वंसक मासेमारीमुळे मत्स्यबीज खाद्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, व वाढते प्रदुषण, सागरी अधिनियमाची पायमल्ली, अशा कारणामुळे कोकणातील मस्त्य उद्योगावर दुष्काळाचे संकट ओढवलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे, असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्‌नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीची कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिस अहमद** : (१) नाही.

कोकणातील मच्छिमारांना विशेष पॅकेज अंतर्गत रुपये ३१.५६ कोटी सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, कोकणामध्ये मत्स्यदुष्काळ आहे हे खरे आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मत्स्य व्यवसाय करने वाले लोगों के लिए मछली का दुष्काल है, इसलिए कोंकण में मछली पकड़ने वाले लोगों के लिए सरकार ने 31 करोड़ रुपए का पॅकेज जाहिर किया है और इसके लिए शासन ने जी.आर. निकाला है. इस हफ्ते से उनको मदद देने का काम किया जाएगा. रापणकार संघ के सभासदों को प्रति कुटुंब 5 हजार रुपए दिये जाएंगे. लाभार्थियों की संख्या 4,351 है और इनको रु. 2,17,55,000 की सहायता दी जाएगी. प्रत्येक बिगर यांत्रिक नौकाधारक को 10,000 रुपए दिए जाएंगे. लाभार्थियों की संख्या

....3



SSK/ पूर्वी श्री.गिते 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 43060

श्री.अनिस अहमद..

2,253 है और इनको रु. 2,25,30,000 की सहायता दी जाएगी. प्रत्येक 1-2 सिलिंडर नौकाधारक को 10,000 रुपए दिए जाएंगे. लाभार्थियों की संख्या 8,252 है और इनको रु. 8,25,20,000 की सहायता दी जाएगी. प्रत्येक 3-4 सिलंडर नौकाधारक को 15,000 रुपए दिए जाएंगे. लाभार्थियों की संख्या 1,475 है और इनको रु. 2,21,25,000 की सहायता दी जाएगी. प्रत्येक 6 सिलिंडर नौकाधारक को 20,000 रुपए दिए जाएंगे. लाभार्थियों की संख्या 5,607 है और इनको रु. 11,21,40,000 की सहायता दी जाएगी. प्रत्येक छोटे मछली विक्रेता को 2,000 रुपए दिए जाएंगे. लाभार्थियों की संख्या 27,278 है और इनको रु. 5,45,56,000 की सहायता दी जाएगी. इस प्रकार से कुल लाभार्थियों की संख्या 49,216 है और इनको कुल मिलाकर रु. 31,56,26,000 की सहायता दी जाएगी. इस प्रकार से मछली पकड़ने वाले लोगों के लिए शासन ने एक नया पॅकेज दिया है. कोंकण के अन्दर मछली पकड़ने वाले लोगों को बहुत ज्यादा तकलीफ हो रही है और सरकार उनकी मदद हर तरह से कर रही है. वर्ष 1990 में मछली पकड़ने वाले लोगों की संख्या 9,819 थी, जबकि वर्ष 2008 में यह संख्या बढ़कर 18,630 हो गई है. पिछले साल 80 करोड़ रुपए डीजल की सबसिडी के रुप में दिए गए थे. पूरे देश में इस प्रकार की सबसिडी मछली पकड़ने वाले लोगों को कहीं पर भी नहीं दी गई है. इस साल सरकार ने डीजल पर 100 करोड़ रुपए की सबसिडी देने का काम किया है.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**सभापती** : अशा परिस्थितीत कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृह 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.40 ते 12.55 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगिती नंतर)**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**तारांकित प्रश्न क्र. 42285 बाबत**

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, शेतकऱ्यांना आपण न्याय द्यावा, अशी माझी विनंती आहे..

**सभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सभागृहाच्या दोन्ही बाजूकडिल काही सन्माननीय सदस्य टंचाईच्या संदर्भात सुरु असलेल्या चर्चेवर बोलले, अजून काही सदस्यांना बोलावयाचे आहे, कारण ती चर्चा अपूर्ण आहे. या चर्चेला उत्तर देत असताना माझी माननीय कृषी मंत्री तसेच संबंधित मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, खालच्या सभागृहात आणि वरच्या सभागृहात या चर्चेवरील उत्तर देताना थोड्या अंतराने उत्तर दिले जावे. कारण जर सन्माननीय सदस्यांना एखादी शंका राहिली तर त्याचे निरसन मंत्री महोदयांना त्यांच्या उत्तरात करता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, आम्ही स्पेसिफिक विभागाचा प्रश्न उपस्थित केला होता. सुरुवातीलाच मी सांगितले की, सभागृहासमोर ज्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे त्या प्रस्तावाची व्याप्ती फार मोठी आहे. त्यात प्रामुख्याने दुष्काळी परिस्थिती, राज्यात उद्‌भवलेली पिण्याच्या पाण्याची टंचाई, रोजगार हमी योजनेच्या कामाची मागणी, कर्जमाफी अशा अनेक गोश्टी त्यात अंतर्भुत होतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात या प्रस्तावाची व्याप्ती असल्यामुळे त्याला उत्तर देताना पहिल्या प्रश्नामध्ये खताच्या पुरवठयाबाबत जो स्पेसिफिक प्रश्न उपस्थित केला आहे त्याला उत्तर मिळेलच याबाबत आमच्या मनात शंका आहे. काल आम्ही या सभागृहात जे विचार व्यक्त केले आहेत त्यावेळी माननीय कृषी मंत्री उपस्थित नव्हते. त्यामुळे आमच्या ज्या शंका आहेत त्यांचे निरसन माननीय मंत्री महोदय करतीलच असे नाही. आमचे म्हणणे असे आहे की, हे सरकार या सर्व गोष्टींमध्ये असफल झाले आहे. कारण राज्यात एप्रिल महिन्यातच खताची मागणी करायला पाहिजे होती पण शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे तसेच हे शासन निष्क्रीय असल्यामुळे जून-जुलैपर्यंत म्हणजेच शेतकऱ्यांच्या पेरण्या आटोपल्यानंतर राज्यात खताचा पुरवठा करण्याचा विचार हे शासन करीत आहे. त्यामुळेच राज्यातील शेतकऱ्यांना या खताच्या मागणीसाठी लढा द्यावा लागला. माननीय मुख्यमंत्र्यांच्या गावात खताची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांनी रक्त सांडले, अकोल्यात शेतकऱ्यांचे रक्त सांडले तरीही मंत्री महोदय समाधानकारक उत्तर देत नसतील तर ते योग्य नाही, म्हणून आपल्याकडून आम्हाला न्याय मिळावा अशी आमची आपल्याला विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या अनुषंगाने जे जे प्रश्न सभागृहात उपस्थित होत असतील त्याबाबत मी देखील गंभीर आहे. कारण मी स्वत: एक शेतकरी आहे, आपणही शेतकरी आहात. मी खालच्या सभागृहात असताना देखील कृषी व शेतकऱ्याच्या संदर्भातही सातत्याने जाण ठेवणारा सदस्य होतो. यापूर्वी देखील सभागृहात कृषी विभाग अथवा अन्य विषयांवर चर्चा झालेल्या आहेत. कालपासून आपली जी चर्चा चालू आहे ती जवळपास चार तास होऊन गेली असून अजून निदान दोन तास तरी ही चर्चा चालणार आहे, त्यानंतर त्या चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. असे असताना प्रत्येकाचे समाधान करण्याच्या दृष्टीने आणि एकंदरित वेळा पत्रकाच्या दृष्टीने विचार करता सभापतींना सुध्दा काही मर्यादा येतात, अशी परिस्थिती आहे. प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने मला असे वाटते की, किमान सहा सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी मी दिलेली आहे. मला खात्री आहे की, माननीय कृषी मंत्री हे सुध्दा कृषी क्षेत्रातील अनेक अडचणींवर मात करणाऱ्यांपैकी एक आहेत हे मी गेल्या 25 वर्षांपासून पाहत आहे. कदाचित माझ्या मताशी माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते हे नक्कीच सहमत होतील. म्हणून माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांच्या ज्या शंका असतील त्या चर्चेला उत्तर मिळत असताना सदस्यांनी मंत्र्यांकडून माहिती घ्यावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, प्रस्तावाची व्याप्ती मोठी असल्यामुळे आम्हाला प्रश्न विचारण्याची संधी मिळणार नाही.

**सभापती** : एखाद्या प्रस्तावावर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सुरु असताना अथवा संपल्यानंतर सन्माननीय सदस्यांच्या शंका असतील तर एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी नेहमीच देण्यात येते, यापूर्वी देखील दिलेली आहे आणि या उत्तराच्या वेळी सुध्दा सदस्यांना एक-दोन प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

कृपया सन्माननीय सदस्यांनी आता या विषयावर आपले विचार मांडू नयेत. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्नोत्तराच्या तारांकित यादीतील प्रश्न क्रमांक 43060 वर चर्चा सुरु होती. त्यामुळे अपूर्ण राहिलेल्या प्रश्नाला पुन्हा सुरुवात करण्यात येत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी प्रश्न विचारावा.

**( तारांकित प्रश्न क्रमांक 43060 पुढे सुरु......**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, राज्यातील मत्स्यव्यवसाय करणा-या मच्छिमारांना मासळी दुष्काळामुळे त्यांच्यावर आपत्ती ओढवलेली नाही असे उत्तरात नमूद करण्यात आलेले आहे. जर या मच्छिमारांवर आपत्ती ओढवली नसेल तर कोकणातील मच्छीमारांना 32 कोटी रुपये सानुग्रह अनुदान कोणत्या कारणासाठी देण्यात आलेले आहे ? सानुग्रह अनुदानाचे विशेष पॅकेज मंजूर करतांना कोणते निष्कर्ष शासनाने लावले आहेत याची माहिती माननीय मंत्रीमहोदय सभागृहाला देतील काय?

श्री. अनिस अहमद :जिस प्रकार से किसानों को मदद करने के लिए पॅकेज की घोषणा की गई है उसी प्रकार से मछली पकड़ने वालों को मदद की गई है. 1990 में मछली पकड़ने वालों की संख्या 9819 थी. अब यह संख्या 2008 में 18630 हो गई है. पहले एक आदमी 100 किलो मछली लाता था, वह अब 50 किलो लाता है. उसी प्रकार समुद्र में प्रदूषण बढ़ जाने की वजह से दूर समुद्र में मछली पकड़ने के लिए जाना पड़ता है. कोंकण के मछली पकड़ने वालों के लिए पॅकेज होना चाहिए, ऐसी मांग की गई थी. इसलिए सरकार ने मछली पकड़ने वालों के लिए 32 करोड़ रुपये के पॅकेज की घोषणा की है. सरकार ने यह तय किया है कि ट्रेडिशनली मछली पकड़ने वालों को प्रति परिवार 5 हजार रुपये की मदद की जाएगी और 1-2 सिलेंडर धारक को 10 हजार रुपये, 3-4 सिलेंडर धारक को 15 हजार रुपये और 6 सिलेंडर धारक को 20 हजार रुपये मदद की जाएगी. इस प्रकार से मछली पकड़ने वालों कागे 5 हजार से 25 हजार रुपये तक मदद की जाएगी.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी कोकणातील मच्छिमार कुटुंबांना 5 हजार रुपयांपासून ते 25 हजार रुपयांपर्यंत सानुग्रह अनुदान देणार अशी घोषणा केलेली आहे. कोकणामध्ये खारवी बांधव मच्छिमारीचा व्यवसाय करीत असतात तसेच भोई समाजही मच्छिमारी करीत असतो परंतु या समाजाचा मच्छिमार कुटुंबामध्ये समावेश करण्यात आलेला नाही त्यामुळे या कुटुंबांचे सर्व्हेक्षण करुन त्यांनाही या योजनांचा लाभ मिळावा यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय ? कोकणामध्ये 40 फॅटमच्या आत मच्छिमारी करु नये असे निर्बंध असल्यामुळे आतपर्यंत जाऊन मच्छिमारी करण्याची अद्यावत यंत्रणा मच्छिमारांजवळ नाही. तसेच मत्स्य विद्यापीठ कोकणात व्हावे यासाठी याजी कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली असून या समितीच्या तीन बैठकाही झालेल्या आहेत. त्यामुळे कोकणात मत्स्य विद्यापीठ स्थापन होण्याच्या दृष्टीने शासन अंतिम निर्णय घेणार आहे काय?

श्री. अनिस अहमद : कोंकण में मत्स्य विद्यापीठ स्थापित करने के संबंध में डॉक्टर मुंणगेकर की अध्यक्षता में एक समिति बनाई गई है. इस समिति की दो बैठके हुई हैं. उनकी एक टीम इसी सिलसिले में कोचीन भेज रहे हैं और इसके अलावा एक टीम मेंगलोर भेज रहे हैं. रत्नीगिरी के कलेक्टर को भी कहा गया है कि मत्स्य विद्यापीठ के लिए 200-300 एकड़ जमीन कहीं मिल सकती है तो वे देखें. माननीय कृषि मंत्री को भी अनुरोध किया गया है कि दापोली में कृषि विद्यापीठ के पास अगर एक्सेस जमीन होगी तो वह मत्स्य विद्यापीठ के लिए देंगे तो वहां मत्स्य विद्यापीठ स्थापित कर सकते हैं. तो जैसे ही जमीन मिलेगी हम मत्स्य विद्यापीठ स्थापित करेंगे. डॉ. मुणगेकर समिति की रिपोर्ट आने के बाद कोंकण में मत्स्य विद्यापीठ स्थापित करने का काम करेंगे.

यानंतर श्री गायकवाड

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना असा स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, कोणत्या निकषावर मत्स्य दुष्काळ जाहीर केला जातो ?

श्री अनिस अहमद : सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने यह नहीं कहा है कि मत्स्य दुष्काल हो गया है या मत्स्य दुष्काल हो रहा है या मत्स्य दुष्काल हुआ है और इसलिए पॅकेज दिया जा रहा है. बल्कि मछली मारने वालों को मदद करने के लिए पॅकेज दिया गया है.

**सभापती** : मत्स्य दुष्काळ कोणत्या निकषावर ठरविला जातो या संबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे.

श्री अनिस अहमद : मैं मत्स्य दुष्काल के संबंध में यह कहूंगा कि अगर एक हजार टन मछली का उत्पादन होता है और उसमें अगर 50 प्रतिशत की कमी आ जाती है तो उस स्थिति को स्केअर्सिटी बोलते हैं. दूसरी बात यह है कि पहले जितनी संख्या में मछली पकड़ी जाती थी उतनी संख्या में आज भी पकड़ी जाती है. सिर्फ मछली पकड़ने वाले डबल हो गए हैं. पहले मछली पकड़ने वालों की संख्या 9819 थी, अब यह संख्या बढ़ कर 18630 हो गई है.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला आहे की, मासेमारी करणा-यांना या वर्षी कमी मासे मिळाले आहेत तेव्हा मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याच्या दृष्टीने काही निकष ठरविण्यात आलेले आहेत काय, जर निकष ठरविण्यात आले नसतील तर ते निकष तयार करण्यात येणार आहेत काय ?

श्री.अनिस अहमद : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला लेखी प्रश्न असा विचारला आहे की, " राज्यातील मत्स्यव्यवसाय करणा-या लाभार्थ्यांना गेल्या आठ वर्षापासून मासळी दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाने जाहीर केलेले 31 लाख 56 हजार रुपयांचे पॅकेज अपुरे पडत असून त्याची थेट अंमलबजावणी आणि मासळी दुष्काळावर ठोस उपाययोजना कार्यान्वित होत नसल्यामुळे मच्छिमारांवर आपत्ती ओढवली आहे हे खरे आहे काय ?
या प्रश्नाला " नाही " असे उत्तर देण्यात आले आहे. राज्य शासनाने 31 लाख 56 हजार रुपयाचे पॅकेज दिलेले आहे. केन्द्र सरकारने 61 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060....

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी....

निर्णय घेतला आहे. मासळीचा दुष्काळ जाहीर करीत असतांना जे पॅकेज जाहीर केले आहे ते अपुरे आहे तेव्हा ते पॅकेज वाढवून द्यावे यासाठी पुन्हा सर्व्हेक्षण करण्यात येणार आहे काय ? त्यांना मदत दिली जाणार आहे काय ? या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री अनिस अहमद : सरकार का यह पहले से ही स्टेण्ड है कि :इस संबंध में कभी भी दुष्काल नहीं हुआ है. सरकार मछली पकड़ने वालों को मदद दे रही है.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी मराठीतून उत्तर द्यावे किंवा हिंदीतून द्यावे. "दुष्काळ " हा हिंदी शब्द नाही. तो मराठी शब्द आहे.

श्री.अनिस अहमद : सभापती महोदय, मला मराठी समजते.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागतात )

**सभापती** : हा प्रश्न कोकण विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या भागातील जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना मी प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देतो आणि त्यानंतर प्रश्नोत्तराचा तास संपवितो. आता सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी प्रश्न विचारावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, शेतक-यांना देण्यात आलेल्या कर्जमाफी प्रमाणे मच्छिमारांची देखील कर्जमाफी व्हावी अशी मागणी मच्छिमारांकडून करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? तसेच समुद्रातून शिंपल्या आणि कालवं काढून उपजीविका करणा-यांबाबत सानुग्रह अनुदानाचा विचार केलेला नाही. त्यामुळे मच्छिमार कर्ज काढू लागले आहेत. त्यांच्याकरिता सानुग्रह अनुदान का देण्यात आलेले नाही ? त्यांना देखील सानुग्रह अनुदान देण्यात येईल काय ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 13:00

ता.प्र.क्र.43060 ...

श्री अनिस अहमद : सभापति महोदय, कर्ज माफ करने के संबंध में मैं खुद माननीय प्रधानमंत्री जी से और माननीय श्री शरद पवार जी से मिला हूं. उन्होंने कहा कि हम विचार कर रहे हैं. केन्द्रीय सरकार ने यह आश्वासन दिया है कि छोटे लोगों का कर्ज जरुर माफ करेंगे. दूसरी बात यह है कि मरीन फिशिंग रेगूलेशन एक्ट, 1981 में सरकार अमेंडमेंट करने जा रही है. छोटी मछलियां पकडने के कारण उत्पादन रुक सकता है और दुष्काल पड़ सकता है, इसलिए हम एक्ट में अमेंडमेंट कर रहे हैं. जून, जुलाई और अगस्त में मछलियां पकड़ने पर रोक है. अगर कोई इन तीन महिनों में मछलियां पकड़ेगा तो उसको फाईन भरना पड़ेगा. एक हजार रुपये से 50 हजार रुपये दंड करने का प्रावधान करने जा रहे है. अगर कोई व्यक्ति इन तीन महिनों में तीन बार मछली पकड़ते हुए पाया जाएगा तो उसे जेल की सजा दी जाएगी. एक्ट में इस प्रकार का प्रावधान करने जा रहे हैं. जून, जुलाई और अगस्त में हम मछली पकड़ने के लिए इसलिए पाबंदी करने जा रहे हैं कि छोटी मछलियां और अंडे देने वाली मछलियां पकड़ी जाएगी तो मछलियों की संख्या बढ़ नहीं पाएगी इसलिए तीन महीने मछली पकड़ने पर पाबंदी लाने के लिए सरकार एक्ट में अमेंडमेंट करेगी. इसी संबंध में पहले कलेक्टर को अधिकार था लेकिन हम अब सहायक आयुक्त और रीजनल डेप्युटी कमिश्नर को अधिकार देने वाले हैं. क्रीक इलाकों में भी हम मछली पकड़ने पर पाबंदी करने वाले हैं ताकि मछलियों की संख्या बढ़े. समुद्र में प्रदूषण बढ़ रहा है, समुद्र में आयपीसीएल के काम करने के कारण और आयल रिग्स के कारण प्रदूषण फैल रहा है और इसी वजह से मछलियां पकड़ने के लिए दूर समुद्र में जाना पड़ रहा है. इन कारणों की वजह से हम कड़े कानून करने का विचार कर रहे हैं.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच शासनाला धन्यवाद देतो की, या शासनाने पहिल्यांदाच मच्छिमारांसाठी मोठे पॅकेज दिलेले आहे. परंतु या ठिकाणी प्रश्न असा आहे की, या पॅकेजमध्ये काही त्रुटी मोठ्या प्रमाणात राहिल्या आहेत. जे छोटे एमआय इंजिनधारक आहेत, ज्याला आमच्याकडे पात म्हणतात त्या पातीला कोठल्याही प्रकारे अनुदान दाखविलेले नाही. तर त्याला अनुदान मिळणार आहे काय ? सभापती महोदय, या पॅकेजमध्ये ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत त्या अधिकाऱ्यांमुळे राहिल्या आहेत. यामध्ये आपण शीतपेट्या दिलेल्या आहेत. पण त्या लोकांना नको आहेत. तेव्हा त्या ऐवजी आपण अनुदान देणार का ? तसेच मत्स्य दुष्काळ

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060 ...

श्री. राजन तेली....

जाहीर करण्याच्या दृष्टीने जे निकष लागतात ते जुने निकष असल्याने ते आपण बदलणार आहात का ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री राजन तेली जी ने कहा है कि जो छोटे इंजिन धारक है उनको मदद नहीं मिली है. मैं उनसे यह कहना चाहूंगा कि आप इस संबंध में एक पत्र दे दीजिए. इस संबंध में कमिश्नर से चर्चा की जाएगी और उन लोगों को भी पॅकेज के माध्यम से मदद की जाएगी.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना विनंती करीन की, त्यांनी प्रश्न विचारताना प्रश्न डेव्हलप करण्यात वेळ न घालविता नेमका प्रश्न विचारल्यास अधिक सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी मला देता येऊ शकेल. तरी सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले प्रश्न विचारावेत.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, शासनाने जे हे अनुदान जाहीर केलेले आहे ते कमी असल्याने ज्या योजनेत 5 हजार मिळणार होते तेथे 3 हजार रूपये देण्याची योजना सुरू झालेली आहे हे खरे आहे काय ? आणि काही बोटींमधून पर्शिअन नेटने मच्छिमारी केली जाते आणि त्यामुळे माशांची लहान लहान पिल्ले देखील पकडली जातात आणि त्यामुळे देखील मत्स्य दुष्काळ होतो. त्यामुळे अशा ट्रॉलर्सची नोंद शासनाकडे आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, हमने यह तय किया है कि नई ट्राली को लाईसेंस नहीं देंगे तथा जून, जुलाई और अगस्त महीने में मछलियां पकड़ने पर पाबंदी की जाएगी. इन तीन महीनों में कोई मछलियां पकड़ता हुआ पाया जाएगा तो उसे एक हजार रुपये से 50 हजार रुपये तक फाईन किया जाएगा और ट्राली भी अलाऊ नहीं की जाएगी. इस प्रकार का प्रावधान हम एक्ट में करने जा रहे हैं.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण हे 31.56 कोटी सानुग्रह अनुदान मंजूर केले आहे. हे अनुदान आपल्या हातामध्ये मत्स्य व्यावसायिकांना देण्यासाठी केव्हा मिळणार आहे ? तसेच माझा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी विचारला तोच आहे. त्यांनी पर्शिअन नेट संबंधात प्रश्न उपस्थित केलेला होता तेव्हा त्या विषयी शासन काही कडक धोरण अवलंबिणार आहे काय ?

यानंतर श्री सरफरे ...

अशुद्धप्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 43060...

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, सरकार पर्शियन नेट पर पाबंदी लाना चाहती है क्योंकि पर्शियन नेट में छोटी मछलियां भी पकड़ी जाती है. नियम के अनुसार तीन सेंटीमीटर की जाली होनी चाहिए लेकिन कुछ लोग 6 सेंटीमीटर की जाली इस्तेमाल कर रहे हैं. इसलिए हमने हमने 6 सेंटीमीटर की जाली इस्तेंमाल करने पर बॅन किया है. लेकिन कुछ मछली पकड़ने वालों ने सुप्रीम कोर्ट से स्टे लिया है. हम स्टे वॅकेट करने के लिए कोशश कर रहे हैं. हम छोटी मछलियां पकड़ने पर रोक लगाना चाहते हैं.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, डहाणू, तलासरी तालुक्यातील आदिवासी लोक मच्छिमारीकरिता बोटीच्या मालकांबरोबर समुद्रात जातात. त्यावेळी त्यांना पाकिस्तान सरकारकडून पकडले जात असल्यामुळे ते बेपत्ता होतात. त्यांना पाकिस्तानच्या जेलमध्ये ठेवण्यात येते. अशाप्रकारे अटक करण्यात आलेल्या मच्छिमारांना केंद्र सरकारने 3 लाख रुपयांची मदत दिली, परंतु राज्य सरकारने अजूनपर्यंत एक छदामही दिलेला नाही. त्यांना राज्य सरकार मदत देणार आहे काय?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, राज्य सरकार मदद करेगी. दुर्घटना के संबंध में सरकार ने मदद की राशि में वृध्दि की है.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, राज्य सरकारने एक पैसाही दिलेला नाही.

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री रावते जी मुझे डिस्टर्ब कर रहे हैं. बीच-बीच में बोल रहे हैं. वे हमारे बीच दीवार बनते हैं. इसलिए मुझे सम्माननीय सदस्य का प्रश्न ठीक से सुनाई नहीं दे रहा है.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी पाकिस्तानच्या जेलमध्ये असलेल्या मच्छिमारांबाबत प्रश्न विचारला आहे आणि मंत्रिमहोदय अपघाता विषयी सांगत आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, मच्छिमारांची संख्या वाढल्यामुळे दुष्काळ पडला. प्रश्न असा आहे की, जून ते ऑगस्ट या ब्रिडींग पिरियडमध्ये मासेमारी केली जाते म्हणून दुष्काळ पडला आहे की, मासे पकडणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे दुष्काळ पडला आहे ? निश्चित काय उत्तर आहे?

ता.प्र.क्र. 43060...

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, मैं बार बार कह रहा हूं कि मत्स्य दुष्काल नहीं है बल्कि मछली पकड़ने वालों की संख्या बढ़ गई है. इसलिए पूरे देश में यह कानून बनाया गया है कि जून, जुलाई और अगस्त महीने में मछली पकड़ने पर पाबंदी रहेगी.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदय बरोबर उत्तर देत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून लहान मच्छिमारांना अत्यंत कमी मासे मिळत आहेत. याचे कारण असे की, मोठ मोठया ट्रॉलरमधून मासेमारी केली जात असल्यामुळे पारंपारिक मासेमारी करणाऱ्यांना दुष्काळ सोसावा लागत आहे. त्यामुळे आपण मदतीचे निकष बदलल्याशिवाय त्यांना मदत मिळणार नाही. पाकिस्तानच्या जेलमध्ये जे मच्छिमार आहेत त्यांची उपासमार होत आहे. तेव्हा जोपर्यंत ते जेलमध्ये आहेत, तोपर्यंत त्यांच्या उपजीविकेची व्यवस्था शासन करणार आहे काय?

श्री. अनिस अहमद :सभापति महोदय, जो मछली पकड़ने वाले पाकिस्तान के जेल में बंद है, उस के संबंध में विदेश मंत्री से बात करके उन्हें छुड़ाने के लिए पूरी कोशिश की जाएगी.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मच्छिमारांना सहकारी सोसायटीमार्फत मदतीचे वाटप करण्यात येईल काय? तसेच, छोटया होडीवाल्यांचा पॅकेजमध्ये समावेश करुन त्यांना मदत देणार काय ? किनाऱ्यावर असलेल्या छोटया मच्छिमारांचा पॅकेजमध्ये अंतर्भाव करणार काय ?

श्री. अनिस अहमद :सभापति महोदय, सरकार मछली पकड़ने वाले छोटे लोगों की भी मदद करेगी और उनकी सहकारी सोसायटी को भी मदद करेगी. क्योंकि मछली पकडने वाले छोटे लोगों ने ही अपनी सहकारी सोसायटी बनाई है. सरकार मछली पकड़ने वाले छोटे लोगों की, सहकारी सोसायटी की और किनारपट्टी के पास रहने वाले मछली मारने वालों की भी मदद करना चाहिती है.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43060 . . . .

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण मला पुन्हा प्रश्न विचारण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी मघाशी एक प्रश्न विचारलेला होता, तोच मी पुन्हा विचारु इच्छितो. मी माननीय मंत्री महोदयांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, मच्छिमार म्हणून कोळी समाज आणि खारवी समाजातील लोक ॲडेन्टीफाय आहेत. परंतु फक्त कायम मासेमारी व्यवसाय करणारे, खाडीच्याच कडेला रहाणारे आणि दुसरा कोणताही व्यवसाय न करणारे, जागा नसणारे जो भोई समाज आहे, त्यांना ॲडेन्टीफाय केलेले नाही. त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. म्हणून या समाजाचे देखील सर्वेक्षण करुन त्यांना शासन लाभ देणार आहे काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच याठिकाणी माननीय मंत्री महोदय एक मुद्दा वारंवार सांगत आहेत की, पूर्वी 9 हजार मच्छिमार होते, ती संख्या आता 19 हजार झालेली आहे. 50 टक्क्यापर्यंत मासेमारी कमी झाल्याशिवाय दुष्काळ जाहीर होत नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याचा अर्थ मासळी वाढलेली नाही. मात्र पूर्वी 9 हजार मच्छिमार मासेमारी करीत होते, ती संख्या आता 19 हजार झालेली आहे. म्हणजे 50 टक्क्यापेक्षा मासळी कमी झाली. मग हा दुष्काळ नाही काय ?

श्री.अनिस अहमद : सभापती महोदय, माननीय सदस्य ने भोई समाज को मदद देने संबंधी प्रश्न पूछा है. मैं इस संबंध में यह कहना चाहूंगा कि अधिकारियों से चर्चा करके उनको भी इस पॅकेज के माध्यम से मदद करने की कोशिश करेंगे. दूसरी बात यह है कि चायना, आस्ट्रेलिया और यूरोप में एक्वा कल्चर फिशिंग हो रही है. इस पध्दति से फिशिंग करने से मछलियों की संख्या बढ़ सकती है. नये कार्यक्रम केवल पॅकेज के माध्यम से नहीं हो सकते हैं इसलिए पूरे महाराष्ट्र में फिशिंग के संबंध में एक्वा कल्चर फिशिंग का एक नया प्रोग्राम करने के बारे में सरकार विचार कर रही है. इस प्रकार का प्रोग्राम आंध्र प्रदेश, कर्नाटक राज्य में शुरु किया जा चुका है.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे एका मुद्याकडे लक्ष वेधू इच्छितो. मघाशी निकषाच्या बाबतीत मुद्दा उपस्थित झाला होता. मत्स्य दुष्काळ घोषित का केला जात नाही ? मासळीची टंचाई का भासत नाही ? तर याबाबतीत बाबा आदमच्या काळातील,

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ....

इंग्रजांच्या काळातील नियम आहे की, 50 टक्क्यापेक्षा कमी मच्छिमारी झाली पाहिजे. पण त्यावेळी ट्रॉलर आणि पर्शिअन नेट असा प्रकार नव्हता. त्यामध्ये पकडली जाणारी मच्छी ही छोटया मच्छीमध्ये धरली जाते.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यामुळे शासन याबाबतीत टंचाई घोषित करु शकत नाही. तेव्हा शासन हा निकष बदलणार आहे काय ? असा माझा पहिला स्पेसिफिक प्रश्न आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी एकच प्रश्न विचारावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पाकिस्तानच्या जेल बाबतचा मुद्दा उपस्थित झाला होता, त्याबाबतीत माननीय केंद्रीय परराष्ट्र मंत्री काही करु शकणार नाहीत. परंतु आपल्या येथून मच्छिमारीसाठी जाणाऱ्या लोकांची नोंदणी होत नाही. तशी आपण मच्छिमारीसाठी जाणाऱ्या लोकांची नोंदणी करावयास पाहिजे. गुजराथ सरकार तशी नोंदणी करीत आहे आणि जे लोक जेलमध्ये असतात, त्यांची सुटका होईपर्यंत त्यांच्या कुटुंबियांना निर्वाह भत्ता दिला जातो. अशा प्रकारे मच्छिमारीसाठी जाणाऱ्या लोकांची नोंदणी करणार आहात काय ? तसे करण्याची गरज आहे. त्याप्रमाणे आपण करणार आहात काय ?

श्री.अनिस अहमद : सभापती महोदय, होय. गुजरात राज्य की धरती पर महाराष्ट्र राज्य में भी रजिस्ट्रेशन करने का काम शुरु किया गया है, उस संबंध में प्रोसेस शुरु की है. मैं यह कहना चाहता हूं कि इस विषय के संबंध में सम्माननीय सदस्य जो सुझाव देना चाहते हैं वे दें, उसका विचार किया जाएगा. इस विभाग में नये सचिव आए हैं, नये कमिश्नर आए हैं. आप जो सुझाव देंगे, मछली पकड़ने वालों की जो समस्याएं हैं, मैं उसके बारे में आपको हंड्रेड परसेंट कन्विंस करुंगा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी ॲक्वाकल्चरच्या संबंधात माहिती देताना सांगितले की, युरोप आणि अन्य देशांमध्ये मच्छीची उत्पत्ती वाढविण्यासाठी ॲक्वाकल्चर मोठया प्रमाणात विकसित झालेले आहे. मी सन्माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, कोकण पट्टयामध्ये काही लोकांनी ॲक्वाकल्चरच्या दृष्टीने संपूर्ण व्यवसाय सुरु केले. परंतु आज तेथील ॲक्वाकल्चरचा व्यवसाय बंद झालेला आहे.

..2



**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी एक सांगितले जाते आणि आज प्रत्यक्षात कोकणामध्ये अशी परिस्थिती आहे की, जर सीड आणावयाचे असेल तर पश्चिम बंगालमध्ये, आंध्र प्रदेशमध्ये, चेन्नईला जावयास पाहिजे. तेव्हा सीड उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था महाराष्ट्रामध्ये निर्माण करणार आहात काय ? तसेच त्यासाठी किती कालावधी लागेल? याची माहिती द्यावी.

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य यह कह रहे हैं कि महाराष्ट्र में एक्वा कल्चर पध्दति से मछली व्यवसाय करने में समस्या पैदा हो रही है, सीड लेने के लिए दूसरे राज्यों में जाना पड़ता है. सरकार इस संबंध में यह विचार कर रही है कि जरुरत पड़ने पर बीओटी के माध्यम से एक्वा कल्चर का काम किया जाए. सम्माननीय सदस्य इस संबंध में जो सुझ ााव देंगे, उन पर विचार किया जाएगा. सरकार एक्वा कल्चर के माध्यम से मछली पकड़ने का कार्यक्रम करना चाहती है और इस संबंध में मछली पकड़ने वालों को सरकार मदद करना चाहती है.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 43060 .......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. मासेमारीचा दुष्काळ ठरविण्याचे निकष कोणते आहेत ? या ठिकाणी वारंवार निकष बदलण्यासंबंधी मागणी केली गेली. ते निकष बदलण्यासंबंधी शासन विचार करणार आहे काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, केन्द्रीय सरकार के फार्मूले के अनुसार लगातार तीन साल 50 प्रतिशत से कम उत्पादन होता है तो दुष्काल जाहिर किया जाता है.

**सभापती** : यामध्ये काही संशोधन करणे गरजेचे असेल तर शासन करणार काय ?

श्री. अनिस अहमद : होय. इस बारे में स्टडी करने के बाद नये स्टेप उठाने की जरुरत होगी तो जरुर उसके अनुसार स्टेप उठाए जायेंगे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. कोकण विभागातील अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सभागृहाची वेळ 10 मिनिटे वाढवून देऊन मी या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिस अहमद यांनी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.** : तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने बुधवार, दिनांक 16 जुलै, 2008 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : बुधवार, दिनांक 16 जुलै, 2008 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

**पृ.शी./मु.शी.**: विधेयकांना संमती व अधिसंमती

**सभापती** : दोन्ही सभागृहाव्दारे पारित केलेल्या पुढील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याची यादी माननीय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली :-

( येथे सोबत जोडलेली यादी छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : काल दिनांक 16 जुलै, 2008 रोजी नियम 93 अन्वये आलेल्या ज्या सूचना वाचावयाचा राहिलेल्या होत्या त्याबाबत मी आता निर्णय देत आहे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील व कपिल पाटील यांनी " दिनांक 20.6.2008 रोजी पेण ( जि. रायगड ) तालुक्यातील खरोशी-दुरशेत रस्त्यावर साकुच्या दुरुस्तीचे काम चालू असताना इलेक्ट्रिक वायरमधून वीज प्रवाह अँगलव्दारे प्रवाहित झाल्याने श्री. अजय महादेव घरत हा विद्यार्थी जागीच ठार होणे व एक विद्यार्थी गंभीर जखमी होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी "मुळशी धरणग्रस्तांना धरणाचे फायदे देण्यात न येणे, या धरणाच्या पाण्यावर टाटा वीज कंपनी वीज निर्मिती करीत असून सदर कंपनी धरणग्रस्तांना वेठीस धरीत असणे, सदर कंपनी व शासनाने धरणग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याची जाहीररीत्या केलेली घोषणा फसवी असल्याने विद्यमान विधानसभा सदस्य श्री. शरद ढमाले यांनी मुळशी धरणाच्या जलाशयामध्ये जलसमाधी घेण्याची केलेली घोषणा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "मुंबईतील गिरण्या बंद झाल्याने सुमारे अडीच लाख गिरणी कामगारांची रोजीरोटी गेल्याने त्यांचे संसार उद्‌ध्वस्त होणे, सदर कामगारांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने वेळोवेळी सभागृहात घोषणा करुनही त्यावर काहीही कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी सर्वशिक्षा अभियान अंतर्गत प्रत्येक जिल्हयामध्ये...

**सभापती** : मी चेक करुन घेतो. परंतु मी आता कालच्या म्हणजे 16 तारखेला सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या 93 च्या सूचना वाचल्या आहेत.

आता आज दिनांक 17 जुलै रोजी नियम 93 अन्वये सूचना आलेल्या आहेत. त्यापैकी काही सूचना शासनाने निवेदन करण्यासाठी मी स्वीकारल्या आहेत. त्याबाबतचे निर्णय मी वाचून दाखवितो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे यांनी "महाराष्ट्र राज्य अपंग संस्था शिक्षक व कर्मचारी संघटनेच्यावतीने त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी दि.2 एप्रिल, 2008 रोजी चर्चा होऊनही त्यावर कार्यवाही न झाल्याने राज्यातील अपंग शिक्षक व कर्मचारी दि.21 जुलै, 2008 पासून अन्न सत्याग्रह करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "कोयना प्रकल्पामुळे सातारा-रत्नागिरी जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांची जमीन वन विभागाकडून शासनाकडे हस्तांतरण होऊनही गत 40 वर्षांपासून किमान एक हजार लोकांना जमीन न देणे तसेच त्यांना इतर सुविधा न मिळणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "नजरचुकीने देण्यात आलेले गुण रद्द करुन पास केलेल्या विद्यार्थ्यांना नापास करण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये निर्माण झालेला गोंधळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील वेंगुर्ले व मालवण तालुक्यातील समुद्राचे अतिक्रमण गेल्या दोन-तीन वर्षांपासून सुरु असून पावसाचे पाणी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

बागायती शेतीमध्ये घुसल्याने माड व सुरुची झाडे उन्मळून पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "शासनाच्या प्रयोगशाळेत आयात केलेला लाल गहू निकृष्ट दर्जाचा असून तो मानवी जीवनास खाण्यास अयोग्य असल्याचा अहवाल असूनही सदर गव्हाचे विदर्भाच्या बहुतांश जिल्हयात वितरण व विक्री सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबईतील सायन येथील प्रतिक्षा नगर संक्रमण शिबिरातील काही भाडेकरुंना म्हाडाने घुसखोर म्हणून घोषित करणे, सदर घुसखोरांसोबत म्हाडातील कर्मचारी व दलाल यांचे संगनमत असणे, सन 2007 च्या पावसाळी सत्रात माननीय मंत्र्यांनी आश्वासन देऊनही अद्याप त्यावर कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविल्या जाणा-या डहाणू तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळांना गेल्या 25 दिवसांपासून सडके धान्य पुरविले जात असून विद्यार्थ्यांना ते खावे लागत असल्यामुळे त्यांच्या शारीरिक प्रकृतीवर परिणाम होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

3....



**सभापती**.....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "राज्यात जात पडताळणीची सुमारे एक लाख चाळीस हजार प्रकरणे प्रलंबित असणे, जिल्हानिहाय जात पडताळणी समित्या शासनाने स्थापन न केल्याने आरक्षित वर्गातील विद्यार्थी विशेष सेवांमध्ये भरती झालेले उमेदवार, पदोन्नती मिळालेले कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी इत्यादींना जात प्रमाणपत्र उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "सर्वशिक्षा अभियानांतर्गत राज्यातील काही जिल्हयात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक परिषदेने दिनांक 23 जून, 2006 च्या पत्रान्वये साधन व्यक्ती/विषय तज्ज्ञ यांच्या जागा कंत्राटी पध्दतीने भरल्या असणे, सदर पदावरील व्यक्तींना मानधनाची रक्कम दहा हजार रुपयांवरुन चार हजार रुपये करण्यात येणे, त्यांच्या मानधनात सहा हजार रुपयांची कपात झाल्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माहितीच्या मुद्यासंबंधी**

डॉ. दीपक सांवत : सभापती महोदय, माझा माहितीसंबंधीचा मुद्दा आहे. कालपासून "प्रेक्षक गॅलरी" ऐवजी "प्रेक्षक दीर्घा" या शब्दप्रयोगामुळे वाद चालू होता. मला एवढेच सांगावयाचे आहे की, "गॅलरी" या शब्दासाठी मराठीमध्ये "दीर्घा" ऐवजी "सज्जा" हा शब्द आहे. "दीर्घा" हा हिंदी शब्द आहे.

**सभापती** : मी काल संध्याकाळी प्रधान सचिव आणि सचिव यांना ही बाब तपासून पाहाण्यास सांगितले होते. तसेच याबाबतीत माननीय अध्यक्षांशी माझी दुपारी चर्चा होईल. मराठीचा जास्तीत जास्त वापर करण्याचा आपणाकडून आणि सर्वांकडून प्रयत्न होतोय. विधिमंडळाच्या माध्यमातून आणि अन्य माध्यमातून महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा सातत्याने जास्तीत जास्त वापर व्हावा या अनुषंगाने जे काही पर्यायी प्रचलित शब्द आहेत, उदा. रेल्वे हा जसा प्रचलित शब्द आहे आणि तसे इतरही शब्द आहेत, त्याबाबतीत मी प्रधान सचिव आणि सचिव यांना "गॅलरी" या शब्दाला अन्य पर्यायी शब्द शोधण्यास सांगितले आहे.

श्री. दिवाकर रावते : मराठीचा वापर करण्यासंबंधी मी एक महिन्यापासून सचिवांच्या मागे होतो. एका ठिकाणी "विधानसभागृह" असे लिहिलेले आहे. त्या ऐवजी तेथे "विधानसभा सभागृह" असे लिहावयास पाहिजे. त्यांनी सांगितले की पेंटर रजेवर आहे, तो रजेवरुन आल्यानंतर दुरुस्ती करुन घेतो. "गॅलरी" ऐवजी तेथे "दीर्घा" असा शब्दप्रयोग तातडीने करण्यात आला. परंतु मराठी शब्दाचा वापर करण्यास सांगावे लागले हे दुःख आहे. सभापती महोदय, "गॅलरी" ऐवजी "दीर्घा" हा शब्द वापरल्यानंतर एक आमदार माननीय अध्यक्षांकडे गेले.... "दीर्घा" हा शब्द शब्दकोषातील आहे...

डॉ. दीपक सावंत : "दीर्घा" हा हिंदी शब्द आहे.

**सभापती** : "गॅलरी" ऐवजी सज्जा किंवा कक्ष हे शब्द वापरण्यासंबंधी आपण जरुर चर्चा करु......

श्री. दिवाकर रावते : मी याबाबतीत कोणावर टीका करीत नाही..

**सभापती** : सन्माननीय अध्यक्षांच्या अनुषंगाने मला या ठिकाणी काही सूचना केली तर मी जरुर त्यांच्याशी चर्चा करीन. परंतु याबाबतीत त्यांचा उल्लेख करणे बरोबर नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : मला एकाच गोष्टीचे दु:ख वाटते. आम्ही सचिवांना मराठी शब्दाचा वापर करण्यास सांगितले. त्यांनी "गॅलरी" या शब्दाऐवजी "दीर्घा" या शब्दाचा वापर केला. ही बाब दूरदर्शनच्या माध्यमातून सा-या महाराष्ट्रभर गेली. मी माननीय अध्यक्षांना आदरपूर्वक पत्र दिलेले आहे. सचिवांना देखील पत्र दिलेले आहे. आपणाकडून मराठीचा वापर व्हावा असा आग्रह मी धरतो. मी कुणावर आक्षेप घेत नाही.

**सभापती** : मराठीच्या वापरासंबंधी आपणच आग्रह धरता असे नाही तर आपण सर्वजण याबाबतीत आग्रही असतो. मी रात्री 11.30 वाजता प्रधान सचिव आणि सचिवांना सांगितले आहे की, याबाबतीत तातडीने कार्यवाही होणे गरजेचे असून "गॅलरी" या शब्दाला पर्यायी शब्द शोधून त्याचा वापर करावा.

...नंतर श्री. गिते....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, शासकीय कामकाजात पूर्णपणे मराठीचा वापर आपण करतो आहोत ही स्वागतार्ह गोष्ट आहे. या सभागृहात मतदानाची संख्या दर्शविणारा तक्ता लावण्यात आलेला आहे. त्यावर "AYES" व "NOES" असे इंग्रजी अक्षरे आहेत. या इंग्रजी अक्षरा ऐवजी त्या ठिकाणी "होय" किंवा "नाही" अशा अक्षरांचा मराठी तक्ता लावावा अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : आपल्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्या डॉ़.नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, मराठीचा अभिमान हा सर्वांना असला पाहिजे. मराठी माणसांना मराठीचा अभिमान असला पाहिजे. मराठी भाषेचा अभिमान तुम्हाला, आम्हाला असला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु या देशात आणि राज्यात पूर्वीपासून सिस्टीम काम करीत आहे. जिल्हा स्तरावरील कोर्टात गेलात, तालुका स्तरावरील कोर्टात गेलात किंवा उच्च न्यायालयात गेलात तर त्या ठिकाणी इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषेत साक्षी पुरावे नोंदवून घेतले जातात. त्या ठिकाणी कोणते व्हर्शन बरोबर आहे असे जर गृहीत धरावयाचे म्हटले तर तेथे काही वेळेस इंग्रजी व्हर्शन ग्राहय धरले जाते. काही वेळा मराठी व्हर्शन ग्राहय धरले जाते. ही बाब आपल्याला प्रत्येक कोर्टामध्ये पहावयास मिळेल. परंतु पूर्वीपासून प्रचलित शब्द वापरला जातो आहे आणि त्यास पर्यायी शब्द काढतो आणि त्याचा वापर करतो तर तो शब्द कधी कधी बरोबर वाटत नाही. "गॅलरी" हा पूर्वीपासूनचा प्रचलित शब्द आहे. त्या शब्दाचा अर्थ तुम्हाला जो अभिप्रेत आहे, तो अर्थ मला अभिप्रेत होऊ शकत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना या शब्दास हरकत घेण्याचे कारण काय आहे ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत आपण एक विधायक सूचना केली आहे. तशी विधायक सूचना सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सुध्दा केली आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी देखील विधायक सूचना केली आहे. या विषयाच्या अनुषंगाने मी प्रधान सचिवांना आणि सचिवांना काल रात्री सांगितले आहे की, "गॅलरी" या शब्दाला अचूक शब्द आपण शोधून काढा. जो शब्द

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

सन्माननीय सदस्य श्री. रावते यांना सोपा वाटेल, तो शब्द कदाचित सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना सोपा वाटणार नाही. "गॅलरी" या शब्दाला पर्यायी मराठी शब्द प्रधान सचिव आणि सचिवांनी हुडकून काढावा अशी सूचना मी दिली आहे. मराठी भाषेला सगळयांनी प्राधान्य देण्याच्या दृष्टीने प्रयत्नांची पराकाष्टा करावी असे मला देखील वाटते.

श्री. दिवाकर रावते : विधिमंडळ इमारतीच्या लिफ्टचा आम्ही वापर करतो. त्या ठिकाणी त्रिभाषा सूत्र कशाला पाहिजे ? विधिमंडळाच्या त्या लिफ्ट आहेत. या लिफ्टमध्ये त्रिभाषा सुत्राचा वापर का करीत आहात म्हणून मी संबंधित अधिका-यांना जाऊन सांगितले आहे. लिफ्टमध्ये आत प्रवेश केल्यानंतर म्युझिक ऐकावयास येते. लिफ्टमध्ये हिंदी गाण्याचे म्युझिक अथवा हिंदी गाणे ऐकविण्या ऐवजी सनईचा आवाज ठेवावा. सदर म्युझिक बंद व्हावे म्हणून मी एका महिन्यापासून प्रयत्न करीत आहे. लिफ्टमध्ये सध्या सुरु असलेले म्युझिक आपणाला मान्य आहे काय ?

**सभापती** : आपली आणि तुमची अनेक वेळा भेट झाली. परंतु ही बाब तुम्ही माझ्या निदर्शनास आणून दिली नाही. ही बाब तुम्ही माझ्या निदर्शनास आणून दिली असती तर त्यासंबंधी मी लागलीच कार्यवाही केली असती.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लोकमान्य टिळक या देशभक्तांना द्रेशद्रोहाच्या गुन्हयाखाली शिक्षा होऊन 100 वर्षे आज पूर्ण झाली आहेत. मी या सदनामध्ये "बॉम्बे हायकोर्टाचे नाव मुंबई उच्च न्यायालय " असे करावे अशा प्रकारची अनेक वेळा विनंती केली आहे. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांशी अनेक वेळा पत्रव्यवहार केलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी " आपल्या सूचनेचा आम्ही विचार करीत आहोत" अशा प्रकारचे उत्तर मला पाठविलेले आहे. मी पुन्हा शासनास या सभागृहाच्या माध्यमातून विनंती करतो की, "बॉम्बे हायकोर्टाचे" नाव "मुंबई उच्च न्यायालय"असे करावे.

**सभापती** : ठीक आहे. शासनाने सदर सूचनेबाबत नोंद घ्यावी.

------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:40

**नियम 93 च्या सूचनेवरील  निवेदन अद्याप प्राप्त न होणे**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी आपण नियम 93 च्या सूचना वाचून दाखविल्या आणि त्या अनुषंगाने काही सूचनांच्या बाबतीत निवेदन करण्याचे निदेश दिले आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये नियम 93 च्या तीन सूचना मी दिल्या होत्या, त्याबाबतीत शासनास निवेदन करण्याचे निदेश दिले होते. परंतु शासनाकडून आजपावेतो त्या सूचनेवरील निवेदने सभागृहात केलेली नाहीत. याबाबतीत शासनास पुन:श्च निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : यासंदर्भात आपण पत्र द्यावे. त्या पत्राच्या अनुषंगाने मी पुढील कार्यवाही करतो.

--------

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

आता लक्षवेधी सूचना ही बाब सभागृहासमोर आहे. पहिली लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलण्याचे ठरविले आहे. इतर दोन लक्षवेधी सूचना आहेत. कामकाजपत्रिकेवर त्या दाखविण्यात आलेल्या आहेत म्हणजे त्या कामकाजात येणारच. लॅप्स होणार नाहीत. 2 जुलै रोजी झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला आहे की, दररोज चार लक्षवेधी सूचना सभागृहात चर्चेला येतील. एक तासामध्ये या चार लक्षवेधी सूचना पूर्ण करावयाच्या आहेत. ज्याप्रमाणे प्रश्नोत्तराचा तास एक तासाचा असतो त्याप्रमाणेच लक्षवेधी सूचनावरील चर्चा एक तासामध्ये पूर्ण केली जाईल. त्याचप्रमाणे कामकाज सल्लागार समितीमध्ये असाही निर्णय घेण्यात आला आहे की, नियम 93 अन्वये केले जाणारे निवेदन ज्या सन्माननीय सदस्याच्या नावावर असेल त्या सन्माननीय सदस्याने एक प्रश्न विचारावयाचा आहे. यासंदर्भात खालच्या सदनामध्ये काय निर्णय झाला आहे याचे उदाहरण देणे बरोबर होणार नाही आणि मी देणारही नाही. विषयाच्या अनुषंगाने जे निवेदन करावयाला सांगितले जाते ते परिपूर्ण निवेदन आहे काय यावर प्रश्न विचारले जातात आणि काही वेळा प्रश्न इतके वाढत जातात की अन्य अत्यंत महत्वाचे असे कामकाज बाजूला पडण्याची शक्यता निर्माण होते. म्हणून कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबतीत सर्वांनी मिळून घेतलेला हा निर्णय आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्याबद्दल असणाऱ्या सद्‌भावनेचा फायदा घेत असतो.

**सभापती** : सद्‌भावनेचा फायदा अपवाद म्हणून घेतला तर समजू शकतो. परंतु ती प्रॅक्टीस होता कामा नये. सकाळी सदनामध्ये दुष्काळावरील चर्चा सुरु होती ती आता पूर्ण केली जाईल. आजच्या लक्षवेधी सूचना मी पुढे ढकलीत आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

( 1.48 ते 2.30 मध्यंतर )

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .. ...

या योजनेसाठी राज्यातील वकील, सी.ए., दुकानदार, व्यापारी तसेच ज्या पानठेल्यांचे उत्पन्न ठराविक मर्यादेच्या वर आहे त्यांच्याकडून प्रोफेशनल टॅक्सच्या रुपाने रक्कम घेतली जाते व त्यातून राज्यातील मजुरांना, ज्यांना कामाची गरज आहे त्यांना रोजगार हमीच्या माध्यमातून कामे देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. तसेच या योजनेसाठी शासनाने 50 टक्के मॅचिंग ग्रँट द्यावी, अशीही संकल्पना होती. मघाशीच मी सांगितले की, रोजगार हमी योजना बंद झाल्याचा उल्लेख येथे करण्यात आला आणि त्या माध्यमातून संपूर्ण राज्यात असा मेसेज गेला की, रोजगार हमी योजनेतून ज्यांना कामे पाहिजेत, त्यांना कामे मिळणार नाहीत. कारण रोजगार हमी योजना शासनाने बंद केलेली आहे. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. कारण राज्यातील रोजगार हमी योजना आणि केंद्राने नवीन तयार केलेल्या एमआरईजीएस मधून देखील राज्यातील मजुरांना कामे मिळू शकतात. म्हणून मागील वेळी या योजनेमये जो पैसा होतो तो पैसा स्वतंत्र निधी स्थापन करुन कन्सॉलिडेटेड फंडात जमा करण्याचे काम केले व त्यामुळे रोजगार हमी योजना बंद करण्यात आली असा मेसेज संपूर्ण राज्यात गेला. परंतु आपणा सर्वांनाच या परिस्थितीत सुधारणा करावी लागणार आहे की, राज्यातील लोकांना दुष्काळी परिस्थितीत काम मिळावे म्हणून दोन्ही सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य गांभीर्याने प्रयत्न करीत आहेत. आमच्या कोंकणात 225 इंच पाऊस पडला नाही तर आम्हाला असे वाटतच नाही की पाऊस पडलेला आहे. यासंदर्भात माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांचे आणि आमचे ब-याच वेळेला मतभेद देखील होत असतात. कारण त्यांच्या तालुक्यात 8-9 इंच पाऊस पडला तरी त्यांची शेती 365 दिवस संपन्न असते, ऊसाचे मळे फुलू लागतात आणि आमच्याकडे मात्र एवढया मोठ्या प्रमाणात पाऊस पडला तरी आम्हाला वाटत नाही की पाऊस पडला. कोंकणात सुध्दा आज शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात मोठ्या प्रमाणात पेरण्या झालेल्या आहेत परंतु पावसाअभावी त्या वाया गेल्या आहेत. आता जर पाऊस पडला नाही तर कोंकणवासीयांवर काय प्रसंग ओढवेल हे सांगणे कठीण आहे. त्याचबरोबर राज्यात इतरत्र मराठवाडा, विदर्भ अथवा पश्चिम महाराष्ट्र असेल या सर्व भागात सुध्दा वेगळे चित्र नाही. परंतु ही परिस्थिती काही मानवनिर्मित नाही. त्यामुळे सरकार असो अथवा विरोधी पक्ष असो त्यांनी हे निर्माण केलेले नाही तर तो एक प्रकारे निसर्गाचा कोपच म्हणावा लागेल. या कोपावर मात करुन आपण कसे खंबीरपणे उभे राहणार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .. ..

यावर चर्चा करण्यासाठीच हा प्रस्ताव सभागृहात आणला आहे आणि या दुष्काळाच्या प्रश्नावर आपण सर्व एकच आहोत, असे चित्र आपल्याला निर्माण करावे लागणार आहे. राज्यात गेल्या दोन-चार वर्षापूर्वी जवळपास 91 तालुक्यांमध्ये "न भुतो न भविष्यती" अशा स्वरुपाचा भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळेस आपण ज्या यंत्रणेला सडकी यंत्रणा म्हणतो अशा यंत्रणेवर जबाबदारी दिल्यानंतर कशी काम करु शकते हे आपल्याला माहीत आहेच. याच यंत्रणेच्या माध्यमातून या दुष्काळावर मात करण्याचे काम या शासनाने केलेले आहे. त्या भागाला कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला नाही आणि लोकांना सावरण्याचे कामही शासनाकडून करण्यात आलेले आहे. मला आठवते की, त्यावेळेस गुरांच्या छावण्या काढण्यात आल्या त्यामध्ये 5-5 लाख गुरे आलेली होती.

यानंतर श्री. जुन्नरे .. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ SBT/ प्रथम श्री. खर्चे... 14:40

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

ज्यांनी कामाची मागणी केली त्यांच्या हाताला काम मिळवून देण्यात आले होते. ज्या लोकांनी आयुष्यात कधी मजुरीचे काम केले नव्हते, ज्यांच्याकडे जमीन जुमले होते अशा लोकांनी सुध्दा 1972 च्या दुष्काळात रोजगार हमी योजनेवर काम मिळवून आपला उदरनिर्वाह केला होता.

सभापती महोदय, विदर्भात चार-साडेचार हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.शेतक-यांनी आत्महत्या करणे हे शासनाच्या दृष्टीने भुषणावह बाब नाही. आजच्या दुष्काळसदृष्य परिस्थितीमुळे विदर्भातील शेतकरी निराश झालेला आहे. परंतु मला या ठिकाणी एक गोष्ट सांगावयास पाहिजे की, विदर्भात जशी सर्व व्यवस्था शेतीवर अवलंबून असते तशी परिस्थिती पश्चिम महाराष्ट्रात नाही. पश्चिम महाराष्ट्रातील अर्थव्यवस्था ही केवळ शेतीवरच अवलंबून आहे असे नसून त्या ठिकाणी शेतीला जोडधंदा सुध्दा आहे. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली तरी ते जोडधंद्यामुळे आपला चरितार्थ चालवित असतात. ज्यावेळेस परिश्चम महाराष्ट्रातील 81 तालुक्यामध्ये दुष्काळ पडला होता त्यावेळेस तेथील एकाही शेतक-यांने विदर्भातील शेतक-यांप्रमाणे आत्महत्या केली नव्हती हे सुध्दा येथे सांगणे आवश्यक आहे. या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. भाऊसाहेब फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी दुष्काळाच्या संदर्भात प्रस्ताव मांडलेला आहे त्यासंदर्भात शेतक-याला न्याय देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाला जे जे करता येणे शक्य आहे ते ते राज्यशासनाने करणे आवश्यक आहे. आज महाराष्ट्रात दुष्काळ सदृष्य परिस्थिती असो किंवा नसो परंतु आज महाराष्ट्रावर जे संकट कोसळलेले आहे त्या संकटाला सर्वांनी मिळून सामोरे जाण्याची आवश्यकता आहे. आज महाराष्ट्रातील 1.28 लक्ष हेक्टर जमिनीपैकी 20-22 हजार हेक्टर जमिनीवरच पेरणी होऊ शकलेली आहे ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. त्यामुळे राज्यशासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. सभागृहात दुष्काळाच्या संदर्भात विषय कोणी उपस्थित केला यापेक्षा या ठिकाणी चर्चा उपस्थित केली गेली हा विषय महत्वाचा आहे. दुष्काळाच्या परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्यशासन जनतेच्या बाजूने खंबीरपणे उभे आहे असे जनतेला वाटले पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

...2

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्रासमोर पुन्हा एकदा दुष्काळाच्या निमित्ताने संकट "आ" वासून उभे राहिलेले आहे. दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भातील प्रस्ताव या ठिकाणी या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते श्री. भाऊसाहेब फुंडकर, श्री. दिवाकर रावते तसेच श्री. जयंत प्र. पाटील यांनी मांडलेला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, काल पासून या सभागृहात महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. या सभागृहात काल चर्चा सुरु असतांना मंत्रीमहोदयांचा सुध्दा दुष्काळ होता तसाच दुष्काळ आज सुध्दा आहे हे महाराष्ट्रा सारख्या प्रगत राज्याला शोभणारे नाही. या दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भात करावयाची उपाययोजना, खतांचा पुरवठा, जनावरांच्या चा-याची करावयाची व्यवस्था अशा मुद्यावर सभागृहात चर्चा होत असतांना संबंधित मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित रहावे अशी मागणी आम्ही काल केली असतांना सुध्दा मंत्रीमहोदय आजही अनुपस्थित राहतात हे काही योग्य नाही. दुष्काळाच्या विषयावर आज या ठिकाणी शासनातर्फे मंत्रीमहोदयांनी ज्या प्रकारची उत्तरे दिलेली आहेत त्याचा आम्ही निषेध करतो व दुष्काळाच्या प्रश्नावर शासनाने गांभीर्याने पहावे अशी मी आपल्या मार्फत शासनाला विनंती करतो.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ...

सभापती महोदय, राज्यातील 225 तालुक्यामध्ये पावसाचा एक थेंबसुध्दा पडलेला नाही. आता जुलै महिना अर्धा संपून गेला आहे. आतापर्यत फक्त 10 टक्के पेरण्या झाल्या असून त्यापैकी जी काही उगवण झाली होती ती सुध्दा वाळून गेली आहे. त्याचप्रमाणे धरणातील पाणी साठासुध्दा संपत आला असून सध्या 22 टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. वेधशाळेकडून पावसाच्या बाबतीत वारंवार घोषणा करण्यात येतात त्या घोषणाचीसुध्दा वाताहात लागली आहे आता वेधशाळेकडून असे सांगण्यात आले आहे की, "कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला असून तो खाली सरकला असल्यामुळे येत्या पाच सहा दिवसामध्ये राज्यात पाऊस पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे".वेधशाळेकडून असे सांगण्यात आलेले असल्यामुळे येत्या पाच सहा दिवसात पाऊस पडणार आहे. त्यांनी जरी असे सांगितलेले असले तरी सुध्दा राज्य सरकाराने त्यांच्या म्हणण्याला बळी न पडता टंचाईच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रयत्न करावा असे मला सांगावयाचे आहे. वेधशाळेला जे काही सांगावयाचे असेल ते त्यांना सांगू द्यावे परंतु टंचाईला तोड देण्यासाठी शासनाने योग्य ती उपाययोजना लवकर करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-यांनी 10 टक्के पेरण्या करण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्याच्या नशिबी काय आले आहे हे मी आपणास सांगू इच्छितो. वेधशाळेकडून असे सांगण्यात आले होते की या वर्षी पाऊस चांगला पडणार आहे त्यामुळे राज्यातील शेतक-यांनासुध्दा असे वाटले की या वर्षी चांगला पाऊस होणार असल्याने आपल्याला खत लागेल तेव्हा हे खत मिळविण्यासाठी अनेक ठिकाणी महिला व मुले रांगेत उभी असतांना त्यांच्यावर लाठीहल्ला करण्यात आला होता. वास्तविक सरकारने शेतक-यांना वेळेवर खत उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होते परंतु शेतक-यांना सरकार वेळेवर खत उपलब्ध करुन देऊ शकले नाही. सभागृहाचे नेते श्री.आर.आर. पाटील यांनी असे सांगितले होते की, गुज्जर समाजाचे आंदोलन राजस्थानमध्ये सुरु होते त्यामुळे महाराष्ट्र सरकार शेतक-यांना वेळेवर खत उपलब्ध करुन देऊ शकले नाही. पश्चिम रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी श्री. शैलेंद्रकुमार यांना मी फोन केला असून त्यांच्याकडून मी माहिती घेतलेली आहे . मी त्यांना असे विचारले होते की, राजस्थानमध्ये गुजर समाजाच्या लोकांनी जे आंदोलन केले होते त्यामुळे महाराष्ट्रातील खत पुरवठा करण्यास उशीर झाला आहे काय ? तेव्हा

2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पश्चिम रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी श्री. शैलेंद्रकुमार यांनी मला सांगितले की, हे चुकीचे व असत्य आहे उलट महाराष्ट्रातील खताच्या वाहतुकीला आम्ही प्राधान्य दिलेले आहे. खताच्या वाहतुकीसाठी वॅगन्स देण्यास प्राधान्य दिले पाहिजे असे रेल्वेने धोरण ठरलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात खत घेऊन जाणा-या वॅगन्सला एक नंबरची कॅटेगरी दिलेली आहे त्यामुळे या वाहतुकीसाठी वॅगन्स कमी पडू दिल्या जात नाहीत अशा प्रकारची माहिती त्यांनी मला दिली आहे, असे असतांना सभागृहात जे उत्तर दिले जाते ते अत्यंत अभ्यासपूर्वक आणि विचारपूर्वक दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. गुज्जर आंदोलनाचा आणि महाराष्ट्रातील खत पुरवठयाचा काय संबंध आहे ?

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या प्रस्तावावर साडेचार तास चर्चा झालेली आहे. अजूनही सात - आठ सन्माननीय सदस्यांना यावर बोलावयाचे आहे तेव्हा आपण पुनरावृत्ती न करता थोडक्यात मुद्दे मांडावेत.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, खताच्या प्रश्नावर बोलत असतांना सभागृहात प्रश्न विचारण्याची परवानगी दिली जाईल असे सकाळी माननीय सभापतींनी सांगितले आहे. असे असतांना मी खताचा मुद्दा मांडत असतांना आपण असे सांगत आहात की थोडक्यात मुद्दा मांडावा.

**तालिका सभापती** : अजूनही अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे पुनरावृत्ती टाळावी एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, ज्या काही चुका झालेल्या आहेत त्याच चुका पुन्हा घडता कामा नये असे मला सांगावयाचे आहे. गुज्जर समाजाच्या लोकांनी जे आदोलन केले होते त्यामुळे खताचा पुरवठा करण्यास उशीर झाला आहे असे वक्तव्य राज्य शासनाकडून करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रात कोणत्या मार्गाने खत येते याची माहिती मी घेतली असून गुजराथ मधील कांडला बंदरात प्रथम खत येते, तेथून गांधीधाम येथे येते, तेथून अहमदाबादला येते, तेथून बडोदा येथे येते आणि त्यानंतर सुरतला येते. सुरतमधून काही खत वसई मार्गाने मुंबईमध्ये येते आणि काही खत जळगाव मार्गे विदर्भात पाठविले जाते. अशा प्रकारे खताच्या रेक्स जात असतांना या आंदोलनाचा सबंध येत नसतांना आंदोलनाचा फटका राज्यातील शेतक-यांना बसला असे सागितले.

श्री.बबनराव पाचपुते (बसून) : उशीर झाला होता.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, रेल्वेच्या अधिका-यांनी मला असे सांगितले आहे की,

नंतर श्री.सुंबरे

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

एकाही वॅगनला एक तासही आम्ही उशीर होऊ दिला नाही. महाराष्ट्रातील पुरवठा हा वेळेवर झालेला आहे. मी रेल्वेच्या त्या अधिकाऱ्याचे आपल्याला नाव देतो, वाटल्यास, आपण देखील त्यांच्याकडून ही माहिती घेऊ शकाल. माननीय विरोधी पक्षनेता श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी देखील नुकतेच फोनवरून त्या अधिकाऱ्यांशी बोलून घेतले आहे. ... सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदय, श्री. पाचपुते साहेबांना सांगू इच्छितो की, आपण कितीही म्हणत असलात की, गुज्जर आंदोलनामुळे महाराष्ट्राला खत पुरवठा होण्यास विलंब झाला आहे, तर हे आपले म्हणणे पूर्णपणे असत्य आहे, ती वस्तुस्थिती नाही. आम्ही याबाबत रेल्वे अधिकाऱ्यांकडे चौकशी केली तेव्हा त्यांनी आम्हाला सांगितले की, आम्ही महाराष्ट्रासाठी रेल्वे मार्ग प्रॅयॉरिटीने मोकळे करून दिलेले आहेत. त्यासाठी त्यांचे जे काही शेड्यूल असते त्याचीही माहिती देण्याची त्यांनी तयारी दाखविली आहे. त्यावरून आपल्याला समजून येईल की, आपण सांगता आहात ते वस्तुस्थितीला धरून नाही. तेव्हा एकंदरीत या बाबतीत राजस्थानातील गुज्जर आंदोलनावर दोष ठेवला गेला ते चुकीचे आहे. किंबहुना हे सारे या राज्य सरकारचे अपयश आहे. राज्य सरकारने खतासाठी उशिरा मागणी नोंदविली आहे. त्यासाठी पैसे देखील उशिराने भरलेले आहेत. दुसरे म्हणजे महाराष्ट्रातील सगळी बंदरे मोकळी असताना तुम्ही गुजरातमधील बंदरातून खते घ्यायची यात कोठला शहाणपणा आहे ? येथील धक्के ओस पडले आहेत याची माहिती तुमच्या अधिकाऱ्यांना नव्हती का ? केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांनी 4 लाख टन गहू आणला तो आपल्याच मुंबईतील बंदरामध्ये उतरविला गेला आणि हा हा म्हणता तेथील कामगारांनी तो खाली उतरवून घेतला. हे आपल्या कृषी खात्याला माहिती नव्हते का ? या शिवाय सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील साहेबांचेही बंदर आहे तेथेही तुम्हाला खते उतरविता आली असती. असे असताना न्हावा-शेवा बंदरातील रेक बंद झाले म्हणून आम्ही येथे खत आणले नाही असे उत्तर आजच सकाळी प्रश्नोत्तराच्या तासात दिले गेले ते चुकीचे आहे असे मला या ठिकाणी ठामपणे सांगावयाचे आहे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, तुम्हाला मुंबईतील बंदरांची माहिती नसेल तर तुम्ही आमच्याबरोबर या, आम्ही तुम्हाला मुंबईतील बंदरांची माहिती देतो, सारी बंदरे दाखवितो आणि त्या बंदरावरील किती धक्के खाली आहेत हेही तुम्हाला दाखवून देतो. शिवाय तेथे उतरविलेला माल ठेवण्यासाठी गोदामांचीही व्यवस्था आहे. त्याचीही उपलब्धता तुम्ही करून घ्या, म्हणजे पुढील वर्षी तरी असा प्रकार पुन्हा

..... WW 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शेंडगे ....

होणार नाही. पुढील वर्षी देखील महाराष्ट्राला खत लागणार आहे ते मग आपल्याला याच बंदरात आणता येईल आणि तसे झाल्यास आपला वेळ देखील जाणार नाही एवढेच माझे म्हणणे आहे. मुंबई बंदरामध्ये असे जवळपास 41 धक्के आहेत त्यांचा आपल्याला उपयोग करून घेता येईल.

सभापती महोदय, या दुष्काळावर आतापर्यंत खूप चर्चा झालेली आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील काही तालुके तर असे आहेत की, तेथे कायमच दुष्काळ असतो. त्यातील काहींचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांनी केला आहे. उदा. कवठे-महांकाळ, जत, आटपाडी, दहिवडी इ. आजही आपण तेथे गेलो तर तेथे गेल्याच्या गेल्या वर्षी उगवलेले कुसळे दिसून येईल. म्हणजेच त्या भागामध्ये तर दुष्काळ हा पाचवीला पुजलेला आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये आम्ही विषय मांडतो आहोत की, या दुष्काळी तालुक्यांसाठी वैधानिक विकास महामंडळ निर्माण करा आणि त्याबाबत आम्हाला आश्वासन दिले जात असले तरी अजून तरी ते प्रत्यक्षात उतरलेले नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांनी सांगितले की, या दुष्काळी तालुक्यात सरकारने केलेल्या उपाय योजनांमुळे आत्महत्या झालेल्या नाहीत. पण मी आमच्या मित्रांना, सरकारला सांगू इच्छितो की, आमच्या तेथील जनतेला आता दुष्काळाची सवयच लागली आहे. त्यामुळेच आमचे लोक आत्महत्या करीत नाहीत तर ते वेठबिगारी करतात, ऊसतोडणीची कामे करतात, हमाली करतात. आज राज्यातील मुंबई सारख्या शहरांमध्ये जे माथाडी कामगार आहेत ते सारे आमच्या या दुष्काळी तालुक्यातीलच आहेत. ते आत्महत्या करीत नाहीत तर मेहनत करतात. 80 टक्के ऊसतोड कामगार हा आमच्या दुष्काळी भागातील आहे. तसेच मेंढरे घेऊन 6-6 महिने ही माणसे भटकायला जातात परंतु ती कोणापुढे हात पसरून भीक मागत नाहीत. पण याचा अर्थ असा नाही की, सरकारने त्यांच्यासाठी काही केले आहे म्हणून तेथे आत्महत्या होत नाहीत. तसा आपला समज असेल तर तो चुकीचा आहे, तो आपण आपल्या मनातून, डोक्यातून काढून टाकावा. सभापती महोदय, येथे असेही सांगण्यात आले की, पंजाब मधील शेतकऱ्याला 800-900 रूपये भाव दिला गेला आणि त्यामुळे तेथील शेतकरी खूष झाला. परंतु आता आपल्या शेतकऱ्यावर संकट कोसळले आहे तेव्हा आपण काय करणार आहात ? आपण ऑस्ट्रेलियातील शेतकऱ्याला 1600 रूपये भाव दिला आणि येथे मात्र 900 रूपये दिला. आता तर आपण कापूस एकाधिकार योजना देखील गुंडाळून टाकली आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एक्सएक्स 1 ..

DGS/ MMP/ SBT/ 14:15

श्री. प्रकाश शेंडगे....

ऊसाला भाव मिळत नाही. त्यामुळे शेती उत्पादन करण्यासाठी जेवढा खर्च येतो तेवढी मदत शेतकऱ्याला दिली तर शेतकऱ्याच्या आत्महत्त्या थांबतील. परंतु आपण ते करणार नाही. आपण शेतकऱ्यांना खताचा पुरवठा वेळेवर करणार नाही, बियाण्यांचा पुरवठा वेळेवर करणार नाही, त्यांच्याकरिता पाण्याचे नियोजन योग्य प्रकारे करणार नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये एका बाजूला 20 ते 25 टीएमसी पाण्याच्या पाटबंधारे योजना केल्यामुळे पाणी वाहून जात आहे, तर दुसऱ्या भागामध्ये पाण्याचा ठणठणाट आहे. या भागामध्ये अजूनही पाण्याचे टँकर सुरु आहेत. या भागामध्ये ताकारी, म्हैसाळ, टेंभू, आरफळ या योजना युती सरकारच्या काळात घेण्यात आला. त्यांचे 80 ते 90 टक्के काम पूर्ण झाले असतांना 10 टक्के सुध्दा काम आपल्याला करता आले नाही. या योजना पूर्ण करण्यात आल्या असत्या तर आमच्या दुष्काळी तालुक्यातील जनतेला दुष्काळाचे चटके बसले नसते. परंतु याबाबतीत आपण कुणाच्या तरी माथ्यावर खापर फोडून मोकळे होत आहात. दुष्काळी भागामधील पाण्याची सिस्टीम आपण किती वर्षे चालू ठेवणार आहात? निवडणुका जवळ आल्यानंतर आपल्या पाणी परिषदा सुरु होतात. माननीय सदस्य श्री. संजय पाटील हे सुध्दा पाण्याच्या प्रश्नावर बोलू लागले आहेत. यापूर्वी ते कधी पाण्याच्या प्रश्नावर बोलत नव्हते. त्यामुळे आता ते असे करीन, तसे करीन, भाजपमध्ये जाईन अशाप्रकारची धमकी देत आहेत. दुष्काळी भागातील जनतेचे आम्हीच कैवारी आहोत अशाप्रकारच्या भूलथापा मारीत आहेत. गेल्या 25-30 वर्षापासून पाण्याचे नियोजन करण्याचे काम सुरु आहे ते आपण थांबविले पाहजे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की,दुष्काळी भागामध्ये अपूर्ण असलेल्या योजना पूर्ण होईपर्यंत शेतकऱ्याच्या तीन पिढया मातीत गेल्या. तेव्हा आता तरी त्यांच्या पुढील पिढया वाढल्या पाहिजेत यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे. आणि दुष्काळी भागातील जनतेला भीषण टंचाईचे चटके बसता कामा नयेत यासाठी आपण उपाययोजना केली पाहिजे. याठिकाणी अनेक माननीय सदस्यांनी इतर बाबींचा उल्लेख केला त्याकडे न जाता मी गुरांच्या चाऱ्यासंबंधी प्रश्न उपस्थित करणार आहे. आज चाऱ्यांची टंचाई निर्माण झाली असल्यामुळे जनावरांकरिता चारा उपलब्ध नाही म्हणून आपण गुरांच्या छावण्या सुरु केल्या पाहिजेत. दुष्काळी परिस्थिती आहे की नाही असे म्हणण्यात वेळ घालविण्यापेक्षा सरळ दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्याला न्याय द्यावा अशी विनंती करतो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अतिशय भीषण अशी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या संबंधी सभागृहातील अनेक माननीय सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली आहेत. विरोधी पक्षनेते माननीय श्री. पांडुरंग फुंडकर व माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सभागृहामध्ये हा ठराव मांडला. या ठरावावरील चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला एकच विनंती करणार आहे की, सद्याची दुष्काळी परिस्थिती ही 1972 साली पडलेल्या दुष्काळापेक्षा बिकट आहे. 1972 मध्ये पाण्याची परिस्थिती थोडी चांगली होती, पिण्यासाठी पाणी मिळत होते. परंतु आज 400 फूट खोल असलेल्या बोअर सुध्दा ड्राय झाल्या आहेत. ग्रामीण भागातील कोणत्याही विहिरींना पाणी नाही. मराठवाडा आणि विदर्भामध्ये शेतकऱ्यांनी पेरण्या केल्यानंतर पाऊस न पडल्यामुळे ते बियाणेसुध्दा वाया गेले आहे. अशा गंभीर परिस्थितीमध्ये जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.त्याकरिता गुरांच्या छावण्या त्वरीत उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. माणसांना कसे तरी खायला धान्य मिळेल परंतु जनावरांना खायला कडबा मिळत नाही आणि पिण्यासाठी पाणी मिळत नाही अशी महाराष्ट्रात परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबतीत शासनाने त्वरीत दुष्काळी परिस्थिती जाहीर करुन उपाय योजना करणे गरजेचे आहे.बाकीचे जे प्रश्न असतील ते आज बाजूला राहू द्या. परंतु आज सर्वात महत्वाचे प्रश्न म्हणजे गुरांना पिण्यासाठी पाणी, चारा आणि माणसांना रोजगार मिळाला पाहिजे. रोजगार हमी योजना बंद झाल्यामुळे मजुरांना काम मिळत नाही. एमआरईजीएसमधून सुध्दा मजुरांना काम मिळत नाही. तेव्हा शेतमजुरांना वेगवेगळया माध्यमातून ताबडतोब काम मिळवून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना त्वरीत काम सुरु करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.आणि राज्यात दुष्काळ त्वरीत जाहीर करावा अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:00

श्री.संजय पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यावर जे दुष्काळाचे सावट आले आहे, त्या संदर्भात सदनामध्ये कालपासून अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त केलेली आहेत.

सभापती महोदय, यावेळेस राज्यावर जे दुष्काळाचे सावट आलेले आहे, ते 1972 च्या दुष्काळापेक्षा अतिशय भयानक स्वरुपाचे आहे. अनेक ठिकाणी 700 ते 1000 फूटापर्यंत बोअर मारलेले आहेत, पण ते सुध्दा ड्राय झालेले आहेत. तेथे पाणी लागलेले नाही. विहिरींच्या बाबतीत सांगावयाचे तर 50 किंवा 60 किंवा 80 फूटापेक्षा जास्त खोल विहीर असू शकत नाही. अशा वेळी राज्य शासनाने ही दुष्काळसदृश्य परिस्थिती असल्याचे मान्य करुन ज्या सवलती दिलेल्या आहेत, ती अतिशय चांगली गोष्ट आहे. अशा वेळी एम.एस.ई.बी.ची कनेक्शन न तोडणे, शेतसाऱ्याबाबत सक्तीची वसुली न करणे या गोष्टी करुन चालणार नाही. तर संपूर्ण राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा आणि त्या कालावधीमध्ये ज्या सवलती दिल्या जातात, त्या देऊन या राज्यातील शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने दिलासा देण्याचे काम करावयास पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी राज्यातील दुष्काळाच्या अनुषंगाने भावना व्यक्त करीत असताना एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, याठिकाणी नथीतून एकमेकाला तीर मारण्यापेक्षा सगळयांनी मिळून, या सदनाच्या माध्यमातून राज्यावर आलेले दुष्काळाचे संकट दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. एका बाजुने दुसऱ्या बाजुला आव्हान द्यावयाचे आणि मग दुसऱ्या बाजूच्या लोकांनी ललकारी द्यावयाची. एका बाजूने आरोप केले जातात म्हणून दुसऱ्या बाजूने आरोप करावयाचे, पण असे करण्यापेक्षा राज्यातील शेतकऱ्यांसाठी ज्या गोष्टी करणे गरजेचे आहे, त्या कराव्यात अशा प्रकारे मी मत व्यक्त करतो.

सभापती महोदय, दुष्काळाच्या बाबतीत बोलत असताना जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न देखील महत्वाचा आहे. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी छावण्या उभ्या करण्याच्या दृष्टीने भावना व्यक्त केलेल्या आहेत. पण माझी याठिकाणी थोडीशी वेगळी मागणी आहे. पण याबाबतीत माझे व्यक्तिगत मत असे आहे की, अनेक शेतकऱ्यांना छावण्यांच्या बाबतीत वेगवेगळे अनुभव आलेले आहेत. तेव्हा शेतकऱ्यांना चारा उपलब्ध करुन दिला पाहिजे किंवा यासाठी सरकारला चाऱ्याचा डेपो उघडला पाहिजे, तसे शक्य नसेल तर त्याचे पैसे द्यावयास पाहिजेत. जेणेकरुन शेतकरी आपापल्या जनावरांना खाण्यासाठी चारा आणतील आणि आपली जनावरे सांभाळतील.

. . . .2 वाय-2

श्री.संजय पाटील . . . .

सभापती महोदय, याठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्रात थोडी उत्पन्नाची साधने अधिक प्रमाणात आहेत. परंतु ही वस्तुसिती काही तालुक्यांपुरती मर्यादित आहे. पण उर्वरित आमचा जो दुष्काळी भाग आहे, तेथे प्रचंड मोठया प्रमाणात अडचणी आहेत. अनेक अडचणींना तोंड देऊन पशुधन वाचविलेले आहे. जे बागायती क्षेत्र आहे, ते मोठया प्रमाणात अडचणीमध्ये आलेले आहे. त्यामुळे शासनाने राज्यामध्ये तात्काळ दुष्काळ जाहीर करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी कर्जमाफीच्या बाबतीत आपली मते व्यक्त केलेली आहेत. त्यानुसार यामध्ये कोणत्याही परिस्थितीत 5 एकरावरील शेतकऱ्यांना अधिकाधिक सामावून घेण्याच्या बाबतीत राज्य शासनाने मदत केली पाहिजे. तसेच ज्यांनी नियमितपणे कर्ज भरलेले आहे, त्यांना सुध्दा शासनाने मदत केली पाहिजे एवढी आग्रहाची भावना याठिकाणी मांडतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

. . . .2 वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटीलसाहेब, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी काल महाराष्ट्रामध्ये सध्या जी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्याबाबतीत प्रस्ताव मांडलेला आहे आणि मी त्याचे समर्थन करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, गेल्या दीड महिन्यातील पावसाची परिस्थिती पाहिली तर असे दिसून येईल की, किमान 14 तारखेपर्यंत राज्यातील 22 जिल्हयांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस झालेला आहे. मी या संबंधातील आकडेवारीच्या खोलामध्ये जाणार नाही. कारण बहुतेक सन्माननीय सदस्यांनी कोणत्या जिल्हयामध्ये किती पाऊस झाला आहे हे आकडेवारीसह सांगितलेले आहे. अशा वेळी शासनाने याकडे गंभीरपणे लक्ष देऊन यासंबंधात निश्चितपणे उपाययोजना सुरु करावयास पाहिजेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ......

कोकणाच्या संदर्भात मी मुद्दाम उल्लेख करतो. त्या ठिकाणी भातशेती आहे. कोकणात 80 टक्के लोक भातशेती करतात. पाऊस पडल्यावर 20 दिवसानंतर लावणी करतात. आज त्या ठिकाणी भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाऊस नसल्यामुळे लावणी करता आलेली नाही. त्या ठिकाणी दुसरे पीक पेरावे लागेल की काय अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्या ठिकाणी पाण्याचा प्रश्न आहे.

**तालिका सभापती** ( श्री. भास्कर जाधव ) : कोकणात दुसऱ्यांदा पेरणी करता येते काय ?

श्री. राजन तेली : तसे करता येत नाही. मी शासनाला विनंती करतो. कोकणातील जे सिंचन प्रकल्प प्रलंबित राहिलेले आहेत त्यासाठी सातत्याने गेल्या तीन वर्षात एक रुपया सुध्दा मिळालेला नाही. काही प्रकल्प 60-70 टक्के पूर्ण झालेले आहेत. दोन-तीन प्रकल्प 90 टक्के पूर्ण झालेले आहेत. देवधर प्रकल्प 90 टक्केपेक्षा जास्त पूर्ण झालेला आहे. शिरशिंगी प्रकल्प 90 टक्केपेक्षा जास्त पूर्ण झालेला आहे. नरडवे प्रकल्प 90 टक्केपेक्षा जास्त पूर्ण झालेला आहे. त्या ठिकाणी थोडी तरतूद केली असती तर हे प्रकल्प पूर्ण झाले असते आणि त्या ठिकाणचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तसेच शेतीचा प्रश्न कायम स्वरुपी सुटला असता. त्यामुळे राज्य शासनाने याबाबतीत उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. त्या ठिकाणी ज्या कृषी विषयक वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात त्याबाबत मापदंड बदलण्याची गरज आहे. कोकणाची तुलना महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याशी करुन चालणार नाही. त्या ठिकाणी मापदंडात बदल न झाल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना तशा प्रकारचे फायदे मिळत नाहीत. राज्य सरकारच्या वेगवेगळ्या योजना त्या ठिकाणी राबविल्या जात नाहीत. या योजना राबवित असताना मोठ्या प्रमाणावर अडचणी येत आहेत. त्यादृष्टीने शासनाने विचार करणे गरजेचे आहे. खत, बी-बियाणे या विषयावर या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य बोलले आहेत. मी त्याबाबतीत जास्त चर्चा करणार नाही. राज्य सरकारने या सगळ्या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे खरीप हंगामाची जी बैठक झाली त्यामध्ये खताचा विषय उपस्थित झाला. त्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली. त्यावेळी कृषी खात्याच्या सचिवांनी सांगितले की, आपल्याला कोणतेही खत कमी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP

श्री. राजन तेली ......

पडणार नाही. त्यांनी तेथे व्यासपीठावरुन सांगितले की, गरजेपेक्षा जास्त खत मिळेल. केवळ कोकणच नव्हे तर संपूर्ण राज्यामध्ये खताचा जो तुटवडा निर्माण झाला त्याबाबत अगोदरच नियोजन होणे गरजेचे होते. भविष्यामध्ये असे होता कामा नये याची खबरदारी शासनाने घेतली पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिलेला प्रस्ताव कर्जमाफीच्या संदर्भात होता. तो प्रस्ताव यामध्ये एकत्रित करुन आपण चर्चा करीत आहोत. कर्जमाफीच्या संदर्भात कोकणातील शेतकऱ्यांवर फार मोठा अन्याय झालेला आहे. आमचा जिल्हा छोटा आहे. त्या ठिकाणी राष्ट्रीयकृत बँका तसेच जिल्हा बँक यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना 18 कोटी रुपयांपेक्षा कमी कर्जमाफीचा फायदा मिळाला. यामध्ये अनेक गोष्टी आहेत. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर केंद्र सरकारकडून जे परिपत्रक आले होते त्यामध्ये ज्या बाबी दाखविलेल्या होत्या, ज्या बाबी सुचविलेल्या होत्या, प्रत्यक्षात कर्जमाफीच्या वेळी ज्या अटी अंमलात आणल्या त्यामध्ये ज्या गोष्टींचा विचार केला गेला नाही अशा बऱ्याच गोष्टी राहून गेलेल्या आहेत. बरेच महत्वाचे विषय आहेत. जमीन खरेदी, कुंपण, शेतघर, शेड, गोडाऊन अशा अनेक बाबी आहेत. शेती कर्जाचा उल्लेख करताना त्यामध्ये अशा अनेक गोष्टी पकडल्या गेलेल्या नाहीत. दुसरी बाब अशी की, ज्या शेती विकास संस्था आहेत त्यांच्या मार्फत ज्यांनी कर्जे घेतली असतील त्यांना कर्जमाफी दाखविलेली आहे. विकास संस्थांव्यतिरिक्त ज्या अनेक वेगवेगळ्या संस्था आहेत, मग डेअरी संस्था असेल, अशा संस्थांनी जी कर्जे दिलेली आहेत त्या कर्जाचा उल्लेख त्यामध्ये दाखविलेला नाही. त्यामुळे त्यांना कर्जमाफी मिळालेली नाही. पोल्ट्री संस्था, शेळीपालन संस्था आहेत या संस्थांकडून जी कर्जे घेतलेली आहेत त्यांचा उल्लेख नसल्यामुळे त्याही शेतक-यांना कर्जमाफीचा फायदा मिळत नाही. सर्वात महत्वाचा मुद्दा असा की, महाराष्ट्रामध्ये फक्त चारच जिल्हे असे आहेत की ज्यांना समुद्र किनाऱ्याचा फायदा झालेला आहे. ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यात मच्छिमार संस्थांनी जे कर्ज काढलेले होते त्याचा उल्लेख यामध्ये दाखविलेला नसल्यामुळे त्या मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. जी मच्छी मोजतात त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने रँडम पध्दत आखून दिलेली आहे. त्याप्रमाणे सातत्याने तीन वर्षे दुष्काळ पडला पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

3 वर्षामध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी माशांचे उत्पादन मिळाले पाहिजे, ही पध्दत चुकीची असल्यामुळे लोकांना त्याचा फायदा मिळत नाही. त्याचबरोबर या कर्जमुक्तीचा फायदा कोकणातील मच्छिमारांना मिळालेला नाही. त्यांना सुध्दा कर्जमुक्तीचा मिळण्यासाठी शासनाने विचार करणे गरजेचे आहे. कोकणामध्ये डोंगराळ भाग आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये, विदर्भामध्ये 5-10 एकरच्या वरचे शेतकरी आहेत. कोकणामध्ये डोंगराळ भागामध्ये एखाद्याकडे 10 एकर जमीन असली तरी प्रत्यक्षात तो 2-3 एकर जमीन कसत असतो. परंतु शासनाने कर्जमुक्तीसाठी 5 एकराचा निकष लावला आहे. म्हणून शासनाने कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्हयामध्ये काताचे उत्पादन मोठया प्रमाणावर होते. त्यासाठी सुध्दा शेतक-यांनी कर्ज घेतलेले आहे, त्याचाही या कर्जमाफीमध्ये उल्लेख केलेला नाही. तो करण्यात यावा. त्याचप्रमाणे कोकणामध्ये 400-500 काजूची छोटी युनिट्स आहेत.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : काजूचे राहू द्या, पण काताच्या झाडाला नगदी पिकातून बाहेर काढले तरी लोकांचा फायदा होईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयात काजूची छोटी युनिट्स आहेत. त्या युनिट्ससाठी लोकांनी कर्ज घेतले आहे. त्या लोकांचाही उल्लेख करण्यात आलेला नाही. या कर्जमाफीचा या लोकांना फायदा मिळाला पाहिजे. सुशिक्षित बेरोजगारांनी छोटी छोटी युनिट्स सुरु केलेली आहेत. त्याचाही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यांना शासनाच्या व जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कर्जमाफीचा फायदा मिळाला पाहिजे, त्याचप्रमाणे आंबा, काजूची प्रोसेसिंग युनिट्स आहेत, वीज भट्टी या व्यावसायिकांना कर्जमाफीचा फायदा मिळालेला नाही. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड कोकणातील या सर्व जिल्हयांमधील शेतकरी प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड करतात किंवा लोन रिन्हयू करुन घेतात, अन्य ठिकाणाहून कर्ज घेऊन व्याजाची रक्कम भरतात. हा प्रामाणिकपणा त्यांना नडलेला आहे असे मला नाईलाजास्तव म्हणावे लागते. या कर्जमाफीचा कोकणातील कोणत्याही शेतक-याला फायदा मिळालेला नाही. त्यामुळे तेथील शेतकरी हवालदिल झाला आहे. काजू उत्पादक, पोल्ट्रीधारक, शेळी-मेंढी पालन करणारे,

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MMP/

श्री.राजन तेली....

मच्छिमार बांधव असे जे छोटे छोटे घटक आहेत त्या घटकांचा कोठेही उल्लेख न केल्यामुळे त्यांना आर्थिक ताण सहन करावा लागत आहे. कोकणामध्ये शेतीच्या वाडया असतात, घरापासून लांब अंतरावर असते. त्या वाडीसाठी त्यांनी लोन घेतलेले असते. त्यासाठी बैल जोडी घेतलेले आहे. त्याचाही उल्लेख करण्यात आलेला नाही. या शेतक-यांना कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही. 1990 मध्ये सरकारने कर्जमाफ केले होते त्याचा विपरित परिणाम बँकांवर झाला होता. 10 वर्षांनी तरी पैसे परत मिळतील या आशेवर बँका होत्या. तशी भीती आता बँकांना वाटत आहे. कारण सध्या 10-20 टक्के सुध्दा वसुली होत नाही. हया बँका शेतक-यांच्या आहेत. या ज्या काही त्रुटी कर्जमाफीच्या धोरणामध्ये राहिल्या आहेत त्याचा फेरविचार करावा आणि राज्यातील आणि विशेषत: कोकणातील शेतक-यांचा यामध्ये अंतर्भाव करावा अशी सूचना करुन मी याठिकाणी थांबतो.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी राज्यामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळाच्या परिस्थितीबाबत नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी कोकणामध्ये 200-250 इंच पाऊस पडतो पण हे सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते असा उल्लेख केलेला आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 15:15

(श्री. परशुराम उपरकर....)

या ठिकाणी स्वामिनाथन अहवालातील शिफारशींचा विविध उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने उल्लेख केला जातो. आज राज्यामध्ये अनेक सिंचन प्रकल्प उभे राहात आहेत. युतीच्या काळामध्ये जास्त निधीची तरतूद करुन या सिंचन प्रकल्पांची कामे सुरु झाली. परंतु आज या सिंचन प्रकल्पांची ठेकेदारांनी जी काही कामे केलेली आहेत त्याचे पैसे देण्यासाठी निधी उपलब्ध होत नाही, पुनर्वसनाच्या कामासाठी निधी उपलब्ध होत नाही. या सिंचन प्रकल्पांची कामे अगदी धिम्या गतीने सुरु आहेत. कोकण विभागामध्ये यावर्षी कमी पाऊस झालेला आहे. कृषी विभागाच्या नोंदी नुसार कोकणातील 152 हेक्टर क्षेत्रावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झालेला आहे. भात पिकासाठी एकदा पेरणी केली जाते. ही पेरणी होऊन लावणी करण्यासाठी विशिष्ट कालावधी लागतो. हा कालावधी अत्यंत अपुरा असल्यामुळे या वर्षी भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे. गेल्या वर्षी देखील भातशेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते आणि त्याबाबतीत शेतक-यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी मी केली होती. गेल्या वर्षी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ऑगस्ट महिन्यामध्ये 7 कोटीचे अनुदान देण्यात आले होते. आमच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री हे महसूल खात्याचे मंत्री आहेत. महसूल आणि कृषी विभागामध्ये तू-तू, मी-मी झाल्यामुळे 7 कोटी रुपये परत गेले. गुंठ्याला 10 रुपये आणि 2 हेक्टरला 2 हजार रुपये अनुदान देण्याचे ठरलेले असताना हे अनुदान परत गेले.

सभापती महोदय, कर्जमाफी बद्दल सांगायचे झाल्यास कोकणातीला शेतक-यांनी प्रामाणिकपणे वेळेवर कर्ज भरलेली आहेत. काही प्रामाणिक संस्थांनी खात्यावर कर्ज रिन्यूअल करुन 100 टक्के कर्ज वसुली झाल्याचे दाखविलेले आहे. या संस्थांनी थकीत कर्ज न दाखविल्यामुळे कोकणातील शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिलेला आहे.

सभापती महोदय, कृषी विभागाचे नाव घेतले की त्यामध्ये बोकाळलेला भ्रष्टाचार समोर दिसतो. कृषी विभागामार्फत ज्या योजना शेतक-यांसाठी राबवल्या जातात त्या ख-या अर्थाने शेतक-यांपर्यन्त पोहोचतात की नाही हा खरा प्रश्न आहे. नालाबंडिग, सी.सी.टी. अशा प्रकारच्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे या सभागृहामध्ये उघडकीस आणल्यानंतर संबंधित 16 दोषी अधिकारी आणि कर्मचा-यांची बदली होऊन केवळ 1 वेतनवाढ रोखण्याची शिक्षा त्यांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. परशुराम उपरकर...)

करण्यात आली. त्यांच्याकडून 2 लाख 65 हजार रुपयांची वसुलीही करण्यात आली. असे असताना अशा या भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचा-यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. शेतक-यांसाठी ज्या ज्या योजना कृषी विभागामार्फत राबविल्या जातात त्या योजना शेतक-यांपर्यन्त पोहोचतच नाही अशी कोकणामध्ये परिस्थिती आहे.

सभापती महोदय, शासनाने दुष्काळासाठी पॅकेज जाहीर केले तरी ते पॅकेज शेतक-यांपर्यन्त पोहोचेल की नाही हा देखील प्रश्न आहे. कोकणातील मच्छिमारांसाठी देखील शासनाने पॅकेज जाहीर केले होते. तशा प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाल्या. परंतु प्रत्यक्षात मच्छिमारांपर्यन्त ते पॅकेज पोहोचलेले नाही. अन्य ठिकाणी शेतकरी कर्जामुळे आत्महत्या करीत आहेत, तशी पाळी कोकणातील मच्छिमारांवर येऊ नये यासाठी कोकणातील ज्या ज्या मच्छिमारांनी कर्ज घेतलेले आहे त्यांचे कर्ज माफ करण्याची गरज आहे. मी यापूर्वी याठिकाणी नवी मुंबईत उदाहरण दिलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

एका मच्छिमाराला आपल्या बोटीसाठी घेतलेले कर्ज फेडता आले नाही म्हणून गळफास घेऊन आत्महत्या केली. राज्यात इतर विभागातील शेतक-यांच्या आत्महत्येचे लोण कोकण विभागात येण्यापूर्वी या ठिकाणच्या शेतक-यांसाठी आणि मच्छिमारांसाठी काही तरी उपाययोजना शासनाने कराव्यात अशी माझी विनंती आहे. कर्नाटक आणि केरळ राज्याने महिच्छमारांसाठी अतिशय चांगल्या योजना राबविण्यास सुरुवात केली आहे, तशा पध्दतीच्या योजना कोकणातील मच्छिमारांसाठी राबविण्यात याव्यात अशा प्रकारची मागणी या चर्चेच्या निमित्ताने करतो. राज्यातील शेतक-यांना 6 टक्के दराने व्याज उपलब्ध करुन देण्यात येते, त्या प्रमाणे मच्छिमारांना सुध्दा 6 टक्के दराने शासनाने कर्ज उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी कळकळीने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या भावनांना शासनाकडून किती प्रतिसाद दिला जाणार आहे हे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरावरुन आम्हाला कळून येणार आहे. मागील वर्षी भात पिकाची नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने 7 कोटी रुपये सिंधुदूर्ग जिल्हयासाठी उपलब्ध करुन दिले होते. त्यातील फक्त 1 कोटी रुपयांचे वाटप करण्यात येऊन उर्वरित 6 कोटी रुपयांचा निधी शासनाकडे परत गेलेला आहे. भात पिकाची नुकसान भरपाई देण्यासंबंधीचा 6 कोटी रुपयांचा निधी सिंधुदूर्ग जिल्हयास परत देण्यात यावा अशी माझी मागणी आहे. या निधीतील प्रत्येक भात उत्पादक शेतक-याला 2 हजार रुपये मिळाले असते तर त्या शेतक-यांना ते पैसे खत खरेदी करण्यासाठी कामी आले असते. मागील वर्षाचा भात पिकाची नुकसान भरपाईची 6 कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावा अशी माझी शासनास पुन:श्च विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयात गोवा राज्यातून येते. झुवारी ॲग्रो केमिकल्स इंडस्ट्रीज बंद पडली आहे, त्यामुळे कोकणात खताचा पुरवठा अतिशय कमी प्रमाणात होऊ लागलेला आहे. कोकणात सध्या 30 ते 40 टक्के एवढेच खत प्राप्त होत असल्यामुळे तेथील भात उत्पादक शेतक-यांना उत्पादनात वाढ करता येत नाही. भात पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात वाढावे म्हणून सिंधुदूर्ग जिल्हयात मोठया प्रमाणात खत उपलब्ध करुन देण्यात यावे अशी माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

सभापती महोदय, कोकणातील भात शेती पिकविणा-या सर्व शेतक-यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा अशी आग्रहाची विनंती आहे. त्याचप्रमाणे राज्य शासनाने महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ जाहीर करुन राज्यातील सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभ होईल अशा स्वरुपाच्या योजना जाहीर कराव्यात अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

-------------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, या सभागृहात दुष्काळावर चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील जनता एका गंभीर परिस्थितीला सामोरे जात असताना महाराष्ट्र शासनाने या गंभीर परिस्थितीचा विचार करुन अतिशय जलद गतीने पाऊले उचलली आहेत. या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने रोजगार हमी योजनेची कामे सुरु करणे, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे त्या गावांमध्ये पिण्याचे पाणी टँकरने उपलब्ध करुन देणे, सिंचन प्रकल्पाच्या माध्यमातून नवीन योजना कार्यान्वित करणे, सिंचनाच्या महसुलाची वसुलीस तात्पुरती स्थगिती देणे, जनावरांसाठी छावण्या उभारणे असे विविध उपक्रम राबविण्यासाठी तात्काळ निर्णय घेतले त्याबद्दल मी शासनाने अभिनंदन करतो. आज वास्तविकता अशी आहे की, पावसाच्या बाबतीत महाराष्ट्रातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. या परिस्थितीशी सामना करण्यासाठी शासनाने अतिशय गांभीर्यपूर्वक उपाययोजना करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्यात गेल्या वर्षी आजच्या दिवसापर्यंत 75 टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. परंतु आज  महाराष्ट्रातील काही जिल्हयामध्ये 25 ते 30 टक्के पेरण्या झाल्या आहेत. सांगली जिल्हयात एक,दोन तालुके सोडले तर फक्त 3 टक्के पेरण्या झाल्या आहेत. काही तालुक्यात तर 2 टक्क्यांपेक्षाही कमी पेरण्या झाल्या आहेत. आज राज्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे शासन वेगवेगळया उपाययोजना करीत आहे. आज महाराष्ट्रात पाऊस न पडल्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे शासनाने ताबडतोबीने दुष्काळ जाहीर करुन त्या संदर्भात वेगवेगळया उपाययोजना करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मला आनंदाची बातमी वाचावयास मिळाली. आपले हवामान खाते आहे, त्या खात्याच्या माध्यमातून हवामानाचा अंदाज वर्तविला जातो. आतापर्यंत हवामान खात्याकडून जे अंदाज वर्तविले जातात, तसे प्रत्यक्षात घडतच नाही असा इतिहास आहे. भविष्यात हवामानाचा अंदाज अचूक व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने एका चांगला निर्णय घेतला आहे...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ प्रथम श्री.गिते 15:25

श्री. रमेश शेंडगे .....

हवामान खात्याचा अंदाज आणि आपत्तीची माहिती अचूक व्हावी म्हणून काही कोटी रुपयांचा निधी खर्च करुन आधुनिक यंत्रसामुग्री या खात्याला देण्याचे निश्चित केलेले आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जवळजवळ 85 ते 90 ठिकाणी वेगवेगळया प्रकारची मशीनरी आणि यासाठी आवश्यक असणारी उपकरणे बसविली जाणार आहेत. या मशीनरीमार्फत अशी खात्री देण्यात आलेली आहे की, कुठल्याही प्रकारचा अंदाज चूक ठरणार नाही. हवामान खात्याला अचूक असा अंदाज अनेक वर्षे मिळत राहणार आहे. त्याचा काही प्रमाणात उपयोग होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्रात जवळजवळ 1536 गावे आणि 1075 वाडयांना 1572 टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरु केलेला आहे. 1972 साली दुष्काळ पडला होता त्यावेळी पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी संधी उपलब्ध होती. परंतु आज परिस्थिती पाहिली तर पिण्याच्या पाण्याच्या पातळीमध्ये झालेली घट ही खऱ्या अर्थाने पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी मोठी अडचण आहे. पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्यासाठी अतिशय कष्ट आणि धावपळ करावी लागत आहे. जागतिक परिषदेच्या माध्यमातून येणाऱ्या निकषांकडे पाहिले तर दुष्काळ असेल किंवा अतिवृष्टीमुळे होणारी नैसर्गिक आपत्ती असेल याच्यापाठीमागे जागतिक पातळीवर काही निष्कर्ष काढलेले आहेत. मागील अधिवेशनात ग्लोबल वॉर्मिंगवर या सदनामध्ये चर्चा झाली होती. सध्याच्या वातावरणामध्ये आणि पर्यावरणामध्ये होणारे बदल आणि स्थिती जर आपणास योग्य रीतीने जाहीर करता आली आणि येणाऱ्या आपत्तीची चाहूल लागली तर वेळीच आपल्याला योग्य दखल घेऊन अशा आपत्तींना सामोरे जाता येईल असे मला वाटते. काही दिवसांपूर्वी अशी माहिती मिळाली आहे की, केंद्रीय कृषी खात्याकडून सूचना आलेल्या आहेत त्यानुसार मागीलवेळी दुष्काळाच्या आपत्तीला सामोरे जात असताना विमानाचा वापर करुन कृत्रिम पाऊस पाडण्यात आला होता त्याप्रमाणे आकाशात ढग जमा होतात पण पाऊस पडत नाही तेथे विमानाचा वापर करुन कृत्रिम पाऊस पाडण्यात यावा. मागील वेळी हा प्रयोग करण्यात आला त्यावेळी उशीर झाला होता आणि ती वेळ येईपर्यंत ढग कमी व्हावयाला सुरुवात झाली होती. आता ज्या सूचना आलेल्या आहेत त्यानुसार काही ठिकाणी असे ढग जमा होत आहेत तेथे विमानाद्वारे पाऊस पाडण्यात यावा. या सूचनांनुसार लवकर याचा उपयोग करुन घेण्यात यावा

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

आणि शासनाने त्वरित निर्णय घेऊन या सूचनांची अंमलबजावणी करावी. राज्य नियोजन आयोगाने ऑगस्ट 2007 मध्ये शिफारस केली होती की, दुष्काळी तालुक्यांचे निकष बदलणे आवश्यक आहे. 1960 सालापासून याचा अभ्यास करण्यासाठी विविध समित्या आल्या. त्यामध्ये हनुमंत समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील 197 तालुके अवर्षण प्रवण आहेत. पाटबंधारे आयोगाने 1972 साली अहवाल दिला होता त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे काही तालुके आणि काही भाग कायम दुष्काळी आहे. कायम अवर्षण प्रवण क्षेत्र आहे. कायम दुष्काळी भाग आहे त्यासाठी सुध्दा कायम स्वरुपी योजना जर अंमलात आणल्या तर संपूर्ण महाराष्ट्रभर दुष्काळ आल्यानंतर दुष्काळ निवारणासाठी यंत्रणा राबविली जाते व शासनावर ताण पडतो तो कमी होईल. सन्माननीय सदस्य श्री. संजयकाका पाटील आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी सांगितले की सांगली जिल्हयातील कवठेमहांकाळ, जत, खानापूर आणि आटपाटी तसेच सातारा जिल्हयातील माण, खटाव या भागामध्ये काही ठिकाणी पावसात गवत सुध्दा उगवत नाही. अशा भागांमध्ये शासनाचे काही प्रकल्प आहेत त्या प्रकल्पांसाठी टंचाईच्या माध्यमातून निधीची व्यवस्था केलेली आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.........

हे प्रकल्प जर पूर्ण केले तर ज्याप्रमाणे म्हैसाळ योजना आहे, सांगली जिल्हयातील पूर्व भागामध्ये वज्रचौंडी ते लांडगेवाडी प्रकल्प आहे, छोट्या छोट्या पाटबंधारे योजना आहेत, त्यांना निधी देऊन त्या पूर्ण केल्या तर पाणी अडायला सुरुवात होईल व शेतीसाठी पाणी मिळाले नाही तरी निदान पिण्यासाठी त्या भागातील जनतेला पाणी मिळेल. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आज अशा ज्या योजना आहेत त्या त्वरित पूर्ण केल्या पाहिजेत. सन्माननीय मंत्रीमहोदय श्री.अजितदादा पवार यांनी इतर मंत्रीमहोदयांबरोबर बैठक घेऊन दुष्काळी भागातील पाटबंधारे योजनांसाठी 1000 कोटी रुपयांचे नियोजन केल्याचे आम्हाला सांगण्यात आले. मी मंत्रीमहोदयांना धन्यवाद देतो. परंतु याची त्वरित अंमलबजावणी झाली तर दुष्काळाला सामोरे जाणारा जो भाग आहे, वर्षानुवर्षे, पिढ्यान्‌पिढ्या या भागाच्या नशिबी दुष्काळ लिहिलेला आहे तो दूर होण्यासाठी मदत होईल. या उपाययोजना करीत असताना अनेक विभागातून, राजकीय पक्षांकडून टीका केली जाते. परंतु एक मात्र नक्की आहे की, देशाच्या इतिहासामध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी 71,600 कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम केंद्र सरकारने दिली. हे देशात प्रथमच घडलेले आहे. त्यातून काय निर्माण होत आहे हे तपासून पहात असताना केंद्र सरकारला देशाचे कृषिमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी प्रस्ताव दिला, त्या प्रस्तावाच्या माध्यमातून 71,600 कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी या देशातील शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यापैकी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जवळजवळ 10 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी मिळणार आहे, हे दुर्लक्षित करुन चालणार नाही.

सभापती महोदय, आज दुष्काळाला सामोरे जात असताना छावण्याचा विषय महत्वाचा ठरला आहे. मागील वर्षी देखील छावण्या उघडल्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांनी सांगितले की, मागील वर्षी छावण्यांबाबत शासन अपयशी ठरले आहे. आज शेतकऱ्यांना चारा वाटप करता येईल. टंचाईच्या गटात एक आणि परिषदेच्या गटात एक याप्रमाणे चारा डेपोचे नियोजन करण्यात यावे. चारा आणि इतर अनुषंगिक गोष्टींचे नियोजन करीत असताना मला शासनाला विनंती करावयाची आहे की, शेतकरी डोळ्यासमोर ठेवला जातो. जो शेतकरी शेती करतो, जो शेतकरी आपत्तीला सामोरे जातो, शेतीला पाणी न मिळाल्यामुळे पिके वाया गेली म्हणून ज्यांचे नुकसान झाले, या राज्यामध्ये शेती करीत असताना काही घटक शेती करुन उदरनिर्वाहासाठी शेळ्या मेंढ्यांचा कळप घेऊन महाराष्ट्रातील एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यापर्यंत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.........

भटकत असतो. त्याच्या आयुष्यामध्ये पिढ्यान्पिढ्या काही दिवस ठरलेले असतात, म्हणजे ऑक्टोबरपासून शेळ्या मेंढ्यांचे कळप घेऊन कोकणामध्ये जात असताना जूनच्या दरम्यान पावसाला सुरुवात झाल्यानंतर हे बांधव आपल्या गावी येतात. आज पाऊस नसल्यामुळे हे बांधव शेळ्या मेंढ्यांचे कळप घेऊन स्थलांतरित झाले त्याच भागात आहेत. पाऊस नसल्यामुळे कळप घेऊन परत आपल्या गावी येता येत नाही. परत न आल्यामुळे नात्यागोत्याचे दैनंदिन व्यवहार आहेत ते करता येत नाहीत. त्यापेक्षा महत्वाची बाब म्हणजे शेळ्या मेंढ्यांना चरायला गवत मिळत नाही. गवत नसल्यामुळे जनावरांची उपासमार होत आहे. ज्याप्रमाणे आपल्याला भूक लागल्यानंतर आपण आवडीचे जेवण घेतो, एका ठिकाणी आवडीचे जेवण मिळाले नाही तर दुसऱ्या ठिकाणी जाऊन आवडीचे जेवण घ्यायचा प्रयत्न करतो. परंतु या जनावरांना भूक लाल्यानंतर खायला चारा मिळाला नाही तर ही जनावरे माती चाटायला सुरुवात करतात. मातीमध्ये चाऱ्यासारखा कण दिसला तर तेथील माती चाटायला सुरुवात करतात आणि आपले पोट भरण्याचा प्रयत्न करतात. अशाप्रकारे माती चाटून खाल्ल्यामुळे जनावरांना रोगराई होते. रोगराई झाल्यानंतर शेळी-मेंढी बांधव एका कोपऱ्यातून दुसऱ्या कोपऱ्यात गेलेला असतो......

(नंतर श्री.खर्चे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .. ..

मेंढपाळ जंगलात असतो, त्याच्या शेळया-मेंढयांसाठी कुठल्याही प्रकारचा निधी मिळत नाही. मग अशा वेळी मेंढया तडफडून मरु देण्यापलिकडे हा मेंढपाळ काहीच करु शकत नाही, त्याच्या हातात काहीच नसते. म्हणून शासनाला माझी अशी विनंती आहे की, राज्यात दुष्काळ पडल्यानंतर नियोजन करीत असताना जनावरांच्या छावण्या असोत अथवा अन्य नियोजन असेल त्यावेळेस फक्त गायी-म्हशींचाच अशा छावण्यांसाठी विचार केला जातो, शेळया-मेंढयांच्या बाबतीत कुठलेच नियोजन केले जात नाही. मी शेळी-मेंढी विकास महामंडळाचा अध्यक्ष आहे. परंतु आज सुध्दा आपल्या राज्यात शेळया-मेंढयांना औषध उपलब्ध करुन दिले जात नाही, लसीकरणाची व्यवस्था नाही, अथवा त्यासाठी कुठलाच स्वतंत्र असा निधी नाही. यासंदर्भात राज्यातून कुठलीच व्यवस्था नसल्यामुळे आम्ही केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांना विनंती केली. त्यांच्याकडे केंद्रीय पशुसंवर्धन खात्याचा सुध्दा कार्यभार आहे. त्यांनी आम्हाला या लसीकरणासाठी काही लाख रुपये उपलब्ध करुन दिले. या निधीच्या माध्यमातून राज्यातील शेळया-मेंढयांना मोफत लसीकरण करण्याचे काम आम्ही केले. हे लसीकरण करण्यासाठी आम्हाला राज्याच्या पशुसंवर्धन खात्याची मदत घ्यावी लागते. जिल्हा पशुसंवर्धन विभागाला लसीकरणाचे पैसे आम्हाला द्यावे लागतात. हाच खर्च भागविण्यासाठी आम्हाला केंद्राकडून पैसे मिळालेले आहेत. सामान्य परिस्थितीमध्ये सुध्दा ही अवस्था आहे तर अवर्षण प्रवण परिस्थितीत तर या क्षेत्राकडे शासनाने अधिक लक्ष दिले पाहिजे परंतु तसे लक्ष दिले जात नाही. याचा परिणाम फक्त धनगर, शेतकरी यांच्यावरच होत नाही तर राज्यातील मेंढयांचे मरण्याचे प्रमाण वाढले तर आपल्याला लोकर मिळणार नाही आणि शेळयांचे प्रमाण वाढले तर मटनावरही त्याचा परिणाम होईल. कारण आज मटनाचे भाव आकाशाला भिडलेले आहेत आणि त्यात जर राज्यातील शेळया-मेंढया मरायला लागल्या तर त्यात आणखी भरच पडणार आहे. कारण आपल्याकडे गायी-म्हशीचे मटन खाणारे लोक फारच कमी आहेत आणि शेळयांचे मटन हे वादातीत आहे म्हणून मला सांगावयाचे आहे की .. ..

डॉ. निलम गोऱ्हे : महोदय, सन्माननीय सदस्यांना असे म्हणावयाचे आहे काय की, हे सरकार शेळया-मेंढयांच्या बाबतीत काहीच करीत नाही. तसे असेल तर त्यांनी आपला मुद्दा अधिक स्पष्ट करुन सांगावा, जेणेकरुन सभागृहाला तो समजू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : महोदय, मी शेळया-मेंढयांच्या संदर्भात जो निधी मिळतो त्यासंबंधीच व तेवढयापुरताच बोलत आहे व ते देखील दुष्काळी परिस्थिती उद्‌भवलेली असताना कोणती उपाययोजना करावी, एवढयापुरताच बोलत आहे. अशा प्रकारे शेळयांचे मृत्यूचे प्रमाण वाढले तर मटनाचे जे भाव गगनाला भिडलेले आहेत ते आणखी वाढतील म्हणून या क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. म्हणून माझी शासनाला अशी सूचना आहे की, दुष्काळी परिस्थितीत केवळ गायी-म्हशींच्याच छावण्यांचा विचार न करता शेळया-मेंढयांसाठी सुध्दा छावण्या निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी एक वेगळा निधी राखीव ठेवण्यात यावा. ज्या माध्यमातून राज्यातील सर्व लोकांसाठी असलेले हे क्षेत्र आहे व त्याचा विचार होणे आवश्यक आहे. शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, दुष्काळी परिस्थितीत अवर्षण, पाणीटंचाई असतांना ज्या उपाययोजना नेहमी करतो त्या प्रचलित पध्दतीतून बाहेर पडून यासंदर्भात कारणमिमांसा शोधावी व कायमस्वरुपी उपाय योजावेत, अशी विनंती करतो. एवढे बोलून मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी पुन्हा एकदा आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------------



अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या संदर्भातील प्रस्तावावर बोलत असतांना मला प्रथम असे सांगावयाचे आहे की, शेळ-मेंढयांच्या संदर्भात अत्यंत चांगली भूमिका सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी मांडली आणि या क्षेत्राकडे नेहमीच दुर्लक्ष केले जाते याकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते. तसेच यासंदर्भात माझे विचार व्यक्त करते.

महोदय, राज्यात आज जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्या संकटाच्या संदर्भात जो प्रस्ताव सभागृहासमोर आहे त्यासंबंधी मला भूमिका स्पष्ट करावयाची आहे ती म्हणजे कृपा करुन या राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा हत्यार म्हणून राज्यातील प्रतिनिधींनी वापर करु नये तसेच आपण वेगळया सुविाा उपलब्ध करुन देतो, जे केले ते आम्ही केले अशा प्रकारे सांगण्याचीही सत्ताधाऱ्यांना आवश्यकता नाही. कारण त्यांचे ते कर्तव्यच आहे. राज्यशासन काम करीत असताना चुका घडतात परंतु निवडणुकीवर डोळा ठेवून त्याचा फायदा घेणे आणि भाषण करणे ही संधी देखील विरोधकांनी घेता कामा नये. कारण या राज्याला जगविण्याची जबाबदारी सर्वच राजकीय पक्ष, सामाजिक संस्था या प्रत्येकाची आहे.

महोदय, दुसरी महत्वाची बाब अशी आहे की, दुष्काळ पडला आणि रोजगार हमी योजनेच्या संदर्भात देखील बरेच सन्माननीय सदस्य येथे बोलले......

यानंतर श्री. जुन्नरे.. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

शेवटी कायदे कोण करतो? आपणच ना? एमआरईजीएस ही केंद्र शासनाची योजना आहे. रोजगार हमी योजना आता बंदच पडलेली आहे. जनतेचे प्रश्न सुटावेत,जनतेला न्याय मिळावा यासाठीच कायदे तयार केले जातात. त्यामुळे जनतेला या योजनाचा फायदा व्हावा यासाठी कायदे फ्लेक्झीबल असले पाहिजेत. एमआरईजीएस आहे म्हणून आपल्याला इजीएस बंद करता येणार नाही. या दुष्काळाच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूर जगलाच पाहिजे. त्यामुळे तातडीने महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजना सुरु केली पाहिजे. ही योजना सुरु करण्याच्या संदर्भात काही अडचण असेल तर केंद्रशासनाशी चर्चा करुन यातून मार्ग काढून ही योजना सुरु केली पाहिजे. आज महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक कामे करण्याची आवश्यकता आहे. एमआय टँकची बरीच कामे अपूर्ण आहेत ती सुध्दा आपल्याला रोजगार हमी योजनेतून पूर्ण करता येतील, पाझर तलावांची कामे आपल्याला पूर्ण करता येऊ शकतील. वाडया-तांडया आपण जोड रस्त्यांनी जोडू शकलेलो नाही. आजच्या परिस्थितीत काम मागणा-यांची संख्या खूप आहे. आता मी निवृत्तीला आलेलो आहे म्हणून प्रशासकीय मान्यता देणार नाही असे अधिका-यांनी करुन चालणार नाही. लोकांना जगवण्यासाठी आपण पुष्कळ कामे करु शकतो त्यामुळे तातडीने रोजगार हमी योजना सुरु करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी अधिक काही बोलणार नाही परंतु पेरणीच्या संदर्भात आकडेवारी देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील 1,28,45,900 हेक्टर खरीपाची जमीन आहे. या उपलब्ध असलेल्या खरीपाच्या जमिनीपैकी 33,01,100 हेक्टर क्षेत्रावरच पेरणी झालेली आहे. जी काही पेरणी झालेली आहे ती करपून गेली आहे. सर्वच शेतक-यांच्या जमिनी काही रब्बीच्या असतात असे नाही तर बोटावर मोजता येईल एवढयाच लोकांकडे रब्बीच्या जमिनी असतात. त्यातूनही वर्षातून दोन पिके घेता येतील अशी जमीन थोडयाच शेतक-यांकडे असते आणि वर्षातून तीन पिके घेता येतील अशी जमीन तर फार कमी शेतक-यांकडे असते. त्यामुळें आता जरी पाऊस पडला तरी शेतक-याला त्याचा उपयोग होऊ शकणार नाही. त्यामुळे खरीपाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. ज्या शेतक-यांनी पेरणी केलेली आहे त्या शेतक-यांनी सावकाराकडून, सोसायटयामधून कर्ज काढलेले आहे, काही शेतक-यांनी आपल्या जवळचे किडूक-मिडूक विकून बियांण्यासाठी पैसे उभे केले आहेत तर काही शेतक-यांनी आपल्या जवळचे धान्य विकून पैसे उभे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

केलेले आहेत. काही शेतक-यांनी आपली जनावरे विकून पैसे उभे केलेली आहेत. शेतक-यांनी अशा प्रकारे पैसे उपलब्ध करुन अव्वाच्या सव्वा दराने बियाणे आणि खते विकत घेतलेली आहेत. आता पाऊस पडला नाही तर त्या बियाण्यांचा आणि खताचे काय करणार असा प्रश्न शेतक-यांच्या समोर पडलेला आहे त्यामुळे शेतक-यांनी जी काही अव्वाच्या सव्वा पैसे देऊन खते आणि बियाणे घेतलेले त्यासंदर्भात शासन काही रिप्लेसमेंट देणार आहे काय? पाऊस पडला नाही तर शेतक-यांना खताचा आणि बियाण्यांचा उपयोग करता येणार नाही. त्यामुळे यासंदर्भात शासनाने गांभीर्याने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी कृत्रिम पावसाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. आमच्या बीड जिल्हयात पावसाचे खूप ढग येतात. हे ढग पाहून कवी जर असेल तर तो दिवसातून 100-500 कविता करु शकेल. परंतु चार वाजले की, जोरात वारा सुटतो आणि सर्व ढग निघून जातात. संध्याकाळी चार वाजले की, सर्व खेळ खल्लास होतो. चार वाजेच्या नंतर एक ढग सुध्दा दिसत नाही, ढग नसल्यामुळे संध्याकाळ झाली की, चंद्र, चांदण्या अगदी स्पष्ट दिसू लागतात. त्यामुळे बीडच्या ढगामधील पाऊस बीडमध्येच पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

या दृष्टीने जर राज्य सरकारने पावले उचलली नाहीत तर या राज्याची काय अवस्था होईल याची आपणास कल्पना आहेच कारण 1972 सालचा दुष्काळ आपण सर्वानी पाहिलेला आहे. या चर्चेच्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, शेतक-याच्या पीक विमा योजनेसंबंधी एक निर्णय तातडीने घेणे आवश्यक आहे. पीक विम्याचा प्रिमियम भरण्याचा शेवटचा दिवस 31 जुलै आहे. आता पाऊस पडेल आणि थोडे फार पीक येईल अशी आपण अपेक्षा करु या . तेव्हा पीक विम्याचा प्रिमियम भरण्यासाठीची मुदत 31 ऑगस्टपर्यंत वाढवून घेण्यात यावी . त्या दृष्टीने राज्य सरकारने पाठपुरावा केला व ही तारीख जर वाढवून मिळाली तर शेतक-यांना जीवदान मिळण्यासाठी एक चांगली बाब होईल.

सभापती महोदय, याठिकाणी शेतक-यांच्या कर्जमाफीसबंधीची चर्चा करण्यात आली आहे. मागच्या अधिवेशनात सुध्दा कर्ज माफीची चर्चा झाली होती. कर्ज माफीच्या बाबतीत महाराष्ट्र सरकारने केन्द्र सरकारकडे स्पष्टपणे अशी मागणी करावयास पाहिजे की 1997 सालच्या अगोदरची कर्जेसुध्दा माफ करण्यात आली पाहिजेत. त्याच बरोबर दुसरी अशी मागणी करण्यात यावी की, ज्या शेतक-याकडे कोरडवाहू जमीन आहे त्याला कर्जमाफी देत असतांना हेक्टर आणि एकरचा वाद निर्माण झाला आहे तो वाद देखील नाहीसा करण्यात यावा. पाच एकरापेक्षा कमी शेती असलेल्या शेतक-याचे कर्ज माफ करण्यात येणार आहे परतु एखाद्या शेतक-याकडे जर दोन हेक्टर जमीन असेल तर त्याचे कर्ज माफ होणार नाही कारण दोन हेक्टर जमीन म्हणजे पाच एकराच्यावर दोन गुंठे जमीन जास्त होते.या दोन गुंठे जमिनीमुळे शेतक-यावरील कर्ज माफ होऊ शकत नाही. अशा प्रकारे हेक्टर आणि एकर मधील फरकसुध्दा शेतक-याना मारावयास लागला आहे. 16 व 18 वयोगटाच्या व्यक्तीसंबंधीचा निर्णय देत असताना, ती मुलगी सज्ञान आहे किंवा नाही हे पहात असतांना न्यायालयसुध्दा दोन वर्षाचा एरर गृहित धरत असते. तसेच बेनिफिट ऑफ डाऊटचा फायदा देऊन न्यायालयसुध्दा आरोपीला सोडून देते. या ठिकाणी मात्र दोन गुठे जमिनीमुळे कर्जमाफी पासून शेतकरी वंचित राहत आहेत तेव्हा याही बाबतीत शासनाने विचार करुन किमान 15 एकरापर्यंतचा कोरडवाहू शेतक-यालासुध्दा कर्जमाफीचा फायदा कसा देता येईल हे पाहिले पाहिजे या बाबतीत मी आपणाला एक उदाहरण देऊ इच्छिते. माझ्या सास-याची 25 एकर जमीन आहे व त्यांना पाच मुले असून या 25 एकर जमिनीपैकी फक्त दहा एकर जमीन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...............

वहितीखालील आहे बाकीच्या जमिनीमध्ये कुसळं उगवतात परंतु रेकॉर्डवर 25 एकर जमीन असल्यामुळे कर्ज माफीचा फायदा मिळणार नाही. कुसळं उगवणारी शेती असल्यामुळे कर्ज माफी पासून त्या शेतक-याना न्याय मिळणार नाही. माननीय श्री.शरद पवार हे पहिल्यांदा केन्द्रीय कृषी मंत्री झाले आहेत. या देशाचे पंतप्रधान, या देशाचे अर्थमंत्री आणि माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्या प्रयत्नामुळे शेतक-यांना कर्जमाफी मिळालेली आहे. सर्व शेतक-यांचे आपण समाधान जरी करु शकलो नाही तरी आता सर्वाचे समाधान आम्ही करु शकलो नाही परंतु प्रयत्न करण्यात आला आहे असे सांगून भागणार नाही कारण आता राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे.या दुष्काळामध्ये जर महाराष्ट्रातील शेतक-यांना जगवावयाचे असेल तर कोठल्याही परिस्थितीमध्ये कर्जमाफीची व्याप्ती वाढवावी लागेल. या संदर्भात मी एक उदाहरण देऊ इच्छिते. या ठिकाणी सन्माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते उपस्थित होते. आज अनेक ठिकाणी जंगल तोड सुरु आहे आणि वृक्षारोपण करण्याच्या बाबतीत निष्क्रियता दाखविण्यात येत आहे. त्यामुळे ढग आलेले असतांना पाऊस न पडता हे ढग दुसरीकडे निघून जात आहे. मागच्या वर्षी आमच्या परळी येथील मेरु पर्वत फोडला जात असल्याबद्दल मी आक्षेप घेतला होता. परंतु तो वन खात्याचा आहे की महसूल खात्याचा आहे असा वाद निर्माण झाला आहे. केवळ मी त्या संदर्भात आक्षेप घेतलेला असल्यामुळेच चार महिने डोंगर फोडण्याचे काम बंद झाले होते. त्यानंतर पुन्हा डोगर फोडण्याचे काम सुरु आहे. हा डोंगर महसूल खात्याचाच आहे. आज अशी परिस्थिती आहे की मध्यंतरी तेथील डोंगर फोडण्याचे काम बंद ठेवण्यात आले होते पंरतु ते काम पुन्हा सुरु करण्यात आले आहे इतकेच नव्हे तर परळी शहरापासून कण्हेरवाडी पर्यत जेवढे डोंगर आहेत ते सगळे डोंगळ फोडण्याचे काम सुरु झाले आहे.अशा प्रकारे त्या ठिकाणचे डोंगर फोडून तेथ्रील मुरुम राजरोसपणे दुसरीकडे नेला जात आहे. त्यामुळे पर्यावरणावर परिणाम होत आहेत. तेव्हा या संदर्भात लॉग टर्म भूमिका आपण जोपर्यंत घेणार नाही आणि नियोजन करणार नाही तोपर्यत आलेल्या संकटाशी मुकाबला करणे आपल्याला नेहमीच जड जाणार आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, कृषी क्षेत्राला औद्योगिक दर्जा दिला जावा आणि पाण्याचे व्यवस्थित नियोजन करण्यात यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करु इच्छिते.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथमश्री.जुन्नरे 15.45

श्रीमती उषा दराडे .....

आज पर्यत जे काही झाले आहे ते खूप झाले आहे. या बाबतीत शासनाने काहीही केलेले नाही असेही माझे म्हणणे नाही पंरतु अजूनही नीटपणे नियोजन केले तर अशा प्रकारचे 50 दुष्काळ जरी आले तरी महाराष्ट्रीील शेतकरी डगमगणार नाही अशा प्रकारचे त्याचे मनोबल आहे असे मला म्हणावयाचे आहे. या बाबतीत योग्य पध्दतीचे नियोजन होत नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे पाणी अडविणे, पाणी जिरवणे आणि मागास भागात असलेले पाणी चांगल्या प्रकारे सांभाळणे, वनीककरण करणे, कृषीला उद्योगाचा दर्जा देणे या गोष्टी शासनाने तातडीने केल्या पाहिजेत जर शासनाने या गोंष्टी केल्या नाही तर या देशातील व राज्यातील शेतकरी मरतो म्हणून त्यांना केवळ श्रध्दांजली वाहत राहणे योग्य होणार नाही किंवा आपल्या मागण्यासाठी मोर्चे काढणे आणि राष्ट्रवादीचे व कॉग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर होते म्हणून शेतक-यांनी आत्महत्या केली असे सांगून प्रश्न सुटणार नाही. शासनाला जर खरोखर प्रश्न सोडवावयाचे असतील तर त्यासाठी कायमच्या उपाययोजना कराव्या लागतील तसेच शेतक-यांचे मनोबल वाढवावे लागेल . महाराष्ट्र सरकारने आतापर्यंत ज्या काही उपाययोजना केलेल्या आहेत त्याचे मी नेहमीच अभिनंदन करील परंतु आाज अभिनंदन करण्याचे दिवस नाही तसेच विरोध करण्याचेही दिवस नाहीत तर दुष्काळात या राज्यातील शेतक-याचे मनोबल कसे वाढवता येईल हे पाहणे आवश्यक आहे. 1972 च्या दुष्काळात महाराष्ट्र जगला परंतु त्या काळात मोडलेला शेतकरी अजूनही उभा राहू शकला नाही तेव्हा आजच्या दुष्काळात कोणताही शेतकरी मोडणार नाही या दृष्टीने शासनाने जर दक्षता धेतली तर त्यांना या राज्याचे नेते म्हणून घेण्याचा अधिकार राहील एवढी भावना मी व्यक्त करते आणि या प्रस्तावाला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपविते.

------

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 15:5 श्री.

हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कालपासून या सभागृहामध्ये जी चर्चा सुरू आहे त्या चर्चेत सहभागी झालेल्या सन्माननीय सदस्यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीबद्दल अत्यंत सविस्तरपणे आणि वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विषयाची मांडणी तर केलेलीच आहे. सभापती महोदय, कदाचित मी या सभागृहात नवखा सदस्य म्हणून असल्याने माझ्याकडून अनावधानाने काही चुका होण्याची शक्यता आहे तरी आपण सर्वांनी मला सांभाळून घ्यावे अशी माझी आपणा सर्वांनाच विनंती आहे.

सभापती महोदय, मुळात मला असे वाटते की, ही जी दोन सभागृहे आहेत आणि या सभागृहांमध्ये सर्व विषयांवर ज्या चर्चा होतात त्या चर्चांचा स्तर त्या सभागृहापेक्षा या सभागृहाचा वेगळा असतो आणि त्याचे संदर्भही वेगळ्या पद्धतीने सामोरे आणले जावेत. तपशीलामध्ये या सगळ्या विषयात जाण्याचे प्रयोजन आहे असे मला वाटत नाही. सभापती महोदय, आजचे हे दुष्काळाचे संकट खूप मोठे आहे, हे राज्यावरील संकट आहे आणि शासनाच्या माध्यमातून याला सामोरे जायचे आहे. हे करीत असताना आपण आज पाहतो आहोत की, दृश्य आणि अदृश्य अशा अनेक कारणांमुळे हे संकट निर्माण झालेले आहे. याची व्याप्ती खूप मोठी आहे. त्याची कितपत जाणीव शासनाला किंवा सत्तारूढ बाजूला आहे, त्यांच्या संवेदना किती जागृत आहेत याबद्दल विरोधी पक्षाकडून अनेक प्रश्न येथे उपस्थित होणे हे स्वाभाविक आहे. अर्थातच शासनाकडून देखील या संदर्भात अनेक पावले उचलली जातात परंतु या सर्वांच्या देवाण घेवाणीत सर्व घटकांना न्याय मिळवून देणे, त्यादृष्टीने केलेल्या उपाय योजनांची अमलबजावणी करण्याचा प्रयत्न होतो, पण त्यानंतरचे काय ? कदाचित सबंध सभागृहाच्या या संबंधातील भावना लक्षात घेऊन उद्या सरकारकडून दुष्काळ जाहीर होईलही आणि त्यादृष्टीने उपाय योजना देखील जाहीर होतील. परंतु एकंदर सूर असा दिसतो की, कितीही चांगल्या उपाय योजना जाहीर झाल्या, त्याबाबत आदेश काढले गेले तरी त्यांच्या अमलबजावणीत खूप मोठे अडथळे निर्माण होतात आणि मग खालच्या थरापर्यंत योजना पोहोचविण्यात अनेक अडथळे निर्माण करण्याची एक शर्यतच लागते. आजची ही दुष्काळ सदृश्य परिस्थिती काय आहे किंवा दुष्काळ जाहीर केल्या नंतरची जी कार्यवाही होणे आवश्यक असते त्याबाबत शासन आणि सभागृहातील विरोधी पक्षनेते यांनी एकत्रित बसून विचार करून कदाचित ही आणीबाणीची परिस्थिती आहे हे समजून एक कायम स्वरूपी कंट्रोल रूमची व्यवस्था मंत्रालयामध्ये करायला पाहिजे. आज आपण चर्चा करू, त्यानंतर काही योजना

..... 3आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टकले .....

जाहीर होतील, त्यांचे अध्यादेश निघतील आणि त्यांची अमलबजावणी होईपर्यंत मध्ये 3-4 महिन्यांचा कालावधी जाईल. या पेक्षा दररोज मंत्रालयातील या कक्षाद्वारा सर्व शासकीय यंत्रणांकडून माहिती गोळा करून तात्काळ उपाय योजना करण्यात आली तर ते जास्त उपयुक्त ठरू शकेल असे माझे प्रामाणिक मत आहे. सभापती महोदय, राज्यात सर्व विभागांमध्ये कृषी विद्यापीठे आहेत. आपल्याला माहिती असेलच की, जे विद्यार्थी मेडिकल कॉलेजमध्ये जातात, मेडिकल कोर्सला जातात त्यांना त्यांचा साडेचार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एक वर्षाची इंटर्नशीप करावी लागते. ती पद्धत या कृषी विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्याबाबतीतही लागू करावी असे मला येथे सांगावेसे वाटते. राज्यातील सर्व कृषी विद्यापीठातून शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि त्यातील शिक्षक-प्राध्यापक जो उपलब्ध आहे त्यांना या प्रत्यक्ष परिस्थितीचा सामना करण्यासाठी आता मैदानात उतरविण्याची वेळ आलेली आहे. त्यासाठी त्यांचे कृतीगट करून शेतकऱ्यांपर्यंत त्यांना पोहोचवावे आणि त्यांच्या शास्त्रीय ज्ञानाचा लाभ आपल्या शेतकऱ्यांना करून देण्याची गरज आहे.

( यानंतर श्री. सरफरे ....3जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

कारण आपण जर पाण्याच्या नियोजनाचा विषय घेतला तर कोणत्या पिकाला किती पाणी दिले पाहिजे, किती कालावधीनंतर पाणी दिले पाहिजे, पावसाळयात कोणत्या वेळेला पाणी दिले पाहिजे या छोटया छोटया गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. एकदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली की, 1972 साली पडलेल्या दुष्काळाची आठवण करुन देण्यात येते. त्यावेळी दुष्काळाशी कशाप्रकारे सामना करण्यात आला हे सांगण्यात येते. अशाप्रकारची परिस्थिती वारंवार उद्‌भवू शकते. हवामान खात्याकडून वारंवार अंदाज वर्तविण्यात येतात. त्याबाबत मला असे सांगावेसे वाटते की, त्यांनी आपले अंदाज वर्तमानपत्रांमध्ये जाहीर करण्याऐवजी मंत्रालयामध्ये आणून द्यावेत, मंत्रिमहोदयांजवळ द्यावेत. जेणेकरुन गैरसमज वाढण्यास जी मदत होत आहे ती होणार नाही. तेव्हा यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. कदाचित यानंतर पाऊस पडेल किंवा पडणार नाही. त्यामुळे परिस्थिती अधिक बिकट होईल. हे सर्व संकट समोर असतांना या परिस्थितीत शेतकऱ्यांनी नेमके करावयाचे काय? याविषयी चर्चा सुरु होईल. आज आपल्याकडे बि-बियाणे नाहीत, खते नाहीत, वीज नाही, पाणी नाही अशा परिस्थितीत जरी पाऊस पडला तरी आपल्याला पिके घेता येणार नाही. आणि पिक घेतले नाहीतर डोक्यावरील कर्ज वाढत जाईल. आणि कर्ज वाढले तर त्याची क्रयशक्ती कमी होईल. बाजारामधून कोणतीही वस्तू तो विकत घेऊ शकणार नाही. त्यामुळे कदाचित आजपर्यंत आपण जे अनुभवले नसेल इतके आत्महत्त्येचे प्रमाण वाढते की काय? अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीचा सांगोपांग विचार करुन कोणताही पक्षाभिनिवेश आपल्या कृतीमध्ये न आणता शासन आणि विरोधी पक्षनेत्यांनी या सभागृहामध्ये हातात हात घालून या संकटाशी सामना करण्याची तयारी दाखविली तर प्रशासकीय यंत्रणेवर एकप्रकारचे नैतिक बंधन आपल्याला या निमित्ताने टाकता येईल. आणि त्या माध्यमातून आलेल्या संकटाला सामोरे जाण्यासाठी सज्ज होता येईल. याबाबत गांभीर्याने विचार व्हावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी आणि त्याचबरोबर कालपासून या विषयावर सदनातील अनेक माननीय सदस्यांनी आपले मौलिक विचार मांडले आहेत त्यांची पुनरुक्ती न करता काही मोजके मुद्दे मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, गेल्या महिन्याभरामध्ये निवडणुकीच्या निमित्ताने मला अनेक जिल्हयात जाण्याची संधी मिळाली. मी कोकणामध्ये सारखा फिरत असतो.परंतु कोकण सोडून अन्य जिल्हयात मला जावयास मिळाले . त्या जिल्हयामध्ये असलेले दुष्काळाचे संकट प्रत्यक्ष डोळयांनी मला पहावयास मिळाले. यावर्षी जवळ जवळ 250 तालुक्यांमध्ये पाऊस कमी पडला आहे. त्यामुळे या संकटावर मात करण्याचे फार मोठे आव्हान शासनाला आणि महाराष्ट्रातील जनतेला स्वीकारावयाचे आहे. सभापती महोदय, कोकणातील शेतकऱ्यांवर सातत्याने शासनाकडून अन्याय होत असतो. कोकणातील मच्छिमारांवर वारंवार संकट येत असते. कोकणामध्ये दरवर्षी 3 हजार मिलीमीटर पाऊस पडतो त्यापैकी 10 ते 15 टक्के सुध्दा पाऊस यावर्षी पडला नाही. त्यामुळे कोकणातील शेती सुध्दा धोक्यात आली आहे. कोकणामध्ये आज सिंचनाची व्यवस्था नाही. मागील अर्थसंकल्पामध्ये 1102 कोटी रुपये सिंचन व्यवस्थेकरिता जाहीर करण्यात आले. प्रत्यक्षात अजून सिंचनाची, पाटबंधारेची कामे सुरु व्हावयाची आहेत. ही कामे जर अगोदर केली असती तर येणाऱ्या संकटाला कोकणातील लोकांना तोंड देता आले असते. परंतु कोकणातील जनतेवर सातत्याने सर्वच विषयांच्या बाबतीत अन्याय केला जात आहे, त्यातील हा एक भाग आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आता निर्माण झाली आहे, परंतु कोकणामध्ये दरवर्षीच अशाप्रकारची वाईट स्थिती असते. ठाणे जिल्हयात फेब्रुवारी-मार्च महिन्यापासून लोक पाण्यासाठी वण वण फिरत आहेत. जनावरांना पिण्यासाठी पाणी आणि चारा न मिळाल्यामुळे कसारा आणि शहापूर तालुक्यातील शेकडो जनावरे मेली. हा विषय मी शासकीय पातळीवर उपस्थित केल्यानंतर त्याठिकाणी पथके पाठविण्यात आली व त्यांचा खोटा अहवाल सादर करण्यात आला. त्यावेळी मी त्यांना दाखले दाखविले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

त्यावेळी त्यांनी हे मान्य केले की, या गावातील 25 गुरे, त्या गावातील 21 गुरे मेली आहेत. अशा प्रकारे सर्व तालुक्यामध्ये मिळून 150 जनावरे मेलेली आहेत. त्याठिकाणी पाणी नाही म्हणून येथील जनावरे मेलेली आहेत अशी स्थिती आहे. चाऱ्याची बात तर सोडूनच द्या. परंतु याठिकाणी हळवा रोगाने जनावरे मेली आहेत. आपण एकीकडे असे सांगितले जाते की, हे राज्य कृषीप्रधान आहे, हा देश शेतकऱ्यांचा आहे आणि हे राज्य देखील शेतकऱ्यांचे आहे. परंतु अशा वेळी जनावरांच्या तपासणीसाठी पशु चिकित्सक डॉक्टर असावयास पाहिजेत. परंतु अनेक ठिकाणी पशु चिकित्सालयामध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत ही बाब उघडकीस आलेली आहे. दोन तालुक्यांमध्ये 7 डॉक्टर नसल्यामुळे जनावरांची तपासणी होऊ शकलेली नाही. त्यामुळे जनावरांना काय झाले आहे हे समजू शकले नाही आणि जवळजवळ 150 च्या वर जनावरे मरण पावली आहेत. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेली जनावरे ऐन शेतीच्या हंगामापूर्वी मरण पावली आहेत. आम्ही यासंबंधातील दाखले देखील दिलेले आहेत.त्यामुळे अशा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, 2005 मध्ये निरनिराळया कृषी भागामध्ये जी अतिवृष्टी झाली होती, त्या वेळी बांधबंधाऱ्याचे, बांधबंदिस्तीचे पैसे दिले जातील असे जाहीर केले होते. त्यावेळी ठाणे जिल्हयामध्ये साडेआठ कोटी रुपये दिले होते. पण त्यासाठी अनेक वेळा आंदोलने करण्यात आली, शेतकऱ्यांबरोबर देखील आंदोलने करण्यात आली. त्यानंतर निधी उपलब्ध झाला, मग संबंधितांना ते पैसे देण्यात आले. परंतु हा निधी देत असताना निरनिराळया तालुक्यातील कृषी खात्यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. आजही ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील लोक कृषी विभागाच्या कार्यालयामध्ये गेल्यानंतर त्यांना हिडीस-फिडीस केले जाते. त्यांना बी-बियाणे उपलब्ध करुन देणे ही बाब तर सोडाच, परंतु त्यांना तेथे उभेही केले जात नाही. त्यांना चार-चार, पाच-पाच तास कुठेतरी बाजुला उभे केले जाते. त्यामुळे इम्प्लीमेंटेशनमध्ये मोठया प्रमाणात गोंधळ निर्माण होतो. तसेच या तालुक्यातील कृषी विभागातील अधिकारी प्रचंड भ्रष्टाचार करतात. त्याबाबतीत चौकशी झाली पाहिजे. खऱ्या अर्थाने ज्याला मदत मिळावयास पाहिजे, ती त्याला मिळत नसेल आणि त्याला जर कार्यालयामध्ये उभे केले जात नसेल तर आम्ही याठिकाणी कितीही सवलती जाहीर केल्या तरी त्या संबंधितांपर्यंत पोहचू शकणार नाहीत.

. . . .3 के-2

श्री.संजय केळकर . . . .

सभापती महोदय, याठिकाणी खताच्या बाबतीत देखील चर्चा झाली आहे. पण या चर्चेच्या वेळी एक मुद्दा उपस्थित केला गेला नाही आणि तो म्हणजे निकृष्ट दर्जाच्या खताचा. हे निकृष्ट दर्जाचे खत कोणी दिले ? कसे दिले ? याला कोण जबाबदार आहे ? याची देखील चौकशी झाली पाहिजे. एकतर वेळेवर खत उपलब्ध करुन देत नाहीत आणि जे दिले जाते ते देखील निकृष्ट दर्जाचे असते. हा शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा प्रकार आहे. याबाबतीत देखील चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी दुष्काळाबाबत चर्चा होत असताना केवळ ग्रामीण भागातील शेतीवर आणि शेतकऱ्यांवर परिणाम होणार आहे असे नाही. जेव्हा पुरेसा पाऊस पडत नाही, त्यावेळी शहरी भागातील लोकांना सुध्दा पाण्यासाठी वणवण फिरावे लागणार आहे. नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रामध्ये जेथे-जेथे मोठया प्रमाणात नागरीकरण झालेले आहे. तेथे सध्या पाणीकपात करण्यात आलेली आहे. अशा वेळी पाऊस पडत नसल्यामुळे, दुष्काळामुळे येथील लाखो-करोडो लोकांवर संकट येणार आहे. याबाबतीत शासनाने योग्य ती उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, याठिकाणी कोकणातील मच्छिमारांच्या बाबतीत मुद्दा मांडला आहे. मच्छिमारांना देखील कर्ज माफी दिलीच पाहिजे. परंतु नवीन कर्ज 2 ते 4 टक्क्याने उपलब्ध करुन दिले पाहिजे. मच्छिमार हे देखील शेतकरीच आहेत अशी शासनाने भूमिका घेणे आवश्यक आहे. जे छोटे मच्छिमार आहेत, जे पिचलेले आहे, अडचणीमध्ये आहेत, त्यांना त्या परिस्थितीतून बाहेर काढले पाहिजे अशी मी मागणी करतो आणि या चर्चेच्या निमित्ताने शासनाने, माननीय कृषी मंत्र्यांनी आजच राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा अशी माझी करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

. . . .3 के-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला या चर्चेच्या निमित्ताने फक्त दोन-चार सूचना करावयाच्या आहेत.

सभापती महोदय, मी जे मुद्दे मांडणार आहे, त्याकडे माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी विनंती आहे. आपण मराठवाडा विभागातील आहात. मी परवा पन्हाळगडावर गेलो होतो. त्यावेळी पन्हाळगडावर धान्याची कोठारे असल्याचे दिसून आले. मग मी सहज एकाला विचारले की, पन्हाळगडावर कोठारे कशासाठी बांधलेली आहेत ? तर याबाबतीत त्यांनी असे उत्तर दिले की, छत्रपती शिवाजी महाराज हे दूरदृष्टीचे होते. येथे दोन कारणांसाठी ही कोठारे बांधण्यात आलेली आहेत. एक म्हणजे सिध्दी जौहरने आक्रमण केल्यानंतर जर गडाला अधिक काळ वेढा बसला तर गडावरील लोकांना धान्याची टंचाई भासू नये.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

आणि दुसरे म्हणजे प्रत्येक गडावर कोठार अशासाठी ठेवा की, देशामध्ये, प्रांतामध्ये, महाराष्ट्रात दुष्काळ पडला तर साठा करुन ठेवावयाचा. राज्यकर्ता म्हणून, राजा म्हणून माझे कर्तव्य आहे. कारण राजाला मायबाप सरकार म्हणतात. दुष्काळ पडला किंवा काही अडचणी निर्माण झाल्या, बी-बियाणांच्या अडचणी निर्माण झाल्या तर त्यासाठी साठा करुन ठेवावयाचा. म्हणून त्यांना जाणता राजा म्हणावयाचे. आता मी व्यक्तिगत बोलत नाही. सकाळी या ठिकाणी उत्तर देण्यात आले. मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. हा राजकीय अभिनिवेशाचा भाग नाही. हा तुमच्या आमच्या समदु:खाचा प्रश्न आहे. आम्ही काल असे बोलत होतो की, या ठिकाणी मंत्री हजर असले पाहिजेत. मी अतिशय आदर ठेवून सांगतो की, त्यांचे सुंदर चेहरे बघून आम्हाला या ठिकाणी सभागृहात बोलण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून आम्ही बोललो. राज्यकर्ता हा आईच्या भूमिकेत जावा लागतो. राज्यकर्ता हा आईवडिलांच्या भूमिकेत जावा लागतो. आईवडील जसे डोळ्यात तेल घालून मुलांच्या संगोपनाची, भविष्याची चिंता करतात, त्याला नीट शिक्षण कसे मिळेल, मुलीचे लग्न वेळेवर कसे होईल, मुलाला नोकरी कशी मिळेल, त्याला अन्न कसे मिळेल याची काळजी करतात त्याप्रमाणे राज्यकर्त्यांनी दूरदृष्टीने जनतेची मुलाबाळांप्रमाणे काळजी केली पाहिजे. आपण आम्हाला राजस्थानच्या गोष्टी सांगता. राजस्थानमध्ये गुज्जरांचे आंदोलन झाले. आपण उत्तर काय दिले ? आपण बेजबाबदारपणे उत्तर देऊन तोंड लपवाल परंतु आपण परिणाम लपवू शकणार नाही. आपण परिणाम टाळू शकणार नाही. आपण असत्य बोलू शकतो परंतु आपण वस्तुस्थिती टाळू शकत नाही. वस्तुस्थितीला आपल्याला सामोरे जावे लागते. आपण आम्हाला चुकीचे सांगाल, आमची दिशाभूल कराल परंतु राज्यकर्ते म्हणून उद्या लोक तुमच्याकडेच येणार. या ठिकाणी खताच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्याला सांगितले. यामध्ये गुज्जरांच्या आंदोलनाचा काय संबंध आहे ? आपण प्रामाणिकपणे कबूल करावयास पाहिजे होते की, आमची चूक झाली, माफ करा. आम्ही या ठिकाणी अगोदरच खत साठवून ठेवावयास पाहिजे होते याबद्दल महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेची आणि 60-65 टक्के शेतकऱ्यांची आम्ही क्षमा मागतो असे म्हणावयास पाहिजे होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

श्री. पाशा पटेल महोदयांनी बरोबर सांगितले की, त्या ठिकाणी 20 मे ते 16 जून या कालावधीत आंदोलन झाले. साधारणपणे महिनाभर आंदोलन झाले. आमच्याकडे जी कात्रणे आहेत त्याप्रमाणे त्या ठिकाणी पॅसेंजर गाड्या अडविल्या गेल्या. वादासाठी असे गृहीत धरु की त्यामध्ये खत होते म्हणून ते आले नाही. देश किती पुढे गेलेला आहे ? विज्ञान किती पुढे गेलेले आहे ? युग किती पुढे गेलेले आहे. त्या ठिकाणी जर गाड्या अडवल्या तर ते खत आपण अन्य मार्गाने आणू शकत होता. त्यासाठी कारणे सांगण्याची गरज नाही. विज्ञान फार पुढे गेलेले आहे. काल या ठिकाणी फिल्डमार्शल माणेकशॉ यांना श्रध्दांजली अर्पण केली. मी रेफरंस साठी सांगत आहे. मी विषयाला सोडून बोलत नाही. दूरदृष्टी कशी असते ते मी सांगत आहे. युध्द उगीच जिंकले नाही. पूर्वीच्या दोन्ही युध्दामध्ये म्हणजे 1962 आणि 1965 च्या युध्दामध्ये चीनच्या विरोधात आणि पाकिस्तानच्या विरोधात पराभव झाला त्याचे कारण असे होते की, तीनही सेनादलांमध्ये समन्वय नव्हता. 1971 मध्ये जनरल माणेकशॉ यांनी समन्वय केला की, एकाचवेळी भूदल हल्ला करत जातील आणि वरुन हवाई दल त्यांच्या संरक्षणासाठी जाईल. खाली भूदल हल्ला करत जातील आणि वरुन त्यांना संरक्षणाचे कवच दिले जाईल. आपल्या मंत्रिमंडळामध्ये एकजिनसीपणा आहे काय ? काल त्यांनी सगळ्या ऋतूंच्या बाबतीत सांगितले. मृग नक्षत्र कधी असते, रोहिणी नक्षत्र कधी असते हे सांगितले. आता आपल्याकडे ठोंब्यावर वात लावतात. कोकणामध्ये त्याला रोप म्हणतो तसेच रत्नागिरी जिल्ह्यात काही गावामध्ये त्याला आवण म्हणतात. त्या ठिकाणी पाऊस पडला की, थोडेसे आवण काढावयाचे, रोप काढावयाचे आणि त्याच्या मुठी बांधून ठेवावयाच्या. दुसऱ्या बाजूला चिखल करावयाचा आणि चिखल वगैरे भरपूर झाला की मग त्याच्यात दोन-दोन , तीन-तीन काड्या लावत जावयाच्या. त्यांनी आवण किंवा रोपे काढून ठेवली. 1 तारखेपासून पावसाचा पत्ता नाही. ते सगळे सुकून गेले. नंतर ते ठोंब्यावर लावावयाचे म्हणजे जी थोडीशी भुसभुशीत जमीन असेल तेथे काठी मारावयाची, त्या ठिकाणी दोन दाणे खताचे टाकावयाचे, काठी टोवायची आणि ती टोवल्यानंतर सुध्दा थोडा तरी पाण्याचा शिडकावा लागतो पण तो झाला नाही. या ठिकाणी अहो बसा हो, आहे चला हो अशी टिंगल टवाळी केली जाते. तुमचे आंदोलन झाले वगैरे सांगण्यात आले. या ठिकाणी

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/

श्री. मधुकर चव्हाण .....

समन्वय होता काय ? आंदोलन झाल्यानंतर चार दिवसात लक्षात यावयास पाहिजे होते की, 20 मे ला आंदोलन सुरु झाले आहे आणि ते किती दिवस चालेल हे माहीत नाही, आंदोलनकर्ते गुज्जर समाजातील सर्वांची माथी भडकविण्याचा प्रयत्न करीत होते किंवा न्याय मागण्या मागण्याचा प्रयत्न करीत होते आणि हे आंदोलन देशभर सुध्दा पेटेल अशातऱ्हेची जाणीव सरकारला लगेच व्हावयास पाहिजे होती. समजा तशी जाणीव झाली असेल तर आपण त्या गाड्या का वळवल्या नाहीत ? सकाळी एक उत्तर दिले नाही. आम्ही टीकेसाठी टीका करीत नाही. 1972 पेक्षाही भयानक दुष्काळ आहे. माणसे पटापट मरणार आहेत. दुष्काळाचे परिणाम नुसते त्यांच्यावरच होणार नाही तर रोगराईबाबतही परिणाम होणार आहेत. पिण्याच्या पाण्यावर परिणाम होणार आहे. पाण्यासाठी माणसे दंगली करतील.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

तुमची कोठारे लुटतील. म्हणून आम्ही म्हणत आहोत की सरकारने एकत्रित बसून विचार करावा. पावसाचा एक थेंबही पडणार नाही, असे गृहित धरुन पुढे जर राज्यात भयानक परिस्थिती निर्माण झ ााली तर त्याचा सामना सरकार कशाप्रकारे करणार आहे याचे विवेचन करणारा एक प्रस्ताव सरकारनेच आणला पाहिजे होता. महाराष्ट्रात दुर्दैवाने निसर्गाने अवकृपा केली आणि पावसाच्या पाण्याचा एक थेंबही पडला नाही तर तर सरकार या या उपाययोजना करणार आहे हे त्यातून दिसले पाहिजे. मुळात मराठवाडा, विदर्भ हा भाग दुष्काळी असतो. मंत्रिमहोदयांचा सुध्दा भाग दुष्काळी आहे. म्हणून यासाठी सरकारला काय काय करावा लागेल यासाठी एक प्रस्ताव आणावयास पाहिजे होता. तज्ज्ञांची एक समिती नेमली पाहिजे होती, आजुबाजूच्या राज्यांची मदत घ्यावयास पाहिजे होती. महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्यावतीने आम्ही सरकारच्या पाठीमागे उभे आहोत हे सांगू इच्छितो. अन्नाशिवाय एक माणूसही मरु देणार नाही. कोणालाही रात्री अन्नाशिवाय उपाशी झोपण्याची वेळ येणार नाही. एक प्रकारचा आत्मविश्वास राज्यकर्त्यांनी द्यावयाचा असतो. सरकारने हा प्रयत्न केला आहे काय ? प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मंत्रिमहोदयांनी उडवाउडवीची उत्तरे दिली होती. सभापती महोदय, मत्स्यव्यवसायाच्या संदर्भात आपण किती पोटतिडीकीने बोलत होता. मी असंसदीय शब्द वापरणार नाही. एकदा येथे सांगितले जाते की, 9 हजार लोक होते, दुस-यांदा सांगितले जाते की, 18 हजार लोक झाले. पण ब्रिडिंग वाढते ना. येथे मी भ्रष्टाचाराचे आरोप करीत नाही आणि कोणी कोणावर करु नये. राजकारणामध्ये कोणी कोणावर कमरेखाली वार करु नये निदान या वरिष्ठ सभागृहात तरी करु नयेत. पण जून ते ऑगस्ट या दरम्यानच्या काळात मासेमारी करु नये हे मंत्रिमहोदयांना माहीत नाही काय ? तट रक्षक दलाच्या माध्यमातून सगळया लोकांना हप्ते देऊन माशांचा ब्रीडींगचा काळ असतो त्या काळात मासेमारी केल्यामुळे मत्स्य दुष्काळ निर्माण होईल हे तुम्हाला कोणाला माहीत नाही ? उलट त्याठिकाणी मासेमारी करणारी जमात आहे मग भोई असतील, कोळी असतील त्यांची मुले इंजिनिअर झाली आहेत, कोणाची मुले डॉक्टर झाली आहेत. ती मुले वडिलोपार्जित व्यवसाय करण्यास तयार होत नाहीत. कोकणामध्ये कुणबी समाज होता. ते लोक

2...

श्री.मधुकर चव्हाण....

वर्षानुवर्षे दुस-यांच्या कारखान्यात पत्रावळया तयार करण्याचे काम करीत होते. पण त्यांचीही मुले शिकल्यामुळे ते पत्रावळया तयार करण्यास नकार देत आहेत. मच्छिमारांची मुले सुध्दा किती वर्षे आपण मासेमारीचा व्यवसाय करावयाचा, आपण दुसरा व्यवसाय करु असे म्हणू लागली आहेत. परंपरागत मासेमारी करणा-या कुटुंबातील मुले शिकल्यामुळे फायद्याचे असेल त्याठिकाणी बॉस झाली आहेत, पण समुद्रामध्ये जाळे फेकून 2-3 दिवस 40-50 समुद्र मैल दूर जाणा-यांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे शासनाने डोळयात धूळफेक करणारी उत्तरे देऊ नयेत. सभापती महोदय, आपणच भोई समाजाचे दुष्काळग्रस्त भागामध्ये नाव घेणार काय असे आपणच विचारले होते, त्याला मंत्रिमहोदयांनी होय असे उत्तर दिले होते. राज्यकर्ता ब्लॉटिंग पेपरसारखा असला पाहिजे. ब्लॉटिंग पेपर जसा शाई टिपतो तसे राज्यकर्त्यांनी लोकांची दु:खे टिपली पाहिजेत. त्यांच्या अडचणी समजावून घेऊन टिपल्या पाहिजेत. जसे जमिनीत पाणी जिरते तसे राज्यकर्त्यांनी लोकांच्या वेदना जिरवून न घेता त्या आपल्या मनामध्ये साठवून ठेवल्या पाहिजेत. शासनाने दुष्काळ जाहीर करावा. ब्रिटिशांच्या काळामधील निकष लावू नये. ब्रिटिशांच्या राज्यात देशातील लोकांनी त्यांच्या राजवटीविरुध्द उठाव करु नये, लोक तसेच मरावेत, त्यांची प्रतिकार शक्ती मरावी, स्वातंत्र्याची लालसा मरावी म्हणून ब्रिटिशांनी आणेवारीचे कडक निकष लावले होते. त्यांनी संस्थानिकांना 5 दिवस क्रिकेट खेळत बसविले. शासनाने दुष्काळ जाहीर करण्यासाठी त्यावेळचे नियम अद्याप चालू ठेवलेले आहेत. काळ बदलेला आहे, पाण्याचा स्त्रोत काय ते पहावा. कोकणामध्ये 80 फूट, 90 फूट खोल विहिर खोदावी लागते. सगळीकडे तीच स्थिती आहे. मग कालानुरुप राज्यकर्त्यांना दृष्टी नसेल तर आपण राज्य करण्यास योग्य नाही. माननीय श्री.बाळासाहेब थोरात यांचा राजीनामा मागण्याची आम्हाला हौस नाही. आम्ही सभागृहात टिंगल-टवाळी करण्यासाठी येत नाही, आम्हालाही कळते, आम्हीही काम करण्यासाठी येतो. लोकप्रतिनिधी हा जनतेच्या सुखदु:खाचे प्रतिबिंब असतो. तो ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतो त्या भागातील जनतेचे दु:ख, वेदना त्यांच्या बोलण्यातून, मुखातून, व्यवहारातून या सभागृहात उमटणार नाहीत तर कोठे उमटणार ? मला वाटते की, सकाळपासून या विषयावर येथे चर्चा चालू आहे. मंत्र्यांच्या

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

राजीनाम्यामुळे हा प्रश्न सुटेल अशातील भाग नाही. पण पश्चात बुध्दी म्हणून मंत्री महोदयांचा राजीनामा घेतला पाहिजे असे आम्हाला वाटते. एका राज्यमंत्र्यांनी एक हरीण मारले म्हणून त्यांना राजीनामा द्यावा लागला. पण दुष्काळी परिस्थितीमुळे किती तरी जनावरे मरणार आहेत, माणसे मरणार आहेत त्यासाठी शासन काय करणार आहे ? राजीनाम्याऐवजी मंत्री महोदयांनी त्वरित दुष्काळ जाहीर केला पाहिजे. यासाठी सगळेजण एकत्र बसू या. या अधिवेशन काळात या दुष्काळावर मात करण्यासाठी आपण काय करु शकतो यावर एकत्र बसून विचार करणे आवश्यक आहे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 4.15 पर्यंत होती. या वेळेपर्यंत ही चर्चा संपवावयाची होती. ही चर्चा संपल्यानंतर कामकाजपत्रिकेवर आणखी एक चर्चा दाखविलेली आहे.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : तालिका सभापती महोदय, सभागृहापुढील कामाकाजाच्या संदर्भात माझी माननीय सभापतीबरोबर चर्चा झाली. त्यांनी सांगितले की, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली नियम 97 अन्वयेची चर्चा आज न घेता वेळ असेल तर अर्धा-तास चर्चा पूर्ण करुन कामकाज संपवावे.

**तालिका सभापती** : माननीय सभापतींचा संदेश मला आलेला आहे. परंतु त्याबाबतीत सभागृहाला अवगत करणे गरजेचे आहे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे भाषण करतील. त्यानंतर या चर्चेला माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. माननीय महसूल मंत्र्यांपासून उत्तराला सुरुवात होईल. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर संपेपर्यन्त पुढील कामकाजाच्या संदर्भात सभागृहाचा कौल घेऊन निर्णय घेण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : तालिका सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आज राज्यामध्ये पडलेल्या भीषण दुष्काळाबाबत जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे तिचे समर्थन करण्यासाठी मी उभी आहे.

काल पासून अनेक वक्त्यांची भाषणे ऐकल्यानंतर प्रत्येकाने आपल्या भाषणामध्ये राज्यातील दुष्काळी परिस्थिती विषयी, शेती विषयी, बी-बियाणा विषयी, खता विषयी, चा-या विषयी उहापोह केल्याचे दिसून आले. परंतु या दुष्काळी परिस्थितीला आपणाला का सामोरे जावे लागत आहे याचे देखील आत्मपरीक्षण आपण प्रत्येक माणसाने करण्याची गरज आहे. आज राज्यावर भीषण दुष्काळाचे सावट पसरलेले आहे. त्यास खरे म्हणजे माणूसच कारणीभूत आहे. याचे कारण असे की, माणसाने झाडे लावण्या ऐवजी झाडे तोडण्यावर अधिक भर दिला. आर्थिक सुबत्ता प्राप्त होण्यासाठी समुद्रामध्ये भराव टाकून त्यावर गगनचुंबी इमारती उभ्या केल्या. निसर्गाच्या प्रत्येक गोष्टीवर माणसाने अतिक्रमण केल्यामुळे त्याचे दुष्परिणाम आज आपल्याला जाणवत आहेत. तालिका सभापती महोदय, 1972 चा दुष्काळ मी पाहिलेला आहे. त्यावेळी मी लहान होते. आता 8 दिवसात पाऊस पडला नाही तर त्याही पेक्षा भीषण दुष्काळ पडण्याची भीती निर्माण झालेली आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यामध्ये आवण येऊन देखील पाऊस नसल्यामुळे लावणी करता येत नाही. अशा परिस्थितीत शासनाने ताबडतोबीने ठोस निर्णय घेण्याची गरज आहे. शासनाने ताबडतोबीने दुष्काळ जाहीर केला पाहिजे, शेतमजुराच्या हाताला काम दिले पाहिजे, जनावरांच्या छावण्या उघडण्याचा निर्णय घेतला पाहिजे, छोट्या मोठ्या प्रश्नांच्या बाबतीत राज्य शासनाने ताबडतोबीने निर्णय घेऊन आधीच हवालदील झालेल्या शेतक-याला दिलासा दिला पाहिजे. आपण सर्वजण या ठिकाणी पाण्याच्या व्यवस्थापनाबद्दल बोलतो. शंभर वर्षापूर्वी महात्मा फुलेंनी पाणी अडवा आणि पाणी जिरवा असे सांगितले होते. मला वाटते पुढील 15 वर्षानंतर पाण्याचे रेशनिंग करण्याची आपणावर पाळी येईल. आताच पाऊस पडला नाही तर असलेले पाणी लोकांना पुरवू शकू की नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागामध्ये अनेक गावामध्ये तळी असतात. आमच्या 29 गावामध्ये 29 तळी आहेत. गाव तेथे देऊळ आणि देऊळ तेथे तळे असते. ही गावतळी आज कोरडी पडलेली आहेत. या तळ्यांची डागडुजी करुन त्यामध्ये पाणी साठविले पाहिजे. मुंबई शहरामध्ये देखील अनेक विहिरी आहेत.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ( पुढे सुरु...)

आताची मोठी शहरे पूर्वी ग्रामीण भागासारखीच होती. मुंबई शहर देखील पूर्वी ग्रामीण भागासारखेच होते. या मुंबई शहरात ब-याच विहिरी होत्या, त्या विहिरी बुजवून त्या जागेवर आता मोठया इमारती उभ्या राहिल्या आहेत. आज राज्यात पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली असल्यामुळे ज्या विहिरी पुनरुज्जीवीत करण्यासारख्या आहेत, त्या विहिरींचे पुनरुज्जीवन करावयात, त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई काही प्रमाणात कमी होऊ शकते. म्हणून विहिरींचे पुनरुज्जीवन करण्यासंबंधीचे नियोजन आखून त्या अनुषंगाने शासनाने कार्यक्रम हाती घ्यावा अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, दरवर्षी कोकण विभागात मोठया प्रमाणात पाऊस पडतो. परंतु या वर्षी कोकणात देखील पाऊस अतिशय कमी प्रमाणात पडला आहे. त्यामुळे कोकण विभागात पाझर तलाव, साठवण बंधारे, विहिरींचे पुनरुज्जीवन करणे इत्यादी स्वरुपाची कामे तातडीने सुरु करण्यासंबंधी निर्णय शासनाने घ्यावेत अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी आहे. आजही राज्यात शिवकालीन तलाव आणि विहिरी अस्तित्वात आहेत. प्रत्येक किल्ल्याच्या उंच ठिकाणी पाण्याचा साठा व्हावा म्हणून तलाव बांधलेले आहेत, तसेच विहिरी खोदलेल्या आहेत. हौद तयार करण्यात आले आहेत. त्या ठिकाणी आजही पाण्याचे साठे आहेत. त्या काळात देखील पाण्याचा साठा व्हावा म्हणून व्यवस्थितपणे नियोजन केले गेले आहे. त्याप्रमाणे नियोजन करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. पाण्याच्या व्यवस्थापनावर शासनाने लक्ष दिले नाही तर पाण्याचे रेशनिंग झाल्याशिवाय राहणार नाही. या राज्यात पाण्याचा साठा जास्तीत जास्त कसा करता येईल म्हणून साठवण तलाव, पाझर तलाव, शेततळी, विहिरी आणि तळयांचे पुनरुज्जीवन ही कामे तातडीने हाती घेतली पाहिजे अशी माझी शासनास विनंती आहे. मूळ म्हणजे जगण्यासाठी पाणी हा अतिशय महत्वाचा घटक आहे. पाणी नसेल तर आपण जीवनात काहीही करु शकत नाही. भविष्यात पाणी टंचाई जाणवणार नाही या गोष्टीकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतक-यांच्या बाबतीत अतिशय पोटतिडकीने भावना व्यक्त केल्या आहेत. राज्यातील शेतकरी वर्ग खरोखरच अडचणीत सापडलेला आहे ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. या चर्चेच्या निमित्ताने मी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

सभागृहाला एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, राज्यातील शेतक-यांची बियाण्याच्या बाबतीत फार मोठी फसवणूक केली जाते. शेतकरी कर्ज काढून बियाणे खरेदी करुन आपल्या शेतात पेरणी करीत असतो. परंतु ते बियाणे 15 दिवसानंतर उगवत नाही. पर्यायाने शेतक-याला त्या फसवणुकीस सामोरे जावे लागते. पाऊस पडल्यानंतर शेतकरी लागलीच पेरणी करतो, परंतु पुढे पाऊस पडला नाही तर त्याचे बियाणे आणि केलेली जमिनीची मशागत वाया जाते. पुढील चार महिन्यात कोणते पीक घ्यावयाचे अशा विवंचनेत शेतकरी सापडतो. त्याला काही पर्याय नसतो. शेवटी तो शेतकरी कर्ज बाजारी होतो आणि आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. राज्यातील शेतक-यांना चांगल्या प्रतीच्या बियाण्याच्या पुरवठा शासनाने केला पाहिजे. तसेच राज्यातील शेतक-यांना जोडधंदा सुरु करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करुन दिली पाहिजे अशी मी या निमित्ताने मागणी करते. शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करुन राज्यातील शेतक-यांना दिलासा द्यावा अशी विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

---------------

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीची नोंद घेण्यासाठी बायोमेट्रिक पध्दत सुरु करणे

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीची नोंद घेण्यासाठी ( Biometric Attendance System ) बायोमेट्रिक हजेरी पध्दती सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सदरहू पध्दती तातडीने कार्यान्वित करण्यात येणार आहे, त्यासाठी महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांची (माननीय मंत्री महोदयांसह) संगणकीय नोंदणी ( Screen Touch Computerised Registration) करणे आवश्यक आहे. यास्तव, सर्व सन्माननीय सदस्यांनी वरील नोंदणी करण्यासाठी विधान भवनातील कक्ष क्रमांक 801, आठवा मजला येथे गुरुवार, दिनांक 17 जुलै, 2008, शुक्रवार, दिनांक 18 जुलै, 2008 व सोमवार, दिनांक 21 जुलै, 2008 रोजी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येऊन सहकार्य करावे. बायोमेट्रिक हजेरी पध्दती ही ऐच्छिक स्वरुपाची असून सन्माननीय सदस्यांना आपल्या उपस्थितीची नोंद नेहमीच्या पध्दतीप्रमाणे हस्त हजेरीपटावर सही करुन किंवा बायोमेट्रिक हजेरी पध्दतीव्दारे यापैकी कोणत्याही एका पध्दतीव्दारे करता येईल.

----

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पावसाअभावी तसेच बियाणे व खते यांचे नियोजनबध्द पध्दतीने वाटप न झाल्याने शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका.

**मु.शी.**: पावसाअभावी तसेच बियाणे व खते यांचे नियोजनबध्द पध्दतीने वाटप न झाल्याने शेती व्यवसायाला निर्माण झालेला गंभीर धोका या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जयंत प्र. पाटील व दिवाकर रावते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सदनाचे विरोधी पक्षनेते सन्माननीय श्री. पांडुरंग फुंडकर साहेब यांनी सदनामध्ये यावर्षी राज्यामध्ये झालेला कमी पाऊस, त्यामुळे उभे राहिलेले दुबार पेरणीचे संकट, खतांची टंचाई, बियाण्यांची टंचाई, कर्जमाफी संदर्भातील प्रश्न इ. अनेक प्रश्नांच्या संदर्भात प्रस्ताव मांडलेला आहे. कालपासून या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करीत असताना महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला आणि विशेषत: शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता आणि त्यांना मदत करण्याची आवश्यकता तसेच एवढे मोठे अस्मानी संकट शेतकऱ्यांवर येत असताना शासनाने त्याच्या पाठीमागे भरभक्कमपणे उभे रहावे आणि योग्य ती मदत करावी अशी अपेक्षा सर्वच सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. तसेच अनेक प्रकारच्या अपेक्षा सुध्दा व्यक्त केलेल्या आहेत. मी सर्वच सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो कारण त्यांनी या प्रस्तावावरील चर्चेच्या दरम्यान अनेक उपयुक्त सूचना केलेल्या आहेत. निश्चितपणाने या सर्व सूचनांचा आदर करुन येणाऱ्या काळामध्ये आपण राज्यातील शेतकऱ्याला, शेतमजुराला, काळया मातीत घाम गाळून सोने पिकविणाऱ्या कष्टकरी माणसाला ताठ मानेने उभे करण्याची आणि जगण्याची शक्ती कशा प्रकारे देता येईल यासाठी प्रयत्न करु या. पुढील काळामध्ये या संदर्भातील सर्व प्रकारच्या मदतीच्या योजना असतील त्या पूर्ण करण्याचे काम करु या. खरे पाहिले तर महाराष्ट्रावरील हे संकट तुम्हांला-आम्हांला नवीन नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी 1972 च्या दुष्काळाचा उल्लेख केला. 1972 च्या दुष्काळाच्या अगोदरपासून या महाराष्ट्रावर दुष्काळाचे संकट किंवा नैसर्गिक आपत्ती येतात हे आम्हांला नवीन नाही. या महाराष्ट्रातील जनतेने आणि शेतकऱ्यांनी अनेक वेळेला दुष्काळाचा सामना केलेला आहे. आज जरी दुष्काळाचे मोठे संकट उभे असले तरी निश्चितपणाने मागील अनेक वर्षांमध्ये ज्या पध्दतीने दुष्काळाला सामोरे गेलो त्याच पध्दतीने आणि त्याच हिंमतीने

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ...

पुढच्या काळामध्ये हे संकट वाढले तरी सगळयांनी मिळून सामोरे जाऊन संकटाचा सामना करण्याची गरज आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये कधी दुष्काळी परिस्थिती तर कधी अतिवृष्टी सुध्दा अनुभवली आहे. मागील 2/3 वर्षांमध्ये सातत्याने दोन वेळा या राज्यामध्ये महापूर आला आणि त्यामुळे फार मोठे संकट आले. या महापुरामध्ये मोठया प्रमाणावर वित्तहानी,जिवितहानी,पशुहानी आणि सार्वजनिक मालमत्तेची हानी झाली. दुष्काळ असेल किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये महापूर असेल किंवा गारपीट असेल त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडतो. वेगवेगळया कारणांमुळे शेतकऱ्यांवर नेहमीच अडचणीची परिस्थिती ओढवली आहे. शेतकरी अडचणीत असताना शासनाच्या वतीने आवश्यक तेवढी मदत केली जात असताना निश्चितपणाने त्याचे पूर्ण समाधान होईल अशी खात्री मी देऊ शकत नाही. परंतु शासनाच्या माध्यमातून जे जे काही करावयाचे आहे आणि ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत त्या करण्याचा प्रयत्न अशा प्रकारचे संकट आले असताना मागील काळामध्ये केलेला आहे. आज परिस्थिती पाहिली तर कमी पावसामुळे फार मोठे संकट येऊ घातलेले आहे. तरी सुध्दा मला खात्री आहे की, पावसाळा सुरु होऊन जवळपास एक ते सव्वा महिनाच झालेला असल्यामुळे अजूनही पावसाचा बराच कालावधी शिल्लक आहे. अनेक शेतकऱ्यांचा खरीप हंगाम जवळपास गेलेला असला तरी येणाऱ्या काळामध्ये राज्यामध्ये पाऊस येईल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली तरी हरकत नाही. या विषयावर चर्चा करीत असताना माझ्याकडील पुनर्वसन आणि मदतकार्ये या खात्याच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांसाठी काय करता येईल आणि काय करणार आहोत हे स्पष्टपणे याठिकाणी सांगितले पाहिजे.

( **सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव** )

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे.............

सभापती महोदय, या राज्यामध्ये सुरुवातीच्या काळात मे महिन्यामध्ये कदाचित काही ठिकाणी खताची टंचाई निर्माण झाली, काही ठिकाणी बियाण्यांची टंचाई निर्माण झाली असेल, वेगवेगळ्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्रास झाला असेल याबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून, विचारातून त्यांच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. दिनांक 15 जुलै, 2008 पर्यंत राज्यात 18 जिल्हयांमध्ये सरासरीपेक्षा 50 टक्क्याहून कमी पाऊस पडला आहे. 198 तालुक्यांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला आहे. त्याचप्रमाणे धुळे, जळगाव, अहमदनगर, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली, नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, वाशिम या जिल्हयांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला आहे. नाशिक विभागामध्ये 33 तालुके, पुणे विभागात 49 तालुके, औरंगाबाद विभागामध्ये 67 तालुके, नागपूर विभागामध्ये 13 तालुके आणि अमरावती विभागात 36 अशा 198 तालुक्यांच्या ठिकाणी आतापर्यंत 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला आहे. आज राज्यातील उपलब्ध असलेल्या पाण्याच्या साठयाची माहिती घेतली. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उल्लेख केल्याप्रमाणे उपयुक्त पाण्याचा साठा पाहिला तर जवळपास जुलै महिन्यामध्ये 15 व 16 तारखेला कोकणामध्ये 61 टक्के, अमरावती विभागात 13 टक्के, नागपूर विभागात 19 टक्के, अमरावती विभागात 12 टक्के, नाशिक विभागात 18 टक्के आणि पुणे विभागात 25 टक्के पाण्याचा साठा उपलब्ध आहे. म्हणजे जवळपास 21 ते 22 टक्के उपयुक्त पाण्याचा साठा झालेला आहे. पिण्याचे पाणी म्हणून वापरता येईल असा पाण्याचा साठा आज महाराष्ट्रातील अनेक धरणांमध्ये शिल्लक आहे. ही माहिती सभागृहाला देत असताना टंचाईची परिस्थिती आज महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली आहे ही वस्तुस्थिती असून अनेक जिल्हयांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी पाऊस पडला त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे हे देखील नाकारुन चालणार नाही. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. कोकणामध्ये काही जिल्हयात 100 टक्के पावसाची सरासरी झालेली आहे. परंतु विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या तीनही विभागांमध्ये 15 जुलै, 2008 पर्यंत शेतकऱ्यांच्या दृष्टीने खरोखर आजच्या काळात अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे मे महिन्याच्या शेवटच्या काळात विदर्भ, मराठवाड्यात शेतकऱ्यांनी धूळपेरणी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ 16:30

डॉ.राजेंद्र शिंगणे............

करण्याची अनेक वर्षापासूनची पध्दत आहे. 21-22 मे रोजी मोठ्या प्रमाणात धूळपेरणी होते. धूळपेरणी करीत असताना कपाशीची देखील मोठया प्रमाणात पेरणी होते. सुरुवातीला पाऊस मोठया प्रमाणावर आला. यावर्षी मे महिन्याच्या 15 तारखेनंतर अनेक वृत्तपत्रांनी, हवामान खात्याने सुध्दा यावर्षी 103 टक्के पाऊस पडेल असा अंदाज व्यक्त केला होता. दूरदर्शनवरील अनेक वाहिन्यांच्या माध्यमातून अशी प्रसिध्दी दिली गेली होती. अनेक तज्ज्ञांचे दाखले देण्यात आले होते. ही सर्व माहिती मिळाल्यानंतर शेतकऱ्यांना असे वाटले की, यावर्षी 103 टक्के पाऊस होणार, समाधानकारक पाऊस होणार, सरासरीइतका पाऊस होणार, त्यामुळे मे महिन्यामध्येच सर्व शेतकऱ्यांनी खते घेण्यास सुरुवात केली. डीएपी असेल, मिश्र खत असेल, युरिया असेल, ही खते घेण्यासाठी मे महिन्यात सुरुवात झाली. पाऊस चांगला होणार, समाधानकारक पाऊस होणार म्हणून मोठया प्रमाणात धूळपेरणी झाली. 103 टक्के पाऊस होणार म्हटल्यानंतर शेतकरी मोठया प्रमाणात शेतीच्या कामाला लागले. शेतकऱ्यांनी पैसे गोळा करुन खते, बियाणे दुकानातून विकत घेण्याचे काम मे महिन्याच्या 15 तारखेनंतर केले. सुरुवात चांगली झाली. महाराष्ट्रात कोकण असेल, विदर्भ असेल, मराठवाडा असेल, 6 ते 9 जूनच्या दरम्यान चांगल्या पावसाला सुरुवात झ ाली.

(नंतर खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे .. ..

यावर्षी पावसाळा चांगला राहील या आशेने शेतकऱ्यांनी पेरणी केली होती. परंतु मध्येच पावसाने दडी मारल्यामुळे पिके कोमेजून जळून गेली. काही शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली त्यामुळे पिके ज्या प्रमाणात वाढावयास पाहिजे होती त्या प्रमाणात वाढू शकली नाहीत. मग त्यात सोयाबीनचे पीक असेल, उडीद, मूग, कपाशी अशी पिके असतील अथवा इतर खरिपाची पिके असतील ही पिके मुख्यत: विदर्भ, मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्रात घेतली जातात. सुरुवातीला जरी पाऊस पडला आणि नंतर पाऊस झाला नाही तर दुर्दैवाने पावसाअभावी हे पीक वाढू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून आज सगळीकडे अनेक ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांना अशा सूचना दिल्या आहेत की, कदाचित यापुढे पाऊस येईल की नाही हे सांगता येत नाही परंतु आजपासूनच सर्व्हेक्षणाच्या कामाला लागावे. दुबार पेरणी मागील वेळेस झाली होती त्यावेळेस सुध्दा असे सर्व्हेक्षण करुन घेतले होते. अशी परिस्थिती उद्‌भवल्यास बियाणे महामंडळ व इतर माध्यमांतून दुबार पेरणीचे काम पडले तर आपल्याकडे कोणत्या प्रकारची बियाणे उपलब्ध आहेत याचीही चाचपणी करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकारी व आयुक्तांना दिल्या आहेत. तसेच अशा प्रकारे दुबार पेरणीचे काम पडलेच तर ताबडतोब तशी तपासणी करावी आणि यासंदर्भातील आढावा घेण्यात यावा. अशा परिस्थितीत शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना मदत करण्याचीच भूमिका राहील असे मी सांगू इच्छितो. परंतु आजची राज्याची परिस्थिती पाहिली तर दुबार पेरणी तरी शक्य होईल असे चित्र मात्र दिसत नाही. तरी देखील पुढील काळात शेतकऱ्यांच्या दृष्टीने अनेक महत्वाच्या उपाययोजना करीत असताना या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देत असताना काय व कशा प्रकारच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे यासंबंधी शासनाने अगोदरच काही निर्णय घेतलेले आहेत. खरे म्हटले तर या परिस्थितीचा अंदाज अगोदरच आलेला होता म्हणून 23 जून रोजी शासनाच्या वतीने पहिले परिपत्रक काढण्यात आले. राज्यात दि. 7 जून, 2008 ते आतापर्यंत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडलेला असून आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या दृष्टीनेच हे 23 जूनचे परिपत्रक काढण्यात आले. त्यानुसार राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत शेल्फवरील कामे तात्काळ सुरु करावीत, पिण्याच्या पाण्याची टंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, तात्पुरत्या नळ योजना कार्यान्वित कराव्यात, त्याचबरोबर विविध प्रकल्पातील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे.. ..

पाण्याचे साठे राखून ठेवावेत, आवश्यक त्या ठिकाणी छावण्या व चाऱ्याचे डेपो उघडावेत. तसेच शासनाच्या माध्यमातून वन विभाग, आदिवासी विभाग यांच्याकडे जो चाऱ्याचा साठा असेल तो मागवावा आणि ज्या ज्या जिल्हयांची मागणी येईल त्यांना देण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. तसेच काही जिल्हयांची मागणी जिल्हाधिकारी नोंदवित आहेत, ज्या ज्या ठिकाणाहून अशी मागणी येईल त्या त्या जिल्ह्यांना चाऱ्याचा पुरवठा करण्याच्या संदर्भातील सूचना शासनाच्या वतीने निर्गमित केल्या आहेत. तसेच जमीन महसुलाची वसुली सक्तीने करु नये, विजेचे कनेक्शन्स तोडू नयेत अशाही सूचना दिलेल्या आहेत. राज्यात आजच्या परिस्थितीत 1562 टँकर्सच्या माध्यमातून 1536 गांवे आणि वाड्यांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. आणि आवश्यकतेनुसार आणखी वाढ करण्याच्याही सूचना जिल्हाधिकाऱ्यांना करण्यात आल्या आहेत. पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होईल अशी परिस्थिती दिसून आल्यावर ताबडतोबीने टँकर्स वाढवावेत आणि टँकर मंजुरीचे अधिकार सुध्दा तहसीलदारांना देण्यासंबंधीच्या सूचनाही ताबडतोबीने निर्गमित करण्यात येतील.

यानंतर श्री. जुन्नरे .. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे...

कारण प्रस्ताव तहसिलदार आणि बीडीओकडे आल्यानंतर तो एसडीओच्या माध्यमातून मंजूर करेपर्यंत बराचसा कालावधी जातो व जेथे पाण्याची आवश्यकता आहे तेथे पाणी वेळेवर पोहचू शकत नाही त्यामुळे तहसिलदारांना टँकर मंजूर करण्याचे अधिकार येथून पुढील काळामध्ये देण्यात येतील. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून 28.6.2008 अखेर राज्यात 62,967 कामे सेल्फवर होती व त्याची मजूर क्षमता 57.88 लाख इतकी आहे व ही कामे आवश्यकतेनुसार केव्हाही ताबडतोबीने सुरु करण्यात येतील. चारा टंचाईच्या संदर्भात मी मघाशी उल्लेख केला होता त्यामध्ये चारा पुरवण्याच्या माध्यमातून सहकारी संस्था, एनजीओ, सहकारी साखर कारखान्यामार्फत छावण्या ताबडतोबीने सुरु करण्यात येतील. काही वर्षापूर्वी जे चारा डेपो उघडण्यात आले होते त्याच पध्दतीने यावर्षीही चारा डेपो उघडण्याच्या माध्यमातून शेतक-यांना चारा पुरवण्याचे काम पुढील काळात करण्यात येईल.

सभापती महोदय, टंचाईच्या परिस्थितीमध्ये ज्या काही उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या बाबतीच्या गाईडलाइन्स शासनाने जिल्हाधिका-यांना कळविलेल्या आहेत. त्यामुळे गाईडलाईन्सच्या संदर्भात जिल्हाधिका-यांनी ताबडतोबीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना आपण दिलेल्या आहेत. पुनर्वसन व मदत कार्य विभागाच्या माध्यमातून शासन अनेक प्रकारच्या उपाययोजना करीत असतांना जे जे प्रश्न या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले त्या सर्वांनाच उत्तर देण्याचा प्रयत्न उत्तराच्या भाषणातून करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. दुष्काळ हे एक मोठे संकट आहे, हे संकट पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या सर्वांची सहकार्याची आणि मदतीची आवश्यकता आहे. मला आनंद वाटला की, या चर्चेवर विचार व्यक्त करीत असतांना सर्वच सन्माननीय सदस्यांनी दुष्काळाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता, दुष्काळ हे महाराष्ट्रावरील संकट आहे, हे संकट कोणत्या एका पक्षावरील संकट नाही याची जाणीव सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात ठेवली. आज आम्ही सरकारमध्ये आहोत, सरकारची कामे करीत असतांना, सरकारच्या निर्णयाची अंमलबजावणी करीत असतांना अनेक प्रकारच्या यंत्रणा सरकारमध्ये आहेत. निश्चितपणे सर्वच यंत्रणा सक्षमपणे काम करतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. परंतु यावर नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधीपक्ष आणि सत्ताधारी पक्षाने व्यवस्थित नियंत्रण ठेवले

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे...

तर महाराष्ट्रातील जनतेला विशेषत: महाराष्ट्रातील शेतक-यांना योग्य तो न्याय मिळू शकेल एवढीच अपेक्षा उत्तराच्या माध्यमातून मी या ठिकाणी व्यक्त करतो. दुष्काळ जाहीर करण्याची गरज आहे असे मला तरी वाटत नाही. शासनाने दि. 9.7.2008 रोजी ज्या ठिकाणी 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला त्या ठिकाणी टंचाई जाहीर करुन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे ठरवलेले आहे व या उपाययोजना निश्चितपणे काटेकोरपणे पाळल्या जातील एवढी खात्री देतो. यासंदर्भात शासनाने दोन जी.आर. सुध्दा काढलेले आहेत. पहिला जी.आर. 23 जूनचा असून दुसरा जी.आर. 9 जुलै रोजी काढलेला आहे. या जी.आर. मध्ये स्पष्टपणे सूचना देण्यात आलेल्या आहेत. पुनर्वसन व मदतकार्य विभागाच्या माध्यमातून जे जे काही करता येईल ते करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून होईल अशी मी खात्री देतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आणेवारीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. आपल्या राज्यामध्ये आणेवारी काढण्याची पध्दत इंग्रजांच्या काळात जी होती तीच पध्दत आज सुध्दा अवलंबवली जात आहे त्यामुळे आणेवारीची पध्दत बदलली पाहिजे असा मुद्दा मी उपस्थित केला होता. आणेवारीच्या संदर्भात वेगवेगळया कमिटया सुध्दा बसवल्या गेल्या होत्या. आजची टंचाई सदृश्य परिस्थिती लक्षात घेता आणेवारीची पध्दत बदलण्याच्या संदर्भात शासन काही विचार करणार आहे काय ? माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितले की, आता शेतकरी कापसाची लागवड करु शकणार नाही, ज्वारी पेरु शकणार नाही, मुग, उडीद, सोयाबीन पेरण्याचा हंगाम आता निघून गेलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. जर अशा परिस्थितीत आणेवारी डिसेंबर महिन्यामध्ये निघणार असेल आणि डिसेंबर महिन्यानंतर जर दुष्काळ घोषित होणार असेल , जर पीकच शेतामध्ये नसेल तर शासन आणेवारी कशी काय काढणार आहे ? त्यामुळे आणेवारी काढण्याच्या संदर्भात थोडासा खुलासा करावा अशी विनंती आहे. आवश्यकता वाटल्यास हा विषय कॅबिनेट समोर आणून ऐतिहासीक निर्णय घ्यावा. इंगजांच्या काळापासून आणेवारीची जी पध्दत चालली आहे ती जर बदलली तर तो ऐतिहासिक निर्णय होईल. आता जसजसा निसर्ग बदलत चालला आहे त्या नुसार आपले दुष्काळाच्या संदर्भात जे काही निकष आहेत ते सुध्दा बदलले गेले पाहिजेत.

यानंतर श्री. गायकवाड....

VTG/ SBT/ MMP/ 16.45

श्री.पांडुरंग फुंडकर ....

तेव्हा हे निकष बदलण्याचा शासन विचार करणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी निकष बदलण्याच्या बाबतीत येथे उल्लेख केला आहे त्याचबरोबर आणेवारीच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केली आहे. खरे पाहिले तर पैसेवारी किंवा आणेवारीच्या संदर्भात विधान सभा, विधान परिषद आणि बाहेरही सातत्याने चर्चा होत असते . इंग्रजाच्या काळात ही पध्दत ठरवून दिली होती त्यामुळे अलीकडच्या काळात ही पध्दत बदलली पाहिजे या दृष्टीने सातत्याने मागणी केली जात आहे.. याबाबतीत मी आपणास सांगू इच्छितो की, श्री.व्ही.एन.जोशी महसूल खात्याचे सचिव असतांना त्यांच्या अध्यक्षतेखाली या संदर्भातील पहिली समिती 1962 साली नेमण्यात आली होती. त्यानंतर 1971 साली डॉ. व्ही.एम. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती , त्यानंतर 1976 साली श्री.डी.डी.साठे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती, 1984 साली माननीय श्री.भगवंतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. नजर आणेवारी असो पैसेवारी असो या संदर्भात वेळोवेळी सन्माननीय सदस्यांकडून ज्या सूचना करण्यात आल्या होत्या त्या सूचनाच्या बाबतीत या समितीने काम केले होते. त्यानंतरसुध्दा 1996 साली माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती.या समित्यांचे निर्णय झाल्यानंतर काही बदल करण्यात आले होते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, दिनांक 26.7.2001 ला शासन निर्णयाव्दारे डॉ.बी.डी.भोळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. परंतु या समितीची एकच बैठक झाली होती. त्यानंतर मात्र या समितीची बैठक झाली नव्हती. या बाबतीत माझ्याकडे काही तक्रारी आणि सूचना करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे विधानासभेमध्ये सुध्दा एका प्रश्नाला उत्तर देत असतांना आणेवारीच्या संदर्भात शासन वेगळी भूमिका घेईल किंवा नवीन समिती नेमून आणेवारीची पध्दत सुटसुटीत करता येईल काय याबाबतीत विचार करण्यात येईल असे मी आश्वासन दिले होते. त्या समितीची फक्त एकच बैठक झाली होती.त्यामुळे राज्यमंत्री या नात्याने मी या समितीची बैठक बोलावली होती वास्तविक ही समिती अस्तित्वातच नव्हती म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र देऊन मी अशी विनंती केली होती की, या संदर्भात डॉ.भोळे यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात

2..

आली होती त्या समितीचे पुनरुज्जीवन करण्यात यावे . पैसेवारीच्या संदर्भात लोकप्रतिनिधीच्या ज्या काही सूचना आहेत त्या सूचनांच्या बाबतीत या समितीने विचारविनिमय करुन पुढच्या काळात पैसेवारीची पध्दत सुटसुटीत कशी करता येईल या बाबतीत निर्णय घेण्याच्या दृष्टीनेसुध्दा शासन कार्यवाही करील एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी परवानगी मागतात)

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : सर्व मंत्र्यांच्या उत्तराची भाषणे झाल्यानंतर एक दोन सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदय मघाशी असे म्हणाले की, कोकणामध्ये 100 टक्के पाऊस पडला आहे. तेव्हा असे जर असेल तर कोकणातील शेतक-यांना मदत मिळणे अवघड होईल.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : कोकणामध्ये आतापर्यत 100 टक्के पाऊस पडला आहे असे शासकीय आकडेवारीनुसार दिसत असले तरी सुध्दा तो पाऊस एक दिवसात पडला की दोन दिवसात पडला आहे हे सुध्दा पाहिले पाहिजे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकणामध्ये 100 टक्के पाऊस पडलेला आहे असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शेतक-यांना जी मदत जाहीर करण्यात आलेली आहे. त्यापासून कोकणातील चारही जिल्हयातील शेतकरी वंचित राहतील. तेव्हा कोकणात 100 टक्के पाऊस पडलेला आहे हा माननीय मंत्री महोदयांनी केलेला उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात यावा

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माझे म्हणणे जर चुकीचे असेल तर ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, दरवेळचा आमचा अनुभव असा आहे की, माननीय मंत्री महोदय सभागृहात चांगली उत्तरे देतात . चारा डेपो सुरु करण्यापासून ते रोजगार हमी योजनेच्या कामाच्या बाबतीत आपण चांगले उत्तर दिले असून टॅन्कर सुरु करण्याच्या बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात येतील असेही मंत्र्यांनी सांगितले आहे. स्थानिक यंत्रणा मात्र ही सगळी कामे रेटत असते विधान सभा सदस्याला वा विधान परिषद सदस्याला काही सूचना करावयाची असेल वा आपले म्हणणे मांडावयाचे असेल तर त्यांनी आंदोलन

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्याशिवाय त्यांचे म्हणणे कोणताही अधिकारी ऐकत नाही. त्यामुळे प्रत्येक तालुक्यामध्ये सर्व पक्षीय सदस्याच्या समित्या नेमण्यात याव्यात. त्याचबरोबर विधान सभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांना दुष्काळ निवारण मोहिमेच्या तालुका स्तरावरील अंमबलावणीमध्ये सहभाग घेता आला पाहिजे व त्यांना या संदर्भात काही सूचना करता आल्या पाहिजेत.

( नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 16:50

डॉ. गोऱ्हे ....

कारण आम्ही पुणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आहोत, तेथे पालकमंत्री काही बैठकाही घेतात, ती गोष्ट वेगळी. पण बाकी सगळ्या तालुक्यांमध्ये बेफामपणे प्रशासकीय अधिकारी आपल्या निवेदनला कवडीचीही किंमत न देता कार्यक्रम रेटत असतात, कोणालाही त्याचा काही पत्ता नसतो. म्हणून आपणाकडून आम्हाला या संदर्भात ठोस आश्वासन पाहिजे की, विधानसभा आणि विधान परिषदेचे सदस्यांचा सहभाग प्रत्येक जिल्ह्यातील दुष्काळ निवारण कार्यक्रमामध्ये असेल हा एक मुद्दा. दुसरा माझा मुद्दा असा आहे की, ग्रामसभेने मागणी केली तरच टँकर तेथे जाईल हा आधीचा निर्णय तुम्ही आता बदलला आहे आणि तुम्ही तहसिलदारांना टँकरद्वारा पाणी देण्याबाबत अधिकार दिले आहेत असे आम्ही आता समजायचे काय ? सभापती महोदय, दुष्काळ निवारणाच्या कामामध्ये सर्व पक्षीय समित्यांच्या बाबतीत आम्हाला येथे मंत्री महोदयांकडून ठोस उत्तर हवे आहे. अन्यथा या संबंधात ठिकठिकाणी फार मोठा स्फोट होणार आहे.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, खरे तर या विषयावर शासनातर्फे संबंधित सर्व मंत्र्यांची उत्तराची भाषणे झाल्यानंतर सदस्यांना 2-4 प्रश्न विचारता येतात. परंतु आता सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक प्रश्न विचारल्यानंतर आता सन्माननीय सदस्या डॉ. गोऱ्हे यांनी देखील एक प्रश्न विचारला आहे. तेव्हा मी आता सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनाही एक प्रश्न विचारण्याची परवानगी देतो. त्या दोन्हीवर माननीय राज्यमंत्र्यांनी एकत्रितच उत्तर द्यावे. त्यानंतर मात्र मंत्री महोदयांची उत्तरांची भाषणे झाल्यानंतरच सदस्यांना 2-4 प्रश्न विचारता येतील.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझी हरकत अशी आहे की, या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक प्रश्न अतिशय स्पष्ट व नेमका विचारला होता की, या वर्षी पेरणीच झालेली नाही आणि जी काही झालेली आहे ती पाऊस न झाल्याने करपलेली आहे. तर मग तुम्ही क्रॉप कटिंग कोठे करणार आहात ? आणि डिसेंबरची वाट पाहणार आहात ? या प्रश्नाचे उत्तरच मिळालेले नाही. आपल्याला दुष्काळ जाहीर करावयाचा असेल तर ताबडतोबीने याबाबत कार्यवाही केली पाहिजे. पेरणीच झालेली नाही, जी झाली ती करपली गेली आहे तर मग तुम्ही आणेवारी कशाची काढणार आहात ? त्याबाबत आपण उत्तर द्यावे.

..... 3यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आता या ठिकाणी प्रथमत: डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना ताबडतोबीने सूचना देण्यात येतील की, दुष्काळ निवारणाच्या कामामध्ये जिल्ह्यामध्ये असलेल्या सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन काम करावे आणि या संबंधात काही समित्या स्थापन करण्यात येत असतील तर त्यात जिल्ह्यातील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यात यावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांच्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही. खरे तर तो गंभीर मुद्दा आहे. सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री हे विदर्भातील आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यात कापसाची पेरणीच झालेली नाही, कापसाचे पीकच उगवले नाही तर मग कापसाच्या झाडाची आणेवारी काढण्यासाठी आपण डिसेंबर पर्यंत वाट पाहणार आहात का ? ज्वारीची पेरणीच झालेली नाही, होऊ शकलेली नाही, जी काही झ ाली ती करपून गेली आहे. अशा स्थितीत आपण त्याची आणेवारी काढण्यासाठी डिसेंबर पर्यंत वाट पाहणार आहात का ? हा जो प्रश्न मी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी विचारला आहे त्याचे उत्तरच आलेले नाही. आपल्या नेहमीच्या पद्धतीनुसार आणेवारी ही साधारणत: नोव्हेंबर डिसेंबर महिन्यात काढली जाते. पण मुळात शेतात पीकच नाही, शेतात काही पेरलेच गेले नसेल तर मग आणेवारी तरी कोठून तुम्ही काढणार आहात ? तर मग आता तुम्हाला दुष्काळ घोषित करण्यास काय अडचण आहे ? शेतामध्ये काही पेरलेच गेले नसेल आणि पेरणीची वेळच निघून गेली असेल तर आणेवारी काढल्यानंतर दुष्काळा घोषित करण्याची जी आपली पूर्वापार पद्धत आहे त्याबाबत मला सांगावेसे वाटते की, ती पद्धत या वेळेस बाजूला ठेवली पाहिजे. तसे आपण करणार आहात का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, दुष्काळ जाहीर केल्यानंतर ज्या काही उपाय योजना आपण करतो ती उपाय योजना आता टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर झाल्यानंतरही आपण करून राहिलो आहोत आणि आवश्यक तेवढ्या उपाय योजना आपण करीत आहोत. आज महत्त्वाचा प्रश्न हा चाऱ्याचा आहे, पिण्याच्या पाण्याचा आहे, रोहयोच्या कामांचा प्रश्न, हे जे प्रश्न आहेत त्याची ताबडतोबीने सोडवणूक करण्याच्या दृष्टीने प्रथमत: आपण प्रयत्न करीत आहोत.

..... 3यू 3 ...



KBS/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 16:50

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे अनेक प्रश्न आहेत. धान्याचा प्रश्न आहे, रोजगाराचा प्रश्न आहे. खरे तर मंत्र्यांनी प्रॅक्टिकल विचार केला पाहिजे की, शेतात कापूस वा ज्वारीचा पेराच झालेला नाही, होऊ शकलेला नाही आणि जो काही पेरा केला गेला होता तो करपून गेला आहे त्यामुळे झाडच उगवले नाही. आता तर पेरणीची वेळ देखील निघून गेली आहे. तर मग तुम्ही आणेवारीसाठी डिसेंबर पर्यंत वाट पाहणार आहात का ? आणि नंतर दुष्काळ घोषित करणार आहात का ? सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी गेल्या 10 दिवसात मराठवाड्यामध्ये 300-350 कि.मी. प्रवास केला आहे पण त्या प्रवासात मला कोठल्याही शेतात साधे झाड उगवल्याचेही दिसले नाही. तेव्हा आता आपण ऑगस्टमध्ये पाऊस पडेल काय ? सप्टेंबरमध्ये पाऊस पडेल काय ? पाऊस पडल्यावर मग कोंब उगवतील काय ? मग आणेवारी निघेल काय असे करीत डिसेंबर पर्यंत वाट पाहणार आहात का ? माननीय राज्यमंत्री डॉ.शिंगणे साहेब आपण स्वत: कापसाच्या विभागातील आहात. आपण हे लक्षात घ्या की, कापसाची पेरणीच झालेली नाही, झाडच उगवले नाही तर त्या कापसाची आणेवारी काढण्यासाठी डिसेंबरपर्यंत वाट पाहण्याची गरज काय आहे ?

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हे लक्षात घ्यावे की, आपण माननीय महसूल राज्यमंत्र्यांकडून कितीही या प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचा प्रयत्न केलात तरी ही शासनाची एकत्रित जबाबदारी असल्याने ते आपल्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाहीत हे मी आपल्याला सांगितले पाहिजे असे नाही. आपण सिनिअर सदस्य असल्याने आपल्यालाही याची जाणीव असेल. म्हणूनच मी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी त्यांचा रिप्लाय सुरू करावा.

( यानंतर श्री. सरफरे .... 3व्ही 1 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये नियम 97 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व अन्य माननीय सदस्यांनी राज्यातील दुष्काळी परिस्थितीसंबंधी चर्चा उपस्थित केली आहे. त्या चर्चेमध्ये भाग घेऊन अनेक माननीय सदस्यांनी उपाय योजना सुचविणारी मते मांडली आहेत.

सभापती महोदय, यावर्षी पाऊस चांगला होईल अशाप्रकारे अंदाज वर्तविण्यात आला होता. त्याप्रमाणे 7 जूनला राज्यामध्ये सर्वत्र पाऊस सुरु झाल्यामुळे जनतेने देखील आनंद व्यक्त केला होता. अशाप्रकारे जून महिन्यामध्ये वेळेवर पावसाला सुरुवात झाल्यानंतर आठ ते दहा दिवस काही परिसरात मध्यम तर काही परिसरात चांगला पाऊस झाला. परंतु त्यानंतर पावसाने दडी मारल्यामुळे संपूर्ण राज्यामध्ये अवर्षणाची परिस्थिती निर्माण झाली आहे. आजपर्यंत पडलेल्या पावसाची एकूण आकडेवारी पाहिली तर 0 ते 20 टक्के पाऊस 54 तालुक्यात, 20 ते 40 टक्के पाऊस 75 तालुक्यात, 40 ते 60 टक्के पाऊस 80 तालुक्यात आणि 60 ते 80 टक्के पाऊस 71 तालुक्यात झाला. 18 जिल्हयात 200 मि.मी. पर्यंत तर बाकीच्या जिल्हयांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला. त्यामुळे ज्या भागामध्ये पेरण्या झाल्या आहेत त्या भागात येत्या पुढील काळात पाऊस झाला नाहीतर अवघड परिस्थिती निर्माण होईल. सभापती महोदय, मी आपणास औरंगाबाद कृषी विभागातील माहिती सांगू इच्छितो. या विभागामध्ये 28 तालुके येतात. त्यापैकी एका तालुक्यात मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला तर 12 तालुक्यात अत्यल्प पाऊस झाला, 15 तालुक्यात निरंक म्हणजे शून्य पाऊस झाल्याची नोंद आहे. सभापती महोदय, खरीपाच्या पेरण्यांचे एकूण 134 लाख हेक्टर क्षेत्र आहे, त्यापैकी 64 लाख हेक्टर क्षेत्रामध्ये खरीपाच्या पेरण्या झाल्या. म्हणजे जवळ जवळ 48 टक्के पेरण्या झाल्या. कोकणाप्रमाणे महाराष्ट्राच्या काही भागात भाताची लावण सुरु आहे. काल सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये बरा पाऊस झाला. हा पाऊस पुढे महाराष्ट्रामध्ये देखील सरकावा असे जर मी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. सभापती महोदय, नागपूर विभागामध्ये सुध्दा भाताची लावण झ ाली आहे. परंतु पाऊस नसल्यामुळे त्याठिकाणी अडचणीची परिस्थिती निर्माण झाली आहे. माननीय राज्यमंत्री डॉ. शिंगणे यांनी आपल्या भाषणामध्ये आपत्कालीन परिस्थितीविषयी माहिती दिली असल्यामुळे मी त्याबाबत पुनरुक्ती करणार नाही. परंतु या आपत्कालीन परिस्थितीबाबत 15 दिवसांचा टप्पा धरुन कृषी विद्यापीठाच्या मदतीने कृषी विभागाला जी काही उपाययोजना करावयाची आहे ती केली आहे. त्यादृष्टीने संबंधित विभागांना सूचना दिल्या आहेत.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. बाळासाहेब थोरात....

यापुढे जरी पाऊस सुरु झाला तरी खरीपाचे नुकसान झाले आहे. परंतु उरलेल्या काळाचे आपल्याला नियोजन करावयाचे आहे. त्यामध्ये बाजरी, करडई, भुईमूग, मका या पिकांचे आपण नियोजन करु शकतो. त्यादृष्टीने या पिकांचे नियोजन करुन त्यासंबंधीचा आराखडा तयार केला आहे. त्याबाबत शासनाकडून योग्य ती काळजी घेतली जाईल.

सभापती महोदय, या राज्यामध्ये शेती क्षेत्राची अत्यंत अवघड अशी वाटचाल सुरु आहे. दुष्काळी परिस्थिती संबंधी चर्चा करीत असतांना आणि खरीपाच्या हंगामासंबंधी चर्चा करीत असतांना खताच्या पुरवठयासंबंधी देखील चर्चा करण्यात आली. त्यादृष्टीने माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काही प्रश्न उपस्थित केले. त्यासंबंधी सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मी काही माहिती दिली व आणखी काही बाबीसंबंधी माहिती द्यावयाची राहिली आहे ती मी सभागृहाच्या निदर्शनास आणीत आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ठोसपणे काही प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांचे भाषण अत्यंत अभ्यासपूर्ण असे होते, त्यांची भूमिका अत्यंत आग्रही होती परंतु ती वस्तुस्थितीपासून थोडी बाजूला होती. अशाप्रकारे महाराष्ट्राच्या व्यासपिठावर माहिती दिल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेमध्ये गैरसमज निर्माण होऊ शकतो. म्हणून याठिकाणी मी काही बाबी सांगणार आहे. खतांचा पुरवठा कशापध्दतीने झाला हे मी सकाळी सांगितले होते. आजच्या एकूण परिस्थितीमध्ये खतांचा तुटवडा आहे, मुबलक खत आहे असे मी म्हणणार नाही. खतामध्ये तूट ही राहणार आहे. परंतु युरीयाच्या बाबतीत तुटवडा नव्हता हे मी ठामपणे सांगितले आहे. डीएपी फॉस्फेटचा तुटवडा होता. डीएपी मिळविण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागणार होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात . . . .

त्याकरता केंद्र शासनाने दिलेले आवंटन आणि त्यामध्ये येथील कंपन्या जे काही देऊ शकत होत्या त्यामध्ये जी तफावत होती, ती दूर करण्यासाठी राज्य शासनाने एम.ए.आय.डी.सी.ही नोडल एजन्सी समजून कृषी विभागाला 150 कोटी रुपयांची व्यवस्था केली होती, तशी मदत केली होती आणि त्यापध्दतीने आपण ऑर्डर देखील नोंदवत होतो. येथे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणामध्ये असा मुद्दा मांडण्यात आला की, आपण मिश्र खताच्या बाबतीत बंदी आणली आणि त्यातून अडचणी निर्माण झाल्या. मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, याठिकाणी आपण अनेक वेळेला मिश्र खताच्या बाबतीत चर्चा केलेली आहे. आपल्याला सर्वांना मिश्र खताच्या बाबतीत असलेले प्रश्न माहिती आहे. केंद्र शासन सुध्दा मिश्र खताला फारसे इन्करेज करण्यास तयार नाही ही देखील वस्तुस्थिती सर्वांना माहिती आहे. जे कॉम्प्लेक्स असतात, त्याबाबतीत सांगावयाचे तर एकत्र पध्दतीने एमपीके ची गोळी बनविली जाते आणि ती बाजूला जाऊ शकत नाही. परंतु याबाबतीत तपासणी केली तर बरोबर निघते. मिश्र खते अशी असतात की, आपण ज्यावेळेस एमपीके एकत्र टाकतो, त्यावेळेस त्याचे मिक्श्चर चांगल्या प्रकारे झाले नाही तरी प्रश्न निर्माण होतात आणि जर कोणी त्यामध्ये दुसरे काही मिक्स केले तर त्याची गुणवत्ता नष्ट होत असते. अशा वेळी आपण 25-30 वर्षापासून ही माहिती घेतली तर असे दिसून येईल की, आपण मिश्र खताच्या बाबतीत प्रोत्साहन देऊ नये अशी सातत्याने चर्चा होत राहिली. मी कृषी मंत्री झाल्या नंतर सतत पुढाकार घेतला जेणेकरुन मिश्र खताच्या माध्यमातून शेतकऱ्यांना फसविले जाऊ नये. काही वेळेला अशी आरडाओरड झालेली आहे की, खूप खते सापडली, गुणवत्ता कमी असलेली मिश्र खते सापडली आहे. परंतु त्याचा शोध कोणी घेतला आहे ? याची जर आपण माहिती घेतली तर असे दिसून येईल की, ही खते कृषी विभागाने शोधून काढलेली आहेत आणि संबंधितांवर कारवाई देखील केलेली आहे. मागच्या काळामध्ये याबाबतीत चर्चा केली होती की, याबाबतीत संबंधितांचे फार थोडया कालावधीसाठी निलंबन केले होते. ही गोष्ट खरी आहे. पहिल्या वर्षी 15 दिवस ते 3 महिन्यापर्यंत साठी निलंबन केले.त्यानंतर दुसऱ्या वेळेस एक वर्षासाठी निलंबन केले आहे आणि दुसऱ्या राज्यातील ज्या कंपन्या आहेत,त्यांना आपल्या राज्यामध्ये खत विक्री करण्यास बंदीच करण्यात आली आहे हे सुध्दा मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.आता परराज्यातील तीन-चार खत कंपन्या येथे खताची विक्री करीत आहेत.आपण त्यांच्या खताच्या बाबतीत गुण नियंत्रण .......

. . . .3 डब्ल्यु-2

श्री.बाळासाहेब थोरात . . . .

ठेवण्यासाठी कायम तपासणी करीत आहोत. अशा वेळी जर त्यामध्ये काही आढळून आले तर त्यांच्यावर देखील बंदी घालण्यात येईल. परंतु गुण नियंत्रण ठेवणे ही बाब सर्वात महत्वाची आहे. त्या खता मध्ये तशा प्रकारची गुणवत्ता असणे महत्वाचे आहे. म्हणून आपण मिश्र खताला फारसे प्रोत्साहन देत नाही. अनेक शेतकऱ्यांच्या संघटना आहेत, युवकांच्या संघटना आहेत ज्यांनी देखील मिश्र खताच्या बाबतीत काळजी व्यक्त केली होती. त्याबाबतीत आपण नियोजन करीत आहोत. मिश्र खते ही गुणवत्तेची तयार व्हावयास पाहिजेत अशी अपेक्षा ठेवावी लागते. पण यामध्ये आपल्याला जे रॉ-फॉस्फेट टाकावे लागते, सुपर फॉस्फेट टाकावे लागते त्याची उपलब्धता बरीच कमी झालेली आहे. खरे म्हणजे आपल्याला राजस्थानमधून रॉ-फॉस्फेट उपलब्ध होते. पण तेथील सरकारने देखील आम्हाला सरळ पत्राव्दारे कळविले आहे की, आम्ही ते तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन देऊ शकत नाही. जर ते आपल्याला उपलब्ध करुन देऊ शकत नसतील, तशी परिस्थिती असेल आणि आपल्याकडेही त्याचा तुटवडा असेल तर अशा वेळी शेतकऱ्यांना पिकासाठी कोणत्या पध्दतीचे खत उपलब्ध करुन दिले पाहिजे, त्यामध्ये कोणते प्रमाण असले पाहिजे हे शिकविण्यासाठी, माती परिक्षणासाठी आपण एक कार्यक्रम हाती घेतला आणि त्यामध्ये कोणत्या पिकासाठी कसे खत टाकावे आणि ते खत कशा प्रकारे तयार करावे ? यासाठी आपण संपूर्ण राज्यामध्ये प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम हाती घेतला. मिश्र खते तयार व्हावीत, परंतु ती चांगल्या गुणवत्तेची असावीत अशीच आपण आता पर्यंत अपेक्षा ठेवलेली आहे. मिश्र खताचे उत्पादन थांबवित असताना, एम.ए.आय.डी.सी.ही आपली संस्था आहे किंवा मार्केटींग फेडरेशन आहे त्यांना सुध्दा पुरेसा खताचा पुरवठा करु शकलो नाही आणि दुसरीकडे मिश्र खत तयार झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी यासंबंधात जो मुद्दा मांडलेला होता, त्याबाबतीत मी जो खुलासा केलेला आहे, तो त्यांना पटू शकेल असे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, खरे म्हणजे यावर्षी खताचा तुटवडा राहील ही परिस्थिती लक्षात आल्या नंतर आम्ही याबाबतीत पहिल्यापासून काळजी घेतलेली आहे. आपली पध्दत अशी आहे की, जानेवारी-फेब्रुवारी मध्ये खताच्या बाबतीत काय परिस्थिती राहील ? किती मागणी केली जाईल ? हे कळविले जाते. याबाबतीत केंद्र सरकार बरोबर ठरलेल्या कालावधीनुसार बैठका होत असतात.

. . . .3 डब्ल्यु-3



APR/SBT/ MMP/ 17:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात . . . .

त्यामध्ये आपल्याला आवंटन दिले जाते आणि त्यानुसार आपण अत्यंत काळजीपूर्वक नियोजन केले. त्यासाठी आपल्याला 150 कोटी रुपयांचा निधी देखील उपलब्ध करुन देण्यात आला. एक गोष्ट अशी की, आमच्याकडे मुबलक खत उपलब्ध होते असे समजण्याचे कारण नाही, आम्ही ही वस्तुस्थिती मान्य करीत आहोत. परंतु आम्ही या वर्षाकरता जेवढे खत हवे आहे, ते किती लागेल? त्याबाबतीत अत्यंत चांगल्या पध्दतीने नियोजन केले होते हे देखील मी आत्मविश्वासाने सांगू इच्छितो. तसेच खते काटकसरीने कशा प्रकारे वापरावीत हे देखील सांगण्यात आले होते. जुन्या खताच्या बाबतीत ज्या पध्दती आहेत, त्या आपण का सोडून दिल्या पाहिजेत ? तसेच खताचा वापर करीत असताना, महाग खत वापरले तर आपल्याला कोणत्याही परिस्थितीत शेती परवडणार नाही. अशा वेळी कमी खत वापरुन किफायतशीर शेती कशा प्रकारे करावी यादृष्टीने आपण सगळया योजना करीत होतो.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

मी या निमित्ताने सांगेन की, येथून पुढच्या काळामध्ये खताची जी परिस्थिती राहणार आहे ती पेट्रोलियम प्रॉडक्ट सारखी राहणार आहे. आपण जसा पेट्रोलला पर्याय शोधण्याचा प्रयत्न करीत आहोत त्या पध्दतीने या खतांना पर्याय शोधावा लागेल अशी परिस्थिती आहे. मी या निमित्ताने सांगेन की, डी.ए.पी. या खताची किंमत एप्रिल 2007 मध्ये 307 डॉलर प्रती टन होती आणि वाहतुकीचा खर्च अधिकचा होता. तीच किंमत एप्रिल, 2008 मध्ये 1350 डॉलर प्रती टन झाली आणि त्यावर अधिकचा वाहतुकीचा खर्च लागतो. 1350 डॉलर म्हणजे 55 हजार रुपये आणि वाहतुकीचा खर्च धरुन 60 हजार रुपये प्रती टनापर्यंत किंमत गेली. युरियाच्या किंमती वाढलेल्या आहेत. या सगळ्या किंमती जर एवढ्या वाढणार असतील आणि शॉर्टेज निर्माण होणार असेल तसेच जगामध्ये अमेरिकेसारख्या देशाची मक्तेदारी निर्माण होणार असेल तर याला पर्याय शोधावे लागतील ही वस्तुस्थिती आहे. आपण कोणत्या पध्दतीने एन.पी.के. देणार याची काळजी घ्यावी लागेल. किफायतशीर शेती करावयाची असेल तर याबाबतीत काही योजना घेऊन आम्ही पुढे गेलेलो आहोत. परंतु त्याबाबतीत संशोधन वगैरे बाबी चालू आहेत. आज पाहिजे तेवढा डी.ए.पी. उपलब्ध केला. 91 टक्के डी.ए.पी. उपलब्ध होता. जी अडचण आली ती आम्ही पुन्हा एकदा सांगितली. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे साहेबांनी गुर्जर आंदोलनाचा परिणाम नाही असे सांगितले. ही वस्तुस्थिती नाही. राजस्थानमध्ये जे आंदोलन झाले त्यामुळे राजस्थानकडे जाणारा, उत्तर भारताकडे जाणारा रेल्वेमार्ग बंद झाला. पर्यायाने परिस्थिती अशी झाली की, आपल्या बाजूने पॅसेंजर जायला सुरुवात झाली परंतु आपल्याला तो ट्रॅक उपलब्ध होत नव्हता.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी आज दुपारी 2.00 वाजता रेल्वेच्या जनरल मॅनेजर बरोबर, रेल्वेच्या अधिकाऱ्यांबरोबर बोललो. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राने ज्या ज्या वेळी आमच्याकडे मागणी केली त्या त्या वेळी महाराष्ट्राला रॅक पुरविलेल्या आहेत आणि एक दिवसाचा सुध्दा उशीर केलेला नाही. आम्हाला केंद्राच्या सूचना होत्या की, महाराष्ट्र ज्या ज्या वेळी रॅक मागेल त्या त्या वेळी महाराष्ट्राला रॅक द्याव्यात असेही त्यांनी सांगितले. या वर्षी नियोजन चुकलेले आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी प्रामाणिकपणे मान्य करावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, असे म्हणण्याचे कारण नाही. जनरल मॅनेजरने काय सांगितले याला महत्व नाही. 50 हजार टन डी.ए.पी. कांडला बंदरामध्ये पडलेले होते आणि त्याच काळामध्ये या ठिकाणी प्रश्न असताना 20 ते 15 जूनपर्यंत आम्हाला ते भरभर आणता आले नाही. ही वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही. ही वस्तुस्थिती सगळ्यांना माहीत आहे. यामध्ये कोणतीही शंका बाळगण्याचे कारण नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : माझा हरकतीचा मुद्दा आहे. राजस्थानच्या आंदोलनाचा आणि गुजरातच्या पावसाचा उल्लेख माननीय मंत्रिमहोदय कशासाठी करीत आहेत ? गुजरातमध्ये दोन दिवस पाऊस पडला म्हणून रेक उशिरा आल्या, गुज्जरांचे आंदोलन झाले म्हणून रेक उशिरा आल्या असे सांगत आहेत. केंद्र सरकारने रेल्वे खात्याला आदेश दिले होते की, ज्या ज्या वेळी महाराष्ट्र रेक मागेल त्या त्या वेळी महाराष्ट्राला रेक द्याव्या आणि आपल्याला प्रायोरिटीने रेक मिळाल्या.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती ( श्री. भास्कर जाधव ) :** नियमाप्रमाणे हरकतीच्या मुद्यावर हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये आपण गुज्जर आंदोलनाचे राजकारण करीत आहोत असे नाही. सन्माननीय सदस्यांनी स्वत: गुज्जर आंदोलन मिटवण्यासाठी श्री. गोपीनाथ मुंडे यांच्या बरोबर भाग घेतला होता. परंतु तें आंदोलन थोडेसे लवकर मिटवले असते तर आम्हाला मदत झाली असती एवढेच आमचे म्हणणे आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्मानीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय यामध्ये गुज्जर आंदोलन कशासाठी आणत आहेत. ते आमची दिशाभूल का करीत आहेत ? नियोजन चुकले हे त्यांनी प्रामाणिकपणे मान्य करावे. जर माननीय मंत्रिमहोदय या पध्दतीने उत्तर देणार असतील तर ते आम्ही ऐकणार नाही. याबाबतीत नियोजन चुकले हे त्यांनी मान्य केले तर आम्ही ऐकण्यास तयार आहोत. यावर्षी नियोजन चुकले हे त्यांनी मान्य करावे. आपले पाप दुसऱ्यावर ढकलावयाचे अशा पध्दतीचे उत्तर देणार असतील तर ते आम्ही ऐकणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये आरोप करण्यासारखे काय आहे ? उलट मी त्यांचा सहभाग मान्य केला. मी चांगली गोष्ट मान्य केली.

श्री. पांडुरंग फुंडकर : केंद्र सरकारने सांगितले की, ज्या ज्या वेळी महाराष्ट्र रेक मागेल त्या त्या वेळी रेक द्याव्या आणि त्यांनी महाराष्ट्राला प्रायोरिटीने रेक दिल्या. केंद्रात आपल्याच पक्षाचे सरकार आहे. आम्ही प्रामाणिकपणे सांगत आहोत.

श्री. बाळासाहेब थोरात : रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी काहीही सांगितले तरी वस्तुस्थिती आम्हाला माहीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : एवढया गंभीर विषयावर मंत्रिमहोदय अशाप्रकारे उत्तर देणार असतील तर ते आम्ही अजिबात ऐकून घेणार नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मुंबई बंदरामध्ये खतांची जहाजे का आणली नाही ? मुंबई बंदरामध्ये वर्षानुवर्षे खते हाताळली जातात याची मंत्रिमहोदयांना कल्पना नाही काय ? सभागृहात दोन दोन मंत्री उपस्थित आहेत, माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे बंदर उपलब्ध असताना, मुंबई बंदर उपलब्ध असताना कांडला बंदरामध्ये जहाजे का नेली याचे मंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यासाठी खत उतरविण्याकरिता बंदर उपलब्ध नाही हा प्रश्न काही आजचा नाही, मागील 20 वर्षापासून अनेक नेत्यांनी राज्याचे स्वत:चे बंदर निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. मी देखील मागील 4 वर्षापासून प्रयत्न करीत आहे. जेएनपीटीमधील एका पॉईन्टवर राज्यासाठी लागणारी खते उतरविता आली पाहिजेत अशी सगळयांनी भूमिका मांडली आहे.(अडथळा) हा विषय हाताळणारे केंद्र सरकारचे सचिव आहेत. त्यांनी सरकारला असे पत्राने कळविले आहे की, "महाराष्ट्राची खतांची मागणी सर्वात जास्त असून गुजरातच्या कांडला बंदरात अडकून पडलेले महाराष्ट्राचे 35 हजार मे.टन खत रेल्वेच्या खास रॅक्सने रवाना करण्यात आले. महाराष्ट्र व गुजरात या राज्यांनी खतांच्या वितरणासाठी केलेले नियोजन वाखाणण्यासारखे आहे." ज्या सत्य गोष्टी आहेत त्या आपल्याला मान्य कराव्या लागतील.

श्री.प्रकाश शेंडगे : महाराष्ट्रामध्ये खताचे जहाज का आणले नाही ?

श्री.बाळासाहेब थोरात : मी सांगितले आहे की, आपल्यासाठी ते बंदर उपलब्ध झालेले नाही. धरमतर बंदर आहे. युरियाचे खत मोकळे येत असते. ते व्हेसलमध्ये येत असते. (अडथळा) याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील उपस्थित आहेत. खत उतरविण्यासाठी ज्या प्रकारच्या शेडची आवश्यकता असते, गोण्या भरण्याची व्यवस्था लागते, त्याशिवाय रेल्वेचा पॉईन्ट असावा लागतो ही सर्व व्यवस्था तेथे उपलब्ध नाही. तसेच ते फार मोठया क्षमतेचे बंदर नाही. या काही अडचणी आहेत. तरीही जेवढे शक्य झाले तेवढे तेथून खत आणलेले आहे. उर्वरित खत कांडला व मुद्रा बंदरातूनच आणावे लागते. त्याला पर्याय नाही ही वस्तुस्थिती आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे : मंत्रिमहोदयांना अधिका-यांनी चुकीचे मार्गदर्शन केलेले आहे. अधिका-यांना ही माहिती नसेल तर अपूर्ण माहिती देणा-या अधिका-यांना निलंबित करणार काय ?

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.शेंडगे यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली नाही. मंत्रिमहोदयांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री.बाळासाहेब थोरात : याठिकाणी एक मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. या खतांमध्ये एनपीकेचे कंटेण्ट्स असतात त्या कंटेण्ट्सच्या आधारे किंमती निश्चित केल्यामुळे कॉम्पेल्क्स खतांच्या किंती काही प्रमाणात कमी झाल्या. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने मुद्दे मांडले आहेत. त्यांनी अतिशय बारकाईने मुद्दे मांडले आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चांगले मुद्दे मांडले आहेत हे मी मान्य करीन. परंतु कर्नाटक सरकारने लगेच आदेश काढून खतांच्या किंमती केल्या आणि महाराष्ट्र राज्याने किंमती कमी केल्या नाहीत अशी वस्तुस्थिती नाही. हे मी सभागृहात सांगत आहे. केंद्र सरकारच्या निदेशानुसार सरकारने खतांच्या किंमती कमी केल्या आहेत, त्यामध्ये व्हॅटचा विचार करुन किंमत ठरविलेली आहे. पण सरकारने आदेशच काढला नाही हे त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. ज्यादिवशी केंद्र सरकारचे पत्र आले त्याच दिवशी राज्य सरकारने ते सर्क्यूलेट केलेले आहे. केंद्रीय मंत्री माननीय श्री.रामविलास पासवान यांनी जाहिरातीच्या माध्यमातून सांगितले आहे की, केंद्र सरकार खतासाठी 30 हजार कोटीची सबसिडी देत होते. परंतु वाढलेल्या किंमतीमुळे आता ही सबसिडी 1 लाख 14 हजार कोटीपर्यंत जाणार आहे. हे सुध्दा सगळयांच्या निदर्शनास आले असेल. खतांच्या विषयाबाबत सगळयांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. शेतक-यांची परिस्थिती, येणारी संकटे यामध्ये राजकारण न करता ही संकटे दूर करण्यासाठी शासनाला मदत कशी करता येईल, शेतक-यांची परिस्थिती कशी चांगली होईल हाच विचार सर्वांनी करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : आम्ही राजकारण करीत नाही. परंतु माननीय मंत्री महोदयांनी त्यांचे खतासंबंधीचे नियोजन चुकलेले आहे हे मान्य करावे. खताचा पुरवठा जून मध्ये केला हे त्यांनी कबूल करावे.

श्री. बाळासाहेब थोरात : मी वस्तुस्थिती सांगितलेली असून ती कागदावर आहे. ही वस्तुस्थिती आपणास मान्य करावी लागेल. आपणासारख्या प्रामाणिक माणसाने म्हटले पाहिजे की, आम्ही जी मागणी केली ती चुकीची होती...

श्री. पांडुरंग फुंडकर : मी कृषी आयुक्तांचे पत्र या ठिकाणी वाचून दाखवू का ? तेव्हा आमचे नियोजन चुकलेले आहे असे माननीय मंत्री महोदयांनी प्रामाणिकपणे कबूल करावे.

श्री. बाळासाहेब थोरात : या सर्व परिस्थितीचा आणि बारकाव्यांचा मी स्वत: आणि प्रधान सचिव देखील अभ्यास करीत होते. एवढेच नाही तर 24-24 तास मॉनिटरिंग केलेले आहे. रेक्स कोणकोणत्या बंदरात कधी पोहाचणार, खते कधी मिळणार यासंबंधी मॉनिटरिंग केलेले आहे. खते उतरविण्यासंबंधी देखील माथाडी कामगारांच्या अडचणी होत्या, संध्याकाळी खते उतरविली जाणार नाहीत असे त्यांनी सांगितले होते...

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय मंत्री महोदयांनी अकारण वाद वाढवू नये. खतासाठी उशिरा पैसे भरण्यात आले. 150 कोटीचे कर्ज एप्रिलमध्ये मंजूर झाले. मंत्री महोदय दिशाभूल करणारे उत्तर देत असतील तर ते आम्ही एकून घेणार नाही. 18 कोटी रु. जून मध्ये भरले आणि त्यानंतर खते आली.

डॉ. नीलम गो-हे : मी फक्त एकाच गोष्टीकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते. महाराष्ट्रामध्ये केन्द्र सरकारचे अनेक कारखाने आहेत. या कारखान्यांनी प्रत्येक राज्यासाठी खते पुरविणे बंधनकारक आहे. अनेक जिल्हाधिका-यांना भेटल्यानंतर अमूक इतके खत मिळेल असे शिष्टमंडळाला आश्वासन मिळाले. राज्याची जेवढी मागणी असेल त्याच्या 10 टक्के खताचा पुरवठा या कारखान्यानी करावयास पाहिजे. असे असताना या कारखान्यांच्या बाबतीत मॉनिटरिंग का केले नाही ?

..2..

श्री. बाळासाहेब थोरात : तालिका सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आयपीएलचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. शासनाने 100 कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्यानंतर आपण मागणी नोंदविली. केन्द्र सरकारने ॲलॉटमेंट दिल्यानंतरच पुरवठा केला जातो. आज देखील आपण मागणी केलेली आहे. परंतु केन्द्र सरकार जोपर्यन्त ॲलॉटमेंट देत नाही तोपर्यन्त पुरवठा होणार नाही. पैसे अगोदर भरण्याची आमची तयारी आहे. परंतु केन्द्र सरकारने ॲलॉटमेंट दिल्यानंतरच पुरवठा होतो. आपल्याकडे कॉम्प्लेक्सचा 56 टक्के पुरवठा झाला. त्यामुळे अन्य खतावर भार आला आणि टंचाईची परिस्थिती निर्माण झाली ही वस्तुस्थिती मी मान्य करतो. कॉम्प्लेक्स आपल्याचसाठी आहे असे नाही तर संपूर्ण देशपातळीवर ते वापरले जाते. सन्माननीय केन्द्रीय कृषी मंत्र्यांच्या माध्यामातून श्री. विलास पासवान यांच्याशी संपर्क साधण्यात येत असतो. याबाबतीत आम्ही पूर्णपणे मॉनिटरिंग केलेले आहे. एकंदरीत देशामध्ये जी परिस्थिती आहे तीच राज्यामध्ये आहे. यापुढे देखील या परिस्थितीबाबत उपाय शोधले पाहिजेत हे देखील मी मान्य करतो. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला असून त्यांनी केलेल्या सूचनांचीनोंद मी घेतलेली आहे एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो.

----

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कालपासून या विषयावरील चर्चा या सभागृहात सुरु झालेली आहे. काल संपूर्ण दिवस माननीय कृषी मंत्री चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित नव्हते. विदर्भातील सहा जिल्हयांसाठी माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले आहे. त्या पॅकेज अंतर्गत कृषी विभागासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. कृषी विभागातील अधिका-यांनी फार मोठया प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. सदरहू भ्रष्टाचाराची चौकशी सी.बी.आय.मार्फत अथवा जलद गती न्यायालयाच्या माध्यमातून करण्यात यावी अशा प्रकारची आम्ही मागणी केलेली आहे. त्या मागणीच्या बाबतीत माननीय कृषी मंत्र्यांनी काहीही खुलसा केलेला नाही. त्याबाबतीत खुलासा करावा. माननीय पंतप्रधान पॅकेज अंतर्गत किती शेतक-यांना लाभ दिला गेला ? किती शेतक-यांचे आर्थिक जीवनमान उंचावले ? या पॅकेजचा प्रत्यक्षात काय फायदा झाला ? यासंबंधी शासनाने श्वेतपत्रिका काढावी अशी देखील मागणी मी केली आहे. परंतु त्या मागणीच्या बाबतीत देखील माननीय कृषी मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात उल्लेख केला नाही. त्या मागणीच्या बाबतीत देखील माननीय कृषी मंत्र्यांनी खुलासा करावा.

श्री. बाळासाहेब थोरात : यासंदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची काहीही आवश्यकता नाही. ही सर्व माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवता येऊ शकते. या पॅकेज अंतर्गत येत असलेल्या जिल्हयात कृषी खात्यात झालेल्या भ्रष्टाचार झाला आहे त्यासंबंधीची चौकशी आय.एस.अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली चालू असून, त्या चौकशीचा अहवाल लवकरच प्राप्त होईल.

श्री. परशुराम उपरकर : सिंधुदूर्ग जिल्हयात गेल्या वर्षी भात उत्पादक शेतक-यांना भात पिकाची नुकसान भरपाई देण्यासाठी 7 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यातील 6 कोटी रुपये शासनाकडे परत गेले आहेत. ते 6 कोटी रुपये परत देण्यात येतील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सिंधुदूर्ग जिल्हयात एका खात्यावर अनेकांची नावे असल्यामुळे त्या सर्वांची संमतीचा एक प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यामुळे तेथील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. याबाबतीत काय मार्ग काढता येईल यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. संमतीच्या बाबतीत निश्चितपणे काही तरी मार्ग निघेल अशी अपेक्षा आहे. भात पिकाची नुकसान भरपाईची रक्कम कृषी विभागाकडेच जमा आहे. ती दुसरीकडे वळती केली

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

गेलेली नाही. संमतीच्या बाबतीत योग्य तो निर्णय झाल्यानंतर ती नुकसान भरपाईचे पैसे परत देण्यात येतील.

श्री. जयंत प्र.पाटील : खते घेण्यासाठी शासनाने एप्रिलआणि जून महिन्यामध्ये पैसे भरले ही बाब माननीय कृषी मंत्र्यांनी कबूल केली आहे. 150 कोटी रुपये एप्रिल महिन्यात मंजूर झाले. यासंदर्भात शासनाकडून झालेल्या चूका याबाबतीत मी चर्चा करु इच्छित नाही. कृषी विभागाची याबाबतीत चूक झाली आहे असे कबूल करा अशी मागणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी केली आहे. परंतु त्या मागणीच्या बाबतीत देखील मी काही बोलणार नाही. पुढील वर्षी पावसाळयापूर्वी म्हणजे एप्रिल आणि मे महिन्यांच्या कालावधीत शेतक-यांना खते उपलब्ध होतील अशा प्रकारचे नियोजन शासनाच्या माध्यमातून केले जाईल काय ?

श्री. बाळसाहेब थोरात : पुढील वर्षी शेतक-यांना वेळेच्या आत उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात व्यवस्थितपणे नियोजन केले जाईल.

श्री. पाशा पटेल : खत कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले की, परदेशात 65 हजार रुपये प्रति क्विंटल खताचा भाव आहे. या ठिकाणी 9 हजार रुपये प्रति क्विंटल खत विकावे लागते. त्यात 35 टक्के रक्कम बॉंड स्वरुपात मिळते. त्यामुळे भांडवल कमी होऊ लागले आहे. या कारणांमुळे खत पुरवठा करण्यामध्ये अडचणी येऊ लागल्या आहेत ही गोष्ट खरी आहे काय ? असल्यास त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या बाबतीत खूप अभ्यास केलेला दिसतो. 35 हजार कोटी रुपयांचा आकडा 14 हजार कोटीपर्यंत आलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांचे वृत्तपत्रात स्टेटमेंट आले होते, ते मी वाचलेले आहे. शासनाने खताच्या बाबतीत जेवढया अनुदानाची कमिटमेंट केलेली आहे, तेवढे अनुदान खतासाठी दिले जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय पंतप्रधानांनी विदर्भातील सहा जिल्हयांसाठी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. विदर्भातील पाच हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्यानंतर सदर पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. माझ्याकडे महाराष्ट्राचे नियंत्रक व महालेखापाल यांचा लेखा परीक्षण अहवाल उपलब्ध आहे. त्यांनी लेखा परीक्षण अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, या

3..



श्री. पांडुरंग फुंडकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॅकेज अंतर्गत कृषी विभागात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचाराची आय.एस.एस.अधिका-यांमार्फत चौकशी करुन चालणार नाही. सदरहू भ्रष्टाचाराची चौकशी सी.बी.आय. अथवा जलद गती न्यायालयाच्या माध्यमातून करण्यात येईल काय ? या प्रकरणी जे दोषी अधिकारी आढळून येतील त्यांच्या विरुध्द कडक कारवाई करण्यात येईल काय ? विदर्भातील पाच हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्यानंतर माननीय पंतप्रधानांनी सहा जिल्हयांसाठी पॅकेज जाहीर केले आहे. परंतु पॅकेजचा पैसा राज्य शासनाच्या विविध खात्यांनी व्यवस्थितपणे वापरला नाही. अनेक अधिका-यांनी मृत व्यक्तीच्या टाळूवरील लोणी खाल्ले आहे. या पॅकेजमधील कृषी विभागाची अधिका-यांनी करोडो रुपये खाऊन टाकले आहेत. त्यामुळे कृषी खात्यांच्या अधिका-यांची सी.बी.आय.अथवा जलद गती न्यायालयाच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल काय?

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 17:25

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पंतप्रधान पॅकेजबाबत मी पूर्णपणे बोललो नाही. डिसेंबरच्या अधिवेशनात चर्चा झाली होती त्यावेळी सविस्तरपणे भूमिका मांडली होती. पंतप्रधान पॅकेज हे एकटया कृषीखात्यापुरते मर्यादित नाही. त्यावर कृषी खात्याचे नियंत्रण आहे. पॅकेजमधील 5000 कोटी रुपयांपैकी आतापर्यंत 3000 कोटी रुपयांची कामे झालेली आहेत. 1800 कोटी रुपये व्याजमाफीसाठी आणि 1200 कोटी रुपये जलसंपदा विभागासाठी खर्च झालेले आहेत. 60 हजार कुटुंबांना प्रत्येकी 25000 रुपयांप्रमाणे मदत द्यावयाची आहे. यामध्ये काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. जे अधिकारी दोषी आढळले त्यांच्यावर कारवाई झालेली आहे....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यासंदर्भात शासनाने श्वेतपत्रिका काढावी आणि भ्रष्टाचाराची न्यायालयीन चौकशी करावी अशी आमची मागणी आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जे अधिकारी दोषी आढळले त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. बुलढाणा जिल्हयातील अधिकारी दोन-अडीच महिने तुरुंगात गेले होते. दोषी अधिकाऱ्यांना कोणतीही दयामाया दाखविलेली नाही. त्यामुळे यासंदर्भात कोणत्याही न्यायालयीन चौकशीची आवश्यकता नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एवढया मोठया भ्रष्टाचाराच्या संदर्भात शासन न्यायालयीन चौकशी करणार नाही आणि श्वेतपत्रिका काढणार नाही म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत. आम्हांला शासनाचे कोणतेही उत्तर ऐकावयाचे नाही.

( विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहातून बहिर्गमन करतात )

----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ( रोजगार हमीयोजना मंत्री ) : सभापती महोदय, टंचाईसदृश परिस्थितीबाबत या सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली. याविषयाच्या अनुषंगाने रोजगार हमी योजनेच्या संदर्भात अनेक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले. काही शंका, काही अडीअडचणी आणि काही सूचना मांडल्या आहेत. या सर्वांची नोंद विभागाच्या वतीने घेण्यात आलेली आहे. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या राज्यामध्ये यावर्षी पडलेला दुष्काळ हा तसे पाहिले तर पूर्वी पडलेल्या दुष्काळांच्या मानाने फार तीव्र स्वरुपाचा आहे. धरणातील पाण्याची न वाढलेली पातळी, कमी झालेला पाऊस त्याचप्रमाणे खरीपाच्या पेरण्या बऱ्याच ठिकाणी झालेल्या नाहीत ही गोष्ट खरी आहे. सन्माननीय कृषीमंत्री आणि सन्माननीय मदत व पुनर्वसन मंत्री यांनी या चर्चेला उत्तर दिलेले आहे. दोन्ही विभागाच्या त्याचप्रमाणे रोजगार हमी योजना विभागाच्या वतीने ही परिस्थिती हाताळण्यासाठी काय केलेले आहे याची चर्चा सदनामध्ये होणे आवश्यक आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी धन्यवाद देतो की हाप्रश्न अधिवेशन सुरु झाल्याबरोबर पहिल्याच दिवशी पुढे आणण्यात आला. याप्रश्नाच्या संदर्भात सदनाच्या दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्या मुद्यांचा उल्लेख करुन मी सदनाचा वेळ घेऊ इच्छित नाही. याचवेळी खालच्या सभागृहामध्ये याच विषयावर चर्चा चालू होती आणि त्या चर्चेला उत्तर देण्यासाठी मी खालच्या सदनामध्ये उपस्थित होतो. मला निरोप मिळाल्यानंतर मी आता याठिकाणी उपस्थित झालो आहे. राज्यातील दुष्काळी स्थिती लक्षात घेऊन शासनाने 350 कोटी रुपयांचा निधी सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर उपलब्ध करुन दिलेला आहे. निधी मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची कोणतीही अडचण ठेवलेली नाही. 350 कोटी रुपयांचा निधी हा पहिला हप्ता आहे. आवश्यकता पडली तर जिल्हाधिकारी स्तरावर कुशल आणि अकुशल कामांसाठी मजुरी देण्याकरिता पतमर्यादा उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबतीत जे निर्णय उत्तर देत असताना सांगितले जाणार आहेत या निर्णयाची प्रत उद्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत प्रत्येक सन्माननीय सदस्याच्या पिजन होलमध्ये उपलब्ध करुन दिली जाईल. या निर्णयांची प्रत सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे देखील उपलब्ध होईल. उद्या मतदारसंघात गेल्यानंतर शनिवारी आणि रविवारी मतदारसंघात फिरत असताना आम्हांला शासन निर्णयाची प्रत मिळाली नाही असे जिल्हाधिकारी सांगू शकणार नाहीत. खालच्या सदनामध्ये जी भूमिका मांडली आहे तीच या सदनामध्ये मांडणार आहे. सभापती महोदय, शासनाने रस्त्यांची नवीन कामे घेण्याकरिता परवानगी दिलेली आहे.

नंतर श्री.भोगले

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 17:30

श्री.हर्षवर्धन पाटील........

त्याचबरोबर पांदण रस्ते, जोडरस्ते, शेतामधील रस्ते असतील किंवा गावठाणातील रस्ते असतील, अशा रस्त्यांची कामे सुध्दा रोहयोमधून करावीत अशा प्रकारचा निर्णय घेतला आहे. तसेच रस्ते रुंदीकरणाची कामे आहेत. काही ठिकाणी ओडीआर, एमडीआर, व्हीडीआर आहेत. ती रस्ते रुंदीकरणाची कामे सुध्दा घेण्यास परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणे स्मशानभूमीपर्यंतच्या रस्त्याची कामे किंवा गाव नदीकाठचे असेल तर त्या गावाला जोडणारा रस्ता असल्यास अशा रस्त्यांची कामे सुध्दा त्या भागातील लोकांना काम मिळावे म्हणून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून घेण्याचा निर्णय घेतला आहे. तशा प्रकारचे आदेश निर्गमित करीत आहोत.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा प्रश्न आपल्याला जाणवतो. आपणही बऱ्याच वेळा या संदर्भात भूमिका मांडली आहे. एखाद्या रस्त्याचे काम घ्यायचे म्हटले तर 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर दानपत्र लिहून ते रजिस्टर केल्याशिवाय काम करता येत नाही. ती अट शिथील केली आहे. आता 20 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर रजिस्टर न करता संमती दिली तरी त्या रस्त्याचे काम तातडीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत एजन्सीने करावे अशा प्रकारचे आदेश या पत्रकामध्ये नमूद केले आहेत.

सभापती महोदय, आणखी एक महत्वाचा विषय म्हणजे गावतळी, मालगुजारी तलाव, पाझर तलाव यामध्ये गाळ साठला आहे. काम देण्यामध्ये अडचण असेल आणि आवश्यकता असेल तर गाळ काढण्याच्या कामास रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून परवानगी द्यावी अशा सूचना या पत्रकामध्ये नमूद केल्या आहेत. त्याचबरोबर सामाजिक वनीकरणाच्या संदर्भात जी सीसीटीची कामे केली जातात, ती कामे करीत असताना पूर्वी नॉर्म्स असे होते की, साधारणत: 30 से.मी.चे काम केले जाते. आता किमान 1 मीटर खोली व रुंदी असलेली सीसीटीची कामे घ्यावीत, जेणेकरुन मजुरांना काम मिळेल. त्याठिकाणी जी काही लागवड केली जाईल, वृक्षारोपणाचे काम केले जाईल ते आज पाऊस नसला तरी भविष्यात पाऊस पडेल त्यावेळी त्या परिसरात सीसीटीमध्ये पाणी अडविता येईल अशा प्रकारचा एक निर्णय घेण्याबाबत वन विभागाचा प्रस्ताव आला, त्या प्रस्तावाला मंजुरी देण्यामध्ये माझ्या विभागाला कोणतीही अडचण येणार नाही. शेततळी, वनतळी याबाबत सुध्दा हा निर्णय आम्ही घेतला आहे. शेततळी आणि वनतळीचे नॉर्म्स, मजुरीमध्ये झालेली 40 टक्के वाढ यामुळे नॉर्म्स रिव्हाईज करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे सन्माननीय वनमंत्री

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील........

सभागृहात उपस्थित आहेत. वनतळ्यांच्या बाबतीत हा निर्णय घेतला आहे. त्या विभागाने सुध्दा या कामामध्ये पुढाकार घेण्याचे ठरविले आहे. सामाजिक वनीकरण आणि वन विभाग या दोन्ही एजन्सीकडून 1 मीटर सीसीटीच्या कामाला मंजुरी देण्याचा निर्णय झाला असून या दोन्ही कामामुळे या राज्यामध्ये चांगल्या पध्दतीने सामाजिक वनीकरण आणि वन विभागाची कामे घेता येतील.

सभापती महोदय, आदिवासी आणि दुर्गम भागातील जे खऱ्याअर्थाने गरजू मजूर आहेत त्यांच्या दोन्ही हातांना काम देता येईल यादृष्टीने निर्णय घेतला आहे. खालच्या सभागृहामध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केल्या, या सदनामध्ये देखील काही सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आहेत. गायरान, गावातील गावठाणे याठिकाणी प्रत्येक गावाला किमान एक गावतळे निर्माण व्हावे अशी मागणी पुढे आली आहे. यावर्षी उपयोग होणार नाही. परंतु प्रत्येक गावाला एक गावतळे निर्माण केले तर भविष्यात असा दुष्काळ पडल्यास त्या गावतळयाचा उपयोग त्या गावातील पिण्याच्या पाण्यासाठी, जनावरांच्या पाण्यासाठी निश्चित होईल. म्हणून गावतळ्यांची योजना प्रत्येक ग्रामपंचायतीच्या परिसरात राबवावी अशा प्रकारची सूचना या माध्यमातून देण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, सगळ्यात महत्वाची अडचण पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील आहे. म्हणून पिण्याच्या पाण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्याला किमान 5 विहिरी तातडीने उपलब्ध करुन द्याव्यात. एका विहिरीला साधारणपणे 1.25 लाख खर्च करता येतो. महागाई वाढली आहे, डीएसआरचे दर वाढले, सिमेंट, स्टील, मजुरीचे दर वाढले, लिडवर बांधकामाचे दर वाढले त्यामुळे 2.5 लाख रुपये एका पिण्याच्या पाण्याच्या विहिरीसाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून अनुदान देण्याचा निर्णय केलेला आहे. 5 विहिरींची मर्यादा यासाठी ठेवली आहे की, आता 5 विहिरींपासून सुरुवात करावी. मागणी वाढली तर त्या त्या जिल्हयाचे पालकमंत्री आणि लोकप्रतिनिधी यांनी एकत्र बसून विहिरींची संख्या वाढली तरी पिण्याच्या पाण्यासाठी......

(नंतर श्री.खर्चे....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील........

हा कार्यक्रम राबविण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. यावर्षी फलोत्पादन लागवडीचा कार्यक्रम जवळपास एक लाख हेक्टरमध्ये घेण्याचे मान्य केले आहे. काही सन्माननीय सदस्य कदाचित म्हणतील की पाऊसच नाही तर फलोत्पादन कार्यक्रम कशासाठी घ्यावयाचा ? पण या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या कार्यक्रमामध्ये खड्डे खोदण्याच्या संदर्भात 40 टक्क्याचा कंपोनन्ट रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करुन देता येतो. आता यापुढील काळातही राज्यात पाऊस झाला नाही तर खड्डे खोदण्याचा कार्यक्रम सुध्दा या माध्यमातून आपण घेऊ शकतो आणि एक लाख हेक्टरला सुमारे 225 कोटी रुपये यावर्षी खर्च करण्याचे धोरण आहे, पुढील वर्षी 40 टक्के आणि त्यापुढील वर्षात सर्व्हायव्हल रिपोर्ट बघून 20 टक्के अनुदानही आपण देतो, अशा प्रकारची ही योजना आहे त्यासंदर्भातला निर्णय आपण घेतलेला आहे.

त्यानंतर जवाहर विहिरींचा कार्यक्रम गेल्या दोन वर्षांपासून स्थगित केलेला होता, कारण राज्यात अपूर्ण असलेल्या जवाहर विहिरी पूर्ण व्हाव्यात हे त्यामागील कारण आहे. या दोन वर्षाच्या काळात आपण 33 हजार जवाहर विहिरी पूर्ण केल्या. आणि नव्याने जो कार्यक्रम आपण हाती घेत आहोत त्यानुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघवाईज लोकसंख्येच्या निकषाप्रमाणे 35 हजार जवाहर विहिरींचा कार्यक्रम सुध्दा मंजूर केला आहे. यामध्ये अगोदर प्रत्येक विहिरीला 65 हजार रुपये आपण खर्च करीत होतो. यावर्षी 1 लाख एवढे अनुदान देण्याचा निर्णय आपण घेतला आहे. कारण 1 लाखामध्ये चांगल्या प्रकारची 3 ते 4 पुरुष म्हणजे जवळपास 20 फुटापर्यंत खोल विहिर होऊ शकते. परंतु जर शेतकऱ्याची स्वत:च्या खिशातून वरची रक्कम टाकून 30-35 फुटापर्यंत विहिर खोल करण्याची इच्छा असली तरी तो ती विहिर आणखी खोल करु शकतो. यातून निश्चितपणे रोजगार उपलब्ध होईल. कारण एखाद्या विहिरीचे काम गावात सुरु झाले तर त्या कामावर 5-10 माणसांना तरी रोजगार मिळू शकतो. अशा प्रकारे संपूर्ण राज्यात 35 हजार विहिरी घेतल्या आणि त्यांची कामे सुरु झाली तर मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो. माननीय विरोधी पक्षनेते सातत्याने विदर्भातील 6 जिल्ह्यांचा उल्लेख करतात. त्या 6 जिल्ह्यांच्या संदर्भात शासनाने एक धडक कृती कार्यक्रम हाती घेतला असून त्या 6 जिल्ह्यातील जवळजवळ 64 तालुक्यांमध्ये 64 हजार विहिरी म्हणजे प्रत्येक तालुक्याला 1 हजार विहिरी अशा प्रकारचा तीन

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ......

वर्षांचा धडक कार्यक्रम मंजूर केला आहे. माझ्या माहितीप्रमाणे दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांनी त्यांच्या त्यांच्या जिल्ह्यांमध्ये लाभार्थी निवडीचे कामही पूर्ण केले आहे. उर्वरित चार जिल्ह्यांमध्ये लाभार्थी निवडीचा कार्यक्रम येत्या काळात पूर्ण करतील आणि हा कार्यक्रम जरी तीन वर्षाचा असला तरी तो दोन वर्षातच कसा पूर्ण करता येईल, असाही प्रयत्न करण्यात येईल. यासाठी 700 कोटी रुपये आपल्याला लागणार आहेत व टप्प्याटप्प्याने रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून या जवाहर विहिरी, फलोत्पादन आणि धडक कृती कार्यक्रम या सर्व कार्यक्रमासाठी एकूण 1100 कोटी रुपये आपल्याला लागणार आहेत. यासाठी दरवर्षीच्या बजेटमध्ये 2000 कोटी एवढी रक्कम मान्य करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी रोजगार हमी योजनेत बेंच मार्क म्हणून सभागृहात तशी सुधारणा आणणार आहोत, त्यामुळे या सर्व कार्यक्रमासाठी पुढील काळात निधीची अडचण भासणार नाही व ही कामे लवकरात लवकर पूर्ण होतील, यात शंका नाही. त्याचप्रमाणे 61 हजार कामे आजही शेल्फवर उपलब्ध आहेत. खऱ्या अर्थाने हा कार्यक्रम एमआरईजीएस मधून घ्यावा की रोजगार हमी योजनेतून घ्यावा अशी चर्चा सुरु आहे. कारण 1 एप्रिल, 2008 पासून आपल्या राज्यात सर्वत्र एनआरईजीएसच्या माध्यमातून एमआरईजीएस ही योजना सुरु झालेली आहे. आपल्या राज्याने एमआरईजीएसचा आधार घेऊन एक परिपत्रक काढलेले आहे. कारण ही सर्व कामे एमआरईजीएसमधून घेतली तर त्यात 60:40 चे निकष आहेत, मजुरांसाठी जॉब कार्ड, नोंदणी, सोशल ऑडिट कंपल्सरी अशा प्रकारच्या अटी आहेत. तसेच याचा दुष्परिणाम म्हणजे 50 टक्के कामे ग्रामपंचायतीमार्फत आणि 50 टक्के कामे जिल्हापरिषदेमार्फत करावीत अशी अडचण निर्माण झ ााली आहे. कारण आपल्या राज्याची रोजगार हमी योजनाच आपण पाहत आलो आहोत, आपली योजना केंद्राच्या एमआरईजीएस या योजनेपेक्षा मोअर फिजिबल आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

लोकांची आणि माननीय लोकप्रतिनिधींची मागणी अशी आहे की, आपल्या राज्याच्या रोजगार हमी योजनेस प्राधान्य द्यावे व नंतर एमआरइजीएसला प्राधान्य द्यावे. एनआरइजीएसचे आपण एमआरइजीएस केलेले आहे. एनआरइजीएस आणि एमआरइजीएस एकच आहे व राज्याची इजीएस वेगळी आहे त्यामुळे शासनाने निर्णय घेतलेला आहे की, जी कामे रोजगार हमी योजनेत मंजूर झाली होती परंतु ती कामे पूर्ण होऊ शकली नाहीत, ही कामे काही कारणास्तव बंद पडलेली आहेत ती सर्व अपूर्ण कामे एमआरइजीएस मधून न घेता ती इजीएसमध्ये घ्यावीत अशा प्रकारचा सुधारित आदेश शासन काढीत आहे. एवढा एक आदेश या राज्यातील रोजगार हमी योजनेच्या कामाला गती देण्यासाठी उपयुक्त ठरेल असा मला विश्वास आहे. यामध्ये जर काही अडचण आली तर हे राज्य आपल्याला सामान्य माणसासाठी चालवावयाचे आहे. कायदा,कलम, नियम काय आहे याची फारशी चर्चा न करता सामान्य माणसाच्या हाताला काम कसे देता येईल अशा प्रकारची भूमिका आम्ही घेणार आहोत. खरे म्हणजे सिंगल पॉईंट ॲक्टीव्हीटीची अडचण आहे. 60 टक्के पाणलोट क्षेत्रात काम झाले असेल आपण इतर कामाला मान्यता देत असतो. महाराष्ट्राला दुष्काळ काही नवीन नाही. तीन वर्षे गेले की, महाराष्ट्राला दुष्काळाला सामोरे जावे लागते. सन 2000 मध्ये ज्यावेळेस माझ्याकडे रोजगार हमी योजनेचे काम आले त्यावेळी 2001 व 2003 मध्ये आपण इजीएसच्या कामावर 16 लाख मजुरांना काम दिले होते. एका एका दिवसाचे 9-9 कोटी रुपयांचे पेमेंट शासनाने केलेले आहे. त्यामुळे दुष्काळ हा आपल्यालासाठी काही नवीन नाही. परंतु माझी सर्व सन्माननीय सदस्यांना एकच विनंती आहे की, दुष्काळाच्या विषयावर कोणत्याही प्रकारचे राजकारण होता कामा नये. दुष्काळाचे संकट हे निसर्ग निर्मीत आहे. सर्वांचे सहकार्य मिळाल्यावरच आपल्याला दुष्काळाच्या संकटांवर मात करता येईल. शासनाची सकारात्मक भूमिका आहे. दुष्काळाचे काम करीत असतांना एखादी भूमिका विरोधकांनी मांडली तर मान्यच करावयाची नाही अशी भूमिका या शासनाची कधीही राहिलेली आहे. सामान्य माणसाला न्याय देण्याची भूमिका शासनाची नेहमीच राहिलेली आहे. लॅंड ॲक्वीझीशनचा मुद्दा या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला नाही परंतु मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, शासनाने रोजगार हमी योजनेसाठी काही शेतक-यांच्या जमिनी ॲक्वायर केलेल्या आहेत. या ॲक्वायर केलेल्या जमिनी नालाबंडीसाठी घेतलेल्या आहेत, रस्त्यासाठी घेतलेल्या आहेत, काही ठिकाणी बंधा-यासाठी जमिनी ॲक्वायर करण्यात आलेली आहे.

. ..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील .....

त्यामुळे शासनाने निर्णय घेतलेला आहे की, ज्या शेतक-यांच्या जमिनी ॲक्वायर केलेल्या आहेत, ज्यांनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जमिनी दिलेल्या आहेत त्यांना दोन महिन्या रक्कम दिली जाईल. तसेच मागील सुध्दा प्रकणे असतील तर त्यांना सुध्दा रक्कम दिली जाईल. रक्कम देण्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. मध्यंतरी सामान्य प्रशासन विभागाने आकृती बंधाच्या संदर्भात निर्णय घेतला होता त्यामुळे जिल्हयामध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावरील डेप्युटी कलेक्टरचे पद व्यपगत करण्यात आले,कार्यकारी अभियंत्याचे पद व्यपगत करण्यात आले होते, आज 10-15 जिल्हयामध्ये अशी परिस्थिती आहे की, तेथील रोजगार हमी योजनेवर डेप्यूटी कलेक्टर नसल्यामुळे कोणाला तरी ॲडीशनल चार्ज दिला जातो, कधी कधी आरडीसीला ॲडीशनल चार्ज दिला जातो, कधी कधी जिल्हा पुरवठा अधिका-याकडे चार्ज दिला जातो. काही ठिकाणी तर दोन दोन जिल्हयाचा ॲडीशनल चार्ज डेप्युटी कलेक्टरकडे असल्याचे पहावयास मिळाले आहे. आपल्याला जर कामे करावयाची असतील तर विभागाकडे सक्षम यंत्रणा असण्याची आवश्यकता आहे. ईजीएसचे अस्थापन असणे आवश्यक आहे, नेटवर्कींग असणे आवश्यक आहे. आपण जर वर्षाला 3-3 हजार कोटी रुपये खर्च करतो तर आपण दुस-या एजन्सीवर का म्हणून अवलंबून रहावे? दुस-या एजन्सीवर आपण अवलंबून राहिलो तर आपण प्रभावीपणे काम करु शकणार नाही असा आम्हाला अनुभव आलेला आहे. त्यामुळे यासंदर्भात आम्ही मंत्रीमंडळापुढे नवीन प्रस्ताव आणलेला आहे. त्यामुळे आता प्रत्येक जिल्हयाला एक युनिट, डेप्युटी कलेक्टर, कार्यकारी अभियंता , व्हीजिलन्स, ट्रेसर, एमबी रेकॉर्डींग, आणि त्यांना आवश्यक असणारे वाहन उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

यानंतर श्री. खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ...

`त्यांच्याकडे जर वाहने असतील तरच उप जिल्हा अधिकारी कामाच्या ठिकाणी जाऊ शकतील वा इतर कर्मचारी कामाच्या ठिकाण्ी जाऊन कामाचे मोजमाप घेऊ शकतील वा त्या कामाच्या संदर्भात निर्णय घेऊ शकतील. त्यामुळे या सबंधीचा निर्णय घेण्याचे शासनाने ठरविले असून लवकरात लवकर या संदर्भात धोरण निश्चित करण्यात येणार आहे व ही पदे तातडीने उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, 350 कोटी रुपये या राज्याकरिता मंजूर करण्यात आलेले आहेत.अर्थात ही रक्कम पुरेशी नाही हे मला देखील मान्य आहे. 2003-2004 साली ट्रेझरीतून या मजुराचे पेमेन्ट देण्यात यावे असे आदेश काढले होते. मला असे वाटते की आवश्यकता वाटली तर अशा प्रकारचे आदेश आतासुध्दा काढण्याची माझ्या विभागाची तयारी आहे. याचे कारण असे की त्या जिल्हयाच्या ट्रेझरीमध्ये जो काही पैसा जमा होईल त्या पैशातील पहिला हिस्सा रोजगार हमी योजनेत काम करणा-या मजुराच्या पगारासाठी दिला जाईल. तेव्हा आवश्यकता भासली तर तसे आदेश काढण्याची माझ्या विभागाची तयारी आहे. हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो.त्याचप्रमाणे 350 कोटी रुपये अकुशल कामासाठी खर्च करण्यात येणार आहेत. शासनाने असे बंधन घालून घेतले आहे की,अकुशल कामाला प्रथम प्राधान्य देण्यात यावे आणि त्यानंतर कुशल कामाला प्राधान्य देण्यात यावे. अकुशल कामाव्दारे मजुराकडून जी कामे करुन घेतली जातात त्या मजुरांचे पेमेन्ट करण्यासाठी प्रथम प्राधान्य दिले जाते. त्यासाठी 350 कोटी रुपयाचा निधी प्रत्येक जिल्हा पातळीवर उपलब्ध करुन दिलेला आहे त्यामुळे त्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, एम.आर.ई.जी.एस.मधून कामे होत नाहीत ग्रामसेवकाच्या संघटनांनी असहकार पुकारला असल्यामुळे ही कामे होत नाहीत. आज सकाळी ग्रामसेवकांच्या शिष्टमंडळा बरोबर एक बैठक घेण्यात आली होती .ग्राम विकास मंत्री व ग्राम विकास राज्यमंत्री त्या बैठकीला उपस्थित होते. माननीय मुख्यमंत्र्याच्या पातळीवर देखील या बाबतीत चर्चा झाली होती. त्या बैठकीनंतर ग्रामसेवकाच्या संघटनेने दुपारी 12.00 वाजता शासनाला असे पत्र दिले होते की आम्ही असहकार मागे घेत आहोत. त्यामुळे आता रोजगार हमी योजनेची कामे एम.आर.ई.जी.एस.मधून ग्रामपंचायतीच्या स्तरावर होण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण राहणार

2..

श्री.हर्षवर्धन पाटील ...

नाही. ग्रामसेवक संघटांनी एक अडचण आमच्या समोर मांडली होती व ती आम्हा सर्वाच्या लक्षात आली आहे. ग्राम रोजगार सेवक नेमण्याच्या बाबतीत तरतूद करण्यात असून या ग्राम रोजगार सेवकाला मानधन देण्यात येणार आहे. 12 हजार 500 ग्राम रोजगार सेवकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम या राज्यामध्ये गेले वर्षभर राबविण्यात आला होता. ग्राम रोजगार सेवकांना नेमण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला देण्यात आला आसून त्यामध्ये शासनाचा हस्तक्षेप राहणार नाही. सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्याच्या बाबतीत आपण नेहमीच चर्चा करीत असतो त्यानुसार हा अधिकार ग्रामपंचायतीला दिला असून ग्राम रोजगार सेवकाची नेमणूक ग्रामपंचायत करणार आहे. त्या परिपत्रकात असे नमूद करण्यात आले होते की, "काम झाल्यानंतर 2500 रुपये मानधन देण्यात यावे."एखादे काम कधी पूर्ण होणार आणि त्यानतर एम.बी.रेकॉर्डीग केव्हा होणार ? यामध्ये काही बदल करण्याची आवश्यकता आहे. एखादा 10 वी वा 12 वी झालेल्या सुशिक्षित बेरोजगाराला काम मिळत नसल्यामुळे त्या व्यक्तीला ग्राम रोजगार सेवक म्हणून नेमण्यात येण्ार आहे. त्यांच्या बाबतीत लवकरच असा निर्णय घेण्यात येणार आहे की, त्याला सुरुवातीला ॲडव्हॉन्स म्हणून 500, 700 वा 1000 रुपये तातडीने द्यावयाचे आणि त्यात अशी अट घालावयाची की पुढच्या मानधनाचा भाग कामाच्या परफॉर्मन्सशी लिंकअप करण्यात येईल. सगळयांच ग्रामपंचायतीनी ग्राम रोजगार सेवक नेमण्याची गरज नाही. एखाद्या ठिकाणी दोन ग्रामपंचायती एकत्र आल्या वा वाडया वस्त्यावरील लहान लहान दोन ग्रामपंचायती एकत्र आल्या तर कामाचा लोड पाहून त्यांना ग्राम रोजगार सेवकाची नेमणूक करता येईल परंतु तो काही सरकारी नोकर राहणार नाही तर मानधनावर काम करणारा तो ग्राम रोजगार सेवक राहील. या संदर्भातील स्पष्टता या परिपत्रकामध्ये नमूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, एस्टिमेट तयार करण्यासाठी 3 टक्के अनुदान देण्यात येणार आहे.एखाद्या कामाचे एस्टिमेट एक लाख रुपयाचें असेल तर तीन हजार रुपये त्या कामाचे एस्टिमट करण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे. सध्याच्या महागाईमध्ये तीन हजार रुपयामध्ये कामाचे एस्टिमेट होऊ शकणार नाही. परंतु केन्द्र सरकारची अट मात्र तीन टक्क्याची जरी असली तरी आम्ही आता असा विचार करीत आहोत की राज्य सरकारच्या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून एस्टिमेट करण्याकरिता अधिक दोन किंवा तीन टक्के वाढीव रक्कम द्यावी .

3..



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 17.45

400 ते 500 कोटी रुपये एम.आर.ई.जी.एस.मधून आम्हाला मिळणार आहेत कदाचित हा मधला फरक देण्याकरता चार ते पाच कोटी रुपये  राज्य सरकारच्या रोजगार हमी योजनेतून द्यावे लागतील.  तरीही ही रक्कम देण्याची आमची तयारी आहे. ही रक्कम वाढवून देण्याच्या बाबतीत शासन विचार करीत असून लवकरच या संबंधीचा  निर्णय घेण्यात येईल असे मी आपल्याला या ठिकाणी सांगू इच्छितो..

सभापती महोदय, यानंतर मी चार टक्के कॉन्टीजंन्सीसंबंधी खुलासा करणार आहे. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी बराच रस घेतलेला असल्यामुळे मी थोडे विस्ताराने सांगू इच्छितो की, 4 टक्के कॉन्टीजंन्सीची रक्कम देण्यात येते परंतु चार टक्क्यातून कॉन्टीजंन्सीचा खर्च भागू शकत नाही त्यामुळे ही रक्कम वाढवून देण्यात यावी अशा प्रकारचा प्रस्ताव माझ्याकडे आला आहे. माझ्याकडे नांदेड आणि चंद्रपूर जिल्हयाचा प्रस्ताव आला असून त्या जिल्हाधिका-यांचा आणि मुख्य कार्यकारी अधिका-यांचा रिपोर्ट पाहिल्या नंतर माझी अशी धारणा झाली आहे की चार टक्के कॉन्टीजंन्सीची रक्कम वाढवून द्यावी  लागेल . तेव्हा  एस्टिमेट तयार करण्याकरता 3 टक्के आणि कॉन्टीजंन्सीचे चार टक्के असे 7 टक्के आपण केन्द्र सरकारचे घेऊ या . त्यामध्ये पाच सहा टक्के जास्त द्यावे लागले तरी राज्याच्या रोजगार हमी योजनेतून ते देऊ या .

या नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 17:50

श्री. हर्षवर्धन पाटील ....

त्यात आपल्याला आपल्याकडून 5-6 टक्के जास्त द्यावे लागले तर राज्यातील रोजगार हमी योजनेतून आपण द्यायचे. याप्रमाणे काही केले तर ग्रामीण भागामध्ये उत्पादक कामे करण्यासाठी आपल्याला फार उपयोग होईल अशी भूमिका आम्ळी आता घेतलेली आहे. ग्रामसेवकांच्या संघटनेने त्यांचा संप, असहकार मागे घेतल्यामुळे आम्ही आता त्यांना सांगितले आहे की, किमान एक तरी काम प्रत्येक ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये सुरू झाले पाहिजे. आता आपण ही कामे सुरू करीत आहोत त्यामुळे एमआरइजीएस बंद झाली असे नाही. ती कामे चालूच राहणार आहेत. परंतु टंचाईसदृश्य वा दुष्काळसदृश्य परिस्थिती म्हणा, या बाबतीतील जे काही आपले निकष आहेत ते प्रसंगी काही प्रमाणात शिथिल करण्याच्या बाबतीत, आवश्यक तेथ् नवीन सुधारणा करण्याच्या बाबतीत देखील आमची भूमिका, राज्य सरकारची भूमिका ही सकारात्मक राहिली आहे हेही मला येथे सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, सगळ्यात महत्त्वाची अडचण या काळामध्ये कोणती असेल तर ती चाऱ्याच्या बाबतीत आहे. या संदर्भात आम्ही 9 जूनलाच एक परिपत्रक काढले आहे आणि त्यात चारा डेपो आणि छावण्यांच्याबाबतीतील उल्लेख आम्ही केलेला आहे. त्यामुळे आज या राज्यातील पशुधन आहे, जे राज्यातील महत्त्वाच्या अशा दूध व्यवसाच्या दृष्टीने आवश्यक घटक आहे, याच्याशी अनेक प्रश्न संबंधित आहेत. आज आवश्यकता आहे ती एका बाजूला मजुरांना काम देणे, काम बदलून देणे आणि आवश्यकता भासली तर पाणी देण्यासाठी रेल्वेच्या वाघिणींचाही त्यासाठी उपयोग करून पाणी पोहोचविणे, तसेच याबाबतीत रोजगार उपलब्ध करून देण्याचे कामही राज्य सरकार करीत आहे. सभापती महोदय, आज राज्यातील पशुधन वाढले आहे त्यासाठीदेखील चाऱ्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. त्यासाठी चारा डेपोंचा प्लॅन आपण तयार करीत आहोत. परवाच आदिवासी विभागाशी देखील माझे या संदर्भात बोलणे झाले. आदिवासी विभागाकडील गवत यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेण्याबरोबरच आपल्याकडील जे बरेच साखर कारखाने आहेत त्यांच्याकडे बगॅस मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे. त्यामध्येदेखील आपल्याला काही प्रक्रिया करून त्यातून पशुखाद्य तयार करता येईल किंवा काय याचा विचार आपण करीत आहोत. तसेच कापूस पणन संघाकडे मोठ्या प्रमाणात सरकी शिल्लक आहे. म्हणून आम्ही असाही निर्णय घेत आहोत की, जी आपल्याकडे सरकी तयार होत आहे ती विकायची नाही. तर ती पशुखाद्याच्या दृष्टीने

..... 4जी 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ....

आवश्यक म्हणून आरक्षत करून आपण ठेवली आहे. कारण त्या सरकीची पेंड देखील जनावरांसाठी उद्या द्यावी लागणार आहे. तसेच या वर्षी शिल्लक राहिलेला ऊस आहे त्याचाही या दृष्टीने उपयोग करण्याचा आपण निर्णय घेत आहोत. कारखान्यांकडे न गेलेला असा ऊस मोठ्या प्रमाणात शिल्लक आहे त्या ऊसाला 25 हजार रूपये दर दिल्यास त्या शेतकऱ्याला देखील त्यातून मोठी मदत होणार आहे. काही भागामध्ये असा ऊस आहे तोही आपल्याला जनावरांसाठी म्हणून आणावा लागणार आहे आणि तो चाऱ्यासाठी म्णून उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. इतर राज्यांमध्ये देखील चारा मिळतो आहे काय याचीही चाचपणी करण्याचा आपले प्रयत्न सुरू आहेत. आता राज्यामध्ये जे संकट आलेले आहे, तसे पाहिले तर या राज्याने दुष्काळ काही आजच पाहिलेला आहे असे नाही. यापूर्वीही आपण दुष्काळामध्ये 15 ते 20 लाख लोकांना काम उपलब्ध करून दिले आहे. 1972 च्या दुष्काळामध्ये तर आपण 52 लाख मजुरांना काम दिले आहे. आतापर्यंत डझनभर वेळा या राज्याला दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे. परंतु इजीएसच्या माध्यमातून काम करून आपण या राज्यात एकही भूकबळी होऊ दिलेला नाही ही गोष्ट निश्चितच या राज्याला भूषणावह आहे. आपण या राज्यात कामाचा अधिकार कायद्याच्या माध्यमातून लोकांना देण्याचा यशस्वी प्रयत्न आपण केलेला आहे. त्यामुळे या साऱ्या गोष्टींच्या बाबतीत ज्या घोषणा मी येथे केल्या त्या केवळ घोषणाच नाहीत तर त्याचे जी.आर. देखील मी आणलेले आहेत. आता आपल्याला माहितीच आहे की, केवळ जी.आर. काढून काही होत नसते. जीआर काढल्यानंतर ते यंत्रणेतील खालच्या माणसापर्यंत जाऊन मग काम सुरू होते. आता जीआर द्वारे आदेश दिल्यानंतर कामे सुरू होणारच. त्याबद्दल आपण नकारात्मक शंका घेणे योग्य होणार नाही इतकेच मी या प्रसंगी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना सांगेन. शेवटी सरकारी यंत्रणा आहे ती आजची नाही तर त्यामध्ये कोणताही निर्णय हा कागदावर करावा लागतो. तो संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत जावा लागतो आणि तसाच तो आपल्या सारख्या तज्ज्ञांकडे देखील द्यावा लागतो. मग आपल्यासारखे त्याचा अभ्यास करतात आणि त्याचा पाठपुरावा करतात. आता हे अधिवेशन सुरूच आहे. तेव्हा आपण यांचा अभ्यास करून केव्हाही याबाबत आम्हाला सांगू शकता. सभापती महोदय, एक गोष्ट मात्र खरी आहे की, या प्रश्नाचे कोणीही येथे राजकारण केलेले नाही. हा आपल्या सगळ्यांचा प्रश्न आहे आणि आपण सर्वांनी मिळून या दुष्काळाच्या संकटाशी सामना करावयाचा आहे. आता येथे यंत्रणेच्या बाबतीत उल्लेख

..... 4जी 3 ...



KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 17:50

करण्यात आला. मी आपल्याला या कायद्याचे पुस्तक दाखवितो, ते आपण वाचले असेलच. त्यात असा एक क्लॉज आहे की, ....

( यानंतर श्री. सरफरे .... 4एच 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

"दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर झाल्यानंतर आणि राज्य सरकारने त्यासंबंधीचे आदेश काढल्यानंतर रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये जर कुणी दिरंगाई केली तर त्याच्यावर आपण कोणतीही कारवाई करु शकतो." त्यासंबंधीचा वेगळा ॲक्ट आहे. इतर एजन्सीच्या बाबतीत असलेला हा ॲक्ट नाही. या कायद्यामध्ये कलम 7(3), 11(2) आणि 13(1) अशाप्रकारच्या अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. या कायद्यानुसार जिल्हाधिकारी यांना रोजगार हमी योजनेच्या बाबतीत जबाबदार अधिकारी म्हटले आहे. उद्या जर या योजनेमध्ये कमी जास्त प्रकार झाले, अंमलबजावणीमध्ये दिरंगाई झाली किंवा हलगर्जीपणा झाला आणि त्यामुळे वेगळी परिस्थिती निर्माण झाली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांवर राहणार आहे. मला वाटते त्याची जाणीव सचिवांमार्फत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी त्याची चिंता करण्याचे कारण नाही. सभापती महोदय, मी या सदनामध्ये सांगू इच्छितो की, शासकीय यंत्रणेकडून जर दिरंगाई झाली तर तो अधिकारी कितीही मोठा असला तरी त्याच्यावर कायद्यानुसार कारवाई करण्यामध्ये हे शासन मागे राहणार नाही, ही शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, या राज्यावर हे निसर्गनिर्मित संकट आले आहे. त्या संदर्भात या सभागृहामध्ये शासनाकडून काय उत्तर मिळणार आहे? राज्य सरकारकडून याबाबतीत कोणती उपाय योजना करण्यात येणार आहे? याकडे राज्यातील सर्व जनतेचे लक्ष लागले आहे. शासनाने जी भूमिका स्वीकारली आहे त्यामध्ये त्रुटी राहणार नाहीत असे मी म्हणणार नाही. आम्ही 100 टक्के जरी निर्णय घेतला तरी त्या निर्णयानंतर ताबडतोब सर्व काही आबादी आबाद होईल, आणि तात्काळ सर्व कामे सुरु होतील असा माझा दावा नाही. रोजगार हमी योजनेचे काम करावयाचे नाही अशाप्रकारची मानसिकता आज अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे, त्यांच्या कामामध्ये शिथिलता आली आहे. त्यामुळे यापुढे कामांमध्ये दिरंगाई करतांना अधिकाऱ्यांना कोणतीही कारणे सांगता येणार नाही. या चर्चेच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की, रोजगार हमी योजनेचे काम उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात हे राज्य सरकार गांभीर्याने आपली भूमिका पार पाडील. त्याबाबतीत राज्य सरकारची भूमका निश्चितपणे सकारात्मक राहील. त्याकरिता आपण सर्वांनी शासनाला सहकार्य करावे अशी विनंती करुन मी माझे विचार संपवितो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना मजुरीबरोबर धान्याचे कूपन देण्यात येणार आहे की धान्य देण्यात येणार आहे? अनेक ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे...

रोजगार हमी योजनेचा निधी मिळावयास वेळ लागतो त्याप्रमाणे अनेक कामे कंत्राटदारामार्फत करण्यात येतात त्याठिकाणी अधिका-यांच्या संगनमताने 1 दिवसाचे काम करुन 8 दिवसांच्या मजुरीचे पैसे लाटले जातात. असे प्रकार सोलापूर, औरंगाबाद व फुलंब्री येथे करणारी एक मोठी गँक पकडण्यात आली. त्यामध्ये संबंधित अधिकारी देखील सामील होते. त्या अधिकाऱ्यांवर पुन्हा त्याच कामांची जबाबदारी टाकल्यामुळे त्यांना भ्रष्टाचाराचे कुरण मिळणार आहे. तेव्हा याबाबतीत अतिशय काळजी घेण्याची आवश्यकता आहे. नाहीतर शासकीय निधीचा जनतेला कोणत्याही प्रकारे फायदा होणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सकाळी भाषण करतांना सांगितले की, रोजगार हमी योजनेकरिता असलेला स्वतंत्र निधी आपल्या खात्याकडील केंद्रीय निधीमध्ये वर्ग करण्यात आला. याबाबतीत राज्याचा निधी किती होता? आणि आता किती उपलब्ध होणार आहे? त्या निधीची आजची स्थिती काय आहे?

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : 2 हजार कोटी रुपये शिल्लक ठेवण्यात आले आहेत, आणि त्यासंबंधीचे विधेयक देखील मागील अधिवेशनात संमत करण्यात आले आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा निधी आपण मागणार आहोत काय? माझ्या माहितीप्रमाणे केंद्र सरकारकडून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा निधी महाराष्ट्र शासनाने उचलला गेला पाहिजे तो उचलला जात नाही. आपल्याकडे जर निधी कमी पडत असेल तर तो निधी घेतला गेला पाहिजे. सभापती महोदय, दुष्काळी परिस्थितीचा विचार करुन महिलांच्या बचत गटांना सुध्दा व्याजामध्ये सूट दिली पाहिजे अशी मी मागणी करते. सन 2001 पासून 2003 पर्यंत आपण मेंढयांना सवलती देता, परंतु महिलांच्या बचत गटांना व्याजामध्ये एक टक्का सुध्दा सवलत दिली जात नाही. महिला बचत गटाच्या माध्यमातून ज्या महिला मोलमजूरी करतात त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुखसोयी नसतात हे सर्वेक्षणाअंती मी पाहिले आहे. रोजगार हमी योजनेकरिता नेमलेल्या समितीने आपल्या अहवालात वेगवेगळया शिफारशी केल्या आहेत त्यांची अंमलबजावणी आपण केली पाहिजे याकडे मला सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे की, ईजीएसच्या मजुरांना धान्य देणार आहात काय ? याबाबतीत सांगू इच्छितो की, सध्या या मजुरांना धान्य देण्याच्या बाबतीत कोणताही विचार नाही, आम्ही त्यांना कॅश पेमेंट देणार आहोत. दुसरा प्रश्न मांडला की, सोलापूर, फुलंब्री,औरंगाबाद येथील कामांच्या बाबतीत ज्या तक्रारी करण्यात आल्या होत्या आणि त्यामध्ये जे संबंधित अधिकारी होते. त्याबाबतीत सांगावयाचे तर सोलापूर मधील 42 अधिकारी सस्पेंड केलेले आहेत. आता आमच्याकडे त्याबाबतचा अंतिम रिपोर्ट यावयाचा आहे. आता याठिकाणी माननीय कृषी मंत्री उपस्थित देखील आहेत. मी त्यांनाही सांगितलेले आहे की, सोलापूर जिल्हयामध्ये या कामासाठी जेवढी मशिनरी होती, ती त्या जिल्ह्यामध्ये नाहीतर डिव्हीजनच्या बाहेरच पाठविण्याच्या बाबतीत आम्ही शिफारस करीत आहोत आणि याबाबतीत आयुक्तांचा रिपोर्ट आल्यानंतर कारवाई करण्यात येईल. मात्र रोजगार हमी योजनेच्या कामाच्या बाबतीत सांगावयाचे तर त्यासाठी मशिनरी किंवा यंत्रणा लागणार आहे आणि शेवटी आपल्याला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मार्फतच कामे करणे भाग आहे. परंतु यामध्ये कोणालाही पाठिशी घालण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी निधीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला आहे. आता आपण या कामासाठी 2 हजार कोटी रुपयांचा कॉर्पस् मंजूर केलेला आहे. सध्या आम्हाला स्टेट ई.जी.एस.मधून प्लॅनिंग विभागाकडून 750 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे आज 750 कोटी रुपये उपलब्ध आहेत. तसेच आम्हाला वित्त विभागाकडून 2 हजार कोटी रुपये मिळू शकतात आणि आपण तशा प्रकारचा कायदा देखील केलेला आहे. त्यामुळे 2 हजार कोटी रुपये मिळण्याच्या बाबतीत काही अडचण येणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी एनआर-ईजीएस बाबत प्रश्न उपस्थित केला होता. आपल्या राज्याला एनआर-ईजीएसमध्ये साधारणपणे 450 कोटी रुपये मिळाले. माझ्या अंदाजाप्रमाणे त्यातील 300 ते 350 कोटीच्या आसपास रक्कम खर्च झालेली आहे. ही सर्व परिस्थिती लक्षात धेता परवा एक बैठक झाली असून, आता आम्हाला नव्याने एनआर-ईजीएस मध्ये 600 कोटी रुपये मिळावेत अशा प्रकारचा सुधारित प्रस्ताव आम्ही केंद्र शासनाकडे पाठवित आहोत. तसेच ई.जी.एस.च्या नियमांमध्ये काही बदल करण्यासाठी जी समिती गठित केली होती, त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून तो आम्ही सभागृहाच्या पटलावर ठेवलेला आहे. आम्ही त्या अनुषंगाने सूचना मागवित आहोत. त्यानंतर या अहवालाच्या बाबतीत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : मला सन्माननीय सदस्यांच्या एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, मी मघाशी सभागृहाची वेळ ठरविण्याच्या बाबतीत असे म्हटले होते की, आजच्या कामकाज पत्रिकेवरील इतर जे कामकाज आहे, त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण झाल्यानंतर निर्णय घेऊ. त्यामुळे आता सभागृहाची परत वेळ वाढविण्याची गरज नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. आता माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेबांनी रोजगार हमी योजनेसाठी पैसा कमी पडणार नाही आणि मागेल त्याला काम मिळेल असे सांगितले. पूर्वी आपल्या कायद्यामध्ये अशी तरतूद होती की, मजुराने तहसील कार्यालयामध्ये जाऊन काम मागितल्यानंतर त्याला ताबडतोब 15 दिवसामध्ये काम उपलब्ध करुन द्यावे. यासाठी मजुरांचा गट देखील ठरविलेला होता. पण याबाबतीत असा अनुभव आहे की, ईजीएस ची कामे करणाऱ्या ज्या सरकारी यंत्रणा आहे, मग सार्वजनिक बांधकाम विभाग असेल, पाटबंधारे विभाग असेल, जिल्हा परिषद असेल, कृषी विभाग असेल किंवा वन विभाग असेल, परंतु या यंत्रणा ईजीएस ची कामे करण्यासाठी उत्सुक नसतात. अशा परिस्थितीमध्ये मजुरांना कामाची आवश्यकता असताना देखील सदरहू यंत्रणा आपल्या विभागाची कामे सोडून ईजीएस च्या कामांना प्राधान्य देत नाही. अशी स्थिती असताना आपण ईजीएसची कामे फार मोठया पध्दतीने कशा प्रकारे करणार आहात? जर उद्या या यंत्रणांनी ईजीएस ची कामे करण्यासाठी नकार दिला तर याबाबतीत आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, आपल्याकडे प्रचलित ॲक्टनुसार ज्या प्रोव्हीजन आहेत, आपण त्याप्रमाणे कारवाई करु. शेवटी या सगळयामध्ये त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी महत्वाचा आहे. आपण जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की, ही लाईन ऑफ ॲक्शन आहे आणि आम्हाला काम करुनच पाहिजे. तर मला असे वाटते की, यामध्ये सामाजिक वनीकरण, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, मायनर इरिगेशन इ. एजन्सीचा कामे उपलब्ध करुन देण्यासाठी उपयोग करुन घ्यावा लागेल. मध्यंतरीच्या काळामध्ये सोलापूरचा एक एपिसोड झाला आणि त्याचा असा परिणाम झाला आहे की, कोणीही, जसे ग्रामसेवकांनी भूमिका मांडली आहे. म्हणून आम्हाला एखाद-दुसऱ्या ठिकाणी यामध्ये कडक कारवाई करावीच लागणार आहे आणि हे मी मघाशीच सांगितलेले आहे. त्यामुळे आपल्याला या यंत्रणांच्या

. . . .4 आय-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कडूनच काम करुन घ्यावे लागणार आहे. कारण आपण दुसरी यंत्रणा आणूच शकत नाही. त्यामुळे ही यंत्रणा कामासाठी कशी उपलब्ध करुन घेता येईल, त्यांच्यामध्ये कसा विश्वास निर्माण करता येईल आणि तुम्हाला काम द्यावेच लागणार आहे याचे गांभीर्य त्यांच्या निदर्शनास आणून देता येईल यादृष्टीने आपण नियोजन करीत आहोत. यामध्ये आपल्याला निश्चितपणे यश येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जवाहर योजनेची मर्यादा 65 हजार वरुन 1 लाख रुपयापर्यंत वाढविली आहे. परंतु ठाणे आणि रायगड जिल्हयामध्ये मात्र ही मर्यादा 43 हजार वरुन 70 हजारापर्यंत नेलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रामध्ये सगळीकडे ही मर्यादा सारखी राहील काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

दुसरा प्रश्न असा आहे की, माननीय रोजगार हमी योजना मंत्री हे पणन मंत्री सुध्दा आहेत. खताच्या टंचाईच्या बाबतीत मार्केटिंग फेडरेशनकडे आणि एमएआयडीसीकडे जे कारखाने आहेत ते पूर्ववत सुरु करण्याचा विचार शासन करणार आहे की नाही ? त्यांना साखर कारखान्यांसारखे पॅकेज देऊन त्यांचे पुनरुज्जीवन करणार काय ? महाराष्ट्रामध्ये मिश्रखताचे जे कारखाने होत आहेत, ज्यांना एनसीडीसीकडून अर्थसहाय्य मिळते ते अजूनपर्यंत मिळाले नाही, ते कारखाने जलद गतीने उभे करण्याचे काम शासन करील काय ? कोल्हापूरमध्ये एनसीडीसीच्या माध्यमातून काही कारखाने होत आहेत. गेली पाच वर्षे ते काम सुरु आहे. ते कारखाने जलद गतीने करण्याचे काम होईल काय ? जी गावतळी आहेत, विशेषत: कोकण भागामध्ये खारेपाटात जी गावतळी आहेत त्यांना पक्की सिमेंटची भिंत बांधण्यासाठी रोजगार हमी योजनेमध्ये तरतूद करण्यात येईल काय ? तसेच 40 लाख 50 लाख अशी मर्यादा न ठेवता जे काम होईल त्याप्रमाणे या कामांना रोजगार हमी योजनेमध्ये मंजुरी मिळेल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : दोन जिल्ह्यांचे जे नॉर्म्स आहेत त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की, सुरुवातीला जी 43 हजार रुपये मर्यादा होती ती 65 हजार रुपये झालेली आहे. त्याबाबत अधिक्षक अभियंता यांची एक तांत्रिक समिती गठीत करुन या दोन जिल्ह्यांचा जो स्ट्राटा आहे त्याचा अभ्यास करु आणि लवकरच याबाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न धोरणात्मक बाबीच्या संदर्भात उपसिथत केलेला आहे.. कृषी विभागाच्या माध्यमातून खताच्या उपलब्धतेकरिता मार्केटिंग फेडरेशन, पणन मंडळ किंवा एमएआयडीसी आहे. त्याचा अभ्यास करु. परंतु खताच्या बाबतीत कृषी मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे कायम स्वरुपी धोरण असणे अत्यंत आवश्यक आहे. एनसीडीसीच्या माध्यमातून सहकारी तत्वावर अशा प्रकारचे जास्तीत जास्त खत प्रकल्प राज्यामध्ये कसे आणता येतील यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न करु. जो खारपाणपट्टा किंवा समुद्रकिनाऱ्याचा भाग आहे त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली की, त्या ठिकाणी सिमेंटचा बंधारा घ्यावा. त्यांनी गावतळ्यांच्या बाबतीत सांगितले. मध्यंतरी बांधबंदिस्ती दुरुस्तीमध्ये काही पैसे या कामाकरिता मंजूर केलेले आहेत. मधल्या काळामध्ये मेरिटाईम बोर्डाकडून एक प्रस्ताव आला होता.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांचा गैरसमज होत आहे. ज्या गावामध्ये गावतळी आहेत, ज्या गावठाणामध्ये गावतळी आहेत ती समुद्रालगची गावे आहेत. त्या गावामध्ये कायम स्वरुपी सिमेंटची भिंत बांधण्याबाबत मी विचारले. बाहेरकाटा म्हणजे खारबंदिस्ती. तो वेगळा मुद्दा आहे. गावतळ्यांना जे पैसे दिलेले आहेत ती गावतळी सिमेंटच्या भिंती बांधून बांधली गेली आहेत. त्यांना रोजगार हमी योजनेमध्ये मुबलक निधी दिला जाईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यामध्ये आम्ही एक स्वतंत्र बैठक आयोजित करु. त्या बैठकीला सन्माननीय सदस्यांना बोलवून घेऊ तसेच संबंधित अधिकाऱ्यांना बोलवून घेऊ. सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी आहे की, गावतळ्याचा भाग सिमेंट कान्क्रीटने बांधून द्यावा. त्यामुळे तूटफूट होणार नाही. याबाबतीत बैठक घेऊन तांत्रिक बाजू तपासून पुढची योग्य ती कार्यवाही करु.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, जुनी राहिलेली कामे महाराष्ट्र रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करणार आहोत परंतु नवीन कामांची अशी परिस्थिती आहे की, ज्या दिवशी महाराष्ट्राची रोजगार हमी योजना संपली त्या दिवशी लातूर जिल्ह्यामध्ये 70 हजार मजूर होते आणि ज्या दिवशी केंद्राची योजना सुरु झाली त्या दिवशी 813 मजूर होते. एवढा फरक होता. एवढी भीती आहे. ही भीती घालविण्यासाठी मजुरांचे जे पासबूक काढावयाचे आहेत त्याबाबतीत ज्या अटी आहेत त्या शिथिल करणार काय ? दुसरा मुद्दा असा की, राजस्थान आणि आंध प्रदेश या राज्यांमध्ये ज्या पध्दतीने केंद्र शासनाचे पैसे आलेले आहेत त्याचे अनुकरण महाराष्ट्रामध्ये केले जाणार आहे काय ? केंद्राचे पैसे आणण्यामध्ये ते महाराष्ट्राच्या पुढे आहेत. महाराष्ट्रामध्ये 150 कोटीच्या आसपास निधी आला. त्या ठिकाणी 600 कोटी आलेले आहेत. यासंदर्भामध्ये शासन काही बदल करणार काय ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एमआरइजीएसच्या बाबतीत मी उदाहरण सांगू इच्छितो की, गडचिरोली जिल्हयामध्ये 42 हजार मजूर काम करीत आहेत, नांदेड जिल्हयामध्ये मे महिन्यात 32 हजार मजूर होते, ठाणे जिल्हयामध्ये मे महिन्यामध्ये रो.ह.यो.च्या कामावर 77 हजार मजूर काम करीत होते. त्या त्या जिल्हयाच्या स्थानिक परिस्थितीवर हे सर्व अवलंबून आहे. म्हणून शासनाने निर्णय घेतला आहे की, रो.ह.यो.ची जी कामे अपूर्ण होती ती कामे....

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव )** : मंत्रिमहोदय, आपले उत्तर पूर्ण होण्यापूर्वी मी आपल्याला एक विचारु इच्छितो की, 1 एप्रिल, 2008 रोजी एमआरइजीएस सुरु झाली. त्यावेळी जी कामे अपूर्ण असतील ती कामे रो.ह.यो.तून करण्याचे शासनाने आदेश दिलेले आहेत. पण दि.1.4.2008 रोजी प्रत्यक्षात वर्क ऑर्डर दिली होती, पण कामे सुरु झाली नव्हती, अशी कामे रो.ह.यो.तून केली जातील काय ? याचा आपण खुलासा करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, अपूर्ण काम म्हणजे जे काम सुरु झाले होते पण काही कारणामुळे ते बंद पडले होते. दि.1.4.2008 रोजी एमआरइजीएसकडे अपूर्ण कामे हस्तांतरित केली आहेत. अशा कामांची संख्या 50 हजारपेक्षा जास्त आहे. ती सर्व कामे सुरु करावयाची म्हटले तर त्यासाठी राज्यामध्ये मजूर उपलब्ध होऊ शकणार नाही. पण अपूर्ण असलेल्या कामांपैकी 10 टक्के कामे सुरु झाली तरी लाखोच्या संख्येने मजुरांना सामावून घेता येईल. बंद असलेली अपूर्ण कामे होती, ती एमआरइजीएसकडे ट्रान्सफर झाली आहेत. ती अपूर्ण कामे सुरु करण्यासाठी अकुशल भागाला पहिले प्राधान्य देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. अपूर्ण कामामध्ये कुशल आणि अकुशल असे दोन भाग आहेत. काही कामे अशी आहेत की, ज्यामध्ये 80 टक्क्याचा अकुशल भाग पूर्ण झालेला आहे. उर्वरित 20 कुशल कामासाठी मेकॅनिझम सुरु केले जाणार आहे. पहिल्यांदा मजुरांना काम देण्याची गरज आहे. अपूर्ण कामे अकुशलमधून करण्याची परवानगी दिलेली आहे. त्याचबरोबर जी नव्याने एमआरइजीएसमध्ये कामे होतील, याचा अर्थ असा नाही की एमआरइजीएस बंद केली आहे. काही जिल्हयामध्ये मागणी करण्यात आली आहे की, ग्रामपंचायती पुढे गेलेल्या आहेत. त्या उद्या असे म्हणतील की, शासनाने आमच्यावर हे गंडांतर कशासाठी आणले आहे ? त्या एमआरइजीएसला सुध्दा शासन कोठेही धोका पोहोचू देणार नाही. तेथे सुध्दा ती यंत्रणा चालू राहणार आहे. फक्त दुष्काळसदृश परिस्थिती असल्यामुळे हा बदल केलेला आहे. . . . 4 K 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष नेता ने यहां पर मुद्दा उपस्थित किया कि ई.जी.एस. के काम के लिए प्रशासन चलाने वाले लोगों में उत्साह नहीं रहता है. इसका उत्तर माननीय मंत्री महोदय ने दिया कि हम उनको प्रोत्साहित करने की कोशिश करेंगे. मुझे ऐसा लगता है कि यह मुद्दा बहुत महत्वपूर्ण है. जब नैसर्गिक आपत्ति आती है तो प्रशासन के बारे में ऐसा देखा गया है कि लोगों की मदद करने का कार्यक्रम पूरे जोर-शोर से चला और शासन की तरफ से पूरी मदद जाने के बाद वह मदद सही लाभार्थी तक नहीं पहुँचती है. हमारी लोकशाही प्रणाली में . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी भाग घेतला होता की नाही हे मला माहीत नाही. परंतु या सभागृहाच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत. मी त्यांना व्यक्तिगत बोलत नाही. सभागृहामध्ये ज्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला असेल त्यांच्या मुद्यांबाबत जर मंत्रिमहोदयांकडून उत्तर आले नसेल तर त्या सदस्यांनाच प्रश्न विचारता येतो. जर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी चर्चेत भाग घेतला नसताना त्यांना प्रश्न विचारता येत असेल तर मला देखील भविष्यामध्ये तशी संधी मिळाली पाहिजे.

**तालिका सभापती** : ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतलेला नाही त्यांना या विषयावर प्रश्न विचारता येतो काय हा माननीय सदस्यांचा मुद्दा आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:15

(तालिका सभापती...)

पहिली गोष्ट अशी आहे की, सभागृहामध्ये कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी कोणताही विषय उपस्थित केला की ती सभागृहाची मालमत्ता होते. चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी पक्ष प्रतोद सन्माननीय सदस्यांची नांवे देतात. काही सन्माननीय सदस्यांची बोलण्याची इच्छा असते परंतु ते बालू शकत नाहीत. परंतु त्यांना प्रश्न विचारण्याचा पूर्ण अधिकार आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, पीठासीन अधिका-यांची परवानगी घेऊन सन्माननीय सदस्या श्रीमती फौजीया खान यांनी प्रश्न विचारलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

डॉ. दीपक सावंत : राईट ऑफ रिप्लायची व्याख्या काय आहे ?

**तालिका सभापती** : अल्पकालीन चर्चेला राईट ऑफ रिप्लाय नसतो.

डॉ. दीपक सावंत : मग सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात केल्यामुळे त्यांना बोलण्याची परवानगी देण्यात आली आणि मी जेव्हा हात वर केला त्यावेळी आपण मला थांबविले.

**तालिका सभापती** : मला वाटते सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचा काही तरी गैरसमज होतोय. मी त्यांना थांबविलेले नाही. ही चर्चा विरोधी आणि सत्ताधारी पक्षाने गांभीर्याने घेतलेली असून चर्चेचा शेवट खेळीमेळीच्या वातावरणात व्हावा म्हणून मी इतके प्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्यांना दिली. अन्यथा इतके प्रश्न विचारण्याची संधी दिली जात नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं यह कह रही थी कि जब नैसर्गिक आपत्ति आती है तब शासन की तरफ से बराबर मदद देने के बाद वह मदद लाभार्थी तक पहुँचनी चाहिए थी, लेकिन वह मदद लाभार्थी तक नहीं पहुँचती है और प्रशासन के कई अधिकारियों के बंगले बन जाते हैं. सारी चीजों पर नियंत्रण रखने के लिए माननीय सदस्या श्रीमती नीलम गो-हे ने सुझाव दिया है कि जिला स्तर पर विधान सभा और विधान परिषद के माननीय सदस्यों की कमेटी बनाकर "चॅक एंड बेलेंस" का सिस्टम होना चाहिए. माननीय मंत्री महोदय ने इस बात का ठोस उत्तर नहीं दिया है. मुझे ऐसा लगता है कि शासन की तरफ से दुष्काल में लोगों की मदद करने के काम पर निगरानी रखने के लिए विधान सभा और विधान परिषद के सदस्यों की कमेटी बनाने के लिए विशेष आदेश निकाले जाते हैं. मेरा प्रश्न यह है कि क्या शासन इस प्रकार के आदेश निकालेगा ?

. . . 4L 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापति महोदय, माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान ने जो प्रश्न पूछा है, उसका उत्तर मैंने पहले दे दिया है. दुष्काल की स्थिति . . . .

(कुछ माननीय सदस्य मराठी में बोलने की मांग करते हैं)

मी याबाबतीत भूमिका स्पष्ट केलेली आहे. दुष्काळी स्थिती संदर्भातील जे आदेश पारित केले जातील त्या आदेशांचे गांभीर्य त्या अधिका-यांवर निश्चितपणे राहील. त्यांचे ते कामच आहे. कोणत्याही अधिका-याने दुष्काळी परिस्थितीमध्ये रोजगार हमीची कामे काढण्यामध्ये कुचराई केली तर त्याच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. या संदर्भात आदेशही काढण्यात येतील.

प्रा. सुरेश नवले : शेतक-यांच्या मागणीनुसार शेततळी घेण्यात येतील काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : शेततळयांसाठी 6 मॉडेल्स तयार केलेली असून शेतक-यांना जे मॉडेल पाहिजे असेल ते त्यांना देण्यात येईल.

श्री. प्रकाश शेंडगे : मागील दुष्काळाच्या वेळी शेळया-मेंढ्यासाठी छावण्या उभारलेल्या नव्हत्या.

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 18:20

श्री. प्रकाश शेंडगे...

म्हणून यावेळी शेळया-मेंढया या पशुधनाचा समावेश करुन त्यांच्यासाठी स्पेशल छावण्या तयार करण्यात येणार आहेत काय ? त्याचप्रमाणे चारा डेपो सुरु करणार असाल तर शेळया-मेंढयासाठी सुध्दा स्वतंत्र डेपो सुरु करणार आहात काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, छावण्या सुरु करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा विचार आम्हाला घ्यावा लागणार आहे. कारण ते नेहमी छावण्याबद्दल बोलत असतात. आज आम्ही पशुधनासाठी चारा डेपो सुरु करण्यासंबंधी निर्णय घेतलेला आहे.शेळया-मेंढया हे प्राणी देखील पशुधनाचाच एक भाग आहे. यासंबंधीचा आम्ही आराखडा करु त्यावेळी निश्चितपणे या प्राण्यासंबंधीचा विचार करु.

**तालिका सभापती (श्री. भास्करराव जाधव )** : या विषयावरील उप प्रश्न जवळपास संपलेले आहेत. मघाशी मी एक प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नाचे मला उत्तर मिळालेले नाही. पीठासीन अधिका-यांच्या चेअरवरुन प्रश्न विचारता येत नाही. परंतु माझी आपणास विनंती आहे की, मला एक, दोन प्रश्नांचा आपल्याकडून खुलासा हवा आहे. मी मघाशी आपल्याला जो प्रश्न विचारला तो आपल्या लक्षात आलेला आहे, परंतु त्या प्रश्नाचे आपण अतिशय कौश्यल्याने उत्तर दिलेले आहे. कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्हयात दोन वर्षात एकही रोजगार हमी योजनेचा रस्ता मंजूर झ ाालेला नाही. आज आपल्याला 33 रस्ते रोहयोचे दिसता आहेत. ते सर्व रस्ते अर्धवट अवस्थेत आहेत. गेल्या पंधरवाडयात प्रत्येक मतदार संघात चार-चार, पाच-पाच रोहयोचे रस्त्याच्या कामांना मंजुरी दिली आहे. साधारणत: 18 ते 19 रोहयोच्या रस्त्यांना आपण मंजुरी दिली आहे. दिनांक 1 एप्रिल, 2008 पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अस्तित्वात आल्यामुळे आता ही रस्त्यांची अर्धवट कामे केली जाणार नाहीत असे सांगितल्यामुळे ही अपूर्ण कामे सुरुच झाली नाहीत. याचा अर्थ आपल्या या निर्णयामुळे रत्नागिरी जिल्हयात एकही काम सुरु होणार नाही. म्हणून मी मघाशी प्रश्न विचारला होता की, आपल्या यासंबंधीचा निर्णयाचा फेरविचार करण्यात येईल काय? आपण 1 लाख रुपये जवाहर रोजगार विहिरीसाठी देतो आहोत. रोहयोच्या विहिरींच्या कामासाठी निधीचे वितरणाच्या परिपत्रकात असे म्हटले आहे की, वालुकामय जमीन असेल तेथील विहिरीसाठी 70 हजार रुपये आणि जेथील जमीन लॅट्रास्टोनची असेल तेथील विहिरींसाठी 1 लाख रुपये देण्यात येतात. वालुकामयची विहीर कोणती आणि लॅट्रास्टोनची विहीर

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती....

कोणती या गोष्टीची स्पष्टता माननीय मंत्री महोदयांनी करावी. त्याचप्रमाणे आपण 1 मीटरपर्यंत सी.सी.टी. करण्यासंबंधीचा उल्लेख केला. कोकणात डोंगर खूपच उंच आहेत. त्या डोंगराचा उतार 5 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्या ठिकाणी खड्डे खोदले तर तेथील जमिनीची धूप अधिक होईल. त्यामुळे तेथे खड्डे खोदले जात नाहीत. कोकणातील चारी बाजूला सहयांद्री पर्वताचा रांगा आहेत. त्या ठिकाणच्या डोंगराच्या माथ्यांवर पाणी साठा करण्यासाठी तळी खोदण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ? त्या ठिकाणी तळी खोदली गेली तर तेथील पाण्याच्या उपयोग परक्यूलेशनसाठी निश्चितपणे होऊ शकतो व पिण्याच्या पाण्याचा देखील प्रश्न काही प्रमाणात कमी होऊ शकतो. म्हणून कोकणातील डोंगराच्या माथ्यावर तळी खोदण्याचा कार्यक्रम शासनाच्या वतीने हाती घेण्यात येईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : कोकणात रोजगार हमी योजनेच्या कामांचा अनुशेष मोठया प्रमाणात आहे ही वस्तुस्थिती आहे. कोकणात फक्त हॉल्टीकल्चरलचे काम आम्ही करु शकलेलो आहोत ही गोष्ट खरी आहे. माननीय महोदय, आपण ज्या सूचना केल्या आहे त्या सूचनांचा बाबतीत काय मार्ग काढता येईल याचा निश्चितपणे विचार केला जाईल. हा ॲक्ट 2006 मध्ये पारित केला आहे. उद्या कोणताही निर्णय करताना त्या ॲक्टचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. म्हणून मला ही बाब तपासून पहावी लागेल. कोकणाच्या बाबतीत राज्य सरकारची भूमिका सकारात्मकच राहील. रोजगार हमी योजनेच्या बाबतीत सर्व जिल्हयांना समप्रमाणात न्याय मिळावा अशी शासनाची भूमिका आहे. आपण जी सूचना केली आहे,त्याबाबतीत योग्य तो मार्ग आम्ही निश्चितपणे काढू. आपण दुसरा विहिरीच्या बाबतीत टेक्निकल प्रश्न उपस्थित केला आहे. वालुकामय जमिनीवरील विहिरी आणि लॅट्रास्टोन जमिनीवरील विहिरींची बाब निश्चितपणे तपासून घेऊ. त्यात आवश्यक त्या सुधारणा निश्चितपणे करण्यात येतील. डोगरावर तळी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, कोकणात तशा प्रकारच्या साईडस् उपलब्ध झाल्या तर त्या ठिकाणी तळी खोदण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल.

2...



ABG/ MMP/ SBT/ प्रथम श्री. शिगम 18:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी या चर्चेच्या निमित्ताने सहकार खात्याशी निगडीत शेतक-यांच्या कर्जमुक्तीचा प्रश्न उपस्थित केला होता. याच प्रस्तावाचा तो एक भाग होता. त्या प्रश्नाचे उत्तर माननीय सहकार मंत्र्यांकडून मिळाले नाही.

**तालिका सभापती** : माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांनी अतिशय खुलासेवार उत्तर दिलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर: शेतक-यांना खते न मिळणे, दुष्काळ जाहीर करणे आणि शेतक-यांवरील कर्ज माफी हे सर्व विषय एकत्र करुन हा प्रस्ताव दिला होता. या प्रस्तावावरील दोन्ही दिवसांच्या चर्चेस सहकार मंत्री आणि सहकार राज्यमंत्री उपस्थित राहिले नाहीत त्याबद्दल त्याचे अभिनंदन करतो. फक्त उत्तर देण्यासाठी सहकार राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित राहिले आहेत. या चर्चेच्या अनुषंगाने सहकार खात्यासंबंधीच्या मागण्याबाबत कोणत्याही प्रकारची दखल घेतली गेली नाही. काल आणि आजच्या चर्चेत सहकार मंत्री आणि सहकार राज्यमंत्री अनुपस्थित राहिले, आता फक्त उत्तर देण्यासाठी सहकार राज्यमंत्री उपस्थित राहिले. सहकार राज्यमंत्र्यांचे उत्तर ऐकण्याची आमची इच्छा नाही. सहकार मंत्री आणि सहकार राज्यमंत्री या विषयावरील चर्चेस उपस्थित राहिले नाहीत म्हणून आम्ही त्यांचा निषेध व्यक्त करतो आणि सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे सदस्य सभात्याग करतात. )

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणाच्या वेळी मी उपस्थित नव्हतो. परंतु सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या भाषणाच्या वेळी मी सदनात उपस्थित होतो. दोन्ही सदनामध्ये एकाच वेळी या विषयावर चर्चा झाल्यामुळे मी या सदनात उपस्थित राहू शकलो नाही. या खात्याचे कॅबिनेट मंत्री नसल्यामुळे मी खालच्या सदनात उपस्थित होतो.

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव)** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवरील अ.क्र. 7 वरील प्रस्ताव पुढील आठवडयात घेता येईल. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवरील अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 18 जुलै, 2008 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 26 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 18 जुलै,2008 रोजीच्या सकाळी
10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही